(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)

पृ.शी.: राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात पडलेला भीषण दुष्काळ, अवकाळी पाऊस व गारपीट आणि तीव्र टंचाई यामुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच अवकाळी पाऊस,गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांच्या झालेल्या हानीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट

मु.शी.: "राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात पडलेला भीषण दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट आणि तीव्र टंचाई यामुळे निर्माण झालेली परिस्थिती" या विषयावर ***सर्वश्री.धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, अमरसिंह पंडित, जयंत प्र.पाटील, शरद रणपिसे, सतिश चव्हाण, संजय दत्त, संदीप बाजोरिया, विक्रम काळे, ख्वाजा बेग, प्रकाश गजभिये, प्रा.जोगेंद्र कवाडे, राजेंद्र मुळक, अमरनाथ राजूरकर, सुभाष झांबड, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, अब्दुल्ला खान दुर्राणी, श्रीमती दिप्ती चवधरी, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, वि.प.स.*** यांचा प्रस्ताव तसेच "अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांच्या झालेल्या हानीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट" या विषयावर श्री.पांडुरंग फुंडकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.गोपीकिशन बाजोरिया, प्रा.अनिल सोले, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री विजय गिरकर, महादेव जानकर, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाले.....)

तालिका सभापती : काल दुष्काळाच्या संदर्भात सभागृहात चर्चा सुरु करण्यात आलेली आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी भाषणाला सुरुवात करावी. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी वेळेचे भान ठेऊन आपले म्हणणे थोडक्यात मांडावे अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-2

VVK/ ST/ AKN/ 10:30

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मला बोलण्यासाठी जास्त वेळ लागणार आहे, काल चार वक्त्यांनी भरपूर वेळ घेतला आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, रोटेशनप्रमाणे सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात यावी. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलण्याची संधी दिली पाहिजे. यानंतर कोणते सन्माननीय सदस्य बोलतील त्यांची नावे वाचली तर बरे होईल. यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांचा क्रमांक असावा असे मला वाटते.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे आलेली आहे. यानंतर राष्ट्रवादी पक्षातर्फे सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित बोलणार आहेत. पहिल्यांदा विरोधी पक्ष नेते बोलले, त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे बोलल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्या नंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित बोलणार आहेत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले विचार मांडले आहेत, त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना भाषण करावयाचे आहे त्याबाबत कोणताही प्रश्न नाही. शेतकरी कामगार पक्षाचे सदस्य म्हणून सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना बोलण्याची संधी दिली जाते, त्याच्यानंतर रिपब्लिकन पक्षाच्या सदस्यांना बोलण्याची संधी दिली पाहजे. त्यानंतर इतर सन्माननीय सदस्यांनी बोलावे अशी माझी विनंती आहे.

तालिका सभपती : आपणाला बोलण्याची संधी देण्यात येणार आहे. परंतु सभापती महोदयांनी जो क्रम ठरवून दिलेला आहे, त्यानुसार मी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देणार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित हे बोलणार आहेत, त्यांच्या अगोदर सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना बोलण्याची संधी द्यावी असे मला वाटते.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांना बोलण्याची संधी देण्याबाबत मला काहीही अडचण नाही. आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी भाषणाला सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात सभागृहात चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. यावेळच्या दुष्काळाबाबत चर्चा करताना मराठवाड्यात खऱ्या अर्थाने दुष्काळाची तीव्रता जास्त असून त्याची झळ सामान्य माणसांना जाणवत आहे. मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जानेवारी महिन्यानंतर होणार आहे. यासंदर्भातील नियोजन राज्य सरकार कसे करणार याचे उत्तर या चर्चेच्या निमित्ताने राज्यातील सर्व जनतेला मिळाले पाहिजे. मी मघाशी सांगितले की, मी जास्त वेळ बोलणार आहे. गेल्या तीन महिन्यापासून माझ्या पक्षाचे कार्यकर्ते मराठवाड्यात काम करीत आहेत. मराठवाड्यातील दुष्काळी भागात कार्यकर्त्यांनी कसे काम करावे याचे प्रशिक्षण आम्ही लातूर येथे घेतले आहे. लातूर येथे 500 कार्यकर्ते आम्ही महाराष्ट्रतून प्रशिक्षणासाठी जमलो होतो. दुष्काळग्रस्त भागात काम करताना आम्ही तीन टप्पे तयार केले आहेत. पहिल्या टप्प्यात पाण्याची तीव्रता नव्हती. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आम्ही एस.टी.बसच्या पासेस दिल्या आहेत. ज्यावेळी पाऊस पडला त्यावेळी तातडीने त्यांना बियाणे देण्याचे काम आम्ही केले आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची नोंद शासनाकडे योग्य प्रकारे होते किंवा नाही याची पाहणी आम्ही गावोगावी जाऊन केली आहे. 500 पैकी 200 प्रशिक्षित कार्यकर्ते मराठवाड्यात काम करीत आहेत. आमच्या पक्षाचे माजी आमदार श्री.विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली दर पंधरा दिवसांनी कार्यकर्ते व आमदार गावोगावी जात आहेत, अशा प्रकारे सर्व टीम त्या ठिकाणी काम करीत आहेत. पहिल्या टप्प्यात शासकीय योजना तळागाळातील लोकांपर्यात कशा पोहचतील याबाबत आम्ही कार्यवाही करीत आहोत. याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी दोन वेळा भेटून निवेदन दिले, आमच्या प्रशिक्षित कार्यकर्त्यांसोबत चर्चा करण्यासाठी आपण थोडा वेळ द्यावा अशी आम्ही मागणी केली होती. शासकीय योजनांची अंमलबजावणी 100 टक्के केली तर यातील 50 टक्के कामे होऊ शकतील. यामध्ये बालसुधार गृहाची योजना आहे, नरेगा योजना आहे. कृषी व सहकार खात्याच्या अनेक योजना आहेत. या योजनांची 100 टक्के अंमलबजावणी केली तर यातून भरपूर काम होऊ शकेल.

सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जुलै महिन्यात थोडा पाऊस पडला व पुन्हा पाऊस पडेल असे वाटल्यामुळे उस्मानाबाद, लातूर व बीड जिल्ह्यातील काही भागात हरभरा हे पीक घेतले जाते. म्हणून त्या ठिकाणी आम्ही महाबीजमार्फत बियाणांचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-4

VVK/ ST/ AKN/ 10:30

श्री.जयंत प्र.पाटील...

वाटप केले. सरकारने काय करायला पाहिजे हे मी सांगत नाही, प्रत्यक्षात काय करायला पाहिजे याचे आम्ही एक मॉडेल तयार करीत आहोत. ही कामे करताना आमच्या प्रशिक्षित कार्यकर्त्यांनी असे ठरवून घेतले की, या कामांची वर्तमानपत्रात किंवा टी.व्ही.वर बातमी द्यावयाची नाही. याचे कारण असे आहे की, ज्या शेतकऱ्यांना आम्ही खऱ्या अर्थाने मदत करतो त्याचे दारिद्र्य, त्याची गरिबी व त्याची हतबलता जनतेला दाखवायची नाही. आम्ही ठरविले की, आपण मदत करणार व शेतकरी टी.व्ही.वर पाहणार अशा प्रकारची प्रसिध्दी आम्ही कोठेही केलेली नाही. म्हणून आम्ही काय करतो याची आपणाला कल्पना नाही. लोकांना माहिती व्हावे म्हणून आम्ही ही कामे करीत नाहीत. प्रत्यक्षात जनतेला खरी मदत झाली पाहिजे अशी भूमिका आम्ही घेतली आहे. या ठिकाणी आम्ही वेगवेगळ्या भूमिका घेऊन 1 जानेवारीपासून महत्वाचा टप्पा सुरु करणार आहोत. मराठवाड्यात दुष्काळाची तीव्रता किती आहे, याची माहिती विरोधी पक्ष नेत्यांना आहे. त्या भागात ते राहत आहेत.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे मराठवाड्यातील त्यांच्या पक्षाच्या दौऱ्याच्या संदर्भात माहिती सांगत आहेत, त्यांनी टी.व्ही. व वर्तमानपत्रांना माहिती दिली नाही, फोटो काढले नाहीत ही बाब मला मान्य आहे. ते प्रसिध्दीपासून बाजूला आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, त्यांच्या पक्षाची संघटना कशी आहे हे मी गेल्या अनेक वर्षांपासून पाहत आहे. त्या खात्याचे मंत्री माननीय श्री. एकनाथराव खडसे आहेत, सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपल्या टीमचा अहवाल आपण शासनाकडे दिला तर त्या अहवालाच्या माध्यमातून तेथील सरकारी अधिकारी किंवा सरकारच्या माध्यमातून त्यांची अंमलबजावणी करण्यास उपयुक्त होईल. आपण प्रसिध्दी दिली नाही हे मान्य आहे, परंतु प्रत्यक्ष काम होण्यासाठी शासनाला याची निश्चित मदत होईल. सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांच्या संदर्भात बियाणे, पिण्याचे पाणी, जलयुक्त शिवार असे अत्यंत महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, अधिवेशन संपण्यापूर्वी सदर अहवाल आपण सरकारला दिला तर त्यासंदर्भात कार्यवाही करता येईल व योग्य माणसापर्यंत ती मदत पोहचेल असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-5

VVK/ ST/ AKN/ 10:30

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी मंत्री महोदय श्री.गिरीष बापट यांना धन्यवाद देतो. रायगड जिल्ह्यात खूप मोठ्या योजना राबविण्यात येत आहेत. त्या ठिकणी आमचे बरेच कार्यकर्ते वेगवेगळे उद्योग करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही पक्षाचा आदेश काढून असे ठरविले की, 15 दिवसातून एका ठिकाणी एका व्यक्तीने पोकलॅन्ड मशीन द्यावयाची. पैठण तालुक्यात नाले खोल करण्याचे काम आम्ही केले आहे.

...B-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सध्या चालू आहे. मी फोटो देखील आणले आहेत. त्या ठिकाणी गावकऱ्यांनी डिझेल उपलब्ध करुन दिले. त्यांचे म्हणणे होते की, आम्ही समर्थ आहोत, तुम्ही मशिनरी उपलब्ध करुन द्या, आम्ही डिझेल उपलब्ध करुन देऊ. काही ठिकाणी डिझेलसह जेसीबी यंत्र उपलब्ध करुन देण्याचे काम आम्ही केले आहे.

सभापती महोदय, उस्मानाबाद जिल्हयामध्ये बियाणे वाटप करण्याच्या संदर्भात प्रशिक्षण सुरु असताना पाऊस पडला. त्यावेळी तातडीने महाबीजकडून बियाणे उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली. त्यांनी बियाणे पुरविण्यास नकार दिला. महाबीजचे मुख्यालय अकोला येथे आहे. मी स्वत: आमदार या नात्याने महाबीज कंपनीच्या प्रतिनिधींशी फोनवरुन बोललो. त्यांनी बियाणे पुरविण्याच्या संदर्भात वरिष्ठांशी चर्चा करावी लागेल असे सांगितले. त्यानंतर मी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांशी फोनवरुन बोललो. माननीय मुख्यमंत्र्यांनी तातडीने आदेश दिल्यानंतर त्यांनी बियाणे उपलब्ध करुन दिले. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, ज्या संस्था सक्षम आहेत, ज्या ग्रामपंचायती सक्षम आहेत त्यांना डायरेक्ट मदत करण्याच्या संदर्भात शासनाने आदेश दिले पाहिजेत. ज्या ग्रामपंचायतीचे बजेट 5 ते 10 कोटी रुपयांचे आहे, अशा ग्रामपंचायती डायरेक्ट काम करण्यास तयार आहेत. शासनाने त्यांचे स्वतंत्र ऑडिट करावे, परंतु अशा यंत्रणेकडे मदत यायला बराच कालावधी लागतो, त्याबाबत शासनाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, पनवेल बाजार समितीमार्फत आम्ही 31 लाख रुपयांचे बियाणे वाटप करण्याचा निर्णय घेतला. आम्ही महाबीज कंपनीला चेकद्वारे पेमेंट केले. माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, तुम्ही पेमेंट द्या, आम्ही परवानगी देऊ. चार महिने उलटून गेले, अद्याप आम्हाला परवानगी मिळालेली नाही. बाजार समितीच्या सचिवांचे म्हणणे आहे की, अद्याप परवानगी प्राप्त झालेली नाही. यावरुन शासकीय यंत्रणा किती उदासीन आहे हे स्पष्ट होते. आम्ही खाजगी दुकानातून किंवा एजन्सीकडून बियाणे विकत घेतले नाही. शासनाच्या अंगिकृत उपक्रमाकडून म्हणजे महाबीजकडून बियाणे घेत असताना अद्याप आम्हाला परवानगी का मिळत नाही? सरकारी यंत्रणा कशाप्रकारे काम करते हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, मी माननीय महसूल मंत्र्यांच्या एक महत्वाची गोष्ट लक्षात आणून देत आहे. मागील 15 ते 20 वर्षात शासनाकडून जी विविध पॅकेजेस घोषित झाली, त्यातून मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा अगदी माफक फायदा झालेला आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील शेतकऱ्यांना बऱ्यापैकी फायदा मिळाला. मराठवाड्यातील शेतकऱ्यांकडील जमीनधारणा जास्त आहे. मराठवाड्यामध्ये 5 एकरपेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे. मराठवाड्यासाठी खास बाब म्हणून योजनेचे सूत्र बदलण्याची मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो. मराठवाड्यातील अधिक जमीनधारणा असलेल्या शेतकऱ्यांना वेगवेगळया पॅकेजेसचा फायदा मिळाला पाहिजे, त्यासाठी मराठवाड्याला वेगळे सूत्र लागू करावे लागेल. आतापर्यंत घोषित झालेल्या पॅकेजेसचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे मराठवाड्यातील शेतकरी पॅकेजच्या लाभापासून वंचित झालेले आहेत. त्यांना मदत कशी देता येईल, या संदर्भात शासनाने लक्ष केंद्रीत करावे आणि त्यांना दिलासा द्यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, लातूर व उस्मानाबाद जिल्हे तसेच बीड जिल्हयाचा काही भाग या ठिकाणी मोठया प्रमाणात डाळीचे उत्पादन घेतले जाते. तेथील शेतकऱ्यांची खाजगी व्यापाऱ्यांकडून लूट केली जात आहे. या देशात डाळी व कडधान्याचे उत्पादन कमी झाल्याने परदेशातून डाळ आयात करावी लागते. डाळ आयात करण्यासाठी केंद्र सरकारकडून सबसिडी दिली जाते. यापेक्षा ज्या भागामध्ये शेतकरी डाळीचे उत्पादन घेतात, त्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने प्रोत्साहनात्मक योजना राबविण्यात आली तर डाळ आयात करावी लागणार नाही. या डाळीच्या पीक पध्दतीने बदल करण्याची मी मागणी करतो. जेणेकरुन डाळीचे उत्पादन मुबलक प्रमाणात होऊ शकते. नागपूर परिसरात मोठया प्रमाणात दर्जेदार डाळीचे उत्पादन होते. मी रायगड जिल्हयात 'रायगड बाजार' या नावाने डिपार्टमेंट स्टोअर्सच्या शाखा सुरु केल्या आहेत. या बाजाराच्या माध्यमातून आम्ही मोठया प्रमाणात लातूर जिल्हयातील डाळ खरेदी करतो, कारण तेथील डाळीचा दर्जा चांगला आहे. परंतु पुरेसे उत्पादन होत नसल्यामुळे आम्हाला आयात डाळीचा वापर करावा लागतो. म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझी शासनाला विनंती आहे की, कृषी खात्यामार्फत डाळीचे उत्पादन वाढण्याच्या दृष्टीने प्रोत्साहनात्मक योजना राबविण्याचा विचार करण्यात यावा.

...3...

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) B.3

SGB/ AKN/ ST/ 10:40

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार यांनी महाराष्ट्रात फळबाग लागवड योजना ही क्रांतीकारक योजना सुरु केली. त्याचा परिणाम असा झाला की, कोकणामध्ये आंब्याचे उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढले. या श्रेयामागे माननीय श्री.शरद पवार यांची दूरदृष्टी आहे असे मला वाटते. सिंधुदुर्ग जिल्हयातील मोठया प्रमाणात काजू आणि आंबा पीक घेतले जाते. डोंगरी भागात लोकांनी मोठया प्रमाणात काजू आणि आंबा या फळझाडांची लागवड केली आहे. त्याच धर्तीवर डाळीचे उत्पादन वाढण्यासाठी कृषी विभागामार्फत योजना राबवावी अशी मी शासनाला विनंती करतो. मी कोणत्याही प्रकारची टीका करणार नाही. शासकीय यंत्रणेमार्फत प्रॅक्टिकल काम झाले पाहिजे एवढीच आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने नुकताच एक जीआर काढला आहे. ज्या भागात 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आहे, त्या भागातील शेतकऱ्यांना किमान 6000 रुपये आर्थिक मदत दिली पाहिजे असे त्या आदेशात म्हटले आहे. या आदेशाची अद्याप आपल्या राज्यात अंमलबजावणी झालेली नाही. किमान 6000 रुपये आर्थिक मदत देण्याचा नियम जारी केलेला आहे. मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात या संदर्भात खुलासा करावा अशी मी विनंती करतो. या आदेशाची अंमलबजावणी करावयाची झाल्यास 7000 कोटी रुपये लागणार आहेत. हा आदेश सक्तीचा आहे. या शिवाय शासनाकडून वेगळी मदत कोणती दिली जाणार आहे हेही सभागृहाला कळले पाहिजे. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना वेगळी कोणती मदत मिळणार आहे हे उत्तराच्या भाषणात स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, आज आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची योग्यप्रकारे नोंद केली जात नाही हे मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो. माझ्याकडे आकडेवारी उपलब्ध आहे. दिनांक 5 जानेवारी, 2015 पर्यंत मराठवाड्यात 660 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. त्यापैकी जवळजवळ 300 आत्महत्याग्रस्त कुटुंबांपर्यंत आमची यंत्रणा पोहोचली. बोगस आत्महत्या किती आहेत,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली की मद्यप्राशन करून आत्महत्या केली या संदर्भातील सविस्तर अहवाल मी शासनाकडे सुपूर्द करायला तयार आहे.

सी.1.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

11 सप्टेंबर पर्यंत ही संख्या 694 वर गेलेली आहे. 4 डिसेंबर 2015 पर्यंत ही संख्या 1024 इतकी झाली आहे. माझ्याकडे जिल्हा निहाय आकडेवारी आहे. सन 2014 मध्ये औरंगाबादमध्ये 40शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत तर दिनांक 5 डिसेंबर 2015 पर्यंत 131 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. जालना जिल्ह्यामध्ये सन 2014 मध्ये 22 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. सन 2015 मध्ये ही संख्या 65 इतकी झाली आहे. परभणीमध्ये सन 2014 मध्ये 49 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, तर सन 2015 मध्ये 35 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हिंगोलीमध्ये सन 2014 मध्ये 29 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, तर सन 2015 मध्ये 35 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. नांदेड जिल्ह्यामध्ये सन 2014 मध्ये 104 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, तर सन 2015 मध्ये 177 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. सन 2014 मध्ये बीड मध्ये 122 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, तर 2015 मध्ये 286 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. लातूर जिल्ह्यामध्ये सन 2014 मध्ये 34 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सन 2015 मध्ये 91 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सन 2014 मध्ये 54 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या, तर सन 2015 मध्ये 154 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही आकडेवारी सरकारची असून ती अधिकृत आहे. प्रत्येक तहसील कार्यालयात जाऊन आम्ही ही माहिती मिळविलेली आहे. त्यात थोडी वाढ होऊ शकते पण ती कमी होऊ शकत नाही. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना कशा प्रकारे मदत करता येईल हे बघण्याचे काम आपण करायला पाहिजे. सरकार मदत करायची ती करेल. पण आम्ही प्रत्येक आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला डायरेक्ट मदत करण्याचे ठरविले आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पत्नीने सांगितले की, साहेब, आम्हाला रूपये वीस हजार द्यावेत, मला गाय घेऊन द्यावी. त्याने माझे कुटुंब मी चालविन. कोणी आम्हाला सांगितले की, आमदार साहेब आपण आलात आम्हाला छोटेसे दुकान काढून देण्यासाठी वीस ते पंचवीस हजार रूपये लागतील. असे केले तर मी माझ्या मुला-बाळांना शिकवू शकेन. त्या पद्धतीने आम्ही त्यांना मदत केली आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.जयंत पाटील....

सभापती महोदय, माझ्या गावचे माझे सहकारी श्री.अनिल पाटील गेले दोन महिने बीड जिल्ह्यामध्ये आहेत. आयपीसीएल मध्ये ते नोकरी करतात. त्यांना आम्ही तीन महिने रजा घेण्यास सांगितले आहे. ते स्वत: गावोगावी जाऊन हा संपूर्ण सर्व्हे करीत आहेत. हे सर्व करीत असताना बोगस नोंद कुठे होत आहे याचा देखील आम्ही उल्लेख केलेला आहे. तो पण रिपोर्ट आम्ही आपणास देतो. आज 1024आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना मदत पाहिजे आहे. त्यामुळे आज आम्ही एक हजार दानशूर व्यक्तींचा आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना मदत करण्यासाठी शोध घेत आहोत किंवा आमच्याच जवळचे जे कार्यकर्ते आहेत त्यांना मदत करण्याचे अनिवार्य करीत आहोत. प्रत्येकाने तीस ते चाळीस हजार रूपये मदत केली पाहिजे असे आम्ही त्यांना सांगितले आहे. त्यानुसार आम्ही पुढच्या टप्प्यामध्ये काम करीत आहोत. आपण जेव्हा घटनास्थळी प्रत्यक्ष जातो तेव्हा ताफा घेऊन जातो. आपल्या सोबत टीव्ही कॅमेरा असतो, पत्रकार असतात. दौरा संपल्यानंतर त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाकडे मागाहून कोणीही बघत नाही ही वस्तुस्थिती आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. आपण येथे बोलतो आणि मग नंतर विसरून जातो. आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना मदत करण्याचे नियोजन माझ्या सारखा एका छोट्या पक्षाचा छोटा कार्यकर्ता करतो. आपण ठरविले तर निश्चितपणे वेगळी भूमिका घेऊन काम करू शकता.

मी येथे काम करीत असताना मौजे चंदनसावरगाव, ता.केज. जिल्हा बीड येथे गेलो होतो. श्री.ज्ञानेश्वर गुलाब तपसे या इमसमाने आत्महत्या केली. त्याला शासनाची एकही मदत मिळालेली नाही. त्याला आम्ही मदत करण्याचा प्रयत्न केला. दिनांक 18.10.2015 रोजी पाटोदा तालुक्यातील श्री.बिभिषण जायभान यांच्या विहिरीच्या बांधकामांचे पैसे अजून पर्यंत मिळालेले नाहीत. श्री.जायभान यांनी तहसील कार्यालयाकडे कामाची लेखी मागणी करून देखील त्यांना अजून पर्यंत काम दिलेले नाही. त्यामुळे त्यांनी आत्महत्या केली. श्री.जायभान यांनी तहसीलदार यांना लेखी पत्र लिहिले आहे की, विहिरीच्या बांधकामाचे पैसे द्यावेत. त्याला पैसे दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाहीत. त्याने सांगितले की, आपल्याकडे पैसे नसतील तर मग मला रोजगार हमी योजनेवर काम द्यावे. ते पण देऊ शकलेले नाही. त्यामुळे त्याने आत्महत्या केली आहे. त्या कुटुंबाला देखील आम्ही मदत केली आहे. हे सर्व लेखी स्वरूपात रेकॉर्डवर आलेले आहे. त्याने लेखी तक्रार केली आहे. मी त्याचे सर्व कागदपत्र आपल्याकडे सुपूर्द करतो. काही जण म्हणतात की, खोटी आत्महत्या केल्याचे दाखविले जाते. प्रत्यक्ष गेल्यानंतर वेगळी भूमिका होते. दिनांक 26.10.2015 रोजी श्री.गणपत चिमाजी नागरगोजे यांनी गळफास लावून आत्महत्या केली आहे. त्याची मुलगी बारावी सायन्समध्ये शिकत आहे. आपले शिक्षण अर्धवट सोडून देण्याची तयारी तिने दर्शविली आहे. आम्ही तिचे शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी घेतली आहे. ती जबाबदारी राज्य शासनाने घेतलेली नाही. अशा कुटुंबियांना काही तरी ठोस मदत मिळाली पाहिजे. जे खरोखर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंब आहे त्यांना मदत केली पाहिजे. तसेच शासनाच्या ज्या विविध योजना आहेत त्यामध्ये ते बसतात काय, जे अल्पभूधारक आहेत, त्यांना आपण वेगवेगळ्या योजनांतून काय मदत करू शकतो हे पाहणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सर्व काही मुंबई-पुण्यामध्ये आहे. आत्महत्याग्रस्त एक हजार शेतकऱ्यांना आपण खऱ्या अर्थाने मदत करण्याचे नियोजन केले तर त्यांना सहज मदत होऊ शकते. मौजे सुकाळी तालकुा केज येथील श्री.दादासाहेब गायकवाड यांनी दिनांक 2 जुलै 2015 रोजी आत्महत्या केली. त्यांची पण मुलगी बारावी सायन्समध्ये शिकत आहे. माझ्याकडे बरीच नावे आहेत. आता सभागृहात सन्माननीय मंत्री श्री.रावते साहेब असावयास पाहिजे होते. श्री.रावते साहेब विरोधी पक्षाच्या बाकावर असताना मोठी आकडेवारी देऊन तीन तीन तास सभागृहामध्ये भाषण करीत होते. त्यामुळे मी जरा माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांचा कित्ता गिरविण्याचा प्रयत्न करतो. श्री.रावतेसाहेब आपण या सभागृहात थोडे उशिरा आलात. आम्ही या सभागृहात 16 ते 20 वर्षे घालविली आहेत. विरोधी पक्षात असताना श्री.रावते साहेब अत्यंत बारकाईने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

सांगत असत की, इकडे गेलो, तिकडे गेलो. आता ते का जात नाही हेच मला कळत नाही. ते मला म्हणाले की, मी गेलो होतो. ते म्हणाले की, दिवाळीमध्ये मी तेथे गेलो होतो. मी देखील दिवाळी आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या सोबत घालविली आहे. नव्हे आमच्या कार्यकर्त्यांना तेथे दिवाळी साजरी करण्याचे अनिवार्य केले. दिवाळीची पहिली पहाट आम्ही मराठवाड्यामध्ये साजरी केली व आम्ही आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना मदत केली. प्रत्येक आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आम्ही भेट वस्तू दिल्या आहेत. त्यावरून देखील तेथे वाद झाला होता.

सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. आपण मला बोलण्यासाठी अधिक वेळ द्यावा.

उप सभापती : आपण भाषण करीत आहात म्हणून मी चेअरवर आलेलो आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, वेगवेगळ्या माध्यमातून काम केले तर वेगळ्या पद्धतीने काम होऊ शकते. श्री.पोटे-पाटील यांच्यामध्ये 15 ते 20 शेतकऱ्यांना मदत करण्याची ताकद आहे. आपण हे प्रत्येकाने ठरविले पाहिजे. मौजे पिंपळादेवी, जिल्हा बीड येथील श्री.अशोक प्रल्हाद घुमळे हा एमबीबीएसचे शिक्षण घेत आहे. गरीबीमुळे त्याचे शिक्षण थांबू नये म्हणून त्याला आर्थिक मदतीची गरज आहे. तो विदर्भात शिकत आहे. त्याला पाच ते दहा हजार रूपये इतकी फी द्यायची आहे. येथे आपलेच कॉलेज आहे. मी श्री.पोटे-पाटील यांना विनंती करतो की, त्याला मदत करण्याचा आपण निश्चितपणे विचार करावा.

D-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री. प्रविण पोटे पाटील यांनी वैयक्तिक मदत केली तर ते किमान 15 ते 20 शेतकऱ्यांना डायरेक्ट मदत करु शकतात एवढी त्यांची ताकद आहे. प्रत्येकाने ठरवले तर शेतकऱ्यांना आपण चांगल्या प्रकारे हातभार लावू शकतो. बीड जिल्हयातील मौजे पिंपळादेवी येथील श्री.अशोक प्रल्हाद ठोंबरे हे या वर्षी एमबीबीएसचे शिक्षण घेत आहेत. गरिबीमुळे त्यांचे शिक्षण अर्ध्यावर थांबू नये यासाठी त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. या विद्यार्थ्याच्या कॉलेजची 5-10 हजार रुपयांची फी मंत्री महोदयांनी दिली तर मराठवाडयातील एक विद्यार्थी डॉक्टर होऊ शकतो. मंत्री महोदयांचे वैद्यकीय कॉलेज असून त्यांनी या विद्यार्थ्याला फी भरण्याच्या कामी मदत करावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या शब्दाला फार किंमत आहे. त्यांनी माझ्या सारख्या माणसाकडे शब्द टाकला तर समोरची व्यक्ती आपला शब्द मोडू शकणार नाही. त्यामुळे आपण 1000 लोक सहज तयार करु शकता. आपल्या शब्दाला कोणी नाही म्हणणार नाही.

सभापती महोदय, मौजे पिंपळादेवी येथील कु.शुभांगी गायकवाड ही मागासवर्गीय विद्यार्थिनी असून ती एमबीबीएसचे शिक्षण घेत असून तिला 98 टक्के गुण मिळालेले आहेत. या विद्यार्थीनींने सांगितले की, मला फीसाठी महिन्याला 4 हजार रुपये दिले तर मी माझे वैद्यकीय शिक्षण पूर्ण करु शकेन. एवढे सांगताच आमचे सन्माननीय सदस्य श्री.विवेक पाटील साहेबांनी ताबडतोब चेक लिहून दिला. आम्ही ज्या पध्दतीने दुष्काळग्रस्त मराठवाडयात काम करीत आहोत तसे काम राज्य शासन देखील करु शकते त्यामुळे यासंदर्भातील प्लॅनिंग राज्यशासनाने करण्याची आवश्यकता आहे. माझ्याकडे बरीच आकडेवारी आहे परंतु वेळ कमी असल्याची मला माहिती आहे.

सभापती महोदय, ही चर्चा गांभीर्याने व्हावी अशी माझी अपेक्षा आहे. मी आणि माझी टिम गेल्या 3-4 महिन्यापासून मराठवाडयात काम करीत आहे. या ठिकाणी मी कोकणाच्या विषयासंदर्भात बोलणार नाही. कोकणात सुध्दा वेगळे प्रश्न आहेत. शेतीमध्ये समुद्राचे पाणी येते त्यामुळे आमच्या शेतकऱ्याचे अतोनात नुकसान होत असते. पिकलेली शेती समुद्राच्या पाण्यामुळे वाया जात आहे. परंतु कोकणातील परिस्थितीपेक्षा मराठवाडयाची तीव्रता अधिक आहे. मराठवाडयात फार वेगळी परिस्थिती आहे. मी विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे यांना विनंती करु

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

इच्छितो की, तुम्ही पावसाळा सुरु होईपर्यंत मराठवाडा सोडू नका. उर्वरित भागाकडे लक्ष देण्यासाठी बरेच सन्माननीय सदस्य आहेत. पाऊस पडेपर्यंत मराठवाडयात वेगळे आव्हान आपल्यासाठी राहणार आहे. मराठवाडयात आपल्याला वेगवेगळया योजना कराव्या लागणार आहेत.

सभापती महोदय, या शासनाने मराठवाडयातील जलसंधारणाची योजना बंद केलेली आहे. दि.4 ऑक्टोबर, 2015 रोजी मराठवाडयातील जलसंधारण योजना बंद करण्याचा जीआर या शासनाने काढलेला आहे. रोजगार हमी योजनेतून जलसंधारणाच्या योजना राबविल्या जातात परंतु ज्या भागात दुष्काळ आहे, पाण्याची गंभीर परिस्थिती आहे अशा मराठवाडयात जलसंधारणाची कामे बंद करण्यात आलेली आहेत. मराठवाडा सोडून उर्वरित महाराष्ट्रात जलसंधारणाची कामे सुरु आहेत. मराठवाडयाच्या संदर्भात संपूर्ण माहिती मी आकडेवारी आणि पुराव्यानिशी आणलेली आहे. मराठवाडयात माझे कार्यकर्ते प्रत्यक्ष काम करीत आहेत.

सभापती महोदय, मागच्या वर्षापर्यंत माझ्या शेजारी बसून सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब रोज किती आत्महत्या झाल्या आहेत त्याची माहिती देत होते. परंतु आज शासनामध्ये नेमके काय चालू आहे, ही आकडेवारी आता कोठे गेली आहे ? दुष्काळी भागात योजना सुरु करण्यासाठी खऱ्या अर्थाने शासनाकडून गती दिली जात नाही. मराठवाडयात आतापर्यंत ज्या ज्या योजनेतून कामे झालेली आहते त्या सर्व योजनांचे पेमेंट ताबडतोब झाले पाहिजे अशी माझी या चर्चेच्या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ आहे याची मला कल्पना नव्हती. त्यामुळे मराठवाडयात खऱ्या अर्थाने जलसंधारणाच्या कामाला गती मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, कोकणापासून पावसाला सुरुवात होते आणि नंतर हळू हळू शेवटच्या टप्प्यात तो मराठवाडयात दाखल होतो. मराठवाडयातील पाण्याचे समन्याय वाटप झाले तरच मराठवाडयातील दुष्काळ संपणार आहे. जोपर्यंत मराठवाडयाला समन्याय पाणी वाटप होत नाही तोपर्यंत मराठवाडयाची परिस्थिती सुधारु शकणार नाही. समन्याय पाणी वाटपाच्या संदर्भात देशात आणि राज्यात कायदा आहे. परंतु मराठवाडयाच्या संदर्भात समन्याय पाणी वाटप होत नाही. जे पाणी नाशिक आणि नगरला मिळते ते पाणी नांदेडपर्यंत मिळाले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

मराठवाडयाचे पाणी नाशिकचे नेते सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव आणि सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले हे राज्याचे नेते असून ते मराठवाडयाचे पाणी अडवित आहेत. त्यामुळे मराठवाडयाच्या पाण्याच्या संदर्भातील भूमिका आपण बदलविण्याची आवश्यकता आहे. आज मराठवाडयावर पाण्याच्या संदर्भात फार मोठा अन्याय होतो आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना हे शासन काय देणार आहे याची आम्हाला कल्पना नाही परंतु मराठवाडयातील शेतकऱ्यांसाठी या शासनाने वेगळे पॅकेज देण्याची आवश्यकता आहे. खासबाब म्हणून मराठवाडयाच्या शेतकऱ्यांच्या संदर्भात शासनाने वेगळी भूमिका घेण्याची आवश्यकता आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील मराठवाडयातील दुष्काळाच्या संदर्भात माहिती देत आहेत. परंतु मी त्यांना विनंती करु इच्छितो की, नाशिककर आणि नगरकर जे काही पाणी अडवित आहेत ते खरोखर अडवित अहोत. आज मराठवाडयातील शेतकरी ज्या प्रमाणे उद्ध्वस्त झालेला आहे तशाच पध्दतीने आमच्या आमच्या भागातील शेतकरी आज उद्ध्वस्त होत आहे.(अडथळा)

उप सभापती : आपली लुटूपुटूची लढाई सभागृहाला अभिप्रेत असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपल्या राज्यात समन्याय पाणी वाटपाच्या संदर्भात कायदा आहे त्यामुळे आपल्या राज्यात समन्याय पाणी वाटप झाले पाहिजे. जर एक ग्लास पास पाणी असेल तर ते चार लोकांनी प्याले पाहिजे. मी फक्त पाणी वाटपाच्या समन्याय पध्दतीच्या संदर्भात विचार मांडत आहे. कृष्णेच्या पाणी वाटपाच्या संदर्भात आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्र राज्य यांचा एक लवाद आहे. आता आंध्र प्रदेशामध्ये नवीन राज्याची निर्मिती झालेली आहे. परंतु हा विषय नव्याने रिओपन करता येत नाही असे मा.न्यायालयाने महाराष्ट्राच्या बाजूने परवा निर्णय देताना सांगितले आहे. (अडथळा)नाशिकमध्ये आमचेही सोयरे राहतात. आमचे सुध्दा नाशिकशी संबंध आहेत. (अडथळा)

E-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

त्या ठिकाणी असलेला भोई समाज हा एका विशिष्ट पक्षाचा नाही. तो समाज सर्वपक्षीय आहे. आम्ही त्या भागाचा दौरा केला असता त्यांनी सांगितले की, आम्हाला काम मिळत नाही. या भागात बाकीचे व्यापारीच काम करीत आहेत. सभापती महोदय, मी आपल्या दालनामध्ये येऊन या विषयावर सविस्तर चर्चा करीन.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यात धारूर तालुक्यात देवना गाव आहे. त्या गावातील 32 वर्षीय भिमा मुरलीधर जाधव या शेतकऱ्याने कर्जाला कंटाळून आत्महत्या केली. कृषी अधिकारी श्री.शिरनारे त्या शेतकऱ्याच्या शेतीचा पंचनामा करण्यासाठी निघाले होते. परंतु त्याच दरम्यान त्या शेतकऱ्याने शिराळे गावी गळफास घेऊन आत्महत्या केली. श्री.उत्तेश्वर रंगनाथ जगताप हा माझ्या पक्षाचा कार्यकर्ता आहे. त्यांनी या व्यक्तीची माहिती मिळवून त्याच्या कुटुंबीयांना मदत करण्याचा प्रयत्न केला. या निमित्ताने माझी विनंती आहे की, आत्महत्या केलेल्या जाधव कुटुंबीयांना शासनाने खऱ्या अर्थाने मदत दिली पाहिजे.

सभापती महोदय, मी या प्रस्तावावर केवळ 25 टक्केच बोललो आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितले की, या प्रस्तावावरील चर्चेला किती मर्यादा आहेत. ही बाब मला सुध्दा कळते. या प्रस्तावावरील चर्चेवर बोलताना मी बरीचशी कागदपत्रे पुराव्यानिशी आणलेली आहेत. परंतु वेळेची मर्यादा लक्षात घेता अनेक विषय मांडता येत नसले तरी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी किंवा अन्य आयुधांच्या माधयमातून जेव्हा संधी मिळेल तेव्हा ते मुद्दे मी मांडेन.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य सर्वश्री अमरसिंह पंडित आणि सतीश चव्हाण यांना सांगू इच्छितो की, आम्ही कधीही शेतकऱ्यांना त्यांचा पक्ष कोणता हे विचारत नाही. आमचा उद्देश केवळ शेतकऱ्यांना मदत करण्याचा असतो. संकटामध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकार नेमकी काय मदत देणार आहे हे मला माहीत नाही. परंतु या राज्यामध्ये काही जागरूक लोक, एनजीओ, उद्योजक आणि कार्यकर्ते आहेत. ते नेहमीच शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्यास तयार असतात. हे खरे असले तरी मी मागणी करतो की, शेतकऱ्यांना विविध संस्थांकडून जी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मदत करण्यात येते त्याची मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी केली जात असल्यामुळे याला प्रतिबंध

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) F-2

SJB/ ST/ AKN/ 11:20

श्री.जयंत प्र.पाटील....

घालण्यासाठी राज्य सरकारने वेगळा कायदा केला पाहिजे. ज्यांना मदत करावयाची आहे त्यांना टी.व्ही. चॅनेल्सवर आणता कामा नये, त्या विषयी वर्तमानपत्रामध्ये बातमी छापता कामा नये. अशा प्रकारे प्रसिध्दी करुन एकप्रकारे आत्महत्याग्रस्त कुटुंबांचे धिंडवडे काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे या प्रकाराला प्रतिबंध घालण्यासाठी राज्य सरकारने कायदा केला पाहिजे, अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो. ज्यांना शेतकऱ्यांना मदत करावयाची असेल त्याने प्रसिध्दी न करता ती मनापासून केली पाहिजे. या चर्चेच्या निमित्ताने मी अनेक मागण्या केल्या आहेत.

सभापती महोदय, आत्महत्याग्रस्त भागातील शेतकऱ्यांचा पुन्हा सर्व्हे केला पहिजे. तसेच त्या भागातील शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून दिलासा मिळाला पाहिजे. या सर्व बाबींचा विचार करता राज्य सरकारने एक वेगळे धोरण तयार केले पाहिजे. राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याची विरोधी पक्षाची प्रमुख मागणी होती. राज्यातील शेतकऱ्यांना पूर्णत: कर्जमुक्त करण्याची मागणी सत्तेमध्ये असलेला शिवसेना हा मित्र पक्ष करीत आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे या सुध्दा तीच मागणी करीत आहे. त्यामुळे त्यांची मागणी सरकारने मान्य करावी. जर त्यांच्या मागणीने या राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली अशी घोषणा राज्य सरकारने केली तर त्यास आमची काहीही हरकत राहणार नाही. त्यामुळे या प्रस्तावावरील चर्चेच्या उत्तराच्या शेवटी माननीय मंत्र्यांनी शेतकऱ्यांना पूर्णत: कर्जमाफी देण्याची घोषणा करावी एवढीच विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) : आता सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आता माझा क्रमांक आहे. काल या प्रस्तावावरील चर्चेची सुरुवात माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी केली. त्यानंतर इतर सन्माननीय सदस्य बोलले व एक राऊंड पूर्ण झाला. त्यामुळे नियमानुसार आपण आता मला संधी द्यावयास पाहिजे. काल मी विचारले असता आपण सांगितले होते की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्या भाषणानंतर तुम्हाला संधी देण्यात येईल. आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचे भाषण झाल्यामुळे आपण मला संधी द्यावयास पाहिजे.

तालिका सभापती : काल माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांच्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांची भाषणे झाली. आज सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचे भाषण झाले. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांचा क्रमांक आहे. काँग्रेस पक्षाच्या वतीने सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना सुध्दा संधी देण्यात येईल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, काँग्रेस पक्षाकडून सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे व ॲड.रामहरी रूपनवर यांना संधी द्यावी.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांच्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना संधी देण्यात येईल. काँग्रेस पक्षातर्फे सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना संधी देण्यात येईल. त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष अशा क्रमाक्रमाने सन्माननीय सदस्यांना संधी देण्यात येईल.

आता सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी आपण मला संधी दिल्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, आम्ही असे समजत होतो की, दुष्काळ हा केवळ मराठवाड्याच्या पाचवीला पुजलेला आहे की काय ? परंतु आता कळून चुकले की, ही भयावह परिस्थिती केवळ मराठवाड्यापुरती नाही तर उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग आणि मध्य महाराष्ट्रात सुध्दा आहे. या दुष्काळाचे संकट चहू बाजूने पहावयास मिळत आहे. महोदय, दुष्काळ हे मानवनिर्मित संकट नाही. दुष्काळ हे मानवनिर्मित संकट आहे असे कोणी म्हटले तर ते राजकीय हेतूने प्रेरित होऊन बोलतात असा रंग दिला जाईल असे माझे व्यक्तिगत मत आहे. माझ्या अगोदरच्या अनेक वक्त्यांनी मराठवाड्यात एकूण आत्महत्या 1085 किंवा 1100 झाल्याचे सांगितले. परंतु मराठवाड्यातील गावांची टक्केवारी बघितली तर, राज्य सरकारकडून 8325 गावांमध्ये 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी जाहीर करण्यात आलेली आहे. मराठवाड्यामध्ये एकूण गावांची संख्या 8325 आहे. त्यामुळे मराठवाड्यातील एकही गाव शिल्लक न ठेवता सर्वच्या सर्व 8325 गावांमध्ये 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असल्याचे घोषित केलेले आहे. त्यामुळे मराठवाड्यात अतिशय भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, माझ्या भाषणापूर्वी काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मराठवाड्यातील पाणी हे सिंचनासाठी वापरले जात आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी पिण्यासाठी पाणी नाही, मग सिंचनासाठी पाणी वापरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. शेतकऱ्यांनी केवळ नापिकीमुळे आत्महत्या केलेल्या नाहीत. शेती पिकली नाही, शेती उत्पादन आले नाही म्हणून शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले आणि माझ्या भाषणानंतर सुध्दा अनेक जण हेच सांगतील. परंतु आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांची काही उदाहरणे किती परिणामकारक ठरू शकतात हे मी सभागृहाच्या नम्रपणे निदर्शनास आणून देतो. मराठवाड्याच्या लातूर जिल्ह्यातील एका विद्यार्थीनीच्या घरची परिस्थिती हलाखिची असल्यामुळे तिने आत्महत्या केली. आपले वडील बसच्या पाससाठी लागणारे 260 रुपये देऊ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) F-5

SJB/ ST/ AKN/ 11:20

श्री.अमरसिंह पंडित....

शकत नाही, किंबहुना मी वडिलांकडे एवढी रक्कम मागू शकत नाही म्हणून त्या मुलीने आत्महत्या केली. बीड जिल्ह्याच्या भाटेपुरी गावातील कुटुंबातील मुलाने त्याच्यावर एक रुपयाचे कर्ज नसताना सुध्दा आत्महत्या केली. तो मुलगा नव्याने कारभारी म्हणून कामास लागला होता. तो आपला संसार नव्याने सांभाळू लागला होता. त्याचे लग्न होऊन दोन वर्षे झाले होते. संसार सांभाळत असताना बहिणी लग्णाच्या वयाच्या झाल्या. त्या मुलाला या वर्षीच्या शेतीच्या उत्पन्नातून बहिणीचे लग्न आणि मुलाबाळांचे शिक्षण करावयाचे होते. पण शेतीतून येणारे उत्पन्न बघता आपल्या पदरात काही पडणार नाही आणि स्टेट बँक ऑफ इंडियाकडून घेतलेले कर्ज फेडता येणार नाही म्हणून त्याने आत्महत्या केली. शिवाय आज शेतकऱ्यांची शासनावरील विश्वासार्हता संपलेली आहे. शासन त्या शेतकऱ्याला मदत करु शकले नाही. आज राज्यातील अनेक भागातील शेती पावसाअभावी पिकली नाही. सलग तीन वर्षे शेतीतून उत्पन्न मिळाले नाही. चवथ्या वर्षी सुध्दा त्याच परिस्थितीला सामारे जाण्याची वेळ आली आहे. शेतीपासून उत्पन्न मिळत नाही आणि शासन सुध्दा मदत करीत नाही, म्हणून त्या शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागली. त्या शेतकऱ्याला रिकाम्या हाताने परत जाण्याची वेळ आली. त्यामुळे त्या 22 वर्षीय मुलाने आत्महत्या केली. यावरुन आपल्या लक्षात येईल की, शेतीचे कर्ज नसताना सुध्दा 22 वर्षीय तरुण शेतकऱ्याने आत्महत्या केली. शेतीच्या कर्जामुळे आत्महत्या केल्या जातात ती दुसरी उदाहरणे आहेत. सभापती महोदय, जालना जिल्ह्यात घनसावंगी तालुक्यातील एका मुलीने आत्महत्या केली. त्यामागील कारण म्हणजे तिचे वडील इयत्ता दहावी आणि बारावीचे शुल्क भरु शकत नव्हते.

नंतर जी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

मुलगी त्या शाळेतील फी भरू शकत नाही. मात्र आपण एकीकडे वेगळेच सांगत आहात. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब, तुमचे एक स्टेटमेंट वाचले. इंजिनिअरिंगची अर्धी फी भरण्याचे आपले भाष्य मी वृत्तपत्रांत वाचले. औरंगाबाद जिल्ह्यातील देवगिरी कॉलेज, एसबी कॉलेज यांमधील अकरावी, बारावीला जाणाऱ्या मुलींच्या लक्षात आले की, त्या फी भरू शकत नाहीत. आपण बापाकडे तरी फी कशी मागायची, म्हणून त्या मुलीने बापाच्या प्रेमापोटी फी मागितली नाही आणि शेवटी आत्महत्याचा मार्ग निवडला. नापिकीमुळे सर्व आत्महत्या झाल्या असे नाही. परिस्थिती निर्माण झाली आहे याला जबाबदार कोण आहे, कोणता पक्ष, सरकार जबाबदार आहे ? आपण बोलतो की, सर्वांनी संघटित होऊन या संकटाला सामोरे जावे. वास्तविक पाहता हे करताना करणीतून काहीही प्रतिबिंबीत होत नाही. मी मघाशी सांगितले की, हे मानवनिर्मित संकट नाही. सर्वांनी मिळून सामोरे जाणे ही काळाची गरज आहे. परंतु दुर्दैवाने ते होताना दिसत नाही. माननीय मुख्यमंत्री बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याला दिलासा देण्याच्या दृष्टीने मी हा विषय मांडला होता. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये आज पात्र अपात्र निवडले जातात. अतिशय लहान विषय आहे. मात्र तो किती अडचणीचा ठरतो ते पहा. भाऊ यातून मार्ग काढू शकतील तर देव जाणे. पण सातत्याने हा विषय मांडूनही यातून काही निघाले नाही. बापजाद्याची जमीन अजूनही मुलांच्या नावाने झालेल्या नाहीत. निर्णय झाला की, 100 रूपयांच्या बाँडवर नव्याने रजिस्ट्रीचे फी भरण्याची गरज नाही. निर्णय झाला. परंतु तो निर्णय खाली पर्कोलेट न झाल्यामुळे आमच्याकडे अजूनही खातेफोड झालेली नाही. आपण सर्वजण मान्य कराल की, खातेफोड न झाल्यामुळे, आत्महत्या करणाऱ्या मुलाच्या नावाने जमीन नसल्यामुळे, शेतकऱ्याला पात्र ठरविले जात नाही, त्याला मदत मिळत नाही. वडिलांच्या नावाने कर्ज आहे. मुलाने आत्महत्या केली तर त्याच्या नावे 7/12 नसल्यामुळे वडिलांना, कुटुंबाला मदत मिळत नाही. त्यामुळे यातून मार्ग निघण्याची गरज आहे. सातत्याने बोलूनही अद्यापपावेतो यातून माग निघू शकलेला नाही. माझी नम्र विनंती आहे की, आजच्या उत्तरात किमान आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

दिलासा देण्यासाठी, एवढ्या पुरते मर्यादित न राहता, त्यांच्या नावावर असणाऱ्या कर्जाच्या संदर्भात सुध्दा तातडीने माननीय जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करून या संदर्भातील निर्णय तातडीने महिन्याभरात, 15 दिवसांच्या आत करणे अतिशय गरजेचे आहे.

सभापती महोदय, पीक विम्याच्या संदर्भात मी अनेक वृत्तपत्रांत वाचले आहे. पोलीस डॉग स्कॉडच्या एका कुत्र्याचा विमा करण्याच्या संदर्भात परवा वृत्तपत्रात बातमी आली. अतिशय महत्त्वाचे, गरजेचे असावे. ते कामही तितकेच महत्त्वाचे आहे. सरकारचा कुत्रा म्हणून त्याचा विमा केला. शेतकरी बाजारातून बैलजोडी घेतो. एक बैलजोडी 1 लाख 10 हजार किंवा 20 हजार रूपयांच्या खाली येत नाही, म्हशीची किंमत 60 हजार रूपयांच्या खाली नाही, शेळी घ्यायला 8-10 हजार रूपये लागतात. उचली घेतल्यानंतर कोणी शेळी, गायी, म्हशी घेतल्या. सरकार दफ्तरी तरी नोंद काय आहे, कायदा काय म्हणतो की, बँकेने अर्थसहाय्य दिले तरच तुम्हाला या पशुधनाचा विमा उतरविता येतो. आम्ही आमच्या पैशातून बैलजोडी, गायी, म्हशी घेतल्या तरी त्याचा विमा उतरविता येत नाही हे दुर्दैव आहे. आम्हाला आमचे पशुधन अबाधित ठेवण्यासाठी भांडायचे आहे. पशुधन अबाधित रहावे म्हणून शासन दरबारी हे मांडण्याची वेळ आमच्यावर आली आहे. या संदर्भात आपल्या उत्तरात त्याचा उल्लेख यावा अशी नम्र विनंती करतो.

सभापती महोदय, दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील बँकांना अर्थसहाय्य करण्याच्या संदर्भातील विषय आहे. विदर्भातील नागपूर, वर्धा, बुलढाणा या जिल्हा सहकारी बँकांना केंद्र सरकारकडून 250 कोटी रूपयांची मदत मिळाली. राज्य सरकारने 160 कोटी रूपयांची आर्थिक मदत केली. आमच्या मराठवाड्यातील व राज्यातील उत्तर महाराष्ट्रातील, मध्य महाराष्ट्रातील बँकांना मदत करण्याचे धोरण नाही. सरकार आल्यामुळे हे नवीन धोरण घेतले की काय ? थेट पीएमओ कार्यालयातून विदर्भातील अनेक बँकांना अर्थसहाय्य केले जाते. मराठवाड्यातील बँकांच्या संदर्भात हा निर्णय का केला जात नाही ? आपण सातत्याने सांगितले की, कर्जाचे पुनर्गठण करू, मात्र नाही झाले, केलेल्या कर्जाचे व्याज माफ करू, व्याज थांबवू, मात्र नाही झाले, हे झालेले नाही. मी जबाबदारीने सांगतो. राष्ट्रीयकृत बँकांना विचारायला गेला की, हा शासन निर्णय झाला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

त्यावेळी ते आम्हाला लागू होत नाही असे सांगतात. डीएलबीसीने बैठक घेतली, त्याचे जिल्हाधिकारी हे प्रमुख आहेत. जिल्हाधिकारी बैठकीला सुध्दा राष्ट्रीकृत बँकांचे लोक दाद देत नाहीत. काही खाजगी बँका, जसे की, ॲक्सिस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक यांचे सीएसआर पाहिले तर दिसेल की, बीड जिल्ह्यातील 10 हजार कोटी रूपयांचे डिपॉजिट त्यांनी जमा केले आहेत आणि त्याचे फायनान्स महानगरात सुरू आहे. आमच्याकडून डिपॉजिट घेतात आणि आम्हाला डिपॉजिटवर साडे आठ टक्के देतात आणि त्यानंतर कर्ज घेतले नाही तर आपल्याला पीक कर्ज 14 टक्क्यांनी मिळते. इंटरेस्ट सबव्हेंशन क्लॉज यांना लागू होत नाही. पंजाबराव देशमुख व्याज दर अनुदान सवलत योजना यांना लागू होत नाही. त्यामुळे 1 लाख रूपये पीक कर्ज शून्य टक्के व्याज दराने त्यांनी देणे आवश्यक आहे. मात्र या खाजगी बँका आम्हाला शून्य टक्के व्याज दराने पीक कर्ज देत नाहीत. आजही आमचा पैसा साडे आठ टक्क्यांनी ठेवतात. आम्हाला पीक कर्ज 14 टक्क्यांनी पुरविले जाते. इंटरेस्ट सबव्हेंशन क्लॉज यांना लागू होत नाही. आमचे डिपॉजिट 10 हजार कोटी रूपये गोळा करतात. माननीय जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत चर्चा होते, परंतु दुर्दैवाने एसएलबीसी संदर्भात ते नीट बोलत नाहीत. मी जबाबदारी व नम्रपणे् बोलत आहे. एसएलबीसीच्या संदर्भात हे उच्च पदस्थ अधिकारी सांगतात की, स्टेट लेव्हल बँकर्स कमिटी. अतिशय बेजबाबदारीने बोलतात. गव्हर्नरचे स्टेटमेंट आले होते, त्याच्यामध्ये सांगितले होते की, आम्हाला राज्य सरकार कर्ज देण्यासाठी अथवा पुनर्गठण करण्यासाठी आमच्यावर बंधने घालू शकत नाही. एसएलबीच्या संदर्भात गव्हर्नरचे म्हणणे असे आहे. वित्तीय संस्थांचे म्हणणे असे आहे. मग डीएलबीसीला काय दाद देणार ? माझी माननीय महसूल मंत्र्यांना या संदर्भात नम्र विनंती आहे की, दुष्काळी, मागासलेल्या जिल्ह्यातील दुष्काळाला सामोरे जायचे असेल तर याचा विचार करण्याची गरज आहे. खालची व वरची लाईन आता एक आहे. वरचे सरकार तुमचे आहे आणि खालचे सरकार देखील तुमचे आहे. या संदर्भात निर्णय करणे, इन्टरेस्ट सबव्हेंशन क्लॉजच्या संदर्भात खाजगी बँकांना बंधनकारक करणे अतिशय गरजेची बाब आहे. आमचे पैसे घेतात आणि आम्हालाच वाढीव 6 टक्क्यांनी वितरित करतात, हे अतिशय चुकीचे ठरत आहे. म्हणून या संदर्भात निर्णय करणे अतिशय गरजेचे आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

सभापती महोदय, खरीपाच्या सन 2014 च्या अनुदान वाटपाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते बोलले. मी अधिक वाढवून बोलणार नाही. फक्त मला एक मुद्दा मांडावयाचा आहे. ज्याचा उल्लेख झालेला नाही. आम्हाला दीड हजार रूपये हेक्टरी दुबार पेरणीसाठी देणार होता. परंतु अजूनही वितरित झाले नाहीत. आता पुढची, 5 महिन्यानंतर आगुटी यायची आहे, म्हणजे, जूनच्या अगोदर पेरणी यावयाची आहे. ती आगुटी देता का, कधी पैसे देता ? दीड हजार रूपये हेक्टरी द्यायचे होते. मात्र ती सुध्दा दिलासा देणारी रक्कम आहे असे वाटत नाही. परंतु ती रक्कम सुध्दा मिळाली नाही. त्यामुळे शासनाने खरीपाच्या संदर्भात निर्णय केला. सन 2014 संपले, सन 2015 ची आणेवारी आली, मराठवाड्यातील निरंक आहे. मराठवाड्यातील 8325 पैकी 8325 गावे 50 टक्के आणेवारीपेक्षा कमी आहेत. रब्बीची आणेवारी आली, तेथेही काहीही नाही. ज्वारी बाटके कंबरेएवढे दिसत आहेत. परंतु आता त्याची वाढ होताना दिसत नाही. त्यामुळे बाटके तोडण्याची वेळ आली आहे. उद्या ते जनावरांना घालण्याची वेळ आली आहे. चारा छावण्या सुरू होत नाहीत. त्याचे कारण प्रत्येक जण सांगतो की, आम्हाला आदेश आलले आहेत, संस्थेला द्या. मात्र त्या संस्था घ्यायला तयार नाहीत.

....H

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) : मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, दुपारी 01.00 वाजता प्रश्नोत्तराचा तास सुरु होणार आहे. सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर माननीय महसूल मंत्री या चर्चेला उत्तर देणार आहेत. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, वेळेची मर्यादा लक्षात घेऊन त्यांनी कमी वेळात चांगले मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करावा.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, एका अतिशय गंभीर मुद्यावर सभागृहात चर्चा सुरु आहे. पहिल्या आठवड्यातील पाच दिवस सभागृहाचे कामकाज होऊ शकले नाही. शासनाने अगोदर मदतीची घोषणा करावी की, अगोदर सभागृहात चर्चा व्हावी, या संदर्भात सत्तारूढ आणि विरोधी पक्षामध्ये वाद निर्माण झाला होता. आता या चर्चेला सुरुवात झालेली आहे. ही सर्वसमावेशक चर्चा व्हावी आणि सर्व सन्माननीय सदस्यांना या चर्चेत सहभागी होता यावे, अशी अपेक्षा आहे. ग्रामीण भागातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांच्या व्यथा सन्माननीय सदस्यांना या चर्चेच्या निमित्ताने सभागृहात मांडता याव्यात आणि सरकारलाही त्या अनुषंगाने निर्णय घेता यावेत, या दृष्टीने ही चर्चा झाली पाहिजे. आपण सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी, एवढीच विनंती आहे.

तालिका सभापती : आपल्या सर्वांच्या भावना मी सभापती महोदयांना कळवीन. माझ्यासमोर असलेला कार्यक्रम मी आपल्याला वाचून दाखविला आहे. अंतिम निर्णय सभापती महोदय घेतील.

आता सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन 2015 च्या रब्बी आणि खरिपाची आणेवारी जाहीर झालेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत करण्यासंबंधीचे शासनाचे धोरण काय आहे, हे मंत्री महोदयांच्या उत्तरातून आमच्यासमोर यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते, विरोधी पक्षातील अन्य ज्येष्ठ नेते यांनी सातत्याने कर्जमाफीचे समर्थन करीत असताना संपूर्ण कर्जमाफीची मागणी केली आहे. पलीकडच्या बाकावरील अनेक सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की, कर्जमाफी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

दिल्यानंतरही मार्ग निघेल, असे वाटत नाही. कर्जमाफीच्या संदर्भात वित्त मंत्री महोदय विरोधी पक्षात असताना कोणती मागणी करीत होते, याची आठवण मी त्यांना मुद्दाम करुन देऊ इच्छितो. कर्जमाफीच्या संदर्भात माननीय वित्त मंत्री श्री.सुधीरभाऊ मुनगंटीवार हे विरोधी पक्षात असताना असे म्हणाले होते की, "वेळप्रसंगी तिजोरी रिकामी करायचीच नाही तर विकायची वेळ आली तरी ती विकावी पण शेतकऱ्यांना मदत करण्यासंबंधी योग्य धोरण शासनाने तातडीने घेतले पाहिजे." त्यांनी केलेल्या या मागणीचे स्टेटमेंट माझ्याकडे उपलब्ध आहे. आज कर्जमाफीची घोषणा करीत असताना एवढा संकुचित विचार कशासाठी करीत आहात ? पात्र बदलल्यानंतर आज तुम्ही वेगवेगळी कारणे सांगावयास लागला आहात ?

सभापती महोदय, शेतमालाच्या भावाच्या संदर्भात सांगावयाचे तर कापसाचा भाव 7200 रुपयांपर्यंत गेला होता, हेही तुम्हाला विसरुन चालणार नाही. ज्वारी 3600 रुपये, सोयाबीन 5100 रुपये एवढा झाला होता. आज कापसाचा भाव 3800 रुपये, 3900 रुपये एवढा खाली आला आहे. यापैकी शेतकऱ्याच्या हातात किती पडतात ? यापैकी किलोमागे 5 रुपये वेचणीला द्यावे लागतात. युरिया, इतर खते यांचे भाव काय झाले आहेत ? 200 रुपये रोजापेक्षा कमीने मजुर मिळत नाहीत. पूर्वी 5 रुपये किलो प्रमाणे वेचणी व्हायची. आता होत नाही. हा दर 7 रुपयांपर्यंत गेला होता. आज मात्र मजुर किलोप्रमाणे वेचणीला येण्यास तयार नाहीत, त्यांनाही रोजंदारीवर काम करावयाचे आहे. पूर्वी एका एकरामध्ये 12 ते 15 क्विंटल कापूस व्हायचा. आज काय परिस्थिती आहे ? आज केवळ 76 किलो कापूस झाला आहे. गेवराई तालुका किंवा बीड जिल्ह्याचे सरासरी कापसाचे उत्पादन एकरी 52 किलोवर आलेले आहे. 5 रुपये प्रमाणे वेचणीला द्यायचे म्हटले तर 3800 रुपये दर असलेल्या कापसाचे 3100 किंवा 3200 रुपये मिळतात. शेतकऱ्याला उत्पादन खर्च वजा जाऊन हे उत्पन्न परवडण्यासारखे आहे का ? सोयाबीन 5200 रुपये होता, तो आता 3600, 3200 रुपयांपर्यंत आलेला आहे. मला असे सांगावयाचे आहे की, केवळ या शेतमालाचे

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

भाव वाढवून चालणार नाही, एमएसपीची घोषणा करून चालणार नाही तर आपल्याला शेतीच्या संदर्भातील केंद्राचे धोरण बदलावे लागणार आहे.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात मी असे वाचले की, कृषी मूल्य आयोगाची स्थापना झाली आहे. राज्यातील परिस्थितीची जाणीव ठेऊन कृषी मूल्य आयोगाचा अहवाल आपल्याला केंद्रीय कृषी मूल्य आयोगाला पाठवावा लागतो. शेतमालाच्या किमतीच्या संदर्भात सत्तारूढ पक्षाच्या निवडणूक जाहीरमान्यात उल्लेख आहे. उत्पादन खर्चावर 50 टक्के अधिक देऊन आम्ही शेतमालाचे भाव जाहीर करू असे वचन त्यांनी आपल्या वचननाम्यातून दिलेले आहे. आता कोठे गेला त्यांचा जाहीरनामा ? आज शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेती नापिकी होत आहे.

सभापती महोदय, दुष्काळी कामाच्या संदर्भातील एक अतिशय महत्वाचा विषय आहे. सत्तारूढ पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात याबाबतचा उल्लेख केलेला आहे. त्यांनी असे सांगितले होते की, आम्ही स्वामिनाथन आयोगाची अंमलबजावणी करू, रमेशचंद्र आयोगाची अंमलबजावणी करू. कोठे गेला स्वामिनाथन आयोग, कोठे गेला रमेशचंद्र आयोग ? आता आपण स्वामीनाथन आयोग लागू करणार नाही. तुम्ही घोषणा केली आणि माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये केंद्र सरकारने शपथपत्र दाखल करून असे सांगितले की, आम्हाला स्वामिनाथन आयोगाची अंमलबजावणी करता येणार नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात निर्णय दिला आहे, तो त्यांचा अधिकार आहे, आपल्याला या निर्णयाच्या संदर्भात निश्चितपणे काही बोलता येणार नाही. पण आज आपण मांडणी करीत असताना जाणीवपूर्वक ज्या चुका करीत आहात त्यातून तुमची नियत कळावयास लागली आहे, सरकारची नियत लोकांना कळावयास लागली आहे. शेतकऱ्यांना मदत करण्याची आपली इच्छा आहे किंवा नाही, हे कळावयास लागले आहे. तुम्हाला ग्राहक सांभाळावयाचा आहे.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

पण उत्पादकाचे दोन पैसे दुकानात आल्याशिवाय आपल्याला दुकानदारी करता येणार नाही. या संदर्भातील वस्तुस्थिती स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींमध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे. त्यांनी अशी शिफारस केलेली आहे की, उत्पादन खर्च वजा जाता शेतकऱ्याचे उत्पन्न सरकारी नोकराच्या बरोबरीने असावे.

सभापती महोदय, सरकारी नोकरांना आपण सातवा वेतन आयोग लागू केला, आमची काही हरकत नाही. आज मनरेगाची मजुरी 162 रुपये आहे. सकाळी 10 वाजता कामाला लागल्यानंतर संध्याकाळी 4 वाजेपर्यंत तुम्ही जर 600 रुपयांचे म्हणजेच 3 ब्रास काम केले तर तुम्हाला 162 रुपये मिळतात. आज पाच तास काम करणाऱ्यांना आणि महिन्याला 5 सुट्या घेणाऱ्यांना 1 लाख 25 हजार रुपये पगार मिळतो आहे, ही विषमता आपल्याला दिसत नाही ? एवढे करूनही त्यांना 50-50 हजार रुपये पेन्शन मिळते आणि 1200 रुपयांचे संजय गांधी निराधार योजनेचे किंवा श्रावणबाळ निराधार योजनेचे अनुदान मिळण्यासाठी आम्हाला तासनतास लायनीत लागावे लागते. आपण त्यांना 7 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले, सातवा वेतन आयोग मंजूर केला आणि दुसरीकडे शेतकऱ्यांच्या फायद्याचा स्वामिनाथन आयोग लागू करण्यासाठी प्रकरण उच्च न्यायालयापर्यंत का जावे ? सरकारची काय नियत होती ? 1 लाख कोटी रुपयांचे पॅकेज आपण बिहारला देऊ केले, 80 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जम्मु आणि काश्मिरला देऊ केले, आमच्या शेतकऱ्यांचा सातबारा उतारा कोरा करण्यासाठी आपल्याला असे किती पैसे लागणार होते ? केवळ 15 ते 17 हजार कोटी रुपयांमध्ये हे काम होऊ शकले असते. आम्ही तुम्हाला काय मागितले ? आज शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे, तो आत्महत्या करावयास लागला आहे. तो संघटित नाही म्हणून आत्महत्या करीत आहे. त्याला काही कळत नाही, आपल्या हक्काची त्याला

...5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) H-5

SRR/ ST/ AKN/ 11:40

श्री.अमरसिंह पंडित.....

जाणीव नाही. त्याला असे वाटते की, आपल्याला आता आत्महत्या केल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. हा शेतकरी तुमच्यासमोर, तहसीलदारासमोर येत असताना मायबाप सरकार म्हणतो, आपण त्याच्याकडे मते मागावयास जातात, त्याच शेतकऱ्याला तुमच्यासमोर जोडे बाहेर ठेऊन कंबरडे मोडण्याएवढे वाकावयास लागते आणि 1200 रुपये द्या, अशी भीक मागावी लागते.

....l-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सातवा वेतन आयोग मंजूर केला जातो, त्यांना 50 हजार रुपये पेन्शन दिले जाते, दिड लाख रुपये पगार दिला जातो आणि आमच्या शेतकऱ्यांना मात्र 1200 रुपयांसाठी एवढे वाकावे लागत आहे. हा जो पराकोटीचा अन्याय सुरु आहे तो कोठे तरी थांबला पाहिजे. काल आमचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य बोलले. कदाचित त्यांना राग आला असेल. मी त्यांची मनापासून माफी मागतो. परंतु, आम्ही काल अतिशय पोटतिडकीने बोलत होतो. आमचे म्हणणे एकच होते की, मागील 15 वर्षात आम्ही काय केले, हे आपण वारंवार सांगू नका. तुमची आणि आमची शेतकऱ्यांची एकच जात आहे. आम्ही काही काळापुरते येथे आलेलो आहोत. उद्या आम्हाला गावाकडे जायचे आहे, त्या लोकांमध्ये जाऊन राहावयाचे आहे. आम्हाला 6 वर्षानंतर पुन्हा त्याच मातीत एकरुप व्हावयाचे आहे. आम्ही काही प्रसंगानुरुप येथे आलेलो आहोत. परंतु, आम्ही जर येथे शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले नाही तर ते कदाचित चुकीचे होईल, मूळ हेतूला छेद दिल्या सारखे होईल.

सभापती महोदय, स्वामिनाथन आयोगाच्या संदर्भात बोलणार आहे. शेती मालावर आधारभूत किंमत लागू करण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा व्हावी. गहू आणि धान पिकांच्या व्यतिरिक्त इतर पिकांना देखील आधारभूत किंमत मिळेल अशी व्यवस्था व्हावी. मी माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांना विचारु इच्छितो की, हे झालेले आहे काय ? शेती मालाचे हमी भाव उत्पादन खर्चापेक्षा कमीत कमी 50 टक्के जास्त असावेत. आपण यातील एक तरी मुद्दा मान्य करावा. माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांची भाषणे आम्ही ऐकलेली आहेत. आता आपले सरकार सत्तेत येऊन एक ते सव्वा वर्षे झालेले आहे. परंतु, तुमच्या करणीतून मात्र हे प्रतिबिंबित होताना दिसत नाही. आपण मागील हिवाळी अधिवेशनात सांगितले होते की, आम्ही 5 हजार गावे दुष्काळ मुक्त करु 5 लाख सोलर पंपांचे वाटप करु माननीय श्री.दिवाकर रावते साहेब, बीड जिल्ह्याला 5 लाख सोलर पंपापैकी फक्त 900 सोलर पंपांचे उद्दिष्ट प्राप्त झालेले आहे. उत्तर महाराष्ट्राला 1400

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

सोलर पंप आणि मध्य महाराष्ट्राला साधारणत: 2700 सोलर पंपांचे उद्दिष्ट प्रापत झालेले आहे. आपण जर अशा प्रकारे 200 सोलर पंप देणार असाल तर हे उद्दिष्ट केव्हा पूर्ण होणार आहे ? आपण या संदर्भात निर्णय करणार आहात की नाही ?

सभापती महोदय, 20 हजार सामुदायिक शेततळे निर्माण करण्याची घोषणा करण्यात आली. आता संपूर्ण मराठवाड्यात शेततळ्यांची एकूण संख्या साधारणत: 193 झालेली आहे. 30 x 30 x 3 आकाराच्या शेततळ्यांची कामे काल पर्यंत लाईन डिपार्टमेंटकडून करण्यात येत होती. परंतु, शेततळ्यांची अधिक मागणी येऊ लागल्यानंतर ती कामे पंचायत समितीकडून काढून घेऊन ती कृषी विभागाडे देण्यात आली. कृषी विभागाचे अधिकारी जागेवर सापडत नाहीत. ज्या ठिकाणी कामे होत होती ती कामेही आता बाजूला सारण्यात आली आहेत. शेततळ्यांची मागणी मंदावल्याच्या संदर्भातील माहिती आता जिल्हाधिकाऱ्यांकडे दिली जाते.

सभापती महोदय, फळबाग वाचविण्यासाठी हेक्टरी 20 हजार रुपये मदत करण्याच्या संदर्भात घोषणा करण्यात आली. तसेच, प्लास्टीक मॅटींगसाठी 16 हजार रुपये देण्याची घोषणा करण्यात आली. परंतु, जॉईंट डायरेक्टर यांच्याकडील अशी आहे की, बीड जिल्ह्यात किंवा मराठवाड्यात प्लास्टीक मॅटींगचे 16 हजार रुपयांचे एकही युनिट वितरीत झालेले नाही. यामध्ये कोणती अडचण आहे ? मग तुम्ही कशासाठी एवढ्या मोठ्या घोषणा करीत आहात ? आम्ही कामे करतो असे आपण सांगत आहात आणि आम्ही तुम्हाला फक्त त्याची आठवण करुन देत आहोत. म्हणून या संदर्भात निर्णय घेताना आपण याचाही वेगळा विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री दिनांक 2.9.2015 रोजी बीड जिल्ह्यात आले होते. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्ही विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करु परंतु, अद्याप एकही निर्णय झालेला नाही. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने औरंगाबाद येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण भागातील 215 विद्यार्थ्यांना तुम्ही फी भरु शकत नाही म्हणून परत जाऊ नका असे सांगितले. त्यांनी त्या विद्यार्थ्यांना थांबविले आणि फी भरता येत नाही म्हणून तुम्ही परत जाऊ नका, तुम्ही नंतर फी भरावी असे सांगितले. त्यांनी त्या विद्यार्थ्यांची जेवणाची, राहण्याची व्यवस्था करुन काम सुरु ठेवले.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

मराठवाड्यातील एका देवगिरी कॉलेजमध्ये असे केले म्हणजे संपूर्ण मराठवाड्यात झाले काय ? मराठवाड्यातील बहुतांश मुले पुणे, मुंबई, कोल्हापूर युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेत आहेत. त्यांच्या संदर्भात कोण निर्णय घेणार आहे ? या संदर्भात अद्याप निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, मी अतिशय नम्रपणे एक विनंती करु इच्छितो. बीड जिल्ह्याच्या पालक मंत्री महोदया सभागृहात उपस्थित नाहीत. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब त्यांना सांगू शकतील. मी नम्रपणे विनंती करतो की, मनरेगा योजने अंतर्गत नद्यांचे पुनरुज्जीवन करणे अतिशय गरजेचे आहे. मला असे वाटते की, आपणही ते मान्य करता. आता नद्यांची पात्र आणि जमिनी सलग झालेल्या आहेत. नदी पात्रात मोठ्या प्रमाणावर बेशरमची झाडे, वाळू, माती साठलेली आहे. त्यामुळे एखाद्या वेळी अधिकचे पाणी आले तर ते पाणी शेतकऱ्याच्या शेतात शिरते. म्हणून नद्यांचे पुनरुज्जीवन केले, खोलीकरण, रुंदीकरण, लांबीकरण केले तर नदी पात्रात पाण्याचा अधिकचा साठा होईल. आपण या कामांचा मनरेगामध्ये समावेश करुन या संदर्भात निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आज बीड जिल्ह्यात मनरेगा योजनेवर केवळ 31 हजार मजूर काम करीत आहेत. एक काळ असा होता की, दुष्काळाला सामोरे जाताना बीड जिल्ह्यातील 1 लाख 23 हजार मजूर काम करीत होते. आज एवढी भयानक परिस्थिती निर्माण झालेली असताना मनरेगा योजनेवर केवळ 31 हजार मजूर काम करीत आहेत. कामाची मागणी असताना दफ्तरी मात्र कामाची मागणीच नाही, असे भासविले जाते. माझ्या स्वत:च्या तालुक्यात काल सोमवारी रस्त्यांची कामे सुरु झाली. ज्यावेळी स्थानिक पातळीवर माहिती मागविण्यासाठी प्रश्न पाठविण्यात आला त्यावेळी रस्त्यांची आणि विहिरींची कामे सुरु झाली. मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काल सोमवार पर्यंत एक मजूर कामावर हजर असल्याची माहिती आली तरी मी माझ्या विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देईन. कशासाठी खोटे बोलावयाचे ? कामाची मागणी असून देखील कामे दिली जात नाहीत. म्हणून कामांच्या संदर्भात निर्णय घेणे अतिशय गरजेचे आहे. केवळ रस्त्यांचीच कामे नाहीत तर बांधबंदिस्तीची कामे देखील मोठ्या

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

प्रमाणावर उपलब्ध करुन दिली पाहिजेत. तसेच, भूमिगत बंधाऱ्यांच्या संदर्भात देखील आपण विचार करणे अतिशय गरजेचे आहे. शेततळे तयार करताना त्यासाठी बंधने घातली जाऊ नयेत. 30 x 30 x 3 आकाराचे शेततळे जर लाईन डिपार्टमेंटकडून बदलून पंचायत समिती करीत असेल, पंचायत समितीची तशी मागणी असेल तर त्यासाठी बंधन घालण्याचे काही कारण नाही.

तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) : मी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना सांगू इच्छितो की, या प्रस्तावावर इतरही सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. आपण आपल्या भाषणाचा समारोप करावा. मी मघाशी आपल्या भावना माननीय सभापतींना कळविल्या आहेत. माननीय सभापती थोड्या वेळात सभागृहात येणार आहेत. त्यावेळी ते या संदर्भात भाष्य करतील.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. मनरेगाच्या कामांच्या संदर्भात मी माझे मत मांडलेले आहे. तसेच, मनरेगाची हजेरी 162 रुपये आहे. त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. शासनाने मनरेगाची हजेरी 300 रुपये करण्यासंदर्भात विचार करावा किंबहुना शासनाने तशी घोषणा करावी, अशी मी नम्रपणे विनंती करीत आहे.

सभापती महोदय, परळी-बीड-अहमदनगर रेल्वे मार्गाच्या संदर्भात मी बोलणार आहे. माननीय पंतप्रधानांनी जाहीर केले होते. राज्य शासनाने देखील स्टेटमेंट केले होते. परळी-बीड-अहमदनगर या महत्वपूर्ण रेल्वे मार्गाच्या संदर्भात राज्य शासनाने आपला 50 टक्के हिस्सा द्यावा. केंद्र शासन तेवढी मदत करीत आहे. या रेल्वे मार्गाच्या संदर्भात केंद्रीय मंत्रिमंडळात चर्चा होऊन 1413 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात घोषणा झाली. परंतु, दुर्देवाने राज्य आणि केंद्र शासनाकडून जिल्हा प्रशासनाला एक दमडीही मिळालेली नाही. यामध्ये अडचण काय आहे ? आपल्याला बीड जिल्ह्याचा, मराठवाड्याचा एवढा राग आहे काय ? त्याला मूळ प्रवाहात आणावयाचे नाही काय ? नगर जिल्ह्याला जोडावयाचे नाही काय ? तुमचा राग काय आहे हे एकदा सांगावे. आम्ही मागणी करणार नाही. या संदर्भात घोषणा होते. परंतु आज करणीतून कोठेही हे प्रतिबिंबित होताना दिसत नाही.

सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात उपायोजना करण्याबाबत मी माझे मत थोडक्यात मांडणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित...

सभापती महोदय, मी उपाययोजनांच्या संदर्भात बोलत असताना केवळ टँकरने पाणी पुरवठा व मनरेगाची कामे करून भागणार नाही. वारंवार आम्ही एका गोष्टींची मागणी करीत आहोत की, 18.33 टीएमसी तुटीचे पाणी मराठवाड्याला गोदावरी खोऱ्यातून देण्यात यावे. जे प्रकल्प व के.टी.वेअर बंद पडले आहेत, इतर प्रकल्प बंद पडले आहेत ते पूर्ण होण्याची सुतराम शक्यता नाही. त्या प्रकल्पाची कामे आता सुरु होण्याची मुळीच शक्यता नाही. या बंद पडलेल्या प्रकल्पातील 18.33 टीएमसी पाणी देण्याचे मान्य करण्यात आले आहे. 18.33 टीएमसी पाण्याच्या संदर्भातील प्रकल्प मोठे नाहीत हे अत्यंत लहान प्रकल्प आहेत, यामध्ये 150 हेक्टर, 175 हेक्टर सिंचन होईल इतके हे छोटे प्रकल्प आहेत. या प्रकल्पासाठी भूसंपादन करण्याची गरज नाही. काही ठिकाणी गावठाण तर काही ठीकाणी गायरान जमिनी आहेत. हे अत्यंत लहान प्रकल्प आहेत, जलसंधारण खाते देखील आमच्या बीड जिल्ह्याकडे आहे. 18 टीएमसी पाण्याच्या संदर्भात किती दिवस तुम्ही आम्हाला माननीय राज्यपाल महोदयांचे बंधन असल्याचे सांगणार आहात ? आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या लाखात गेल्यावर यासंदर्भातील निर्णय घेणार आहात काय ? आता मराठवाड्यातील शेती नापिकी होऊ लागली आहे. त्या शेतीत पिके येत नाहीत, शेती करणाऱ्या लोकांची टक्केवारी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. आमच्या भागात शाश्वत शेती नसल्यामुळे शेती नापिकी होत आहे. आज पेरणी केली तर पुढील वर्षात शेती करण्याची परिस्थिती राहील असे नाही. जलयुक्त शिवारातून 24 टीएमसी पाणी अडविले या विषयाबाबत मी बोलणार आहे..

सभापती महोदय, माझा असा दावा आहे की, जलयुक्त शिवार योजनेमधून 24 टीएमसी पाणी अडविले असेल तर मी या विधानभवनाचे तोंड पाहणार नाही. या पाण्याचा हिशोब केला पाहिजे. हिशोब करण्याचे साधे आणि सरळ सुत्र आहे. एकूण तयार झालेले बंधारे व जास्तीत जास्त एका बंधाऱ्यात किती पाणी अडविले जाते यासंदर्भातील आकडेवारी जिल्हाधिकारी यांच्याकडून घेण्यात यावी. संपूर्ण राज्यातील आकडेवारी घेऊन जलयुक्त शिवार योजनेतून अडविलेले पाणी 13 टीएमसीच्यावर असेल तर मी विधानभवनाला तोंड दाखविणार नाही. 24 टीएमसी पाणी अडविले असे फक्त सांगितले जात आहे, यासंदर्भातील हिशोबासाठी एक वेळ

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित...

बसलेच पाहिजे. आम्हाला सिध्द करुन दाखवा की, 24 टीएमसी पाणी कसे अडविले आहे. असे असेल तर मी विधानभवनाला तोंड दाखविणार नाही. मला ही बाब अतिशय नम्रपणे सांगावयाची आहे.

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अधिकृत आकडेवारी दिली पाहिजे. 24 टीएमसीबाबत ते अधिकृत आकडेवारी सांगत नाहीत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझे मंत्री महोदयांना आव्हान आहे की, या अधिवेशनानंतर एका आठवड्यात त्यांनी विधानभवनात बैठक बोलवावी मी सिध्द करुन दाखवितो की, 24 टीएमसी पाणी अडविल्याचा आकडा चुकीचा आहे, मी 13 टीएमसी पाणी अडविल्याचे सांगत आहे. 13 टीएमसीच्या वर पाणी अडविले असेल तर मी विधानभवनात येणार नाही. मंत्री महोदय काय करतील ते त्यांनी सांगावे. मंत्री महोदय, तुमच्याच सरकारची कागदपत्रे, तुमच्याच सहीची कागदपत्रे घेऊन मी हे तुम्हाला सांगणार आहे. हा आकडा 13 टीएमसीच्यावर जाणार नाही.

सभापती महोदय, मी 18 टीएमसी पाण्याबाबत बोलत होतो. हे प्रकल्प अतिशय लहान आहेत, यासाठी भूसंपादन करण्याची गरज नाही. जमिनीचा मोबदला कोणालाही देण्याची गरज नाही. जबरदस्तीने कोणाची जमीन ताब्यात घेण्याची गरज नाही. 18 टीएमसी पाण्याच्या अंतर्गत येणारे प्रकल्प सुरु करण्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदय व माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना मी विनंती करतो. येथे सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर आहेत, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आहेत, माननीय मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे आहेत, आपण माननीय मुख्यमंत्री महोदयांना 18 टीएमसी प्रकल्पाच्या आराखड्यासंदर्भात हे अधिवेशन संपण्याच्या आत चर्चा घडवून आणावी. या चर्चेला उत्तर देतांना तो विषय यात नमूद करावा अशी मी नम्रपणे विनंती करतो.

सभापती महोदय, मी एक संदर्भ देऊ इच्छितो की, तेलंगणा राज्यातील प्रकल्प होत असताना तेथे चार स्टेजमध्ये पाणी पंप केले जात आहे. एका स्टेजमध्ये साधारणपे एक ते सव्वा लाख हेक्टर जमीन पाण्याखाली आणण्यासंदर्भातील धोरण तेलंगणा राज्य करीत आहे. यासाठी 25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) J-3

VVK/ AKN/ ST/ 12:00

श्री.अमरसिंह पंडित...

हजार कोटी रूपयांची तरतूद जलसंपदा खात्याने केलेली आहे. तेलंगणा हे राज्य मराठवाड्यापेक्षा मोठे नाही. त्यांचे ध्येय व उद्दिष्ट अत्यंत मोठे आहे. तेलंगणा राज्य चार स्टेजमध्ये योजना तयार करून कृष्णा आणि गोदावरी नद्याचे एकीकरण करीत आहेत. अशी कामे महाराष्ट्रात का होऊ शकत नाहीत ? असा माझा सरकारला प्रश्न आहे.

सभापती महोदय, ड्रीप संदर्भात मराठवाड्याच्या बाबतीत मी मुख्यमंत्री महोदयांकडे वारंवार मागणी करीत आहे. नियतव्यय वगळून व ड्रीपच्या संदर्भात माननीय आयुक्तांना समन्वयक नेमून सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून ड्रीप संदर्भातील मागणी घ्यावी 90 टक्के शासकीय अनुदान व 10 टक्के रक्कम शेतकऱ्यांकडून घेऊन ड्रीप संदर्भातील निर्णय मराठवाड्यासाठी घेण्याचा विचार शासनाने करावा यासंदर्भातील माहिती या प्रस्तावाच्या उत्तरात देण्यात यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मराठवाड्यातील जमिनी कमांडमध्ये घेण्यात आल्या आहेत. जायकवाडी धरणाचे पाणी मिळून आम्हाला चार ते सव्वा चार वर्षे झाली आहेत. आता आम्हाला पाणी मिळत नाही तरी देखील आम्हाला कमांड लागू आहे. याचा परिणाम असा होतो की, आम्हाला जमिनीची नोंदणी करतांना 30 टक्के अधिक रक्कम भरावी लागते. तुमच्या जमिनीची नोंदणी करतांना तुम्हाला 1000 रूपये भरावे लागत असतील तर त्यासाठी आम्हाला 1300 रूपये भरावे लागतात. एखाद्या प्रकल्पाचे पाणी मिळाले तर आम्हाला कमांड लागू करावी बीड तालुक्यातील टुकूर प्रकल्प आता चर्चेत आहे अजून तो कागदावर देखील आलेला नाही. त्या प्रकल्पाचे कमांड लागू करण्यात आले आहे. बीड जिल्हयातील जमिनीला कमांड लागू केल्यामुळे त्या जमिनी विकता येत नाहीत. हा प्रकल्प अजून कागदावर सुध्दा आलेला नाही. यासंदर्भातील निर्णय करणे अतिशय गरजेचे आहे.

सभापती महोदय, माझ्या अगोदर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी भाषण केले. एनजीओ म्हणून ते त्यांचे मत मांडत होते. माझी एक अतिशय नम्र विनंती आहे की, तुम्ही शेतकऱ्यांपर्यंत जाऊन त्यांना मदत करीत आहात याबाबत तुमचे अभिनंदन करतो. तुम्ही कौतुकास पात्र आहात. आत्महत्या केल्यानंतर तेथे मदत पोहचू लागली आहे. त्याऐवजी आत्महत्या करु नये अशी परिस्थिती निर्माण करणारे बीड जिल्ह्यातील कोणतीही दोन गावे आपण तयार करावीत. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित...

गावात तीन लाईनमध्ये तीन बंधारे करायचे त्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करावे. माझा असा दावा आहे की, फक्त पिण्याचे पाणी नाही तर शेतीला देण्यासाठी पाणी देखील तेथे उपलब्ध होईल.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडत आहे, संपूर्ण राज्यातील उद्योजकांना सीएसआर द्यावा लागतो. या सीएसआर रकमेचे उद्योजक काय करतात, आपल्या स्वत:च्या मामा किंवा भाचाच्या नावाने ट्रस्ट तयार करतात, किंवा हॉस्पीटल काढतात, त्यासाठी एकूण नफ्याच्या पाच टक्के रक्कम सीएसआरमध्ये जमा करतात. त्यांचा एकूण नफा 100 कोटी असेल तर पाच टक्के प्रमाणे पाच कोटी रुपये त्या प्रतिष्ठानला किंवा त्या एनजीओला देतात. रेकॉर्डवर असे दाखवायचे की या एनजीओला सीएसआरची रक्कम देण्यात आली आहे. अशा प्रकारे पाच ते दहा एनजीओ निर्माण करतात, त्यांच्याकडे ते पैसे जमा करतात आणि ते पैसे दुसऱ्या हाताने पुन्हा घरात घेतात. उद्योजकांकडून सीएसआरची जी पाच टक्के रक्कम येते ती जिल्हानिहाय विभागून दिली पाहिजे. अशा प्रकारे ही रक्कम एनजीओला देण्याऐवजी नफ्याचे गणित करुन जिल्हाधिकारी यांच्याकडे सीएसआर वर्ग करण्यात यावा. सीएसआर रकमेच्या माध्यमातून त्या भागातील जलसंधारण व जलसंपदा विभागाची कामे किंवा दुष्काळग्रस्त भागांना मदत करण्याची कामे केली तर प्रत्येक तालुक्यासाठी दहा कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम मिळेल. अशी कामे करण्यासाठी सरकारची इच्छाशक्ती पाहिजे. राजकीय इच्छाशक्ती असेल तर असे निर्णय सरकार घेऊ शकेल असे मला वाटते.

...K-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

मुख्यत: मराठवाड्यातील शेतकरी, उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी या मायबाप सरकारकडे आशेने पहात आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी निश्चितपणे शेतकऱ्यांच्या संदर्भात सरकारकडून सकारात्मक निर्णय घेतला जाईल, आपल्या पदरात काही तरी पडेल, लेकरांचे शिक्षण होऊ शकेल, लेकीबाळींचे लग्न होऊ शकेल अशा प्रकारचा विचार त्यांच्या मनात येत आहे. परंतु नेमके आज काय होत आहे? आज आमचा संसार तुमच्यावर अवलंबून आहे. सरकारची मदत येईल, मग आमच्या लेकांचे शिक्षण होईल. सरकारची मदत येईल, मग आमच्या लेकींचे लग्न करू हे अवलंबित्व वाढत चालले आहे. ही जी मानवनिर्मित संकटे आहेत त्या संकटातून मार्ग निघू शकतो. तसा निर्णय घेण्याची इच्छाशक्ती तुमच्यात आहे का? अधिवेशन संपण्यापूर्वी निश्चितपणे शासनाच्या करणीतून त्याचे प्रतिबिंब उमटले पाहिजे एवढी नम्र विनंती करतो आणि या प्रस्तावावर मला विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सत्ताधारी व विरोधी पक्षाकडून मांडण्यात आलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, कालपासून मी भाषणे ऐकल्यानंतर एक विचार मनात आला की, 50-55 वर्षे केलेले राज्य कुठे आणि एका वर्षातील जबाबदारी कुठे? एका वर्षात काय केले आणि काय केले पाहिजे हेच आम्ही ऐकत आहोत. केवळ विषयावर चर्चा करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा वाचवू शकतो, हमी भाव कसा वाढवू शकतो, त्यांचे कौन्सिलिंग कसे करू शकतो याचा विचार झाला पाहिजे. मी चार ओळी वाचून दाखविते.

पिढ्यान्‌पिढ्या शेतकऱ्यांवर अन्याय केला कोणी?
तरी आज आम्हाला जबाबदारी विचारता तुम्ही
एका वर्षाच्या काळात यशस्वी प्रयत्न करतो आम्ही
तुम्हीच सांगा शेतकऱ्यांना फासावर टांगले कोणी?

सभापती महोदय, 2002 पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. गेली 26 वर्षे मी सभागृहात दुष्काळावर विचार मांडले आहेत. गेली 26 वर्षे महाराष्ट्राची आर्थिक पाहणी हे पुस्तक उघडल्यानंतर त्यात कृषी उत्पन्नाचा जीडीपी वाढलेला दिसला नाही. पाऊस चांगला झाला तर 7.5 टक्के आणि पाऊस कमी झाला तर 2.5 टक्के हेच प्रमाण गेली 4-5 वर्षे कायम दिसून आले आहे. याचा अर्थ आम्ही केवळ चर्चा करतो. परंतु कृषी उत्पन्नाचा जीडीपी वाढविण्यासाठी जे प्रयत्न व्हावयास पाहिजेत ते झालेले नाहीत. हा निसर्गाचा खेळ आहे. पाऊस येणे, अतिवृष्टी, अवर्षण, गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. शेतकऱ्यांच्या पिकाचे संरक्षण, सिंचन सुविधा, शेतीवर होणारा खर्च कमी करणे याचा खऱ्या अर्थाने विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांकरिता कर्जमाफी करावी अशी आम्ही मागणी करतो. 2008 मध्ये शासनाने कर्जमाफी जाहीर केली. परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या का? तोच विषय वारंवार सभागृहामध्ये चर्चेसाठी येतो. 2001 पासून 2014 पर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. मी आकडेवारी देऊन सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. 2002 मध्ये 122 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, परंतु त्यापैकी 43 प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली. 2007 मध्ये 2476 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असताना 1232 प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली. 2006 मध्ये 2376

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) K.3

SGB/ ST/ AKN/ 12:10

श्रीमती शोभा फडणवीस.....

शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असताना 1339 प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली. अपात्र ठरविणे म्हणजे त्या आत्महत्याग्रस्त कुटुंबांना शासनाने मदत दिली नाही. ती कुटुंबे उद्ध्वस्त झाली. त्यांच्याकडे लक्ष दिले गेले नाही. ज्यांना मदत केली त्यांना केली, परंतु ज्यांना मदत केली नाही त्यांचे संसार उद्ध्वस्त झाले, याचा विचार केला गेला नाही.

सभापती महोदय, आत्महत्या का होतात, कशा होतात, कोणामुळे होतात? हा प्रश्न नसून आत्महत्या केल्यामुळे घर उद्ध्वस्त होते, मुले उघड्यावर पडतात. त्यांना मदत करण्याची गरज असते. या ठिकाणी सांगण्यात आले की, कौन्सिलिंग करून शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त केले पाहिजे. कौन्सिलिंग करणे हे सगळयांचे कर्तव्य आहे. परंतु मी माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना हेच सांगितले की, एवढे प्रयत्न करुनही सगळयात जास्त आत्महत्या यवतमाळ जिल्हयामध्ये होत आहेत. त्याबाबत प्रयत्न करुन आत्महत्या रोखण्याकरिता प्रयत्न का करु शकत नाही? आत्महत्या एक होवो की दहा होवो, त्या आत्महत्याच आहेत. घरे उद्ध्वस्त होत आहेत. त्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, जे शेतीमालाचे हमीभाव ठरविले जातात ते परवडत नाहीत. याचे कारण असे की, आमच्याकडे उत्पादनावर आधारित खर्च अधिक होतो आणि उत्पन्न कमी येते. आंध्रप्रदेश राज्यात 2011-12 मध्ये प्रती हेक्टरी 37946.69 रुपये खर्च आला, उत्पन्न 55.56 क्विंटल आले आणि प्रती क्विंटल खर्च 976.36 रुपये आला. हरियाणा राज्यात प्रती हेक्टरी 36476.96 रुपये खर्च आला, उत्पन्न 44.15 क्विंटल आले आणि प्रती क्विंटल खर्च 1250.61 रुपये आला. पंजाब राज्यात प्रती हेक्टरी 31248 रुपये खर्च आला, उत्पन्न 58.57 क्विंटल येते आणि प्रती क्विंटल खर्च 904 रुपये येतो. तामीळनाडू राज्यात प्रती हेक्टरी 46953.56 रुपये खर्च आला, उत्पन्न 50.16 क्विंटल येते आणि प्रती क्विंटल खर्च 1011 रुपये येतो. मध्यप्रदेश राज्यात प्रती हेक्टरी 18287 रुपये खर्च आला, उत्पन्न 27.46 क्विंटल येते आणि प्रती क्विंटल खर्च 960 रुपये येतो. महाराष्ट्रात तशी परिस्थिती नाही. महाराष्ट्रात प्रती हेक्टर 35253 रुपये खर्च येतो आणि उत्पन्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मात्र 32.61 क्विंटल येते व खर्च प्रती क्विंटल 1267 रूपये येतो. त्यामुळे उत्पन्न कमी आणि खर्च जास्त येत असल्याने शेतकऱ्यांना हमी भाव परवडत नाहीत. परिणामी शेतीवरील खर्च कसा कमी

....4...

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) K.4

SGB/ ST/ AKN/ 12:10

श्रीमती शोभा फडणवीस.....

होईल आणि उत्पन्न कसे वाढविता येईल, शेतकरी आर्थिकदृष्टया सक्षम कसा होईल याचा विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, चंद्रपूर जिल्हयात नजरअंदाज आणेवारी 50 टक्क्यावर असताना अंतिम आणेवारी 30 टक्क्याच्या खाली आली असा मुद्दा मांडला होता. चंद्रपूर जिल्हयात केवळ ऊसाचे पीक घेतले जात नाही. मुख्यत: धानाचे पीक घेतले जाते आणि ते दरवर्षी घेतले जाते. ऊस एका वर्षी लावला तर पुन्हा तिसऱ्या वर्षी लावला जातो. परंतु दरवर्षी धानाचे पीक घ्यावे लागते. ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात नजरअंदाज आणेवारी काढली गेली. त्यावेळी पाऊस झाला होता. अंतिम अंदाज काढले जातात ते पिकाच्या अनुषंगाने असतात. नजरंअदाज आणेवारी काढल्यानंतर चंद्रपूर जिल्हयात पाऊस पडला नाही. सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात पाऊस झाला नाही. शेवटी शेतातील पीक पावसावर अवलंबून असते. कारण चंद्रपूर जिल्हयात फक्त 13 टक्के सिंचन झालेले आहे. त्यामुळे 87 टक्के जमीन कोरडवाहू आहे. त्यामुळे जेव्हा अंतिम आणेवारी काढण्याची वेळ आली तेव्हा लक्षात आले की, पीक फोल ठरले आहे. भाताच्या लोंबीमध्ये तांदळाचा दाणा निघाला नाही. पीक फोल ठरल्याने केवळ गवत वाढले, त्यामुळे आणेवारी 50 टक्क्यावर आली. कोणावर बोट दाखवून स्वत:चे महत्व वाढविणे योग्य नाही. पालकमंत्र्यांनी आणेवारी काढली होती का?

एल.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

एकीकडे पालकमंत्र्यांना शेतकऱ्यांच्या नावाने बुडवायचे आणि दुसरीकडे आपण झेंडे लावायचे, हा कुठला नियम आहे ? आपण परिस्थिती जाणून घ्यावी. मी धानाची शेतकरी आहे. मुख्यमंत्री धानाचे शेतकरी आहेत. मुख्यमंत्री कुठे धानाचे शेतकरी आहेत असे आपण म्हणता. ते शेतकरीच नाही असे आपण म्हणता. मी आपणास सांगू इच्छिते की, त्यांचीपण शेती आहे. ऊस, कापूस, तांदूळ, तुरी उत्पादक शेतकऱ्यांचे दु:ख एकच असते. त्याला वाचविण्याचा प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा येथे विचार मांडत असताना दुसऱ्याकडे बोट दाखवून मी कसा चांगला आहे असे सांगण्यापेक्षा सगळ्यांनी मिळून पुढे जाण्याची आवश्यकता आहे, असे मला म्हणावेसे वाटते.

नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना काय मिळाले असा देखील मुद्दा उपस्थित करण्यात आला. सन 2010-11 मध्ये दुष्काळ पडला तेव्हा दुष्काळासाठी मदत म्हणून 4 कोटी 24 लाख रूपये देण्यात आले. अतिवृष्टी आणि गारपीटीसाठी 802 कोटी रूपयांची मदत करण्यात आली. सन 2011-12 मध्ये 1100 कोटी रूपये दुष्काळावर खर्च केले, तर अतिवृष्टी गारपीटीसाठी शेतकऱ्यांना 25 कोटी रूपये दिले. सन 2012-13 मध्ये 1404 कोटी रूपये दुष्काळासाठी देण्यात आले, तर अतिवृष्टीसाठी 100 कोटी रूपये दिले. सन 2013-14 मध्ये 1296 कोटी दुष्काळासाठी देण्यात आले, तर रूपये 883 कोटी गारपीटीसाठी देण्यात आले. सन 2014-15 मध्ये किती निधी दिला आहे ? आपण आमच्याकडे बोट दाखवतात ना ? सन 2014-15 मध्ये 3538 कोटी दुष्काळासाठी देण्यात आले असून अतिवृष्टी आणि गारपीटीसाठी 1719 कोटी रूपये देण्यात आले. दोघांची बेरीज केली तर 5257 कोटी रूपये त्या काळात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वाटले आहेत. जे आजे ते आपण बोलले पाहिजे. जे आहे ते आपण सांगितले पाहिजे, असे माझे म्हणणे आहे. दुष्काळ, गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले आहे ते पैशाने भरून येणार नाही हे मला माहीत आहे. श्री.पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री होते तेव्हा आम्हीच मागणी केली होती की, प्रति हेक्टरी चार हजार रूपये मदत देण्यात यावी. त्यांनी आम्हाला हो म्हटले होते. परंतु, त्यांनी आम्हाला प्रति हेक्टरी 2500 रूपये दिले. आम्ही मागणी करीत असलो तरी भाव काय आहे हे आम्हाला देखील माहीत असते. त्यावेळी आम्हाला 2500 रूपयाच्यावर कधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

प्रती हेक्टर भाव मिळालेला नाही. यावेळी आम्हाला प्रति हेक्टरी 4500 रूपये भाव देण्यात आला. हा भाव वाढीव नाही काय ? हे समजून घेतले नाही पाहिजे काय ? या सगळ्या गोष्टींचा विचार करून शासनाने शेतकऱ्यांना मदत करण्याची भूमिका घेतली होती, यावेळी देखील घेतली होती हे लक्षात येईल. यात फक्त फरक पैशाचा असू शकेल. पण त्यावेळी मनोवृत्तीचा आणि सहानुभूतीचा फरक नव्हता आणि आजही नाही. त्यामुळे आता विचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

केंद्र शासनाकडे प्रस्तावच पाठविला नाही असा देखील आरोप करण्यात आला. यासबंधातील मी माहिती काढली असता रूपये 4002 कोटी रूपयांची मागणी दिनांक 9 नोव्हेंबर 2015 रोजी केल्याचे मला सांगण्यात आले. त्यामुळे आपण आरोप करण्यापेक्षा आपण काय केले पाहिजे हे पाहणे अतिशय महत्त्वाचे आहे.

आपण आणेवारी काढत असताना त्यातील दोष आपण समजून घेतला पाहिजे. मी एका खरीप हंगामाच्या मिटींगला गेले होते. त्यावेळी मी धानाचा चार्ट बघत होती. त्यावेळी मला आणेवारी दाखविली की, एका हेक्टरमध्ये 7.52 क्विंटल धान होते. अशी आणेवारी निघाली तर कुठलाही शेतकरी जीवंत राहू शकणार नाही. आम्ही हेक्टरी 7 क्विंटल धान पिकवायला लागलो, उंबरठा उत्पन्न दाखवायला लागलो तर आमचे कसे होणार. आम्ही नवीन पद्धतीचे धान लावतो. मेहनतीने पाणी टाकतो. आम्ही रासायनिक खते वापरतो. आमचे उत्पन्न वाढेल कसे ? आणेवारीमध्ये आपण 7.52 क्विंटल धान दाखवत असाल तर आम्हाला आयुष्यभर विमा मिळणार नाही. आयुष्यभर दुष्काळ होऊ शकत नाही. त्यामुळे आणेवारीची पद्धत बदलत असताना उंबरठा उत्पन्न कसे काढण्यात येते ते मला अजून पर्यंत कळलेलेच नाही. मी उंबरठा उत्पन्नावर खूप अभ्यास करीत आहे. आपण उद्योजकांचे उंबरठा उत्पन्न कसे काढतो ? उद्योजक ठरवितो की, मला अमूक एक कारखाना काढायचा आहे, त्यामुळे माझ्याकडे एवढे उत्पन्न होईल, इतका घसारा होईल, इतके नुकसान होईल असे तो सांगतो. आम्ही आमचे उत्पन्न सांगतो की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

एकरी 10 क्विंटल पीक काढत आहोत. हेक्टरी 25 क्विंटल पीक काढत आहोत. आपण आणेवारी काढताना मात्र ती 7.52 क्विंटल काढतात. त्यामुळे उंबरठा पद्धत बदलविण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आणेवारीची पद्धत बदलविणे अत्यंत आवश्यक आहे. आम्ही विम्याचा हप्ता भरतो. आम्ही दरवेळी कर्ज घेतो त्यावेळी विम्याचा हप्ता भरतो. पण जेव्हा आणेवारी निघते तेव्हा मात्र विमा कंपनीचे पोट भरले जाते. शेतकऱ्याला न्याय मिळत नाही. तेव्हा याचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा शेतकऱ्याला आपण विम्याच्या आणि आणेवारीच्या माध्यमातून मदत मिळण्यासाठी हा जो तक्ता आहे तो बदलणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी आता हमी भावावर बोलणार आहे. श्री.शरद पवार यांच्याबद्दल मला नितांत आदर आहे. ते देशाचे कृषि मंत्री असताना आम्ही देखील त्यांच्याकडे गेलो होतो. आम्ही त्यांच्याकडे हमी भाव वाढवून लेव्ही रद्द करण्याची मागणी केली होती. त्यावेळी धानावर लेव्ही होती. मला अत्यंत आदराने सांगावेसे वाटते की, त्यांनी लगेचच धानावरील लेव्ही रद्द केली आणि आम्हाला लेव्हीतून मुक्त केले. हमी भाव कसे काढले जातात हे त्यांनी मला जे सांगितले तेच मी या सभागृहात सांगणार आहे. त्यांनी मला सांगितले की, ताई मला केवळ महाराष्ट्राचा विचार करून चालत नाही. हमी भाव काढत असताना हरयाणा, पंजाब, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश या सगळ्यांच्या उत्पन्नाचा तक्ता एकत्र करून मला आणेवारी काढावी लागते. त्यामुळे हमी भाव काढत असताना मला सगळ्यांचा विचार करावा लागतो. त्यामुळे मी आपल्याला फार मोठ्या प्रमाणावर मदत करू शकणार नाही, असे त्यांनी मला मोकळ्या मनाने सांगितले आणि मला लेव्ही माफ करून दिली. आपण त्यावेळी म्हणजे सन 2012-13 मध्ये 1250 रूपये क्विंटल, सन 2013-14 मध्ये 1310 रूपये क्विंटल, सन 2014-15 मध्ये 1360 रूपये क्विंटल, सन 2015-16 मध्ये 1410 रूपये प्रति क्विंटल असा हलक्या धानाचा भाव होता. जड धान्याला सन 2012-13 मध्ये रूपये 1280 प्रति क्विंटल, सन 2013-14 मध्ये प्रति क्विंटल 1345, सन 2014-15 मध्ये प्रति

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

क्विंटल 1400 रूपये, आणि सन 2015-16 मध्ये प्रति क्विंटल रूपये 1450 इतका भाव दिला. हमी भाव हा एक दर असतो. त्याच्या खाली जाता येत नाही. त्याच्यावर विकण्यास परवानगी मिळते. आज आपल्याकडे उत्पन्नावर खर्च जास्त होत आहे. शेतीवर खर्च जास्त होतो आणि उत्पन्न कमी होते. आंध्रप्रदेशमध्ये खर्च कमी आहे, उत्पन्न जास्त आहे. पंजाबमध्ये खर्च कमी आहे, उत्पन्न जास्त आहे, हरयाणामध्ये खर्च कमी आहे, उत्पन्न जास्त आहे. या सगळ्याचा परिणाम देशाच्या कृषि उत्पन्नावर होत असतो. आज महाराष्ट्रात शेतीवर वाढीव खर्च होत आहे. तो कमी करण्याची गरज आहे. त्याकरिता सरकारने प्रयत्न करावेत अशी माझी सरकारला विनंती आहे. सगळ्यात पहिल्यांदा शेतकरी काय मागतो ? शेतकरी कर्ज माफी मागत नाही. शेतकरी म्हणतो की, माझ्या शेताला पाणी द्यावे. सिंचनाची सोय करावी. शेतकरी हा भीक मागणारा नाही. शेतकरी हा सन्मानाने जगणारा आहे. शेतकरी कधीही कोणाचे कर्ज बुडवत नाही. कर्ज हे उद्योजक बुडवत असतात. कर्ज हे मोठे लोक बुडवतात. शेतकरी कर्ज कधी बुडवत नाही. सिंचनाला पाणी द्यावे, कमी खर्चात खत द्यावे, उत्तम प्रतीचे बियाणे द्यावे, आम्हाला सन्मानाने जगू द्यावे, एवढेच शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

मघाशी मनरेगाच्या मजुरीचे भाव वाढविण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. जेव्हा रोजीचे दर वाढविण्यात येतात त्याचा फटका हा शेतकऱ्यांनाच बसतो. आज मनरेगाच्या मजुरीचा दर रूपये 183/- इतका आहे. त्यामुळे आमचा शेतकरी मजुरांना 200 ते 250 रूपये इतका दर मजुरीवर देत असतो. उद्या जर आपण मनरेगाच्या मजुरीचा दर 300 रूपये केला तर शेतकऱ्याला मजुरीसाठी किमान 500 रूपये इतका दर मजुरीसाठी द्यावा लागेल. आज शेतकऱ्याच्या खिशात पैसाच नाही त्यामुळे तो हा दर कसा काय देऊ शकेल ? अशाने शेतकरी कसा काय शेती करू शकेल याचा आपण कुठे तरी विचार करायला पाहिजे.

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

पूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारात धानाचे, कापसाचे भाव जास्त होते. त्यामुळे आपल्या येथे भाव कमी होते. त्यामुळे हा जो फरक आहे तो आपल्या येथे भाव वाढविण्यासाठी उपयुक्त ठरत असतो. प्रत्यक्षात आज अशी स्थिती आहे की, तांदुळाचे प्रति टन 349.01 डॉलर इतका भाव आहे. इंटरनॅशनल बाजारात हा भाव 212.04 डॉलर इतका आहे. याचा परिणाम धानाच्या शेतीवर होतो. उत्पन्नावरही होतो. मार्केटवरही होतो आणि शेतकऱ्यावरही होतो. मला एक गोष्ट कळत नाही की, कांदा महाग झाला की, सगळेच ओरडतात. त्याचा भाव कोणाला मिळतो ? त्याचा भाव शेतकऱ्याला मिळत नाही ? आम्ही भाजी खाणे बंद केले आणि चरण खाणे सुरू केले तर भाजी उत्पादक शेतकरी कसा वाचेल. शेतकऱ्यांच्या मालाचे भाव वाढविल्यानंतर आपण गोंधळ घालतात. परंतु, कपड्याचे, पेट्रोल, डिझेलसह अन्य गोष्टींचे भाव वाढतात त्याबद्दल एक शब्दही कोणी काढत नाही. शेती मालाचे भाव वाढले की, आपण ओरडाओरड करतो आणि दुसरीकडे शेतकऱ्याच्या हितासाठी आपण येथे भाषण करतो.

M-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

त्यामुळे याचाही कोठेतरी गांभीर्याने विचार होण्याची आवश्यकता आहे असे माझे स्पष्ट मत आहे. या ठिकाणी मला एक गोष्ट सांगावीशी वाटते की, या ठिकाणी कॉटन सपोर्टेट प्राईस, तूर डाळ, सोयाबीनच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

सभापती महोदय, शासन मोठया प्रमाणात शेतकऱ्यांना शेततळी देत असतो. शेततळयाचा कार्यक्रम हा काही आजचा कार्यक्रम नाही तर हा जुना कार्यक्रम आहे. परंतु शेततळयाचे महत्व काही शेतकऱ्यांना समजले तर काही शेतकऱ्यांना समजले नाही. मी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून उस्मानाबाद जिल्हयाला भेट देण्यासाठी गेले होते. समितीने एका विहिरीला भेट दिली होती त्यावेळेस त्या विहिरीला पूर्ण काळा दगड लागला होता. ही विहीर 60 फूट खोल होती तरी सुध्दा काळा दगड काही संपला नव्हता. या विहिरीला छोटे छोटे झिरपे लागले होते. परंतु छोटया झिरप्याने विहीर कधीच पाण्याने भरली जात नाही. त्या शेतकऱ्याला मी विचारले की, या झिरप्याने तुझी विहीर पाण्याने भरेल असे तुम्हाला वाटते का ? त्यावेळेस शेतकरी म्हणाला की, झिरप्याने विहीर कधीही भरली जात नाही. जोपर्यंत मोठे झिरपे लागत नाही तोपर्यंत विहीर पाण्याने भरु शकणार नाही. विहिरीला पाणी लागले नाही तर त्याचा दोष कोणाचा ?

सभापती महोदय, नंतर आम्ही शेततळी पाहण्यास गेलो. शेततळी चांगली होती परंतु शेत तळयाचे प्रमाण कमी होते. या ठिकाणी समितीने जलयुक्त शिवार योजनाही बघितल्या, त्यावेळेस माझ्या डोक्यात अशी कल्पना आली की, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विहीर दिली जाते व त्यासाठी शासनामार्फत 3 लाख रुपये दिले जातात. विहीर देत असताना जर आपण विजेचा पंप किंवा सोलार पंप तसेच डीझल पंप यातील एक जरी पंप विहिरी बरोबर मंजूर केला तर विहीर तयार झाल्याबरोबर त्या शेतकऱ्याला विहिरीतील पाण्याचा उपयोग होईल. विहिरीच्या बरोबर पंप मान्य करुन घेतला तर त्याचा फायदा शेतकऱ्याला होईल. नाही तर विहीर तयार झाल्यानंतर शेतकऱ्याला पंपासाठी 10 खेटया माराव्या लागत असतात. त्यामुळे रोजगार हमी योजनेतून विहीर देत असताना शेतकऱ्याला पंप त्याच वेळेस मंजूर करुन दिला तर आपल्याला शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने न्याय देता येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

सभापती महोदय, खरे दुर्दैव तर आमच्या शेतकऱ्याचे आहे. मराठवाडयात पाण्याची जेवढी सोय नाही तेवढी सोय आमच्याकडे आहे. आमच्या भागातून गोदावरी,वैनगंगा, पैनगंगा अशा मोठमोठया नद्या वाहतात तरी सुध्दा आमच्या भागातील शेतकरी भिकारी आहे. आम्हाला नदीच्या काठावर बसून भीक मागावी लागते. भीक मागण्याचे कारण असे आहे की, आम्ही केवळ वन राखल्यामुळे आमच्याकडे एकही प्रकल्प होत नाही. आमच्या भागात मंजूर झालेले प्रकल्पही नामंजूर होत असतात. कोठे झुडपी जंगल, कोठे रिझर्व्ह फॉरेस्ट तर कोठे संरक्षित फॉरेस्ट असेल. परंतु आम्हाला फॉरेस्टच्या नावाखाली पाणी मिळू शकत नाही. त्यामुळे आता तरी आमच्या भागात पाण्याचे प्रकल्प झाले पाहिजे. आता आमच्या भागात छोटे छोटे बंधारे बांधण्यास सुरुवात झाली आहे. मागच्या वेळेस आम्ही सुप्रमासाठी अडून राहत होतो. सुप्रमा म्हणजे झारीतील शुक्राचार्य आहे की, काय असे आम्हाला वाटते. परंतु या शासनाने आमच्या भागातील 13 कामांच्या सुप्रमांना मान्यता दिली आहे. त्यामुळे सुप्रमाचा विषय लवकर संपवावा अशा प्रकारची भावना आता राज्य शासनाची देखील झालेली आहे. त्यामुळे सुप्रमा लवकर देऊन प्रकल्प लवकर पूर्ण झाले पाहिजे. पहिल्यांदा छोटे प्रकल्प पूर्ण करा व नंतर मोठे प्रकल्प पूर्ण करा. मोठे बंधारे बांधल्याशिवाय उद्योग उभे राहू शकत नाही. आज गोसीखुर्द प्रकल्पात पाणी साठलेले आहे. परंतु या गोसीखुर्द प्रकल्पातील पाण्याचा उपयोग शेतकऱ्यांना होत नाही. त्यामुळे गोसीखुर्द प्रकल्पाचा एक कॅनॉल आमच्या अस्वली मेंढयाला जोडला तर 170 गावांना त्या पाण्याचा उपयोग होऊ शकेल व त्यातून लाखो एकर जमीन ओलिताखाली येऊ शक्ेल. यावेळेस आम्ही पाईपलाईनच्या माध्यामातून पाणी लिफ्ट केले. आमचा प्रयोग यशस्वी झाला परंतु या योजनेच्या माध्यमातून आम्ही जास्त शेतकऱ्यांना पाणी पुरवू शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. शेतातील पीक पाण्यावाचून मरत असताना शेतकऱ्याच्या डोळयातील पाणी आम्ही स्वत: बघितले आहे. खरे म्हणजे आम्ही शेतकऱ्यांना पाणी देऊ शकलो नाही, न्याय देऊ शकलो नाही. त्यामुळे गोसीखुर्द प्रकल्पातील पाणी इतर तलावात सोडले तर धान उत्पादक शेतकऱ्याला दुष्काळाला सामोरे जावे लागणार नाही.

सभापती महोदय, 350-450 वर्षापासून माजी मालगुजारी तलावाची दुरुस्ती झालेली नाही. मध्यंतरी सन्माननीय श्री. अजित पवार साहेब जलसंधारण मंत्री होते त्यांनी मालगुजारी तलावाच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

दुरुस्तीसाठी दरवर्षी 20 कोटी रुपये देऊन सर्व माजगुजारी तलाव दुरुस्त करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु हे 20 कोटी रुपये आले का, मालगुजारी तलाव दुरुस्त झाले का, शेतकऱ्याला न्याय मिळाला काय ?

सभापती महोदय, सर्व मालगुजारी तलावाच्या दुरुस्तीसाठी आमच्या सरकारने 100 कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यामुळे सर्व मालगुजारी तलाव दुरुस्त होऊन शेतकऱ्यांना भविष्यात न्याय मिळावा यासाठी हा कार्यक्रम क्रांतिकारक क्रार्यक्रम म्हणून राबविण्याची आवश्यकता असून यासाठी शासनाने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शासन मागेल त्याला शेततळी देत असते. शेततळी देतांना अगोदर शेतकऱ्याला 28 हजार रुपये दिले जात होते. परंतु या 28 हजारामध्ये शेततळयाचे काम पूर्ण होत नव्हते. त्यामुळे शेततळयासाठी 50 हजार रुपये द्यावेत अशी आम्ही दोन वर्षापासून मागणी करीत होतो. परंतु या शासनाने शेततळयासाठी 50 हजार रुपये केले असून आता शेतकऱ्याला शेततळी करताना कोणतीही अडचण येणार नाही व शेतकरी आपल्या पायावर उभा राहू शकेल.

सभापती महोदय, दुसऱ्याने पाच पैसे दिले तर त्यावर पोट भरत नसते. विरोधी पक्षाने शेतकऱ्यांना एकरी 20 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. परंतु आम्ही एकरी 10 क्विंटल धान तयार करतो. त्यामुळे कितीही नुकसान भरपाई दिली तरी आपण शेतकऱ्यांने नुकसान भरुन देऊ शकत नाही. धानाच्या पिकाच्या लावणीसाठी एकरी 12 हजार रुपये खर्च येतो. यामध्ये शेतकऱ्याच्या व त्याच्या घरच्या माणसांच्या मजुरीचाही उल्लेख नाही. त्यामुळे शासनाने शेतकऱ्याला कितीही नुकसान भरपाई दिली तरी शेतकऱ्याचे नुकसान भरुन येऊ शकत नाही. खऱ्या अर्थाने शेतकऱ्याला कोणीही नुकसानभरपाई देऊ शकत नाही. शेतकऱ्याला नुकसानभरपाई देण्यापेक्षा, कर्ज माफी देण्यापेक्षा शेतकऱ्याला सिंचन प्रकल्प द्या, कमी भावात रासायनिक खते द्या, चांगले बी-बियाणे देऊन शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने स्वत:च्या पायावर उभे राहण्याची हिंमत द्यावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करते.

सभापती महोदय, कृषी आरोग्य योजनेच्या माध्यमातून मातीची तपासणी केली जाते. मातीची तपासणी करणे अतिशय आवश्यक आहे. मी माझ्या शेतात कोणते खत टाकावे याची

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

शेतकऱ्याला माहिती नसते. कोणी सांगितले की, एकरी दोन गोण्या रासायनिक खत टाक व त्याप्रमाणे मी एकरी दोन गोण्या रासायनिक खत टाकले तर पहिल्या वर्षी पीक येते परंतु दुसऱ्या वर्षी पीक येत नाही. अति खतामुळे दुसऱ्या वर्षी पीक येत नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने शेतीच्या मातीचे नमुने तपासण्याची आवश्यकता आहे. मातीचे नमुने तपासले तर कोणत्या शेतामध्ये कोणते खत टाकावे, किती टाकावे याची माहिती मिळाल्यामुळे शेतकऱ्याचा फायदा होतो. मातीचे नमुने या अगोदर तपासले जात नव्हते असे मी म्हणत नाही. परंतु ज्या पध्दतीने मातीच्या नमुन्यांची तपासणी या अगोदर व्हावयास पाहिजे होती त्या प्रमाणात ती झाली नाही. या कामास ज्या प्रमाणात वेग यावयास पाहिजे त्या प्रमाणात तो आलेला नाही. त्यामुळे मातीचे नमुने तपासण्यासाठी कृषी आरोग्य योजनेच्या माध्यमातून शेतीच्या मातीचे नमुने तपासून त्यासंदर्भात योग्य मार्गदर्शन झाले तर शेतकरी चांगल्या प्रकारे पीक काढू शकेल असा मला विश्वास आहे.

N-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये....

सभापती : मी प्रश्नोत्तरे पुकारलेली आहेत. त्यामुळे आपण नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मांडावी.

राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थी तसेच शासकीय कर्मचारी
यांना जातीचे दाखले मिळण्यास होत असलेला विलंब

(१) * ११९३८ श्री.विजय गिरकर, श्री.अनंत गाडगीळ, श्री.रामराव वडकुते, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, ॲड. हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ मे, १९६० पूर्वीपासून ज्या व्यक्तींचा स्थायी निवास महाराष्ट्रात आहे त्यांना १९५० पूर्वीचा दाखला सादर करण्याबाबतची अट लागू राहणार नाही कारण ते अविभाजीत मुंबई प्रातांचे निवासी होते असे शासनाचे परिपत्रक क्र.सीबीसी-२०१४/प्र.क्र.२६४/भावक-५ दिनांक ९ सप्टेंबर, २००४ अन्वये घोषित केले असताना अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र आवश्यक असल्यास संबंधित विभागाकडून १९५० पूर्वीच्या महाराष्ट्रात स्थायी निवास असल्याचा दाखला पुराव्यासह सादर करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागासवर्गीय विद्यार्थी तसेच शासकीय कर्मचारी यांना वेळेवर जातीचे दाखले मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षणापासून वंचित रहावे लागत असून शासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(३) असल्यास, अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय इत्यादी विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शहरी ग्रामीण विद्यार्थांसाठी वेगवेगळ्या स्वरुपाचे निर्णय घेतल्याने मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह विविध शहरांमध्ये शिक्षणासाठी आलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे जमवून संबंधित समाज कल्याण विभागात सादर करण्याची व त्याचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी यापूर्वी महाविद्यालयांना देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच उपरोक्त जात प्रमाणपत्र मिळण्याच्या दृष्टीने शासनाने समित्या स्थापन केल्या आहेत काय व केव्हा, तसेच या समित्यांमार्फत किती जिल्ह्यात व किती व्यक्तींना जातनिहाय प्रमाणपत्र देण्यात आले आहे,

(६) असल्यास, मागासवर्गीय विद्यार्थी व शासकीय कर्मचारी यांना विनाविलंब जातीचे दाखले मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यास जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्‌भवत नाही.

(४) हे खरे आहे.

तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ अंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ विहित करण्यात आले आहेत. सदर नियमांनुसार जात पडताळणीचे कामकाज करण्यात येते. त्यानुसार जाती दावा सिध्द करण्याची जबाबदारी संबंधितांची आहे. ..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजकुमार बडोले....

(५) सद्य:स्थितीमध्ये राज्यात १५ विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत आहेत. या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचा कामाचा व्याप विचारात घेऊन समित्यांचे कामकाज प्रभावीपणे व्हावे, याकरीता प्रत्येक जिल्ह्याकरिता स्वतंत्र समिती कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(६) प्रलंबित प्रकरणांची संख्या व अपुरा कर्मचारी वर्ग यांचा समन्वय साधून तसेच अतिरिक्त कार्यभार देऊन व वेळोवेळी विशेष मोहिमा आयोजित करुन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्द पातळीवर करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विजय गिरकर : सभापती महोदय, 1960 पूर्वी मुंबई प्रांत होते. त्यावेळी गुजरात आणि महाराष्ट्र हे संयुक्त राज्य होते. गुजरात राज्यातील अनुसूचित जाती किंवा मागासवर्गीय लोकांना 1950 पूर्वीच्या वास्तव्याच्या दाखल्याची अट लागू राहणार नाही असा महाराष्ट्र सरकारने शासन निर्णय काढला होता. त्यांच्याकडून 1960 नंतरचे वास्तव्याचे दाखले घ्यावेत असा तो शासन निर्णय आहे. असे असताना 1950 पूर्वीच्या वास्तव्याचा दाखला मागितला जातो. त्यामुळे त्या लोकांना वास्तव्याचा दाखल मिळविण्यात अनेक अडचणी येतात. विशेषत: विद्यार्थी आणि अधिकारी/कर्मचाऱ्यांना तो दाखला मिळविण्यात खूप अडचणी येतात, किंबहुना त्रास होतो. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, गुजरात राज्यातील मागासवर्गीय लोकांकडे 1950 पूर्वीचा वास्तव्याचा दाखला न मागता 1960 नंतरचा वास्तव्याचा दाखला मागवून, त्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल काय ? तसेच दुसरी बाब अशी की, पूर्वी कॉलेजच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जात पडताळणीचे प्रकरण जात पडताळणी समितीकडे पाठविले जात होते. परंतु आता ऑनलाईन पध्दतीने त्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आपले प्रकरण स्वत:च सादर करण्यास सांगितले आहे. वास्तविक पाहता मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रक्रियेने अर्ज सादर करता येत नाही किंवा ती प्रक्रिया पार पाडता येत नाही. विद्यार्थ्यांना या माध्यमातून अर्ज सादर करावयाचा झाल्यास त्यांना मूळ जिल्ह्यात जावे लागते. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तातडीने दाखले देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात येईल ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11938....

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, दिनांक 1 मे, 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची पुनर्रचना झाली. कर्नाटक, गुजरात व महाराष्ट्र या प्रांताचे स्वतंत्र राज्य निर्माण झाले. या पुनर्रचनेनंतर जो भाग महाराष्ट्रात राहिला त्या अनुसूचित जातीच्या लोकांचे 1960 पूर्वीपासूनचे वास्तव्य महाराष्ट्रात होते. त्यामुळे त्यांना 1950 पूर्वीच्या वास्तव्याची अट लागू राहील असे माननीय उच्च न्यायालयाने 60/60/2008 मध्ये कु.श्वेता लाल विरुध्द महाराष्ट्र शासन यांच्या प्रकरणाच्या अनुषंगाने काढण्यात आलेल्या आदेशात नमूद केले होते. विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र यासाठी 1950 ची अट नंतर सुध्दा कायम करण्यात आली आहे. त्यामुळे 1960 पूर्वी जे संयुक्त मुंबई प्रांतात होते, त्यांना 1950 ची अट तशीच लागू राहील.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, आपण जी मागणी करीत आहात ती प्रचलित पध्दतीनुसार आहे, असे माननीय मंत्री महोदय सांगत आहेत. माननीय मंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांना अपेक्षित असलेलेच उत्तर आपण दिले आहे ना ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, 1950 पूर्वीच्या वास्तव्याची अट शिथिल करण्यात आलेली नाही. परंतु सदरहू अट शिथिल करण्याबाबत दिनांक 19 नोव्हेंबर, 2015 रोजीच्या पत्रान्वये ॲटर्नी जनरल यांचे मत मागविले आहे. त्यांनी सकारात्मक मत दिले तर नक्की ती अट शिथिल करण्यात येईल.

श्री.विजय गिरकर : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 एप्रिल, 2004 रोजी काढलेला शासन निर्णय माझ्याकडे आहे. त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, ते लोक अविभाज्य मुंबई प्रांताचे निवासी असल्यामुळे त्यांना 1950 पूर्वीची अट लागू राहणार नाही. महोदय, सदरहू शासन निर्णयाची प्रत मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांकडे पाठवितो. माननीय मंत्र्यांनी न्यायालयाचा उल्लेख केला. या निमित्ताने माझी मागणी आहे की, 1950 पूर्वीच्या वास्तव्याचा जो दाखला मागितला जातो तो एकप्रकारे अन्याय आहे. त्यामुळे हा अन्याय दूर करावा. मी विचारु इच्छितो की, एकीकडे राज्य सरकारने शासन निर्णय काढलेला असताना पुन्हा ॲटर्नी जनरल यांचे मत मागण्याचा संबंध कुठे येतो ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने न्यायालयांनी वेगवेगळी मते दिलेली आहेत. माधुरी पाटील प्रकरणात 1994 मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक जात पडताळणीचे प्रकरण स्वतंत्रपणे तपासण्यात येईल असा निवाडा दिला होता. राज्य सरकारने या विषयी केंद्र सरकारच्या ॲटर्नी जनरल यांच्याकडे मत मागविले आहे. पूर्व विदर्भाचा काही भाग मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यात आहे. त्यामुळे त्या भागातील लोकांचे सुध्दा काही प्रश्न सारखेच आहेत. पुनर्रचनेच्या वेळी कर्नाटक आणि गुजरातमध्ये काही गावे गेली आहेत. 1950 पूर्वीचा प्रेसिडेन्शीयल रूल आहे. त्यानंतर 2012 मध्ये नियमावली करण्यात आली. सन्माननीय सदस्यांनी 2004 च्या शासन निर्णयाबाबत विचारणा केली आहे. जात वैधता आणि जात प्रमाणपत्राच्या बाबतीत 2012 मध्ये राज्याने कायदा केला आहे. त्यामुळे उक्त नियमावलीनुसार आपण कार्यवाही करीत आहोत. त्यामुळे 1950 ची अट यापुढे सुध्दा कायम राहील.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, सद्य:स्थितीत राज्यात मागासवर्गीय विद्यार्थी तसेच शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या जात पडताळणीचे किती प्रस्ताव प्रलंबित आहेत, तसेच सदरहू प्रस्ताव विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासन काही निर्णय घेईल काय ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, आजच्या घडीला राज्यामध्ये वेगवेगळ्या जात पडताळणी समित्या कार्यरत आहेत. त्या सर्व समित्यांकडे साधारणत: एकूण 1 लाख 3 हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. परंतु यातील 50 टक्के प्रकरणे ही वास्तव्याचे पुरावे मिळत नसल्यामुळे प्रलंबित आहेत.

सभापती : या विषयी सन्माननीय सदस्य श्री.विजय गिरकर यांनी मूळ प्रश्न विचारला होता की, महाराष्ट्र राज्याच्या पुनर्रचनेनंतर 1950 पूर्वीचा की 1960 नंतरचा वास्तव्याचा दाखल घ्यावा. हा प्रश्न एवढ्यापुरताच मर्यादित आहे. मला वाटते या सभागृहात या प्रश्नाला राज्यव्यापी स्वरूप देण्याची गरज नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना याच विषयाच्या अनुषंगाने प्रश्न विचारावयाचे असतील तरच विचारावेत.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार 2004 चा शासन निर्णय न्यायालयात set-aside झाला नाही. याचा अर्थ आजही तो शासन निर्णय वैध

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11938....

ॲड.राहुल नार्वेकर....

आहे. सदरहू शासन निर्णय वैध असताना आणि त्या शासन निर्णयामध्ये 1950 पूर्वीच्या वास्तव्याच्या अटीचे कम्पलशन नसताना सुध्दा त्या बाबत कम्पलशन का केले जात आहे ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, जात वैधता समितीच्या संदर्भात 2012 मध्ये कायदा करण्यात आला. त्यामुळे पूर्वीचे शासन निर्णय आणि नियम ओव्हररूल झालेले आहेत. सन्माननीय सदस्य म्हणतात त्यानुसार सदरहू जी.आर. आता रद्द झाला आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विजय गिरकर यांनी आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांना शासन निर्णयाची प्रत दिलेली आहे. दिनांक 9 सप्टेंबर, 2004 चे शासनाचे परिपत्रक आहे. त्या परिपत्रकामध्ये न्यायालयीन आदेशाचा संदर्भ दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक 2636/98 च्या निर्णयाच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाने हे परिपत्रक काढले आहे. त्यात स्पष्टपणे नमूद केले आहे की, न्यायालयाच्या निर्देशाच्या अनुषंगाने 1950 पूर्वीची वास्तव्याची अट शिथिल करुन ती 1960 नंतर गृहीत धरावी. हे आदेश त्याच विभागाने काढले आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, न्यायालयाच्या निकालानुसार आणि शासनाच्या परिपत्रकानुसार जातीचा दाखला किंवा जात वैधता प्रमाणपत्रासाठी 1950 पूर्वीच्या वास्तव्याची अट शिथिल करुन, ती 1960 पासून गृहीत धरण्यात येईल काय ?

....पी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11938....

सभापती : माननीय मंत्री, सन्माननीय सदस्यांकडून पुन्हा पुन्हा तोच प्रश्न विचारला जात आहे. दोन प्रश्न तयार झाले आहेत. ॲटर्नी जनरलचे ओपिनियन गरजजेचे आहे का आणि आपला जो शासन निर्णय आहे, त्यावर कोर्टाने स्टे दिला नसेल आणि तो अस्तित्वात असेल, अंमलबजावणी होणार असेल तर हे सर्व करण्याची गरज काय आहे ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, सन 2012 मध्ये ऑलरेडी नियम बनविले आहेत. त्यामुळे त्या पूर्वीचे शासन निर्णय रद्द झाले आहेत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, न्यायालयाचे निर्देश रद्द होऊ शकत नाहीत. शासनाचे परिपत्रक रद्द झाले असेल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे. आपले कायदेमंडळ आहे. आता दाखले मिळविण्याच्या संदर्भात दुकानदारी सुरू आहे. आपल्यालाही हे माहीत आहे. विभागाच्या सचिवांनी दिलेले साचेबध्द उत्तर देऊ नका. कायदे का अपुरे आहेत, शासन कायदे बदलण्याचा विचार करेल का ? आपण कायदे करण्यासठी आहोत. सभागृहाचे काम जनतेच्या हितासाठी कायदे बनविणे हे आहे. शासन त्या दृष्टीकोनातून विचार करेल का, आज कैक म्हणजे जवळपास 1 लाख अर्ज प्रलंबित असतील तर शासनला हे भूषणावह आहे का ? सभागृहात अनेक वेळा या संदर्भात चर्चा केली. मागच्या सरकारच्या वेळी देखील अनेक वेळा चर्चा केली. उघड पुरावे दिले आहेत. शासन या दृष्टीने सर्व नवीन पुरक कायदे करण्याचा विचार करेल का, झटपट दाखले देण्याची व्यवस्था करेल का ? मी वृत्तपत्रात वाचले की, विद्यार्थी शाळेत गेल्यानंतर ताबडतोब त्याची जात लिहिली जाईल. त्यामुळे याची अंमलबजावणी शासन तातडीने करेल का ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, सदर प्रकरणी माझे उत्तर 'होय' असे आहे.

श्री. रामराव वडकुते : सभापती महोदय, मी आपले लक्ष वेधू इच्छितो की, सन 1950 पूर्वी धनगराच्या जागी धनगड म्हणून दाखला देत होते. आता तसे दाखले देण्यास काही अडचण आहे का ? महाराष्टात धनगड अशी कुठली जातच नाही. त्यामुळे धनगरला धनगडाचे दाखले देण्याचे काम सरकार करेल का ? सन 1950 ला महाराष्ट्र वेगळा झाला. काही लोकांना तसे दिले. महाराष्ट्राच्या बाहेर धनगड गेले, त्यांना धनगड म्हणून दाखले दिले आहेत. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11938....

सभापती : माननीय मंत्र्यांनी तपासून घ्यावे.

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, हा विषय आदिवासी विकास विभागाशी संबंधित आहे. तरी देखील हा विषय तपासून घेण्यात येईल.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, प्रश्नामध्ये विचारण्यात आले होते की, राज्यामध्ये एकूण किती समित्या आहेत ? उत्तरात म्हटले आहे की, एकूण 15 विभागीय समित्या आहेत. हा प्रश्न सातत्याने सभागृहात चर्चेला येत आहे. आपल्याला सर्वांना जाणीव आहे की, दाखले वेळेवर मिळत नाहीत. काही कायदे करण्याची गरज आहे आणि त्या संदर्भात माननीय मंत्र्यांनी 'होय' असे म्हटले आहे. 15 विभागीय समित्यांमध्ये एकूण किती कर्मचारी, अधिकारी कार्यरत आहेत, किती जागा रिक्त आहेत ? हा प्रश्न मागच्या अधिवेशनात तसेच त्या अगोदरच्या अधिवेशनात मी उपस्थित केला होता. योगायोगाने मागच्या वर्षी जे आकडे सांगितले ते, 1 लाख 3 हजार अर्ज प्रलंबित आहेत, असे उत्तर परत देण्यात आले आहे. मागच्या अधिवेशनात या प्रश्नाला हेच उत्तर देण्यात आले हाते की, 15 समित्या कार्यरत आहेत आणि 6 ठिकाणी अधिकारी नाहीत. तेच उत्तर आज दिले आहे. 15 समित्यांमध्ये आता किती अधिकारी पोस्टेड नाहीत ? जिल्हा समिती स्थापन करण्याच्या संदर्भातही मागील अधिवेशनात सांगितले होते. लवकरात लवकर जिल्हा समिती स्थापन करण्यात येईल, जेणेकरून जातीचे दाखले वेळेवर मिळतील असे म्हटले होते. जिल्हा समिती कधीपर्यंत स्थापन करणार आहात ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोय, कास्ट व्हॅलिडिटी ही प्रोसेस आहे. मागच्या अधिवेशनात 1 लाख 3 हजार अर्ज दिले असे नाही. प्रकरणे दाखल होतात आणि दाखले दिले जातात. सातत्याने चालणारी ही प्रक्रिया आहे. त्यामुळे आज आमच्याकडे 1 लाख 3 हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. शैक्षणिक प्रकरणे 54645, सेवा प्रकरणे 16872, निवडणूक प्रकरणे 29880 अशी एकूण 1 लाख 3 हजार प्रकरणे आजच्या घडीला आहेत. सातत्याने चालणारी ही प्रोसेस आहे. प्रत्येक जिल्हावार जात समित्या स्थापन निर्माण करण्याच्या संदर्भातील प्रश्न होता. प्रत्येक जिल्ह्याला जात पडताळणी समिती निर्माण करण्याबाबत ऑलरेडी मागच्या अधिवेशनात शासनाचा निर्णय झाला होता. अध्यक्ष पदे जी अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा समकक्ष पदे आणि उरलेली

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11938....

श्री. राजकुमार बडोले ....

बाकीची अशी साधारणत: 300 पदे आजच्या घडीला रिक्त आहत. ती पदे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. कार्यरत असणाऱ्या 15 समित्यांमध्ये अध्यक्षांची 11 पदे रिक्त आहेत, 4 सदस्य पदे रिक्त आहेत, सदस्य सचिवांची 3 पदे रिक्त आहेत. मात्र तरी सुध्दा मागील 3 वर्षापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र देत होते त्याच रेश्यो पाहिला तर असे दिसेल की, तो साधारण दरवर्षाला 3 लाख होता, आजमितीला 17 लाख जात वैधता प्रमाणपत्रे देत आहोत. प्रत्येक ठिकाणी कक्ष निर्माण केले आहेत. ऑनलाईन, मोबाईलवर देत आहोत. आता समिती निर्माण करण्याचा प्रश्न आहे.

ॲड. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, 3 लाखांच्या अगेंस्ट किती अर्ज हाते आणि 17 लाखांच्या अगेंस्ट किती अर्ज आले हे सांगावे.

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, ही चालणारी प्रोसेस आहे. मी माहिती पटलावर ठेवतो.

सभापती : मला भीती होती त्याचप्रकारे हा प्रश्न भरकटत चालला आहे. पुनर्रचनेनंतर इकडचे तिकडे झाले, त्यांना सन 1950 की सन 1960 चा पुरावा या संदर्भातील प्रश्न होता, माझ्या समजुतीने त्यावर माननीय मंत्र्यांनी दिलेले उत्तर स्पष्ट आहे की, त्यांनी हे एजींना पाठविले आहे. माझे माननीय मंत्र्यांना निर्देश आहेत की, आपण एजींकडून हे एक महिन्याच्या आत काय तांत्रिक मुद्दा आहे ते पहावे आणि अधिवेशन असेल तर सभागृहासमोर ठेवावे किंवा नसेल तर मला सांगावे. आपण यासबंधी बघू. दोन्ही बाजूंच्या लोकप्रतिनिधींना हे मान्य राहणार आहे. आपण कितीही आकडेवारी दिली तरी, काही सांगायचे झाले तरी विद्यार्थ्यांना, मागासगर्वीयांना किंवा निवडकींमध्ये आवश्यक असलेल्या जात वैधता प्रमाणपत्रांच्या संदर्भात बराच गोंधळ सुरू असतो. माझी सूचना अशी आहे की, एक अशी काही तरी सिस्टिम तयार करावी की, त्यात लवकरात लवकर, एफिशिएन्टली सर्व दाखल दिले जातील. आपण आम्हाला हे सादर करून द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जिल्ह्यातील एका गावाचा स्मार्ट दलित गाव म्हणून विकास करण्याबाबत

*(२) * १२५११ श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाणण:ण सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय* :-

(१) जिल्ह्यातील एका गावाचा स्मार्ट दलित गाव म्हणून विकास करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ *मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,*
(२) असल्यास, या योजनेचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, ही योजना केंव्हा अंमलात आणण्यात येणार आहे ?

श्री. राजकुमार बडोले : (१) *अंशत: खरे आहे. या विभागाने दिनांक* ९.१०.२०१५ *च्या शासन निर्णयाव्दारे निवडक वस्तीचा सर्वकष विकासाची योजना तयार करुन कार्यान्वित करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.*
(२) व (३) *योजना प्रगतीपथावर आहे.*

श्री. रामराव वडकुते : सभापती महोदय, गेल्या ऑगस्ट, 2015 ला दलित गावे सुधारण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. परंतु त्यावर आजही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. कुठली गावे निवडायची, किती निधी उपलब्ध केला जाईल, सुधारणा कशा प्रकारे करायच्या किंवा विकास कसा करायचा याचे कोणतेही मार्गदर्शन आजपर्यंत शासनाकडून झालेले नाही. सातत्याने दलितांवर अन्याय होत आहे. एकीकडे घोषणा करायच्या, मात्र अंमलबजावणी करायची नाही असे चालले आहे. सरकारने या योजनेचे काय स्वरूप आहे याची सुध्दा कल्पना दिलेली नाही. घोषणा करून 7/8 महिने झाले आहेत, दलितांबाबतचा निर्णय झालेला नाही. शासन हा निर्णय कधी करणार आहे ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती निमित्ताने सामाजिक न्याय विभागाने कार्यक्रम घेतले, त्यामध्ये दलित वस्तींच्या सर्वकष विकासासाठी योजना तयार करणे हा विषय होता.

....Q

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12511.....

श्री.राजकुमार बडोले.....

त्या संदर्भातील योजना आम्ही तयार करीत आहोत. या योजनेसाठी किती गावे निवडायची, 1 हजार लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या दलित वस्तीच्या गावांचा समावेश व्हावा, या संदर्भातील धोरण आम्ही ठरवीत आहोत. मला वाटते, लवकरच त्या संदर्भातील योजना आपल्यासमोर येईल.

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, ही योजना किती दिवसांत आमच्यासमोर येईल, या योजनेचा आराखडा कसा राहील, त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे होईल, या योजनेअंतर्गत कोणत्या सुविधा दलित वस्तीला मिळतील, शिक्षण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अशा कोणत्या व्यवस्था यामधून उभारल्या जातील, दलित वस्ती सुधारण्यासाठीचा नेमका कोणता आराखडा शासन करीत आहे, हे मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगितले पाहिजे.

सभापती : अद्याप हा आराखडा निश्चित व्हावयाचा आहे. त्यामुळे मंत्री महोदय त्या संबंधिची सविस्तर माहिती कशी देऊ शकतील ?

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने एक अतिशय चांगला उपक्रम शासन सुरु करीत असेल तर खरोखरच हे शासन अभिनंदनास पात्र ठरेल. शासनाने ही योजना ऑगस्ट, 2015 मध्ये जाहीर केली आणि प्रत्येक जिल्ह्यातील एक गाव स्मार्ट दलित गाव म्हणून उभारू, असे सांगितले. या स्मार्टचे आपल्याला काय कौतुक आहे, हे मला समजत नाही. परंतु, आपल्याला त्याच पध्दतीने विकास करावयाचा असेल तर आम्हाला काही हरकत नाही.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, पुरवणी मागणीत या योजनेसाठी किती निधी ठेवलेला आहे आणि त्यामधून प्रत्येक जिल्ह्याला किती निधी दिला जाणार आहे, त्याचे नियोजन कसे केले आहे आणि प्रत्येक स्मार्ट दलित वस्तीचा आराखडा तयार आहे का, ही माहिती मंत्री महोदय सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहेत का ?

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12511.....

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, सुस्वातीला स्मार्ट दलित गाव, अशी संकल्पना नव्हती. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त आम्ही संकल्पना मांडली व निवडक दलित वस्तींसाठी विकास योजना तयार करुन कार्यान्वीत करण्यासाठी आम्ही 20 कोटी रूपयांची तरतूद केली होती. या गावांचा आराखडा तयार करण्यासाठी 1 हजार लोकसंख्येवरील दलित वस्तीची गावे घेण्यासंबंधी आम्ही विभागाला कळविले होते. 20 कोटी रूपयांची तरतूद ही टोकन प्रोव्हिजन आहे. अधिकचा निधी लागला तर त्याची तरतूद करता येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाने ही योजना जाहीर केली. आज डिसेंबर महिना सुरु आहे आणि वर्षाचा हा शेवटचा महिना व शेवटचे अधिवेशन आहे. या अधिवेशनानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च महिन्यामध्ये आहे. आता या सरकारने या योजनेसाठी 20 कोटी रूपयांची तरतूद ठेवली आहे आणि या योजनेचा मसुदा अद्याप तयार झालेला नाही. म्हणजे, परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा वापर करुन दलित वस्तीसाठी योजना जाहीर करायची आणि मसुदा तयार करायचा नाही. मंत्री महोदय केवळ एवढेच सांगू शकत आहेत की, या योजनेमध्ये 1 हजार लोकसंख्या असलेल्या दलित वस्तीचा विचार करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत दलित वस्तीमध्ये आपण काय करणार आहात, यापूर्वी सुरु असलेल्या दलित वस्ती सुधार योजना बंद करणार आहात का किंवा ती योजना सुरु ठेऊन त्याच योजनेचा निधी या नवीन योजनेसाठी देणार आहात का, या योजनेसाठी वेगळा निधी देणार आहात का, या योजनेचा मसुदा काय आहे, स्मार्ट दलित वस्ती याचा अर्थ काय आहे, त्याची व्याख्या आपण केली आहे का ? दलित वस्ती सुधार योजनेमधून सामाजिक सभागृहे, नाली व रस्त्यांचे बांधकाम आणि अन्य कामे केली जातात. त्या कामांव्यतिरिक्त या नवीन योजनेत कोणत्या कामांचा समावेश आपण केला आहे, अशा स्वस्याची काही ठराविक माहिती मंत्री महोदय देऊ शकतील का ?

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12511.....

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, निवडक दलित वस्तीच्या संदर्भातील तपशील आम्ही सहायक आयुक्तांकडून मागविलेला आहे. साधारणत: निवडक दलित वस्तीसाठी सर्वंकष विकासाच्या योजना तयार करण्यासंबंधी जे उपक्रम राबवावयास दिले होते त्यामध्ये पाणी पुरवठा, मलनि:सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, गटारे, वीज पुरवठा, पर्जन्य पाण्याचा निचरा, अद्ययावत वाचनालये, सौरपथ दिवे, कम्युनिटी हॉल, अशा अनेक बाबी त्यामध्ये अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ऑगस्ट महिन्यामध्ये शासनाने ही योजना जाहीर केली आहे. योजना जाहीर होऊन आज चार महिने झाले तरी शासनाचा मसुदा तयार नाही. मी जबाबदारीपूर्वक संगतो की, पुर्वीच्या दलित वस्ती सुधार योजनेमध्ये ज्या कामांचा समावेश आहे, त्याच कामांचा उल्लेख मंत्री महोदयांनी नवीन योजनेच्या संदर्भात आता केला आहे. रस्ते, नाली बांधकाम, दिवाबत्ती, सामाजिक सभागृह आणि अन्य अनेक कामे सध्याच्या दलित वस्ती सुधार योजनेमधून करता येतात. म्हणजे, योजना पुर्वीचीच आहे, निधीही तोच आहे. परंतु, परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त नवीन योजना सुरु केल्याचे दाखवायचे, हा परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान आहे. नवीन योजनेचा मसुदा चार महिन्यात तयार होत नसेल तर तो देखील अपमान आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया विषय भलतीकडे नेऊ नये. मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी पुन्हा एकदा सर्वंकष माहिती घ्यावी. तोपर्यंत मी हा प्रश्न राखून ठेवत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील विशेषत: पांढुर्णा (जि.वर्धा) व रायगड येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत होत असलेल्या लैगिंक अत्याचाराबाबत

(३) * ११९५८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.सुनील तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: पांढुर्णा (जि.वर्धा) येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील एका अल्पवयीन मुलींवर लैगिंक अत्याचार झाला असून रायगड येथील आश्रमशाळांमध्येदेखील अनेक अत्याचार होत असल्याचे तसेच १३ आश्रमशाळा बेकायदा सुरु करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पांढुर्णा तसेच रायगड जिल्ह्यातील बेकायदा आश्रमशाळांवर व संबधित दोषींवर शासनाने तसेच जिल्हा प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : *(१) हे अंशत: खरे आहे.*
शासकीय आदिवासी आश्रमशाळा पांढुर्णा (जि.वर्धा) येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाला आहे हे खरे आहे. तथापि रायगड जिल्ह्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांत अशा प्रकारची घटना घडलेली नाही. तसेच वर्धा व रायगड जिल्ह्यात बेकायदा आश्रमशाळा सुरू नाहीत.
(२) होय, या प्रकरणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांच्या कार्यालयाने चौकशी केली आहे. सदर चौकशीत शासकीय आदिवासी आश्रमशाळा पांढुर्णा येथील मुख्याध्यापक, अधिक्षक व अधिक्षिका यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे दिसुन आले आहे.
(३) सदर प्रकरणाच्या अनुषंगाने अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांनी शासकीय आदिवासी आश्रमशाळा पांढुर्णा येथील मुख्याध्यापक, अधिक्षक व अधिक्षिका यांना निलंबित केले आहे. तसेच आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर घटनेचा पोलीस तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पांढुर्णा, जिल्हा वर्धा येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराची घटना सप्टेंबरमध्ये घडली, त्या संदर्भातील हा प्रन आहे.

...5....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11958.....

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, लेखी उत्तरात शासनाने अतिशय तपशिलवार माहिती दिलेली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आदिवासी विभागाला आदिवासी आश्रमशाळेमधील मुलीवर झालेल्या अत्याचाराबाबत प्रश्न विचारल्यानंतर त्या विभागाने खरी माहिती रेकॉर्डवर आणलेली आहे. त्याबरोबरच मुख्याध्यापक, अधीक्षक, अधिक्षिका यांच्यावर कारवाई देखील केलेली आहे. मला असे वाटते की, आदिवासी विकास मंत्री महोदयांनी या प्रकरणी लक्ष घातले आहे आणि विभागाच्या अधिकाऱ्यांनीही सर्वंकष माहिती घेतली आहे, हे महत्वाचे आहे. त्यांनी ते योग्यच केलेले आहे.

सभापती महोदय, मला या संदर्भात दोन प्रश्न विचाराबयाचे आहेत. श्री.अंकित गोयल, पोलीस अधीक्षक, वर्धा यांचे दैनिक लोकमतमध्ये असे विधान छापून आलेले आहे की, त्या शाळेतील दोन मुलींवर अत्याचार झाला आहे. तथापि, या लेखी उत्तरात एका मुलीवर अत्याचार झाल्याची माहिती देण्यात आलेली आहे. संख्या दोन की एक, हे महत्वाचे नाही. कारण, एका मुलीवर जरी अत्याचार झाला असला तरी ते गंभीर आहे.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, या मुलीचे शिक्षण पुन्हा सुरु होण्याच्या दृष्टीकोनातून सरकारने कोणती पावले उचलली आहेत ?

सभापती महोदय, मुख्याध्यापक आणि अधिक्षिका यांना शासनाने या प्रकरणात सहआरोपी केले आहे, ही फार महत्वाची गोष्ट आहे व ते योग्यच केले आहे. परंतु, हे सहआरोपी आता जामिनावर सुटले आहेत. या प्रकरणात असे दिसते की, चौकीदारामार्फत आदिवासी आश्रमशाळेत अशा प्रकारे रॅकेट सातत्याने चालविले जात असते. आदिवासी आश्रमशाळेत मुली शिकत आहेत, त्यांच्या सुरक्षिततेसंबंधी दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची एक तदर्थ समिती गठीत करुन या संदर्भातील पूर्वीच्या शिफारशींची अंमलबजावणी झाली आहे किंवा नाही, हे तपासले जावे. अशा प्रकारचा सकारात्मक निर्णय घेऊन शासन याबाबतीत कशा प्रकारे पुढाकार घेणार आहे ?

श्री.विष्णु सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सुचनेचा आम्ही निश्चितपणे विचार करु

...6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11958.....

श्री.विष्णु सवरा.....

सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळेतील मुलींच्या संरक्षणासाठी सुरक्षा यंत्रणेच्या मध्यमातून सुरक्षा रक्षक नेमण्याची कार्यवाही आम्ही करीत आहोत. याबाबत सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे, त्या सूचनेचाही विचार करता येईल.

सभापती महोदय, या प्रकरणातील चौकीदार हा शासकीय सेवक नाही तर तो खाजगी कंत्राटदाराचा सेवक आहे.

...R-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11958.....

श्री.विष्णू सवरा.....

त्यांनी हे कृत्य केलेले आहे. तो चौकीदार सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. परंतु, यासाठी जे मुख्याध्यापक, अधीक्षक आणि अधीक्षिका जबाबदार आहेत त्यांच्यावर आपण निलंबनाची कारवाई केलेली आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, त्या आश्रमशाळेत जो चौकीदार आहे तो खाजगी ठेकेदाराचा चौकीदार आहे. तो खाजगी ठेकेदार कोण आहे आणि आश्रमशाळेत खाजगी ठेकेदाराला चौकीदार नियुक्त करण्याचा अधिकार आहे काय आणि तसा अधिकार दिला असेल तर त्यासाठी शासनाची परवानगी घेतली आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या मुलीवर लैंगिक अत्याचार झाला त्या मुलीचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ? तसेच, राज्यातील अनेक आश्रमशाळांमध्ये मुलींवर लैंगिक अत्याचार होतात, ते रोखण्यासाठी शासनाने काही निर्णय घेतलेला आहे काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, जो चौकीदार होता तो एका खाजगी ठेकेदाराकडे काम करीत होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने एका खाजगी ठेकेदाराला बांधकामाचे कंत्राट दिलेले आहे. त्या चौकीदाराचे नाव श्री.राजू लांडगे असून तो त्या ठिकाणी राहत होता आणि त्याने हे कृत्य केलेले आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुरक्षितेच्या संदर्भात दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आम्ही आश्रमशाळांच्या आणि आश्रमशाळेतील मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षारक्षक नेमण्याची कार्यवाही करीत आहोत. सध्या आश्रमशाळेत पहारेकरी आहेत. त्याशिवाय स्त्री अधीक्षिका आहेत. परंतु, स्त्री अधीक्षिका यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे. मुख्याध्यापकांना देखील निलंबित करण्यात आले आहे. तसेच, मुलांच्या वसतिगृहाच्या अधीक्षकांना देखील निलंबित करण्यात आले आहे. मला काल दिनांक 14 डिसेंबर, 2015 रोजी अशी माहिती मिळाली की, आश्रमशाळेत आमचा जो चौकीदार होता त्याचे नाव श्री.कामाठे असे आहे आणि तो यामध्ये दोषी आढळून आल्यामुळे त्याला देखील आम्ही निलंबित केले आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11958.....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. शासनाने विविध मुलींच्या पुनर्वसनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही केलेली आहे ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, जी कार्यवाही करावयाची आहे ती आम्ही केलेली आहे. ती मुलगी आश्रमशाळेत शिक्षण घेत आहे. ती मुलगी बाहेर गेलेली नाही. त्या मुलीने ही घटना शिक्षकांना किंवा इतर कोणालाही सांगितली नाही. ज्यावेळी ती मुलगी रक्षाबंधनासाठी आपल्या घरी गेली त्यावेळी तीने आई-वडिलांना ती घटना सांगितल्यानंतर ही घटना उघडकीस आलेली आहे. त्यामुळे आम्ही संबंधितांवर कारवाई केलेली आहे.

सभापती : माननीय मंत्री महोदय, मला असे वाटते की, वारंवार अशा घटना घडत आहेत. अशा घटनांमध्ये जी शारीरिक इजा होते त्यावर निश्चित स्वरूपाचे उपचार करता येतील. परंतु, मला असे वाटते की, त्या महिलांना किंवा मुलींना जे सायकॅट्रिक्ट उपचार लागतात त्या संबंधी विभागाने विशेष धोरण घ्यावे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, निश्चितपणे असे धोरण घेतले जाईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा विषय अत्यंत गंभीर आहे आणि याची सभागृहाने दखल घेतली पाहिजे. ही एकच घटना नाही. अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. अमरावती येथील तपोवन आश्रमशाळेत 7 मुलींवर अत्याचार झालेला आहे. त्यापैकी एका मुलीने आत्महत्या केलेली आहे. अकोला येथील जवाहर नवोदय आश्रमशाळेत 55 मुलींवर शिक्षक आणि केअर टेकर यांनी अत्याचार केलेला आहे. त्यांनी त्या मुलींचे लैंगिक शोषण केलेले आहे. अकोट येथील शासकीय निवासी वसतिगृहामध्ये 15-16 वर्षाच्या 6 मुलींचे ॲबॉर्शन झालेले आहे. तेथे श्रीमती राऊत नावाच्या महिला अधीक्षिका आहेत. त्या अधीक्षिकेच्या पतीने आणि 23 वर्षाच्या मुलाने व त्याच्या मित्रांनी मुलींना वेश्यांप्रमाणे वापरले आहे. मला या गोष्टीचा भयंकर संताप येतो. अशा प्रकारे मुलींवर अत्याचार होत आहे. डॉ.आशाताई मिरगे महिला आयोगाच्या सदस्या आहेत. ही घटना 25 ऑक्टोबर रोजी घडलेली आहे आणि आपण इतके लाईटली घेत आहात ? त्या मुली लहान आहेत, आदिवासी आहेत, आश्रमशाळेत शिक्षण घेत आहेत, मागासवर्गीय, दलित आहेत त्यांच्यासाठी आपण काय करीत आहोत ? सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी राजीनामा

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11958.....

श्रीमती विद्या चव्हाण.....

दिला पाहिजे. मंत्री महोदयांना उत्तर देखील देता येत नाही. तुमच्या, आमच्या मुली असत्या तर हे सहन केले असते काय ?

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी सभागृहाला विचारु इच्छिते की, तुमच्या, आमच्या मुलींवर असे अत्याचार झाले असते तर तुम्ही सहन केले असते काय ? आपण एवढे लाईटली का घेत आहात ? मंत्री महोदयांनी राजीनामा दिला पाहिजे. संबंधितांवर कडक कारवाई झाली पाहिजे आणि आश्रमशाळेत फक्त महिला अधीक्षिकांचीच नियुक्ती केली पाहिजे. शासन याची दखल घेऊन संबंधितांवर कडक कारवाई करणार आहे काय ? महिला आयोगाच्या अध्यक्षांचे पद रिक्त आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षांची लवकर नियुक्ती केली पाहिजे. शासन अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये संबंधितांवर कडक कारवाई करणार आहे काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी इतर घटनांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. आम्ही त्याची गंभीर दखल घेतच आहोत. लेखी प्रश्न पांढुर्णा येथील आश्रमशाळेतील घटनेच्या संदर्भात विचारण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांनी अशा घटनांच्या संदर्भात माहिती दिलेली आहे. आम्ही त्याचा शोध घेऊ, माहिती घेऊ आणि आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना चांगल्या प्रकारचे संरक्षण देण्यात येईल, त्यांची सुरक्षा वाढविण्यात येईल. शासनाला जे करणे शक्य आहे त्या सर्व गोष्टी आम्ही करु आणि विद्यार्थीनींना संरक्षण देऊ. आपण ज्या घटनांचा उल्लेख केलेला आहे त्या संदर्भात संबंधितांवर कारवाई केलेली आहे. पांढुर्णा येथील आश्रमशाळेच्या संदर्भात लेखी प्रश्न विचारण्यात आलेला आहे. त्यामुळे माझ्याकडे या प्रश्नाची माहिती आहे. परंतु, आपण ज्या घटनांचा उल्लेख केला त्या ठिकाणी देखील संबंधितांवर कारवाई केलेली आहे. अन्य ठिकाणी संबंधितांवर कारवाई झाली नसेल तर ती करण्यात येईल.

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, आदिवासी पाड्यांवरील मुलींना शिक्षण घेण्यासाठी वसतिगृहामध्ये पाठविण्यात येते. आम्ही मागील वर्षी देखील अशा घटनांच्या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11958.....

ॲड.हुस्नबानू खलिफे.....

प्रश्न उपस्थित केला होता आणि यावर्षी देखील आम्ही हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मुलींवर जे लैंगिक अत्याचार होतात ते अतिशय वेदनादायक आहेत. त्यामुळे शासन आश्रमशाळांमध्ये संपूर्ण महिला कर्मचाऱ्यांचा स्टाफ नियुक्त करण्याचा निर्णय घेणार आहे काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, आपण मुलींच्या वसतिगृहात स्त्री अधीक्षिकेचीच नियुक्ती करतो. मुलींच्या वसतिगृहात पुरुष अधीक्षकाची नियुक्ती केली जात नाही. मुलांच्या वसतिगृहासाठी पुरुष अधीक्षकाची नियुक्ती करण्यात येते....

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, स्त्री अधीक्षिकाच जर अशा गोष्टींना पाठिंबा देत असेल तर त्यांना पाठीशी घालण्याची आवश्यकता नाही.

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी आपण मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जी सूचना केलेली आहे त्याचाही आम्ही विचार करू मुलींवर अशा प्रकारे अत्याचार, अन्याय होऊ नये यासाठी.....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आपण मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे. तुमचे समाधान झाले नाही तर आपण काय करायचे ते बघू. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा योग्य आदर राखून त्या प्रमाणे कार्यवाही केली जाईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आश्रमशाळेतील मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या संदर्भात सभागृहात प्रश्न उपस्थित झालेला आहे. सभागृहातील महिला सन्माननीय सदस्यांनी राज्यात अशा प्रकारे मलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांचा संदर्भ दिला तर काय चुकीचे आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11958.....

श्री.धनंजय मुंडे.....

(...अडथळा...) मंत्री महोदय उत्तर देण्यास सक्षम आहेत. सन्माननीय सदस्य महिला आणि मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या बाबतीत उद्विग्न होऊन बोलले तर मंत्री महोदयांनी तो विषय समजून घेऊन उत्तर द्यावे.

सभापती : सर्व महिला सन्माननीय सदस्यांच्या भावना मी ऐकून घेतलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी देखील काही गोष्टी सांगितलेल्या आहेत. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जी सूचना केलेली आहे की, दोन्ही सभागृहाच्या महिला सदस्यांची जॉईंट कमिटी नेमावी. त्यांना काही विशिष्ट अधिकार दिले जावेत आणि हे विशिष्ट अधिकार देऊन त्यांचे अहवाल प्रत्येक अधिवेशनात सभागृहात ठेवावेत.

..S-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11958...

सभापती...

या ही पुढे जाऊन माझी अशी सूचना आहे की, पालक मंत्री महोदयांनी जसे आपण डीपीडीसीमध्ये आढावा घेतो तसा आढावा घेण्यास काय हरकत आहे. जिल्हा पातळीवर यासंदर्भातील नियंत्रण झाले तर चांगले होईल. असे नियंत्रण होऊ नये असे म्हणणारा एकही व्यक्ती या सभागृहात असेल असे मला वाटत नाही. याप्रमाणे ही कार्यवाही व्हावी. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी अत्यंत महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. यासंदर्भात सखोल माहिती घेऊन पूर्णपणे कारवाई करण्यात यावी. पुढील अधिवेशनात यासंदर्भातील संपूर्ण अहवाल ठेवण्यात यावा.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील आश्रमशाळातील शिक्षकांना विनाविलंब वेतन देण्याबाबत

(4) * १२६९९ श्री.महादेव जानकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :
(1) राज्यातील आश्रमशाळांना शाळा सुरू झाल्यापासून शासनाकडून कोणतेही अनुदान देण्यात आले नसल्याने सदर शाळांमधील १४ हजारांपैकी ५ हजार शिक्षकांना जुलै-ऑगस्ट, २०१५ चे वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर आश्रमशाळांना शासनाकडून अनुदान देण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(3) असल्यास, सदर आश्रमशाळांना किती दिवसांत अनुदान देण्यात येणार आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे नाही.
(2) व (३) अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी योजनेतर रु. २९३.८३ कोटी व योजनांतर्गतसाठी रु. १३०.२० कोटी असा एकूण रु. ४२४.०३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, हे खरे नाही, परंतु वस्तुस्थिती तशी नाही. जून, जुलै महिन्याचा पगार अतिशय उशिराने काढण्यात आला आहे. अनुदानाच्या बाबतीत हा प्रकार वारंवार घडत आहे. अनुदान वेळेवर दिले असे नमूद केले आहे तर ते केव्हा देण्यात आले तसेच जुलै व ऑगस्ट महिन्यातील पगार वेळेवर दिलेला नाही तर हा पगार उशिराने दिला म्हणजे कोणत्या महिन्यात देण्यात आलेला आहे. याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, वेतनाच्या संदर्भातील प्रश्न विचारण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे परिरक्षण अनुदानाचा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. ऑक्टोबर, 2015 पर्यंत पूर्ण वेतन देण्यात आलेले आहे. डहाणू प्रकल्पातील काही वेतन शिल्लक राहिलेले आहे. याची मला माहिती आहे] यासंदर्भातील माहिती मी घेतली आहे. या प्रकल्पातील ऑक्टोबरचे वेतन देखील डिसेंबर अखेरपर्यंत देण्यात येईल. अनुदान देण्याबाबत काही तांत्रिक अडचणी आल्यामुळे थोडा उशिर झालेला आहे, हे मी मान्य करतो, परंतु परिरक्षण अनुदान देखील डिसेंबर अखेरपर्यंत देण्यात येईल, डहाणू प्रकल्पातील अनुदान देखील 31 डिसेंबरपर्यंत देण्यात येईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आश्रमशाळांचे परिरक्षण अनुदान आणि त्या शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेतनाचा हा प्रश्न आहे. हे खरे आहे की, ऑनलाईन प्रक्रिया किंवा सेवार्थ पध्दतीमुळे पगार उशिरा झाला आहे. ही योजना शालेय शिक्षण विभागात सुरु आहे. निधी नसताना वेळेवर वेतन न मिळणे ही गंभीर बाब आहे. याबाबत शालेय शिक्षण विभागाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित केला आहे त्यामध्ये असे नमूद केले आहे की, निधी असताना शिक्षकांना किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन दिले नाही तर त्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल. तसेच आदिवासी विभागातील आश्रमशाळांमध्ये निधी आहे पण वेळेवर वेतन दिले नाही तर यामध्ये ज्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष व हलगर्जीपणा झाला त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, होय.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, राज्यातील सर्व अनुदानित बिगर आदिवासी ज्या आश्रमशाळा आहेत, तेथे काम करणाऱ्या सर्व शिक्षकांना वैद्यकीय बिलाची प्रतिपूर्ती दिली जाते. परंतु अनुदानित आश्रमशाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती आदिवासी विभागाने गेल्या काही महिन्यापासून थांबविली आहे. तशा पध्दतीचा शासन निर्णय उपलब्ध नाही असे मला संबंधित विभागाच्या सचिवांनी सांगितले आहे. मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, याबाबत आपण तातडीने लक्ष घालून ज्या प्रमाणे अन्य शाळांतील शिक्षकांच्या वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती करण्यात येते तशी प्रतिपूर्ती तातडीने या शिक्षकांच्या बाबतीत करण्यात येईल काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, या संदर्भातील सर्व माहिती घेण्यात येईल व नियमाप्रमाणे त्यांना वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खामगांव (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

(5) * १२५९० श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ५१६९० ला दिनांक ३ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कृषी उत्पन्न बाजार समिती खामगांव (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील कामातील अनियमिततेबाबत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे संबंधितांवर कारवाई करणेबाबत अनेक तक्रारी श्री.नंदलाल भट्टड यांना केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश विशेष लेखापरिक्षक वर्ग २, फिरते पथक, सहकारी संस्था, बुलढाणा यांना दिले होते, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, या चौकशी अहवालात तथ्य निदर्शनास आल्याप्रमाणे तक्रारीतल्या मुद्यांवर तत्कालीन संचालक मंडळ सदस्य व तत्कालीन सचिव यांचेवर कृषी उत्पन्न बाजार समिती खामगांवची आर्थिक नुकसानाची जबाबदारी निश्चित करणेसाठी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, खामगांव यांची नियुक्ती करुन २ महिन्यांच्या आत जबाबदारी निश्चितीबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, संबंधित दोषींवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१), (2) व (३)३ होय.
(4) व (५) सदर प्रकरणी प्राप्त चौकशी अहवालातील मुद्यांमध्ये तथ्य असल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधितांविरुध्द महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास वव विनियमन) अधिनियम १९६३ चे नियम ५३ अन्वये जबाबदारी निश्चित करण्यासाठी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी लेखी प्रश्नाच्या क्रमांक 1, 2 व 3 ला उत्तर देतांना 'होय' असे नमूद केले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती खामगांव बाबत लोक आयुक्तांकडे तक्रार झाली होती. लोक आयुक्त यांच्याकडे केलेल्या तक्रारीवरुन कृषी उत्पन्न बाजार समितीचे स्पेशल ऑडीट करण्याचे आदेश झाले. जिल्हा उपनिबंधन यांनी स्पेशल ऑडीट केले. या ऑडीटमध्ये अतिशय गंभीर गोंष्टी आढळून आल्या आहेत. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याबाबत एआर यांच्याकडे ते प्रकरण सोपविण्यात आले आहे. काय कारवाई केली याचा अहवाल दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा असे निदेश देण्यात आले होते. दोन

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12590..

श्री.पांडुरंग फुंडकर...

महिन्याऐवजी आता पाच महिन्यांचा कालावधी झालेला आहे तरी देखील अद्याप एआर यांनी अहवाल पाठविलेला नाही. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियम 1963 चा नियम 53 अन्वये जबाबदारी निश्चित करण्यासाठी जो अधिकारी निश्चित करण्यात आला आहे. त्यांच्याकडे दोन महिन्यात अहवाल मागितला असताना देखील पाच महिने झाले तरी तो अहवाल देत नाही त्यामुळे या प्रकरणाचा अहवाल मागवून पुढील कार्यवाही किती दिवसात करण्यात येईल ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, लोकआयुक्त यांच्याकडे केलेल्या तक्रारीनुसार अहवाल सादर झाला आहे. त्यानंतर असा निर्णय झाला की, विशेष लेखा परीक्षा अधिकारी यांच्याकडून लेखा परीक्षण झाले पाहिजे. सन्माननीय सदस्य सांगत आहे ती वस्तुस्थिती आहे. जी कार्यवाही होण्यासाठी दोन महिने लागावयास पाहिजे होते त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी दोन वेळा मुदतवाढ मागितली होती ती मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यांनी परस्पर निर्णय घेतलेला नाही. आज रात्री 12 वाजेपर्यंत एआर काहीही करुन रिपोर्ट देणार असे त्यांच्याशी बोलणे झालेले आहे. त्यानंतरच्या एक महिन्यात यासंदर्भातील कारवाई पूर्ण करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या परवान्यांची संख्या कमी करुन उद्योजकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करुन देणेबाबत

(6) * **११२१२ श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात मेक इन महाराष्ट्र या अभियानांतर्गत उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या परवान्यांची संख्या कमी करण्याबरोबरच उद्योजकांना । ऑनलाईन सेवा जलदगतीने उपलब्ध करुन द्याव्यात असा आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या आदेशानुसार उपरोक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री. सुभाष देसाई, यांच्याकरिता : (१) होय.
(2) मेक इन महाराष्ट्रर या उपक्रमाच्या अंतर्गत पाठपुराव्याअंती राज्य शासनाने खालील उल्लेखनीय प्रगती केली आहे.
1) राज्यात उद्योग स्थापन करण्याच्या प्रक्रियेमध्ये घटकाची गुंतवणूक, उत्पादन प्रक्रिया, उद्योगाचे ठिकाण इत्यादीच्या आधारे ढोबळमानाने ६४ ते ६६ परवाने लागत असत, आता सुलभीकरणांतर्गत त्यांची संख्या ही ४८ ते ४६ इतकी करण्यात आली आहे. ऑटो उद्योगांना एमआयडीसी क्षेत्रात ३७७ व एमआयडीसी क्षेत्राबाहेरील जागेवर ४२ परवाने लागत आहेत. तसेच स्टील उद्योगांनाही अनुक्रमे ४१ व ४६ परवाने लागत आहेत.
2) ऊर्जा विभागाकडून देण्यात येणारी विद्युत जोडणी परवाना देण्यासाठी लागणाऱ्या मंजुऱ्यांची संख्या ७ वरुन ३ इतकी कमी केली असून सदरची परवानगी देण्यासाठीचा कालावधी ६७ दिवसांवरुन १५ इतका कमी केला आहे व रस्ता न ओलांडता द्यावयाच्या विद्युत जोडणी परवान्याचा कालावधी ७ दिवस इतका कमी केला आहे.
३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या परवानग्यांची संख्या १४ वरुन ५ इतकी कमी केली आहे.
४) २० हजार चौ.मी. पेक्षा जास्त बांधकाम असणाऱ्या औद्योगिक बांधकामासाठी पर्यावरण विभागाच्या ना-हरकतीची आवश्यकता असणार नाही.
५) नदी नियमन धोरण फेब्रुवारी २०१५ पासून रद्द करण्यात आले आहे.
६) उद्योगांना मुंबई प्राधिकरण विभागामध्ये स्थान निश्चयन धोरणाअंतर्गत लागणारे ना हरकत प्रमाणपत्रर प्राप्त करण्याची प्रक्रिया शासनाने संपुष्टात आणली आहे.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, महाराष्ट्रात उद्योग उभारतांना सरासरी 70 परवानग्या घ्याव्या लागतात. हे शासन सत्तेवर आल्यापासून या परवानग्या कमी करण्यात येतील असे ते सांगत आहेत. लेखी उत्तरात अनेक बाबी नमूद केल्या आहेत की, या कमी केल्या त्या कमी

...7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11212...

श्री.अनंत गाडगीळ...

केल्या. आज वर्तमानपत्रात शासनाची आणखी एक जाहीरात आलेली आहे त्यामध्ये असे नमूद केले आहे की, 70 परवानग्यावरुन आम्ही त्या 25 वर आणणार आहोत. ऑगस्ट महिन्यात मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, उद्योगासाठी लागणाऱ्या परवानग्या कमी करण्यात येतील. आताही तेच म्हटले जात आहे. पहिला प्रश्न असा आहे की, या परवानग्या किती कमी करण्यात येणार आहेत. दुसरे असे आहे की, या खात्याचे लोक सांगत आहेत की, 25 पर्यंत जर परवानग्या कमी केल्या तर 'आओ जावो घर तुम्हारा' होणार आहे, कोणीही कशीही फॅक्टरी बांधू शकेल. त्यामुळे हे प्रॅक्टीकल होणार नाही. तिसरा प्रश्न असा आहे की, प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, नदी नियमन धोरण रद्द करण्यात आले आहे. मी उदाहरण सांगतो की, पुणे येथे हरित न्यायालयाने नदीच्या काठावर रस्ता देखील बांधण्यास बंदी घातली आहे. असे असताना नदीच्या काठावर फॅक्टरी आणि मील्स बांधण्यास कशी काय परवानगी दिली जात आहे. यासंदर्भातील धोरण रद्द केले आहे, त्यामुळे याबाबत निश्चित काय करणार आहात ? या सर्व धोरणामुळे शासनाने मेक इन इंडियापासून सुरुवात केली मेन इन महाराष्ट्रावर आलात आणि आता महाराष्ट्रातील उद्योग धंदे गुजरात राज्यात चालले आहेत व त्यामुळे आता मेक इन गुजरात झाले आहे. त्यामुळे शासन याबाबत काय भूमिका घेणार आहे ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी अत्यंत महत्वाचा व महाराष्ट्रातील उद्योग धंदे वाढण्याच्या दृष्टीने चांगला प्रश्न उपस्थित केला आहे. त्याबाबत मी त्यांचे पहिल्यांदा अभिनंदन करतो. उद्योग उभारण्यासाठी 70 परवानग्यावरुन 25 वर आणणार आहोत असा त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. एका वर्षात आम्ही 36 परवानग्यापर्यंत आलो आहोत. औद्योगिकदृष्टया महाराष्ट्र विकसित करावयाचा असेल तर उद्योग उभारण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या कमी करण्याची गरज आहे. सुरुवातील उद्योग उभारण्यासाठी 64 ते 65 परवानग्या घ्याव्या लागत होत्या. पहिल्या दोन महिन्यात या परवानग्या 46 ते 48 पर्यंत खाली आणल्या आहेत. ऑटो उद्योगसाठी 42 परवानग्या लागत होत्या त्या 37 पर्यंत खाली आणल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11212.....

श्री.प्रवीण पोटे-पाटील.....

रोजगार वाढविण्याच्या दृष्टीने आणि बेरोजगारी कमी करण्याच्या दृष्टीने विचार केला तर तरूणांकरिता स्कील डेव्हलपमेंटचा विषय हाती घेतला आहे. थोडक्यात सांगावयाचे झाले तर महाराष्ट्रामध्ये 46 मेगा प्रकल्प आले असून त्याद्वारे 74 हजार कोटी रूपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात आणली आहे. महाराष्ट्रात 1.82 लाख लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. एका वर्षात मोठया प्रमाणात काम केलेले आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मेक इन इंडिया आणि मेक इन महाराष्ट्राबद्दल माहिती दिली. उद्योगपतींबाबत अनुभव असा आहे की, शेतकऱ्यांची आणि शहराच्या लगतची जमीन मिळवायची आणि कालांतराने त्या जमिनीवर उद्योग सुरु करायचा नाही. हे सेझ प्रकल्पाबाबत घडले आहे. सेझ प्रकल्प उभारण्यात आला, परंतु तेथे एकही उद्योग सुरु झाला नाही. शासनाने या अधिवेशनात एक विधेयक मंजुरीसाठी मांडलेले आहे. त्यात म्हटले आहे की, जर औद्योगिक विकास मंडळाने परवानगी दिली तर इतर कोणत्याही परवानगीची गरज भासणार नाही. उद्योग संस्थेला कोणत्याही परिस्थितीत सवलत मिळाल्यानंतर त्या जमिनीचा वापर गृहनिर्माण प्रकल्पासाठी करण्यास परवानगी दिली जाणार नाही असे आश्वासन दिले जाईल का?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, एमआयडीसीने ज्या उद्योगासाठी जागा दिली त्याच्या स्पेसिफिकेशनप्रमाणे उद्योजकाने एका महिन्याच्या आत प्रकल्प अहवाल सादर करावयाचा असून एक वर्षाच्या आत उद्योग सुरु करायचा ही शासनाची भूमिका आहे. त्या पध्दतीने काम करीत आहोत. मागील एक वर्षात महाराष्ट्रात ज्या उद्योगासाठी जागा घेतली, तो उद्योग सुरु न करता त्या जागेचा वापर दुसऱ्या कारणासाठी केला असा एकही उद्योग नाही.

श्री.शरद रणपिसे : तशी अट घालणार आहात काय?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : अट घातली आहे.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात म्हटले आहे की, उद्योग सुरु करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्यांची संख्या कमी केली आहे. परंतु उद्योग विभागाकडून परवानगी दिली जात नाही असा अनुभव आहे. मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, उद्योग सुरु करायवयाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) T.2

SGB/ ST/ AKN/ 13:50

ता.प्र.क्र.11212.....

श्री.विजय सावंत.....

झाला तर दोन तीन लोकांना काम दिले जाते. चेंज ऑफ युजरची केस दाखल केल्यानंतर 3-3 वर्षे परवानगी दिली जात नाही. विजेचे कनेक्शन मिळण्यासाठी एक एक वर्ष वाट पहावी लागते. एकीकडे काही लोकांना 7 दिवसात विजेचे कनेक्शन दिले जाते, परंतु सिंधुदुर्ग जिल्हयात विजेचे कनेक्शन मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर वर्षभराच्या काळात कनेक्शन दिले जात नाही.

.श्री.प्रवीण पोटे-पाटील : असे प्रकरण समोर आले नाही, पण तपासून कार्यवाही करु

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, गेल्या वर्षभरात 46 मेगा प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यात 66 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणली आहे. 46 मेगा प्रकल्पांची नावे सभागृहाला वाचून दाखविली जातील काय? गेल्या वर्षभराच्या काळात 66 हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांबाबत काय कार्यवाही झाली, कोणते करार झाले व त्याचे आजचे स्वरुप काय आहे? मंत्री महोदयांचे भाषण ऐकल्यानंतर 46 मेगा प्रकल्प उभे राहिले आहेत असा आभास निर्माण होतो. मंत्री महोदयांनी याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे. जेणेकरुन महाराष्ट्रातील सामान्य जनतेचा गैरसमज होणार नाही.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी महत्वाचा विषय मांडला आहे. आज 46 मेगा प्रकल्पांच्या माध्यमातून 74 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली असून 1.82 लाख लोकांना रोजगार दिला आहे हे मी यापूर्वी सांगितले आहे. मी चार महत्वाच्या कंपन्यांची नावे सांगू इच्छितो व उर्वरित कंपन्यांची यादी पटलावर ठेवतो. महाराष्ट्रात गेल्या वर्षभराच्या काळात युतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर काय काम केले हे सभागृहाला सांगण्याची गरज आहे. हॉस्कॉन लिमिटेड, पुणे या उद्योगामध्ये 35 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक व 50 हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. जनरल मोटर्स, पुणे या कंपनीमध्ये 6400 कोटी रुपयांची गुंतवणूक व 1000 लोकांना रोजगार मिळणार आहे. रिलायन्स इंडिया, पाताळगंगा येथे 2672 कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून 1200 लोकांना रोजगार दिला जाणार आहे. मर्चिडीस बेंझ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कंपनीमध्ये 2000 कोटी रूपयांची गुंतवणूक होणार असून 4387 लोकांना रोजगार मिळाला आहे. याची विस्तृत माहिती मी पटलावर ठेवतो.

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) T.3

SGB/ ST/ AKN/ 13:50

ता.प्र.क्र.11212.....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी माहितीच्या अधिकाराखाली उद्योग विभागाकडून लिखित स्वरूपात माहिती प्राप्त करुन घेतली आहे. 66 हजार कोटी रूपयांची गुंतवणूक 46 मेगा प्रकल्पांच्या माध्यमातून होणार असून 1.82 लाख लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे असे मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगितले आहे. हे उत्तर पूर्णत: चुकीचे आहे. मला उद्योग विभागाकडून माहितीच्या अधिकारात पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये असे म्हटले आहे की, सदरची सर्व गुंतवणूक, आश्वासने ही अत्यंत प्राथमिक स्वरूपात असल्याने व अद्याप त्याबद्दल लिखित स्वरूपात 12 महिन्यांचा कालावधीत काहीही करार प्रगती न झाल्याने ते उपलब्ध करुन देऊ शकत नाही. ही उद्योग विभागाने दिलेली माहिती खरी आहे की मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेली माहिती खरी आहे? मंत्री महोदयांनी अशा पध्दतीने मांडणी केली की, आम्हालाही ते खरे वाटले. माझ्या मामाच्या 100 गायी आणि सकाळी उठलो तर एकही नाही, अशी स्थिती आहे. एकही प्रकल्प अंतिम करारापर्यंत पोहोचलेला नाही, ही मागच्या वर्षभरातील माहिती आहे. सदनामध्ये चुकीची माहिती देणे योग्य नाही.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी महत्वाचा विषय मांडला आहे. मी सुरूवातीलाच सांगितले आहे की, मागील एक वर्षाच्या काळात जे उद्योग आले त्या कंपन्यांची यादी पटलावर ठेवणार आहे. उद्योग उभारण्यास सुरूवात केल्यानंतर, करार झाल्यानंतर रात्रीच्या रात्री उद्योग उभा रहात नाही, त्यासाठी काही कालावधी लागतो. आज आपली सुरूवात झाली आहे.

सभापती : मंत्री महोदय, मला असे वाटते की, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी माहितीच्या अधिकाराखाली उद्योग विभागाकडून माहिती प्राप्त केली आहे. आपण कंपन्यांची यादी पटलावर ठेवण्याचे जाहीर केले आहे. या दोन्ही बाबी प्रश्नाशी निगडित आहेत. याचा तपशील तुलना करुन रिकन्साईल होतो का हे पहावे. याची बरीच चर्चा झालेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / परिक्षेसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा गंभीर विषय आहे.

सभापती : माननीय मंत्री त्यांच्याकडील माहिती पटलावर ठेवत आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा पटलावर ठेवण्याचा विषय नाही. माननीय मंत्री महोदय, चुकीची माहिती देत आहेत. यात एकही करार झालेला नाही.

सभापती : आपली माहिती आणि त्यांची माहिती पुढच्या वेळी पटलावर आली तर बिघडे कुठे ? त्यावर आपण उचित कारवाई करावी.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा प्रश्न आपण राखून ठेवावा.

सभापती : हा प्रश्न राखून ठेवता येणार नाही. मंत्री महोदयांनी येथे माहिती दिलेली आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, संपूर्ण राज्याच्या औद्योगिक धोरणाशी हा प्रश्न संबंधित आहे.

सभापती : हा प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे. आता पुढील तारांकित प्रश्न क्रमांक 11481 घेण्यात येत आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, ताराकित प्रश्न क्रमांक 11481....

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 10 डिसेंबर 2015 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : दिनांक 10 डिसेंबर 2015 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली,दुसरी, तिसरी, चौथी व पाचवी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी व पाचवी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतरांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी व पाचवी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म.वि.प.नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : आज माझ्याकडे एकूण 6 म.वि.प.नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचना आलेल्या आहेत.

आज दिनांक 15 डिसेंबर 2015 रोजी सर्वश्री शरद रणपिसे, अनंत गाडगीळ, श्रीमती दीप्ती चवधरी, वि.पस.यांनी सकाळी 9.00 वाजता "पुणे महानगरपालिका आयुक्त यांनी प्रत्यक्ष स्मार्ट सिटीचा आराखडा तयार करत असताना केवळ बाणेर व बालेवाडी याच भागासाठी अपेक्षित 3500 कोटी रूपयांचा खर्च धरल्याने पुणे शहराच्या विकासाचा समतोल बिघडणे, तसेच कर वसूल करण्यासाठी स्पेशल पर्पझ कंपनी स्थापन करून महानगरपालिकेच्या अधिकारावर गदा आणणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंबंधी सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा असा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नाही. परंतु, विषयाचे गांभीर्य पाहता मी एकाच सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी दोन मिनिटे वेळ देत आहे. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी आपले थोडक्यात विचार मांडावेत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, स्मार्ट सिटी करण्याचा प्रयत्न आता सुरू आहे. काही महानगरांचा स्मार्ट सिटी संदर्भात प्रस्ताव आहे. त्यात पुण्याचा देखील प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव पारित करीत असताना सरकारने घटनेची पायमल्ली केली आहे. पुणे महानगरपालिकेच्या इतिहासात असे कधीही घडले नाही ते यावेळी घडले आहे. राज्य सरकारने बीपीएमसी ॲक्टचा आधार घेऊन कलम 448 अन्वये जी.बी.घेऊन हे करावे असे सांगितले आहे. आयुक्तांनी ते डॉकेट स्थायी समितीमधून मंजूर करून घेतले आणि दोन-तीन दिवसांमध्ये आपण महानगरपालिकेला जी.बी.घ्यावी असे सांगत आहात. या सदस्यांना घटनेच्या 74 व्या दुरूस्तीनुसार घटनादत्त

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे.....

अधिकार मिळाले आहेत त्याची पायमल्ली झालेली आहे. हे अत्यंत चुकीचे आहे. त्यामुळे मी सरकारचा निषेध करतो. केंद्र सरकार दर वर्षी 100 कोटी रूपये पाच वर्ष देणार आहे. प्रत्येकी 250 कोटी रूपये महानगरपालिका व राज्य सरकार देणार आहे. एकूण 3500 कोटी रूपयांचे प्रपोजल आहे. त्यातील अडीच हजार कोटी रूपये कोण देणार आहे ? ही रक्कम पुणेकर कशी काय देणार आहे? यात कराची योजना काय आहे ? आपणाला एलबीटी आणि टोल संबंधी काहीच करता आले नाही. आज राज्य दिवाळखोरीमध्ये निघाले आहे. आज या सरकारचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नियोजन नाही. त्यामुळे या सर्व प्रश्नांची अत्यंत निकड आहे. सरकारने लोकशाहीची पायमल्ली केली आहे, पुणे महानगरपालिकेचा अवमान केला आहे. हा स्थगितीचा विषय होत नाही मी आपल्या निर्णयाशी सहमत आहे. परंतु, या राज्य सरकारचा मी तीव्र निषेध करतो राज्य सरकारचे हे कृत्य घटना विरोधी आहे, असे मी येथे नमूद करू इच्छितो.

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आज दिनांक 15 डिसेंबर 2015 रोजी सर्वश्री. धनंजय मुंडे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, संदीप बाजोरिया, विक्रम काळे, ख्वाजा बेग, प्रकाश गजभिये, वि.प.स.यांनी सकाळी 9.01 वाजता तसेच सर्वश्री.संजय दत्त, माणिकराव ठाकरे, शरद रणपिसे, मुझफ्फर हुसेन, रामहरी रुपनवर, वि.प.स.यांनी सकाळी 9.03 वाजता आणि सर्वश्री.धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, जयंत पाटील, अमरसिंह पंडित, शरद रणपिसे, सतिश चव्हाण, जोगेंद्र कवाडे, संजय दत्त, संदीप बाजोरिया, विक्रम काळे, ख्वाजा बेग, बबाजानी दुराणी, प्रकाश गजभिये, हरिसिंग राठोड, रामहरी रूपनवर, श्रीमती दीप्ती चवधरी, श्री.मुझफ्फर हुसेन, वि.प.स.यांनी सकाळी 9.04 वाजता "माहे ऑगस्ट 2015 पासून तुरडाळ, मुगडाळ, आदींच्या किंमती गगनाला भिडल्याने सामान्य जनता त्रस्त असणे, शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे डाळीचे भाव वाढून सामान्यांना बसलेला महागाईचा फटका, डाळ घोटाळ्यात झालेला करोडो रूपयांचा भ्रष्टाचार यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची तसेच स्वस्त धान्य दुकानांमार्फत डाळ उपलब्ध करून देण्याची होत असलेली मागणी" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा असा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नाही. तसेच सारख्याच विषयावर बऱ्याच लक्षवेधी सूचना प्राप्त झालेल्या असून त्या स्वीकृत करण्यात आलेल्या आहेत. त्या माध्यमातून यावर चर्चा होऊ शकते. तुरडाळीच्या लक्षवेधीच्या सूचना आपल्या विचारार्थ प्राधान्याने ठेवणार आहे. त्यामुळे मी ही सूचना मान्य करीत आहे.

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आज दिनांक 15 डिसेंबर 2015 रोजी श्री. जयंत पाटील, वि.प.स.यांनी सकाळी 9.05 वाजता "नागपूर सुधार प्रन्यासने नागपूरच्या कोणताही विकास केला नाही तरी देखील नागपूर जिल्ह्यातील नऊ तालुक्यांतील 721 गावांची योजना राबण्यियासाठी शासनाने नागपूर सुधार प्रन्यासला नियुक्त केले ते अन्यायकारक असल्याने रद्द करण्याची मागणी जय जवान, जय किसान संघटना, नागपूर यांच्यामार्फत करण्यात येणे, नागपूर मेट्रोरिजन आराखडा दोषपूर्ण असल्यामुळे सरकारने तो मागे घ्यावा याबाबत संघटनेतर्फे दिनांक 15 डिसेंबर 2015 रोजी मोर्चाचे आयोजन केलेले असणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा असा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या सदनाचे माजी आमदार ब्रिगेडिअर सुधीर सावंत यांच्या नेतृत्वाखाली आज मोर्चा आलेला आहे. माझी आपल्या मार्फत एकच विनंती आहे की, यासंबंधी सरकारने पूर्ण विचार करावा. यास कोर्टाने स्थगिती दिलेली आहे. तेव्हा या सगळ्या आराखड्याला स्थगिती द्यावी अशी मागणी मी करतो.

सभापती : यासंबंधी शासनाने उचित कारवाई करावी.

..8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आज दिनांक 15 डिसेंबर 2015 रोजी सर्वश्री धनंजय मुंडे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, संदीप बाजोरीया, विक्रम काळे, ख्वाजा बेग, प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी सकाळी 10.37 वाजता "राज्यात मुंबई, नागपूर सारख्या महानगरांसोबतच सर्वत्र वाढत असलेले गुन्हेगारीचे प्रमाण, प्रत्येक दिवशी होणारे खून, बालिकांवर होणारे अत्याचार, लैंगिक अत्याचाराच्या वाढत असलेल्या घटना,

V-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

कारागृहात चालणाऱ्या कैद्यांच्या पाटर्या, मा. न्यायालयाच्या आदेशानंतर सरकारने डान्सबार सुरु करण्याची केलेली तयारी, पोलिसांच्या विविध समस्यांकडे होणारे दुर्लक्ष त्यामुळे राज्यात कायदा व सुव्यवस्था हाताळण्यात येत असलेले अपयश" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील एखादा नियम स्थगित करणे या संबंधाचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास मा.सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल.

यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे.

वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲडव्होकेट जनरल श्री. अणे यांच्या बाबतीत शासनास निवेदन करण्याबाबत.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, काल आपण या सभागृहात शासनाला ॲडव्होकेट जनरल श्री. अणे यांच्या विषयावर आज सकाळपर्यंत निवेदन करण्याचे निदेष दिले होते. परंतु आतापर्यंत शासनाने ॲडव्होकेट जनरल श्री.अणे यांच्यासंदर्भात निवेदन केलेले नाही. त्यामुळे शासनाकडून या विषयाच्या संदर्भात जोपर्यंत निवेदन येत नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित ठेवावे अशी माझी विनंती आहे.

सभापती : सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात येणार नाही. अधिवेशनाचा कालावधी अजून संपलेला नाही. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात योग्य वेळेत निवेदन होईल याची व्यवस्था मी स्वत: करीन एवढे आश्वासन मी आपल्याला देतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाचे कामकाज ऑनलाईन झाल्याबाबत

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सर्व प्रथम मी आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो. विधिमंडळाचे सचिव श्री. चव्हाण साहेबांच्या अध्यक्षतेखाली विधिमंडळाचे कामकाज पूर्णपणे ऑनलाईन करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती. संपूर्ण देशात महाराष्ट्र विधिमंळात पहिल्यांदा ऑनलाईन कामकाजास सुरुवात झालेली आहे. त्यामुळे या संदर्भात आपल्याला आणि आपल्या सचिवालयाला श्रेय दिले गेले पाहिजे व त्यासाठी मी आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो. ऑनलाईन पध्दतीमुळे आपल्याला निश्चितपणे फायदे झाले असून वेळेचीही बचतही झालेली आहे. यामध्ये आमची अशी अडचण झाली आहे की, प्रश्न देण्याचे काम आमचे स्वीय सहायक करीत असतात परंतु आमचे स्वीय सहायकांना संगणकाची संपूर्ण माहिती असते असे नाही. सदस्यांच्या स्वीय सहायकाना आपल्याकडून 15 हजार रुपये पगार मिळतो परंतु 15 हजार रुपयांच्या पगारात संगणकाची माहिती असलेले स्वीय सहायक मिळू शकत नाही त्यामुळे सदस्यांना ऑनलाईन प्रश्न देताना अडचणी येतात व आम्हाला अनेक वेळा प्रश्न देण्यापासून मुकावे लागते. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, संगणकाचे ज्ञान असलेले स्वीय सहायकांची नेमणूक करण्यासाठी आमच्या स्वीय सहायकाचा पगार आज 15 हजार आहे तो 25 हजार रुपये केला तर आपल्या प्रयत्नांना निश्चितपणे मोठी मदत होईल अशी माझी आपल्याला विनंती आहे. पुन्हा एकदा आपले अभिनंदन करतो आणि आमच्या प्रश्नाला न्याय मिळेल व आपण सरकारला सूचना द्याल अशी आपल्याकडून आशा बाळगतो.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, कामकाजाच्या दृष्टीने ऑनलाईन पध्दतीचा वापर करुन आपल्या सभागृहाचे कामकाज अधिक वेगाने कसे होईल व सभागृहात अधिक प्रश्न कसे येऊ शकतील यादृष्टीने आपण ऑनलाईन पध्दत सुरु केली असून ती अतिशय अभिनंदनीय बाब आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी आता सूचना केली आहे की, ऑनलाईन पध्दतीच्या नव्या ज्ञानाची पूर्ण माहिती घेऊन त्यामध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी आमचे जे स्वीय सहायक आहेत त्यांना आता मिळत असलेला पगार आणि त्यांना प्रशिक्षीत करण्यासाठी लागणारा कालावधी व त्यानंतर ही कामे अधिक चांगली होण्यासाठी आताच्या पगारामध्ये ते शक्य दिसत नाही. त्यामुळे आपली सूचना प्रत्यक्षात आणण्यासाठी आमच्या स्वीय सहायकांना कौशल्य विकास करण्यासाठी जी आर्थिक तरतूद व्हावयास पाहिजे ती अतिशय गरजेची असून त्यादृष्टीने आपण

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

शासनाला यासंदर्भात निर्देश द्यावेत व हे काम अधिक वेगाने व अधिक कार्यक्षमतेने होईल यादृष्टीने या उपक्रमाचा सर्व सदस्यांना चांगला फायदा होऊ शकेल यादृष्टीने कार्यवाही व्हावी अशी आपल्याला विनंती आहे.

सभापती : पुढील अधिवेशन सुरु होण्याच्या अगोदर या विषयाच्या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. मेटे साहेबांनी अचानकपणे सूचना केलेली आहे. ऑनलाईनची माहिती असलेले सक्षम स्वीय सहायक सदस्यांकडे नसतील तर आपण सुध्दा यामध्ये अडचणीत येऊ शकतो. ऑनलाईन व मॅन्यूअल या दोन्ही पध्दतीने आपण हे त्रांगडे किती दिवसा घालावयाचे, त्यामुळे याबाबतीतही आपल्याला निर्णय करावा लागणार आहे. आता यापुढे फक्त ऑनलाईन पध्दतीनेच कामकाज केले जाणार आहे. ऑनलाईन पध्दतीने कामकाज करावयाचे असेल तर निश्चितपणे संगणकाचे सक्षम ज्ञान असणारे, संगणाकाचे प्राविण्य मिळवलेले, आयटी सॅव्ही असलेले स्वीय सहायक आपल्याला द्यावे लागतील. जे स्वीय सहायक आपल्याकडे आहेत त्यांना आपल्याला ऑनलाईनचे ट्रेनिंग द्यावे लागेल. पुढील अधिवेशनाच्या अगोदर या विषयाच्या संदर्भात निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विधानमंडळाचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केल्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. ऑनलाईन पध्दतीने तारांकित प्रश्न स्वीकारत असताना सर्व साहित्य घेऊन सर्व ठिकाणी जाता येत नाही. प्रश्नाच्या संदर्भात ऑनलाईन पध्दतीमध्ये 30 दिवसापूर्वीचे बंधन घालण्यात आले आहे. ऑनलाईन प्रश्न आल्यानंतर मग ही माहिती संकलित करुन नंतर क्रमाने प्रश्न सदनामध्ये लावले जात असतात. परंतु आपण कोणत्याही वेळेला ऑनलाईनने प्रश्न पाठवू शकण्याची व्यवस्था वर्षभरासाठी सुरु केली तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. ज्यावेळी प्रश्न आपल्या हातामध्ये येईल त्याच वेळेस ऑनलाईन पध्दतीने प्रश्न पाठविला गेला तर आपण अजून चांगल्या पध्दतीने ऑनलाईनचा उपयोग करु शकू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मला याची कल्पना आहे की, ऑनलाईन पध्दत सुरु झाल्यानंतर इफिशिअंटली आपल्याला विधानमंडळाचे कामाकाज करावे लागणार असून त्यामध्ये आपले असणारे प्रचलित नियम मग ते विधानपरिषदेचे असतील किंवा विधानसभेचे असतील, स्वीय सहायकांचे ट्रेनिंग किंवा अजून कोणतेही प्रश्न आपल्याकडे असतील तर ते प्रश्न आपण कार्यालयाकडे पोहचवावेत. आवश्यकता वाटली तर आपल्या सभागृहाच्या सदस्यांची किंवा दोन्ही सदनाच्या सदस्यांची कमिटी यासंदर्भात निर्माण करण्यात येईल. परंतु येत्या अधिवेशनामध्ये आपल्याला ऑनलाईन पध्दतीनेच काम करावयाचे असून मग लक्षवेधी सूचना असो किंवा तारांकिती प्रश्न असो किंवा अन्य असेल प्रश्न असो आपल्याला ते ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारावयाचे आहेत असे धोरण आपण ठरवलेले आहे.

आता पुढील कामकाज घेण्यात येईल.

....6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.:लेखी उत्तरे

मु.शी.:तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.विष्णु सवरा (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अकोला जिल्हयातील आदिवासी विभागात विकास मंडळातर्फे जनरेटर खरेदीमध्ये सुमारे 67 लाख रुपयांचा झालेला अपहार या विषयावरील श्री. जयंत पाटील, वि.प.स. व श्री. विजय गिरकर,वि.प.स.यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 658 ला दिनांक 11 डिसेंबर, 2014 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

श्री. एकनाथराव खडसे (पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय मंत्री मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादत,पुणे यांचा सन 2011-2012 या वर्षाचा तेहतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल ठेवण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांनी सदरहू अहवाल विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. दादाजी भुसे(पणन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्या सन 2014-2015 या वर्षाचा सत्तावन्नावा वार्षिक लेखा अहवाल व महालेखापाल कार्यालयाचा सन 2013-2014 या वर्षाचा स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल(S.A.R.) सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल ठेवण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांनी सदरहू अहवाल विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

W-1/....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या ठाकूर (अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन 2008-2009 या वर्षाचा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे. हा अहवाल विधानमंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे

श्री.विजय शिवतारे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक 13 जुलै ते 31 जुलै, 2015 या कालावधीत मंत्री / राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण 566 आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवणे

श्री.विजय शिवतारे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर पूर्तता करण्यात आलेल्या एकूण 807 आश्वासनांच्या पूर्ततेसंबंधीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस :कृपया येथे सोबतचे विवरण छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना

सभापती : माझ्याकडे आज दिनांक 15 डिसेंबर, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत, त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "मुंबईतील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी "नागपूर शासकीय प्रादेशिक मनोरुग्णालयातील विविध सुविधां अभावी रुग्णांचे होत असलेले अतोनात हाल " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रूपनवर यांनी "राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती लागू करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री धनंजय मुंडे यांनी "गंगाखेड (जि.परभणी) येथील तहसीलदार श्री.अविनाश शिंगटे यांनी अधिकाराचा गैरवापर करुन शासनाचे केलेले लाखो रुपयांचे नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.ख्वाजा बेग यांनी "आर्णी तालुक्यात होणारी अवैध वीज चोरी रोखून ग्राहकांना आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त वीज शुल्कात कपात करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सचिव.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी "औरंगाबाद शहरातील स्त्री रुग्णालयाच्या बांधकामासाठी तातडीने जागा उपलब्ध करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "मौजे गोंधळेपाडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील सर्व्हे नं 2 अ/1अ/1ब व 32 मधील ग्रामस्थांची अतिक्रमित जागा नियमित होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया यांनी "कोंढाळी व चाकडोह (जि.नागपूर) येथील वन विभागाची जमीन स्फोटके कारखाना निर्मितीसाठी देणे व पूर्व सूचना न देता सदर परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षित भूखंडांवर होत असलेले अतिक्रमण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांनी "उमरखेड (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्र पीरंजी येथे झालेल्या सागवान वृक्षांची अवैध तोड प्रकरणी आवश्यक ती चौकशी न करता श्री.जी.बी.चव्हाण या क्षेत्रीय कर्मचाऱ्याचे करण्यात आलेले निलंबन" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सचिव.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी "पुणे जिल्ह्यातील 249 पर्यावरण खात्याची परवानगी नसलेल्या दगड खाणींमधून होत असलेले बेकायदा उत्खनन व वाहतूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "राज्यात नगरपंचायत व नगरपालिका क्षेत्रात म्हाडातर्फे केंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या सदनिकांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी "मानोरा (ता.मंगरूळपीर, जि.वाशिम) येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांच्या समस्यांच्या अनुषंगाने आंदोलन केलेल्या लोकप्रतिनिधींवर दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर लक्षवेधी सूचना दाखविण्यात आलेल्या आहेत. त्याशिवाय पुरवणी मागण्यांवर चर्चा दाखविण्यात आलेली आहे. आजची कामकाजपत्रिका पाहता त्यामध्ये कचकचून कार्यक्रम आहे. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण लक्षवेधी सूचनांचे अर्ध्यातासाच्या सूचनेमध्ये स्थांतर करु नये. ज्या सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे त्यांनी एक-दोन प्रश्न विचारावेत. या स्मार्ट दिवसांमध्ये स्मार्ट लक्षवेधी सूचना करु या, अशी माझी आपणा सर्वांना विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

स**भापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"कल्याणमध्ये पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये कल्याण्, डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर या परिसरातील हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. काल कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी शाळेच्या प्रॉपर्टी टॅक्स संदर्भातील डिस्पूटमुळे शाळेतील काही रूम्स सील केले. त्यामुळे पालकांमध्ये विद्यार्थ्यांच्या भवितव्या विषयी संभ्रमाचे व भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. काल मला रात्री 12.00 वाजेपर्यंत 100 ते 150 कॉल्स आले. शाळेचा प्रॉपर्टी टॅक्सचा डिस्पूट असेल, परंतु विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यादृष्टीने विचार झाला पाहिजे. हे शैक्षणिक वर्ष अंतिम टप्प्यामध्ये आलेले आहे. आता नजीकच्या काळात विद्यार्थ्यांच्या परीक्षा आहेत. तेव्हा विद्यार्थ्यांचे संरक्षण करणे खूप गरजेचे आहे. या ठिकाणी नगर विकास विभागाचे राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील उपस्थित आहेत. ते खूप अभ्यासू आहेत. माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर कोणताही परिणाम होणार नाही याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना आश्वस्त करावे."

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी या ठिकाणी अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या संस्थेच्या संस्थाचालकांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे जे काही देय असेल ते दिले नसेल किंवा टॅक्स भरला नसेल तर तो वसूल करण्याचे अनेक मार्ग आहेत. आता शाळा सुरु आहे आणि हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळा बंद करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणे हे काही योग्य वाटत नाही. कल्याण्-डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी टॅक्स वसूल करण्यासाठी अन्य मार्गांचा अवलंब करावा. माझ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यादृष्टीने त्यांनी याचा फेरविचार करावा. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी शाळा सील केलेली आहे ती त्यांनी उघडावी आणि विद्यार्थ्यांना शाळेत येऊ द्यावे. या संदर्भात शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी अशी माझी विनंती आहे.

..9..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, कल्याण येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलच्या संदर्भात जो टॅक्स इव्हेशनचा प्रश्न आहे त्या संदर्भातील सविस्तर माहिती घेण्यात येईल. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

सभापती : सन्माननीय सदस्यांची शाळा सुरु करावी अशी मागणी आहे.

डॉ.रणजित पाटील : विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ दिले जाणार नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी शाळा सील केलेली आहे. तेव्हा ते सील काढून उद्या शाळा सुरु करण्यात येईल असे आश्वासन मंत्री महोदयांनी द्यावे, अशी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"राज्यामध्ये महिलांना शासनाच्या विविध सेवांमध्ये मोठ्या प्रमाणात सामावून घेण्यात आलेले आहे. सौदी अरेबियामध्ये देखील स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळालेला आहे. माझ्याकडे श्रीमती सुजाता गवई या ग्रामसेविकेने तक्रार केलेली आहे की, औरंगाबाद जिल्हयातील चितेगाव येथे ग्रामसेविका म्हणून काम करीत आहेत. त्यापूर्वी त्यांनी बीडकीन, ता. पैठण व वेगवेगळ्या गावांमध्ये 15 ते 20 वर्षे काम केलेले आहे. सन 2011, 2012, 2013, 2014 या वर्षात त्यांनी पैठण तालुक्यामध्ये वेगवेगळ्या गावांमध्ये काम केलेले असताना त्यांनी रोजगार हमी योजनेच्या कामांना चालना दिलेली आहे. त्या गावांतून श्रीमती सुजाता गवई यांच्या कामाबद्दल कोणतीही तक्रार नाही. परंतु औरंगाबाद जिल्ह्याील चितेगाव येथे त्यांची बदली झाल्यावर महिला ग्रामसेवक नको म्हणून त्यांच्या नियुक्तीला काही ग्रामस्थ विरोध करीत आहेत. महिला सरपंचांना संरक्षण देण्यासाठी महसूल विभागाने अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी पावले उचललेली आहेत. त्याप्रमाणे श्रीमती सुजाता गवई यांना चितेगाव येथे ग्रामसेवक म्हणून चांगल्याप्रकारे काम करता यावे म्हणून त्यांना सरंक्षण द्यावे. तसेच महिला अधिकारी नको म्हणून ग्रामपातळीवर त्यांना विरोध होत असेल तर त्याची सरकारने दखल घ्यावी" अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

सभापती : शासनाने याची नोंद घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अमृत अभियानाच्या वार्षिक कृती आराखड्यास केंद्र शासनाच्या शिखर समितीने मान्यता देणे

मु.शी. : अमृत अभियानाच्या वार्षिक कृती आराखड्यास केंद्र शासनाच्या शिखर समितीने मान्यता देणे, या संबंधी नगर विकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो..

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या जागा नागपूर शहरातील शांती नगर, यशोधरा नगर, कळमना, राणा प्रताप नगर व हुडकेश्वर या पाच पोलीस स्टेशनकरिता गृह विभागास देण्याबाबत घेतलेला निर्णय

मु.शी. : नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या जागा नागपूर शहरातील शांती नगर, यशोधरा नगर, कळमना, राणा प्रताप नगर व हुडकेश्वर या पाच पोलीस स्टेशनकरिता गृह विभागास देण्याबाबत घेतलेला निर्णय, या संबंधी गृह (शहरे) राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ.रणजित पाटील (गृह (शहरे) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो..

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई व पुणे शहराच्या सुरक्षेसाठी बसविण्यात आलेले सीसीटीव्ही नादुरुस्त असणे

मु.शी. : मुंबई व पुणे शहराच्या सुरक्षेसाठी बसविण्यात आलेले सीसीटीव्ही नादुरुस्त असणे, या संबंधी सर्वश्री अनंत गाडगीळ, संजय दत्त, मुझफ्फर हुसेन, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनंत गाडगीळ (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई व पुणे येथे शहराच्या सुरक्षेसाठी लाखो रुपये खर्च करून शासनाने सीसीटीव्ही लावले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास येणे, परंतु हे सीसीटीव्ही लावल्यानंतर किती वाहतूक गुन्ह्यांचा शोध लागला व किती वाहनांवर नियम तोडल्याबद्दल दंड केला गेला याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असणे, तसेच या शहरातील बहुतांश सीसीटीव्ही नादुरुस्त असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी असणे, परंतु शासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे अनेक वाहने नियमाचे पालन करीत नसल्याचे आढळून येणे, परिणामी येथील जनतेत शासनाबाबत पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने सदर सीसीटीव्ही तातडीने कार्यान्वित करुन पोलिस प्रशासनास दक्ष ठेवण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (गृह (शहरे) राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, या अधिवेशनातील लक्षवेधी सूचनांचा श्रीगणेशा मी सुरु करीत आहे. मुंबई आणि पुणे येथे सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास सुरुवात झाली आहे. परंतु शासनाला माझा पहिला प्रश्न आहे की, ज्या कंपन्यांना या कामाचा ठेका दिला आहे त्या कंपन्यांचा पूर्व इतिहास आपण तपासला होता काय ? कारण मुंबईमध्ये 1510 ठिकाणी 6 हजार सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. त्यातील 300-400 सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडले आहेत. पुण्यात 1231 सीसीटीव्ही कॅमेरे बसविले, परंतु त्यापैकी केवळ 1159 सुरु आहेत. या क्षेत्रातील तज्ज्ञांनी सांगितले की, 4850 हे fixed focus box आहेत. 1150 हे पीटीजीचे आहेत. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, शासनाने या कॅमेऱ्यांची योग्यता तपासली होती काय ? वास्तविक पाहता सीसीटीव्ही कॅमेरे गुन्हेगारी, वाहतूक समस्या आणि दहशतवादी कारवाया यावर नियंत्रण आणण्यासाठी बसविले जातात. पहिल्या मुद्यावर भाष्य करुन मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु वाहतुकीच्या समस्येच्या बाबतीत सांगू इच्छितो की, या सरकारने सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून वाहतूक समस्येवर नियंत्रण आणले जाईल असे सांगितले होते. परंतु मुंबई आणि पुण्यामध्ये अशा प्रकारचा कोणताही अनुभव आला नाही. मुंबईमध्ये फ्लाय ओव्हरवरुन उतरले आणि पुढच्या फ्लायओव्हरला चढायला सुरुवात केली की, bottlenecks अर्धा-अर्धा तास, एक-एक तास होते. कोणताही हवालदार सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फुटेज बघून ते सोडवायला येत नाही. महोदय, आपल्या येथील सिग्नल सिंक्रोनाईज नाहीत. जे वाहतूक नियम तोडतात त्यांना सीसीटीव्हीमध्ये बघून दंड करावयाचा असतो. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, 1 लाख 45 हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, किती दंड वसूल केला यापेक्षा सर्वात महत्त्वाचे म्हणजे वाहतूक नियम मोडणाऱ्या किती लोकांवर शासनाने कारवाई केली आहे ?

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

सभापती महोदय, आता मी दहशतवादाच्या मुद्यावर लक्ष वेधतो. इसिस किंवा अन्य दहशतवादी संघटनांनी ज्या शहरात सीसीटीव्ही बसविले आहेत ते कॅमेरे चुकवून कसा हल्ला करता येईल याचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. जर हेल्मेट घातले तर सीसीटीव्ही कॅमेराचा उपयोग होत नाही, धूर केला तरी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा उपयोग होत नाही. त्यामुळे

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत गाडगीळ....

शासनाने या बाबतीत काय पाऊल टाकले आहे ? सभापती महोदय, इस्त्राईलने या संदर्भात एक सॉफ्टवेअर तयार केले आहे. ते सॉफ्टवेअर युरोपीयन राष्ट्रांनी वापरण्यास सुरुवात केली आहे. एखाद्या व्यक्तीची संशयास्पद हालचाल सुरु झाली आणि ती सीसीटीव्ही कॅमेऱ्याने पीकअप केली तर तो गुन्हेगार कोणता दहशतवादी आहे हे अगोदर आयडेंटीफाय होऊ शकते. परंतु आपल्या सरकारने ते सॉफ्टवेअर वापरले नाही, अशी माझी माहिती आहे. जर माझी माहिती चुकीची असेल तर माननीय राज्यमंत्र्यांनी ती दुरुस्त करावी. महोदय, 26/11 रोजी मुंबईमध्ये कुलाबा येथील बधवार पार्कमधून दहशतवादी हल्ला करण्यात आला. त्यामुळे त्या ठिकाणी आता सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. वास्तविक पाहता त्या ठिकाणी समुद्राच्या बाजूने हल्ला झाला होता. परंतु बधवार पार्क येथे बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे तोंड समुद्राकडे नव्हे तर एका मच्छीमाराच्या घराकडे ठेवले आहे. मी परवा मुंबईमध्ये जाऊन आलो आणि त्या भागात बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फोटो सुध्दा मोबाईलमध्ये काढले. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, वाहतुकीचे नियम तोडणाऱ्यांपैकी किती लोकांना सीसीटीव्हीच्या फुटेजच्या आधारे शासन केले, राज्यातील दहशतवाद रोखण्यासाठी human behaviour pattern या सॉफ्टवेअरचा उपयोग केला आहे काय, नसल्यास, या दृष्टीने शासन कोणती पावले उचलणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या अनुषंगाने गुन्हेगारी, वाहतूक समस्या आणि दहशतवाद या तीन मुद्यांच्या बाबतीत प्रश्न विचारले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सॉफ्टवेअरचे ॲप्लीकेशन आणि त्या कॅमेऱ्याचे डेफिनेशन आणि इतर स्पेसिफिकेशन या बाबतीत शंका व्यक्त केल्या आहेत. मूलत: ज्या कामासाठी हे सीसीटीव्ही आहेत ते केवळ मोठ्या स्वरुपाच्या गुन्ह्यांवर लक्ष ठेवण्यासाठीच वापरतो असे नाही. यातून sense of social inhibitions सुध्दा यायला पाहिजे. आपल्यावर कोणी तरी लक्ष ठेवत आहे, म्हणून inhibitions येते, त्यामुळे येथून suspected movements detect व्हायला पाहिजे आणि तेथपर्यंत यांची व्याप्ती आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या लोकांकडून किती दंड वसूल केला हे सांगण्याऐवजी

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील...

किती लोकांवर कारवाई करण्यात आली आहे हे सांगावे. या बाबतीत सांगतो की, 5800 लोकांनी वाहतूक व्हायलन्स, सिग्नल तोडणे, हेल्मेट न घालणे, लेन कटींग, मोबाईलवर बोलणे असे गुन्हे केले आहेत. अशा सर्व गुन्ह्यांमध्ये real time picture चे पुरावे आजकाल कोर्टात सुध्दा सादर करीत आहोत. त्यामुळे सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व्याप्ती आणि मदत ही मर्यादित स्वरूपाची नाही. याचा सर्व बाजूने फायदा घेऊ शकतो आणि त्या दृष्टीने फायदा घेतला जात आहे. पुण्यामध्ये 430 ठिकाणी 1231 कॅमेऱ्याचे इन्स्टॉलेशन झाले आहे. यातील केवळ 72 कॅमेरे बंद आहेत. परंतु हा आकडा मी तपासून घेईन. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, बधवार पार्क येथील समुद्राकडून जो हल्ला झाला होता त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे तोंड समुद्राकडे नाही. मी सांगू इच्छितो की, काही कॅमेरे हे zoom होणारे सुध्दा असू शकतात. परंतु एकाच इन्स्टॉलेशनने सर्व दिसते असे नाही तर, त्याचा horizon, त्याचा अँगल सर्व ठिकाणी ठेवलेला असतो. केवळ एका कॅमेऱ्याच्या माध्यमातून आपण असे ठरवू शकत नाही की, त्या कॅमेऱ्याचे समुद्रावर लक्ष नाही. महोदय, इसिसचा हल्ला चुकविण्याच्या क्लुप्त्या आणि सॉफ्टवेअरचे लाँचिंग की ज्यातून संशयास्पद हालचाली दिसायला पाहिजे अशी सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे ती मोलाची आहे. या बाबतीत सॉफ्टवेअरच्या अपडेटसमध्ये कुठे कुठे इन्स्टॉलेशन करता येईल, या बाबतचे सजेशन मौलिक असल्यामुळे ते ग्राह्य धरले जाईल.

..वाय...

अप्रधारित प्रत / प्रश्नोत्तरी नाही

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनंत गाडगीळ यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे याकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. दहशतवाद, वाहतूक, दंगल किंवा इतर गोष्टी असतील या संदर्भात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची उपयोगिता, उपयुक्तता सांगितली आहे. मला माननीय मंत्र्यांना सांगावयाचे आहे की, पुण्यातील सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास खूप विलंब झाला आहे, खूप वर्षे गेली आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे बसविले, त्यावेळी फक्त माननीय मुख्यमंत्री, माननीय पालकमंत्री आणि 2-3 माननीय मंत्र्यांना ते काय आहे ते दाखविले. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे होत्या, आम्ही होतो, मात्र बाकीच्या कोणालाही त्यातील ए, बी, सी, डी माहीत नाही. मी सूचना केली होती की, नगरसेवक असो, बाकीचे सदस्य असो, लोकप्रतिनिधी असो, आमदार असो सर्वांना हे दाखवा. तुम्ही काय करायचे आहे ते का दाखवित नाही ? इतका पैसा खर्च करून काहीही आऊटपूट नाही. तुम्ही वाहतूक नियम तोडलेल्या 5800 लोकांची संख्या सांगितली. तुम्ही वाहतुकीचे नियम सीसीटीव्ही कॅमेरातून कॅच केलेली संख्या सांगितली की जनरल सर्व संख्या सांगितली याचे उत्तर माननीय मंत्र्यांनी द्यावे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी इन्स्टॉलेशनच्या वेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक आमदार यांना सोबत घेतले नाही, त्याबद्दलची प्रात्यक्षिके, वर्किंग संदर्भात संगितले नाही असे सांगितले. मला याबाबत एवढेच सांगता येईल की, कधीही जाऊन हे बघता येते. घराघरात, छोट्या आस्थापनांत सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातात. याची उपयोग खूप आहे. एद्याखा फाटकासमोर "बिवेअर ऑफ डॉग" असे म्हटले की, त्या घरात जाण्याची भीती वाटते तसे आपण शेवटच्या सस्पेक्टेड मूव्हमेंट पर्यंत हे घेऊ शकतो. दुसरे सांगितले की, याबाबत 5800 गुन्हे रजिस्टर केले आहेत. सदर बाबतीत मी अगोदरही सांगितले की, कलेक्टिव्ह एव्हिडन्स आहे. एखाद्याने लेन कट केली तर त्याला पुरावा द्यावा लागतो की, लेन कट केली आहे, तो नंबर हा आहे. आपण हा पुरावा सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून देतो. पुरावा म्हणून त्याची मदत हाते. तो पुरावा रिअल टाईम असतो. आता तो ग्राह्य धरला जातो. त्यामुळे हा हॉस्टाईल होऊ शकत नाही. त्यामुळे ही मदत फार मौलिक मदत आहे असे मला वाटते. घातपाताच्या कारवाईवर कायदा व सुव्यवस्थेच्या माध्यमातून नजर ठेवण्यासाठी, धार्मिक सणाच्या मिरवणुकीवर नजर ठेवण्यासाठी, मोर्चा, आंदोलने यावर लक्ष ठेवण्यासाठी सुध्दा याचा उपयोग करता येऊ शकतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मुंबई व पुण्यावर अनेकदा दहशतवादी हल्ले झाले आहेत, त्यांच्या सुरक्षिततेबाबत मुंबई, पुण्यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा महत्वकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला. हा अतिशय चांगला प्रकल्प आहे. मी मुंबईच्या सुरक्षितेबाबत 3-4 प्रश्न उपस्थित करणार आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबाबत ज्या निविदा निघाल्या, त्याच्या अटी, शर्ती पाळल्या गेल्या का ? सीसीटीव्ही सर्व्हियलन्स निविदा प्रक्रियेत अटी, शर्ती नुसार 4 निर्देशांकापैकी 1 निर्देशांकात कमीत कमी 60 गुण मिळाले पाहिजे हेाते, ज्यांनी या निविदा प्रक्रियेत भाग घेतला त्यांना 60 गुण मिळाले नाहीत. एकाला 57 गुण मिळाले आणि दुसऱ्याला 57 गुण मिळाले. मग असे असताना ज्यांना कॅमेरे बसविण्याचा फार काही पूर्वीचा अनुभव नाही अशा व्यक्तीला ही निविदा देण्यात आली. अशी माहिती आहे की, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या बाबतीत जी इमेज पकडली जाते ती एका कॅमेऱ्यावर एक पकडली गेली तर संबंध 1000 कॅमेऱ्यांच्या बाबतीत इमेज पुन्हा कुठे आली तर ती आयडेंटिफाय झाली पाहिजे, ती सिस्टिम या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या बाबतीत आहे का ? मुंबईमध्ये पहिल्या टप्प्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले, त्यातील फक्त 100 कॅमेरे नियंत्रण कक्षाशी जोडले आहेत, हे खरे आहे का ? अतिशय गंभीर विषय आहे. माननीय मंत्र्यांनी याबाबतीत स्पेसिफिक उत्तर द्यावे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे साहेबांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या संदर्भातील अटी, शर्तींच्या संदर्भातील 4 मानकांमध्ये 60 गुण मिळाले होते का असा प्रश्न उपस्थित केला. तसेच सर्व मानकांत 57 गुण मिळाले अशा एजन्सीला काम दिले, याबाबतही प्रश्न उपस्थित केला. मला एवढेच सांगायचे आहे की, ज्या अटी, शर्ती, निकष पूर्ण करायचे होते त्याची पूर्तता करूनच काम केलेले आहे. एक कॅमेऱ्याने पिक्चर घेतल्यानंतर संबंधित बाकीचे कॅमेऱ्यांवर सुध्दा पिक्चर मॉनिटरवर दिसतात. मल्टि टास्किंग पिक्चरचे होते का असे त्यांनी विचवारले. माझ्याकडे याबाबत आता सध्या एवढीच माहिती उपलब्ध आहे. मी माहिती घेतो. एकाच टाईपचे कॅमेरे इन्स्टॉल केलेले नाहीत. की कंपोनंन्ट्स घेतले आहेत, त्यामध्ये 80 टक्के कॅमेरे फिक्स्ड हाय डेफिनेशन आहेत, 20 टक्के पीटीझेड हाय डेफिनेशन कॅमेरे आहे, 20 थर्मल कॅमेरे आहेत आणि 200 कॅमेरे ए ॲण्ड पीआर कपॅबिलिटीचे म्हणजे आपण म्हणत आहात त्याप्रमाणे आहेत. 500 लोकेशन टू सपोर्ट अनलिसिस आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील ....

आपल्याला हवे असेल तर दोन्ही जागांवरच्या सर्व स्पेसिफिकेशन्स देऊ शकतो. आपण म्हटले की, यामध्ये फक्त 100 लोकेशनवरील कॅमेरे सुरू आहेत. माझी माहिती अशी नाही. हे इन्स्टॉलेशन झाले, दिनांक 30 नोव्हेंबर, 2015 ला लोकार्पण झाले, तेथे 434 स्पॉट आहेत. येथे इन्स्टॉलेशन 1381 आहेत, सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. कॅमेऱ्यांच्या मदतीने आता यापुढे ई-चलान देणार आहोत. जानेवारीपासून प्रस्तावित आहे आहे की, सर्व कॅमेऱ्यांचा उपयोग यासाठी करायचा आहे. वाहतूक नियम मोडले असतील तर पावती फाडायची गरज नाही. आपण ई-चलान देणार आहोत.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न अनुत्तरित आहेत. निविदा प्रक्रियेत ज्या अटी, शर्तींचे पालन केले पाहिजे होते ते केले की नाही ? ज्यांनी निविदा दाखल केल्या त्यांच्या मार्किंग सिस्टिम बाबत मी सांगितले. एलएनटी कंपनीला काम दिले. हे सीसीटीव्ही नाहीत तर हे सर्व्हियलन्स कॅमेरे आहेत. मुंबई नेहमी हाय अॅलर्टवर असते. इमेजचा विषय नाही. कोणती नंबर प्लेट, काय विषय आहे, ती कोणाची आहे याचे निरीक्षण होते. माझे म्हणणे एवढेच आहे की, याबाबत अटी, शर्तींचे उल्लंघन झाले आहे, ते झाले का ? एलएनटी कंपनीला काम दिले होते. एलएनटी कंपनीला असे सर्व्हियलन्सचे काम करण्याचा पूर्वी अनुभव होता का ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर पहिल्यांदाच दिले आहे. मात्र तरीही सन्माननीय विरोधी पक्षनेते पुन्हा सांगत आहेत म्हणून त्याबात पुन्हा एकदा खातरजमा केली जाईल, तसे असेल तर, चौकशी केली जाईल, शहानिशा केली जाईल.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, चौकशी .... शहानिशा, नेमके काय आहे ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, अटी व शर्तीचे उल्लंघन झाले असेल, पूर्तता झाली नसेल तर निविदा प्रक्रियेतील सर्व गोष्टींची खातरजमा करून घेऊ. (अडळळा) चौकशी केली जईल.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे शहरात वाहतूक नियमांचा भंग होऊ नये याकरिता शासनाने लाखो रूपये खर्च करून सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असे म्हटले जात आहे. पुणे मनपाने 6 वर्षांपूर्वी सर्व सीसीटीव्ही कॅमरे लावले होते. आम्हाला यात असा संशय आहे की, ज्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले ....

कंपनीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविले, त्यांनी ते बसविले नाहीत. मनपाच्या जुन्या कॅमेऱ्यांवरून कनेक्शन घेऊन सरकारची, पुणेकरांची, पुण्यातील नागरिकांची फसवणूक केली आहे आणि त्या कॅमेऱ्यांचे कनेक्शन तेथे जोडले आहे.

....Z

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन भोसले.....

पुणे महानगरपालिकेने एक ट्रॅफिक रूम बनविली आहे व चलन बनविण्यापासून सर्व कामकाज त्याव्दारे सुरु केले आहे. महानगरपालिकेने यासाठी 12 ते 13 कोटी रूपये खर्च केले आहेत. या संदर्भात कंपन्यांनी राज्य सरकारला फसविले आहे. याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ? या प्रकरणी चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, ज्यावेळी आघाडी सरकार होते तेव्हा मी माझ्या आमदार निधीतून काही सीसीटीव्ही कॅमेरे लावले होते व या प्रत्येक सीसीटीव्ही कॅमेरांचे कनेक्शन प्रत्येक पोलीस स्टेशनला दिलेले आहे. ज्या ठिकाणी अवैध धंदे चालतात, अफू, गांजा, चरस विकले जाते, त्या ठिकाणचे कॅमेरे पोलीस स्वत: बंद करतात आणि हे धंदे चालविण्यात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी कॅमेरे सुरु करीत नाहीत. या सर्व गोष्टींची देखील चौकशी शासन करणार आहे का ?

सभापती महोदय, मी अगोदरच सांगितल्याप्रमाणे राज्य शासनाने नवीन कॅमेरे बसविलेले नाहीत तर महापालिकेच्या कॅमेऱ्यांवरूनच कनेक्शन देण्यात आलेले आहे. या बाबतची चौकशी शासन करणार आहे का ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक मूलभूत स्वरूपाचा प्रश्न विचारला आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक गुन्हेगारी प्रकरणे उघडकीस येऊ नयेत म्हणून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नुकसान करतात. या प्रकारांना आळा घालणार का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. याबाबत निश्चितपणे ठराविक तक्रार असल्यास सर्व्हिलन्स पार्ट म्हणून कारवाई केली जाईल.

श्री.नितीन भोसले : सभापती महोदय, माझा प्रश्न वेगळा आहे. अवैध धंद्यांना मदत व्हावी, या दृष्टीने स्वत: पोलीस कॅमेरे बंद पाडतात.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सर्व्हिलन्स आणि ॲनॅलिटिक्स या दोन आणि आपल्या सीसीटीव्हीचा जो मूळ प्रश्न आहे हा जरी त्याच्या ॲम्बीटमध्ये येत नसेल तरीही ज्या ज्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आहेत, अशा ठराविक ठिकाणी मुद्दाम आपण सीसीटीव्ही

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.....

फुटेजमध्ये येऊ नये, असे वाटल्याने कॅमेरे खराब करण्याचे काम करीत असतील तर त्याबाबत कडक कारवाई केली जाईल व याबाबतच्या सूचना तातडीने निर्गमित केल्या जातील.

श्री.नितीन भोसले : सभापती महोदय, महानगरपालिकेने 12 ते 13 कोटी रुपये खर्च करुन 6 वर्षापूर्वी ट्रॅफिककरिता कॅमेरे बसविलेले आहेत व सॉफ्टवेअर देखील तयार केलेले आहे. आता कंपनीने नवीन कॅमेरे बसविलेले नाहीत. जुन्याच कॅमेऱ्यांचे कनेक्शन दिलेले आहे, हे मी या ठिकाणी सिध्द करुन दाखवू शकतो. माझी मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, त्यांनी आज रात्रीपर्यंत याबाबतची माहिती घ्यावी.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, पुणे येथे दिनांक 8/8/2015 रोजी जे काही ऑपरेशन सुरु झाले त्यामध्ये 430 लोकेशनवर 1231 कॅमेरे सुरु करण्यात आले आहेत. तथापि, सन्माननीय सदस्यांनी सभागृहात सांगितलेली माहिती सत्य मानून त्याची सुध्दा माहिती घेतली जाईल. पुणे शहरात खाजगी क्षेत्रातील 2361, सार्वजनिक उपक्रमाचे 971 आणि सरकारी 1231 कॅमेरे आहेत. ही सर्व आकडेवारी माझ्याकडे आहे. आपण उल्लेख केलेल्या महानगरपालिकेच्या 1231 कॅमेऱ्यांचा आणि या कॅमेऱ्यांचा काही संबंध नाही. खाजगी क्षेत्रातील 2361, सार्वजनिक उपक्रमाचे 971 आणि आता शासनाने बसविलेले 1231 नवीन कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. महानगरपालिकेने बसविलेल्या कॅमेऱ्यांचा इनपुट घेऊन राज्य सरकार सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्याचा विषय पुढे आणीत आहे. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, ते महापालिकेने बसविलेले कॅमेरे आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न देखील महत्वाचा आहे. ज्या ठिकाणी अवैध धंदे चालतात त्या ठिकाणी असलेले सीसीटीव्ही कॅमेरे पोलीस बंद करतात. पोलीस हे कॅमेरे का बंद करतात, याबाबत शासन चौकशी करणार आहे का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी असा आरोपच केला आहे की, पोलीस स्वत: हे कॅमेरे बंद करतात. या बाबीची गंभीर दखल घेतली जाईल आणि या बाबत तातडीने चौकशी-वजा-माहिती घेतली जाईल.

सभापती महोदय, महानगरपालिकेच्या कॅमेऱ्यांची यंत्रणा नवीन यंत्रणेशी सुसंगत करुन, इंटिग्रेट करुन माहिती घेतली जात असेल तर तो या संपूर्ण योजनेसाठी ॲडिशनल बेनिफिट आहे. It is an additional benefit only. त्यांच्या इनपुटवर काम केले जात आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महापालिकेच्या कॅमेऱ्यांच्या इनपुटचा वापर केला जात असेल तर त्यामध्ये चुकीचे काही नाही.

श्री.दिप्ती चवधरी : सभापती महोदय, हजारो, लाखो रुपये खर्च करुन राज्य शासनाने सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. परंतु, काही कालावधीनंतर हे कॅमेरे नादुरुस्त होतात व बंद पडतात. या कॅमेऱ्यांच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी कोणाची आहे, यासाठी काही यंत्रणा शासनाने निर्माण केली आहे का ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अेडीएसएल या कंपनीला कॅमेऱ्यांचे कंत्राट देण्यात आले असून कॅमेऱ्यांच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी त्यांच्याशी केलेल्या करारान्वये त्यांचीच आहे. देखभाल व दुरुस्ती, कॅमेऱ्यांची दुरुस्ती आणि दररोजचे सर्व्हिलन्स ही कामे या कंपनीकडूनच केली जातील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पुण्यातील यमुनानगर, निगडी येथील घरात केलेल्या कीटकनाशक फवारणीमुळे धवल शंकर लहगानिया व मंदिरा रामलाल चौधरी यांचा झालेला मृत्यू

मु.शी. : पुण्यातील यमुनानगर, निगडी येथील घरात केलेल्या कीटकनाशक फवारणीमुळे धवल शंकर लहगानिया व मंदिरा रामलाल चौधरी यांचा झालेला मृत्यू यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुण्यातील यमुनानगर, निगडी येथील धवल शंकर लहगानिया यांच्या घरात केलेल्या कीटकनाशक फवारणीमुळे गुदमरून धवल शंकर लहगानिया व मंदिरा रामलाल चौधरी या प्रेमीयुगुलाचा मृत्यू झाल्याची घटना माहे नोव्हेंबर, 2015 मध्ये वा त्या सुमारास घडणे, डस्बन डेसी व अल्युमिनिअर फॉस्फरसचा गॅस जास्त वापरल्यामुळे श्वसनाचा त्रास होऊन झालेला मृत्यू, अशा घटनांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर प्रकरणी सखोल चौकशी होण्याची नितांत आवश्यकता, यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ठिकठिकाणी मोठ्या शहरांमध्ये पेस्ट कंट्रोल करण्याची आवश्यकता भासत असते आणि विशेषत: प्रत्येक कार्यालयांमध्ये किंवा घरांमध्ये तापमान वाढीनंतर किंवा पावसाळ्यात पेस्ट कंट्रोल करून घेणे अत्यावश्यक ठरत आहे.

सभापती महोदय, या लक्षवेधीत केवळ एका घटनेचा उल्लेख असला तरी यापूर्वी पुण्यातील कोथरूडमध्ये पेस्ट कंट्रोल झाल्यानंतर घरातील काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना देखील घडलेली आहे.

सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांकडे गृह आणि नगरविकास ही दोन्ही खाती आहेत. सद्य:स्थितीत पेस्ट कंट्रोल करणाऱ्या परवानाधारक आस्थापनांकडून अप्रमाणित औषधांचा वापर केला जातो, औषधांचा मनमानीपणे वापर केला जातो, अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून पेस्ट कंट्रोलचे काम करून घेतले जाते, पेस्ट कंट्रोल करण्यापूर्वी आणि नंतर कोणती काळजी घ्यावी, याबाबतची माहिती दिली जात नाही, अशा सर्व गुणनियंत्रणाच्या बाबी संबंधित विभागातर्फे होत नाहीत. यापूर्वी कृषी विभागाकडे ही जबाबदारी होती. आता मात्र जिल्हा परिषदेकडून पेस्ट कंट्रोलचे परवाने दिले जातात. त्याचा परिणाम असा होतो की, पेस्ट कंट्रोल कंपन्या कोणत्या प्रकारची औषधे वापरतात, त्यामध्ये काही विषारी द्रव्ये आहेत का, हे शोधणे अत्यंत कठीण झाले आहे. विसेरा रिपोर्ट, केमिकल रिपोर्ट, याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत, असे शासनाचे म्हणणे आहे. परंतु, गेल्या तीन वर्षात पेस्ट कंट्रोलने मृत्यू झाल्याच्या अनेक घटना समोर आलेल्या आहेत. याबाबत शासन सीआयडीमार्फत चौकशी करणार आहे का ?

सभापती महोदय, अशा घटनांमध्ये कोणत्या प्रकारची औषधे वापरली जातात, त्यावर देखरेख करण्यासाठी कोणती उपाययोजना आपण करणार आहोत, याबाबत शासनाने स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे आणि शासन कोणता धोरणात्मक निर्णय घेणार आहे, हे देखील सांगितले पाहिजे. मंत्री महोदय याबाबतची स्पष्टता करतील काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी निगडी भागातील एका घटनेचा उल्लेख त्यांच्या लक्षवेधी सूचनेत केला आहे आणि त्या अनुषंगाने या मूलभूत प्रश्नाला वाचा फोडली आहे.

...6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.....

सभापती महोदय, अप्रमाणित औषधे वापरली गेली का, अप्रशिक्षित कामगारांनी काम केले का आणि या संदर्भात रेग्युलेटरी बॉडी आहे का, असे तीन प्रश्न त्यांनी विचारले आहेत. ही गोष्ट सत्य आहे. या प्रकरणी ज्या व्यक्तीने पेस्ट कंट्रोल केले होते ती व्यक्ती केवळ चवथी पास आहे. त्याचप्रमाणे कोणताही परवाना नसताना त्यांनी हे काम केलेले आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.....

कोणत्याही नोंदणीकृत रेग्युलेटरी बॉडीचा परवाना किंवा अशा कोणत्याही रेग्युलेटरी बॉडीकडे त्याने नोंदणी केलेली नाही, हे सत्य आहे. मी याबाबतीत माहिती घेतल्यानंतर असे कळले की, मृतांचे पोस्टमार्टेम करण्यात आले होते. परंतु, पोस्टमार्टेममध्ये देखील Exact cause of death is not mentioned. व्हिसेरा प्रिझर्व्ह केलेला आहे आणि तो व्हिसेरा केमिकल ॲनॅलिसेससाठी पाठविलेला आहे. जे ड्रग्ज वापरण्यात आले ते चौकशी दरम्यान समोर आलेले आहेत. क्लोरा फेरीस्ट 20 ई.सी. आणि देवीकॉल याचे प्रमाण त्याने किती वापरले याची त्यालाही माहिती नाही. कारण, किती प्रमाण वापरावयास पाहिजे आणि किती वापरु नये याबाबत तो काही जज्ज करु शकेल एवढे त्याचे शिक्षण नाही. यासाठी कोणती रेग्युलेटरी बॉडी असावी याचा मी देखील रिसर्च केलेला आहे. इंडियन इन्सेक्टीसाईड ॲक्ट हा केंद्र शासनाचा कायदा आहे. त्या कायद्यात बऱ्याच रिकमेंडेशन्स दिलेल्या आहेत. त्याची एक कमिटी आहे. त्याचा परवाना कसा घ्यावयाचा यासाठी रेग्युलेशन्स आहेत. राज्य सरकारने किंवा स्थानिक प्राधिकारी संस्थेने द्यावे का ॲग्रिकल्चर खात्याने द्यावे ? कारण जे इन्सेक्टीसाईड ड्रग्ज आहेत याचे सर्व नार्म्स, रेग्युलेशन, वापरण्याच्या पद्धती या फक्त शेतकऱ्यांनी किंवा इतर संबंधित लोकांनी कशा प्रकारे वापरावेत या बद्दलचे निकष त्यांनी दिलेले आहेत. म्हणून याबाबतीत निश्चितपणे थोडा अभ्यास करावा लागेल आणि भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी कोणते शिक्षण असले पाहिजे, रेग्युलेटरी बॉडी कोणती असावयास पाहिजे, त्याच प्रमाणे किती प्रमाणात कॉन्सन्ट्रेशनने हे ड्रग्ज वापरले जावे जेणेकरुन जीवितास हानी होणार नाही याचा देखील साकल्याने विचार करुन धोरण जाहीर केले जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, वाढत्या शहरीकरणामुळे काही नवीन प्रश्न निर्माण होत आहेत. साधारणपणे सर्व ठिकाणी पेस्ट कन्ट्रोल केले जाते. या संदर्भात अगोदरच्या ज्या संकल्पना होत्या त्या म्हणजे पूर्वी पेस्ट कन्ट्रोल कृषीशी जोडले गेले होते. आता याचा कृषीशी काहीही संबंध नाही. शहरात, नागरी वस्त्यांमध्ये जे लोक राहतात ते पेस्ट कन्ट्रोल करण्यासाठी अशा एजन्सीकडे जातात. महानगरपालिकेच्या एकूण यंत्रणेमध्ये हा विषय महत्वाचा मानून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे याची जबाबदारी आहे काय आणि नसेल तर याचे लायसन्स देण्याची जी पद्धत

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

आहे त्यासाठी आपल्या खात्यामार्फत महानगरपालिकेला काही सूचना देण्यात आलेल्या आहेत काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, या सर्वांचे मॉनिटरींग करताना त्यांना जी लायसन्स दिली जातील त्याच्या नूतनीकरणाची काही प्रोसिजर आहे काय आणि सर्टिफाईड केमिकल्स किंवा पेस्टीसाईडस् जे काही वापरावयाचे असतील त्याचे नियमन करणारी फुड ॲन्ड ड्रग्ज ॲडमिनिस्ट्रेशनकडून माहिती घेऊन ते डिपार्टमेंट, अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंट आणि महानगरपालिका यांचा संयुक्त विचार करुन या प्रश्नाकडे आपल्याला बघावे लागणार आहे. कारण, आपण मृतांचे पोस्टमार्टेम वगैरे जे काही सांगत आहात ती सर्व नंतरची उपरती आहे. प्रिव्हेंटिव्ह मेजर्स काय घ्यावयाचे आहेत याचा बेसिक विचार आपल्याला या निमित्ताने करता येऊ शकेल. म्हणून आपण त्या दृष्टीने कोणती पावली उचलणार आहात ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.हेमंत टकले यांनी ज्यामुळे प्रायमरी कॉज झालेले आहे आणि आपण त्यावर रेग्युलेशन काय करु शकतो याबाबत प्रश्न विचारलेला आहे. उदाहरणार्थ कोणतीही गोष्ट करण्यासाठी रेग्युलेटरी बॉडी असते त्यामुळे जबाबदारी फिक्स केली जाऊ शकते की हे असे असे सुरु आहे. महानगरपालिकेच्या आरोग्य किंवा सॅनिटेशन यापैकी आरोग्य डिपार्टमेंटच जास्त संयुक्तिक राहील. मी अगोदरच अर्बन डेव्हलपमेंट आणि होम डिपार्टमेंट या संदर्भात सांगितले आहे. कारण, ज्यावेळी आपण एखादे खतरनाक ड्रग्ज किंवा केमिकल हाताळतो आणि त्याचा उपयोग होमीसाईड पासून तर सुसाईडपर्यंत केला जातो. म्हणून याबाबत शासन स्तरावर रेग्युलेटरी बॉडी कशी असावी याबाबत दोन्ही विभागांचे मत जाणून घेतले जाईल. याबाबतचा एक्झरसाईज अधिवेशन संपल्यानंतर 15 दिवसाच्या काळात निश्चितपणे केला जाईल आणि अर्बन डेव्हलपमेंट बॉडीच्या कोणत्या अधिकाऱ्याकडे ही जबाबदारी द्यावी या गोष्टीचा देखील परामर्श घेतला जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चांगले आणि समर्पक उत्तर दिलेले आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

उप सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र.3 पुढे ढकलण्यात आलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी तसे पत्र दिलेले आहे. कै.शरद जोशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी मंत्री महोदय गेलेले आहेत. आपण ही लक्षवेधी सूचना उद्या चर्चेला घेऊ.

श्री.धनंजय मुंडे : ठीक आहे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाला 5 टक्के आरक्षण देण्याचा रद्द करण्यात आलेला निर्णय

मु.शी. : महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाला 5 टक्के आरक्षण देण्याचा रद्द करण्यात आलेला निर्णय यासंबंधी सर्वश्री ख्वाजा बेग, जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात आघाडी सरकारने मागील निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाला 5 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात येणे, त्या निर्णयावरुन मोठे वाद निर्माण होऊन काही जणांनी मा.उच्च न्यायालयात या निर्णयाला आव्हान देणे, मा.उच्च न्यायालयाने त्या याचिकेवर सुनावणी करताना मुस्लिम समाजाला नोकरीत नाही पण शिक्षणामध्ये दिलेले आरक्षण कायम करणे, शासनाने दिनांक 5 फेब्रुवारी, 2015 रोजी अध्यादेश काढून मुस्लिम समाजाला मा.उच्च न्यायालयाने मान्य केलेले आरक्षण रद्द करण्यात येणे, तद्नंतर मुस्लिमांना आरक्षण देण्यासंदर्भात सरकारने कोणतेही पाऊल न उचलणे, त्यामुळे मुस्लिम समाजात शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना व त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.एकनाथराव खडसे (अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, मुस्लिम समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली आहे. मागील अधिवेशनात विचारण्यात आलेल्या लेखी प्रश्नाला जे उत्तर दिले होते तेच उत्तर याही वेळी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात छापण्यात आले आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, "या प्रकरणी महा अधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शन घेण्यात आले असून सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात अंतिम निर्णयासाठी प्रलंबित आहे." मागील अधिवेशनात हेच उत्तर देण्यात आले होते आणि आता देखील हेच उत्तर देण्यात आले आहे. शासन हा प्रश्न गांभीर्याने घेत आहे किंवा नाही असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. आपण जर बघितले तर हा विषय स्वातंत्र्यापूर्वी पासूनचा आहे. सन 1871 मध्ये विलियम वेन्सल हंटरने याबाबतीत आपले मत व्यक्त केले होते. त्यानंतर या संदर्भात सन 1886 मध्ये रॉयल कमिशन, सन 1912 मध्ये इंग्लिस्टन आयोग, सन 1924 मध्ये मुद्दीबान आयोग नेमून आणि स्वातंत्र्यानंतर इंदर मल्होत्रा यांनी सन 1965 मध्ये आपले अध्ययन व्यक्त केले. तत्कालीन गृह राज्यमंत्री रामनिवास मिर्धा यांनी सन 1971 मध्ये याबाबत चिंता व्यक्त केली होती. त्यानंतर शासनाने सन 1980 मध्ये गोपालसिंह आयोग नेमला होता आणि त्यानंतर सन 1989 मध्ये सुरेंद्र नवलखा, सच्चर समिती, रंगनाथ मिश्रा आयोग, महेमुदूर रहेमान समिती राज्य शासनाच्या वतीने नेमण्यात आली होती. या सर्वांनी आरक्षणाच्या बाजूने आपले मत व्यक्त केले होते. आपल्याला धर्माच्या आधारावर आरक्षण देता येणार नाही असेही बोलले जाते. परंतु, ज्यावेळी सन 1950 मध्ये कॉन्स्टिट्युशनचे गठण झाले त्यावेळी Presidential Orders for S.C. यानुसार it would be applicable to the Hindus only and later on Buddhists and Sikhs were added. याचा अर्थ त्याही वेळी धर्माच्या आधारावर हे आरक्षण दिले गेले होते. आज हिंदू समाजात सफाई कामगार आहेत आणि मुस्लिम समाजात देखील सफाई कामगार आहेत. ते एकमेकांच्या शेजारी राहतात. परंतु, एकाला आरक्षण आहे आणि दुसऱ्याला आरक्षण नाही. सांगण्याचा उद्देश असा आहे की, मुस्लिम समाजाला खरोखर आरक्षणाची गरज आहे काय याबाबत शासन किती गंभीर आहे ? याबाबत शासनाने काय मत आहे ? मागील वेळी जे लेखी उत्तर देण्यात आले होते तेच उत्तर आताही देण्यात आले आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेत असताना मराठा

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग.....

समाजाला 16 टक्के आणि मुस्लिम समाजाला 5 टक्के आरक्षण देण्याबाबत ऑर्डिनन्स काढण्यात आला होता. नंतरच्या काळात ते विधेयक संमत करुन त्याचे कायद्यात रूपांत करण्यासाठी मराठा आरक्षणाचा विषय घेण्यात आला. त्याही वेळी मुस्लिम समाजाचे आरक्षण आणि त्याबाबतचा कायदा हा विषय बाजूलाच ठेवण्यात आला.

..2B-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्याजा बेग...

परंतु आज मराठा आरक्षणाच्या कायद्याला उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. मुस्लिम आरक्षणाबाबत मत व्यक्त करीत असताना या समाजातील शिक्षणाबाबत सरकारचे धोरण स्पष्ट आहे काय ? (..अडथळा..) सभापती महोदय, मला या निमित्ताने सरकारला इतके विचारावयाचे आहे की, उच्च न्यायालयाने शिक्षणाच्या बाबतीत गृहित धरुन आरक्षणाची भूमिका स्पष्ट केली त्याबाबत सरकार उदासिन आहे काय ? सरकार गंभीर आहे काय ? याबाबत सरकार कोणती पावले उचणार आहे की, जेणेकरुन मुस्लिम आरक्षणाचा मार्ग मोकळा होईल याबाबत शासन आपली भूमिका स्पष्ट करणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात राज्य सरकार गंभीर आहे. यासाठी मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. या निर्णयाच्या संदर्भात अनेक आक्षेप आले अनेकांनी न्यायालयात यासंदर्भात अपिल दाखल केले होते. मुस्लिम समाजाच्या आरक्षणाच्या आक्षेपासंदर्भात प्रामुख्याने रिट याचिका दाखल झाली होती. त्यासंदर्भात घटनात्मक दृष्ट्या मुस्लिम समाजाला आरक्षण वैध नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार आरक्षणाचे प्रमाण 50 टक्केपेक्षा जास्त होता कामा नये. धर्माच्या आधारावर आरक्षण देता येत नाही. राज्य मागासवर्ग आयोगाने पाच टक्के आरक्षण देण्याची शिफारस केलेली नाही. 50 टक्के जातीकरिता आरक्षण लावण्यात आले आहे तथापि या 50 जाती कशाच्या आधारे निवडल्या यासाठी कोणताही आधार नाही अशा स्वरुपाचे आक्षेप घेऊन या निर्णयाच्या विरोधात कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे.

सभापती महोदय, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात आता याचिका प्रलंबित आहे. त्यामुळे न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही राज्य सरकारकडून करण्यात येणार आहे. शासनाने आरक्षणाचा निर्णय घेतला होता. दिनांक 9 जुलै, 2014 रोजी मुस्लिम आरक्षणाविषयी माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 14.11.2014 च्या अंतरिम आदेशान्वये शैक्षणिक सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम घटकांसाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणासंदर्भात खालील अंतरिम आदेश पारित केले आहेत. " शैक्षणिक सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम घटकांसाठी शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये थेट भरतीकरिता विहित करण्यात आलेले पाच

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

टक्के आरक्षण स्थगित करण्यात येत आहे. शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम समाजातील घटकांकरिता विद्यार्थ्यांना खाजगी शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरिता विहित करण्यात आलेले पाच टक्के आरक्षणही स्थगित केलेले आहे. शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरिता विहित केलेले पाच टक्के आरक्षण अध्यादेश असेपर्यंत जीवंत ठेवले होते. अध्यादेशाची मुदत आता संपलेली आहे. याचिका आता उच्च न्यायालयाच्या निर्णयासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाचे आदेश आल्यानंतर याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, 9 जुलै, 2014 रोजी मुस्लिम समाजाला शिक्षण व शासकीय सेवेत 5 टक्के आरक्षण त्यावेळच्या आघाडी सरकारने दिले होते. या लक्षवेधी सूचनेचा विषय अतिशय स्पष्ट आहे. मागील हिवाळी अधिवेशनात 23 डिसेंबर रोजी मुस्लिम समाजाच्या आरक्षणाच्या अध्यादेशाची मुदत संपत होती. त्यावेळी आम्ही शासनाला विनंती करीत होतो की, मराठा समाजाच्या आरक्षणाच्या अध्यादेशाची तारीख त्याच दिवशी संपत होती. मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भातील विधेयक आपण त्यावेळी सभागृहात पास करून घेतले होते. मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यासंदर्भातील विधेयक आणण्याबाबत सरकारने अशी भूमिका घेतली की, आम्ही महाधिवक्त्याकडून मार्गदर्शन मागवित आहोत. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत अशी भूमिका घेण्यात आली नाही. त्याबाबत आमचे काहीही म्हणणे नाही. मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत महाधिवक्त्यांकडे मार्गदर्शन मागविण्यात आले असून ते मार्गदर्शन अद्यापही आलेले नाही. एक गोष्ट माझ्या लक्षात आली नाही, सरकारने या लक्षवेधी सूचनेला उत्तर देतांना ती स्पष्ट करावी. कोर्टाने मुस्लिम समाजाला पाच टक्के शैक्षणिक आरक्षण देण्यास मान्यता दिल्यानंतर महाधिवक्त्यांकडून मार्गदर्शन मागविण्याची काय गरज होती. याचाच अर्थ या सरकारला मुस्लिम समाजाला जाणीवपूर्वक आरक्षण द्यावयाचे नाही. डिसेंबर, 2014 च्या 23 तारखेला अध्यादेशाची मुदत संपत होती. त्यावेळी पुन्हा 24 तारखेला अध्यादेश शासनाला काढता आला असता. हे सरकार मुस्लिम समाजाच्या विरोधात आहे की, बाजूने आहे. कोर्टाने आरक्षण देण्यास मान्यता दिली असताना सरकारने मुस्लिम समाजाला आरक्षण का दिले नाही असा माझा प्रश्न आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दिनांक 9-7-2014 रोजी न्यायालयाने अंतरिम

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

आदेश पारीत केले आहेत. त्या अंतरिम आदेशात असे नमूद केले आहे की, या आरक्षणाला स्थगिती देण्यात येत आहे. त्यामुळे या आरक्षणाला स्थगिती देण्यात आलेली आहे. हा विषय आता न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे न्यायालयाचा निकाल होईपर्यंत.....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देतात)

सभापती महोदय, विरोधी पक्षात गेल्यावर यांचे एकाएकी प्रेम उचंबळून आले आहे. इतक्या वर्षात आपण आरक्षण का दिले नाही. तुम्हाला कोणी अडविले होते ? हा विषय आता न्यायप्रविष्ट असल्यामुळे यावर भाष्य करता येणार नाही. परंतु या कालखंडात (...अडथळा...) इतके वर्षे तुम्ही का केले नाही. हेतुपुरस्सर तुम्ही इतके वर्षे त्या समाजावर जाणीवपूर्वक अन्याय केला आहे.

सभापती महोदय, या कालावधीत जे नोकरीवर लागले असतील किंवा ज्यांनी शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतला असेल त्यांची नोकरी व त्यांचा प्रवेश प्रोटेक्ट करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मुस्लिम समाजाच्या भूमिकेबाबत आम्ही या सरकारचा धिक्कार करतो व सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सदस्य सभात्याग करतात)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या अध्यादेशाच्या कालावधी दरम्यान मुस्लिम समाजातील लोकांना नोकरी मिळाली असेल किंवा ज्या मुलांना शैक्षणिक प्रवेश देण्यात आले असतील अशा सर्वांचे प्रवेश व नोकरी प्रोटेक्ट करण्यात येईल. मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यासाठी घटनेचा अभ्यास करुन घटनेत असेल तर त्या समाजाला आरक्षणाचा फायदा नक्की देण्यात येईल. हे सरकार आरक्षण देण्यास बांधील आहे. आता विरोधी पक्षात बसणारे गेल्या 60 वर्षापासून सत्तेत होते. या कालावधीत त्यांनी मुस्लिम समाजाला आरक्षण का दिले नाही. आता हे राजकारण करीत आहेत. 60 वर्षे यांनी मुस्लिम समाजाला आरक्षणापासून दूर ठेवले आहे. आरक्षण देण्याची सरकारची प्रामाणिक इच्छा आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून अध्यादेशाद्वारे मुस्लिम समाजाला पूर्वी आरक्षण देण्यात आले होते. 6 जुलै, 2014 रोजी उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला असून उपरोक्त अध्यादेश अस्तित्वात असेपर्यंत उक्त कालावधीकरीता शासकीय अनुदानित संस्थांमध्ये देण्यात आलेले प्रवेश प्रोटेक्ट करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. संचालक, तंत्र

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

संचालनालय यांनी सन 2014-15 या शैक्षणिक वर्षात विशेष मागासवर्ग प्रवर्ग 'अ' या प्रवर्गातील खालील प्रवेश झाले असल्याचे आम्हाला कळविले आहे.

....CC-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे.....

आणि त्यानुसार अभियांत्रिकी थेट द्वितीय वर्ष 370 विद्यार्थी, औषध विभाग शास्त्र थेट द्वितीय वर्ष 3, अभियांत्रिकी पदवीधर बीई 164, औषध निर्माण शास्त्रामध्ये 47, तंत्रनिकेतन 36, औषध विभाग शास्त्र पदविका 04, एमबीए 36, एमए 05 अशा एकूण 665 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. यांच्या प्रवेशाला राज्य सरकारने संरक्षण दिले आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कल्याण-अंबरनाथ राज्य महामार्गाच्या विस्तारीकरणामध्ये दुकाने व निवासी घरे बाधित झाल्यामुळे संबंधितांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे व उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविणे

मु.शी. : कल्याण-अंबरनाथ राज्य महामार्गाच्या विस्तारीकरणामध्ये दुकाने व निवासी घरे बाधित झाल्यामुळे संबंधितांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे व उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविणे यासंबंधी श्री. गुरुमुख जगवानी, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री प्रकाश गजभिये, संदीप बाजोरिया,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.गुरुमुख जगवानी (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कल्याण-अंबरनाथ राज्य महामार्ग नं. ३५ विस्ताराचे काम दिनांक ४ डिसेंबर, २०१५ पासून सुरु करण्यात असल्याचे निदर्शनास येणे, उल्हासनगर महापालिकेने केलेल्या रोड वायडिंगमध्ये २०० दुकाने, २२० रहिवाश्यांची घरे १००% उद्ध्वस्त झालेली असणे, परंतु सदर रहिवाशांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यात न येणे, सदर रहिवाशांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होऊन त्याकडे उल्हासनगर महानगरपालिका दुर्लक्ष करीत असणे, यामुळे तेथील रहिवाशांमध्ये संतापाची भावना निर्माण होणे, सदर उद्ध्वस्त करण्यात आलेल्या रहिवाशांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्याची नितांत आवश्यकता, त्याचप्रमाणे रोड बांधकामासाठी महापालिकेकडे निधी उपलब्ध करण्यात येणे, त्यानुसार बांधकाम करण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री गुरुमुख जगवानी : सभापति महोदय, उल्हासनगर शहर सिंधी शरणार्थियों के नाम से जाना जाता है. सन 2006 में उल्हासनगर की 855 बिल्डिगों का संकट आया था. उस समय ये ही सभापति थे जिन्होंने निर्णय दिया था. इसके कारण 855 बिल्डिगें बच गई थी. फर्क केवल इतना है कि उस समय मैं उस बाजू में बैठता था और आज इस बाजू बैठता हूं. कल्याण-अंबरनाथ का जो रोड था, वह 1947 में 22 फीट का रोड था. उस समय सिंधी समाज के लोगों को कच्चे दुकानें बनाकर दिए गए थे. 1985-88 के बीच में नोंदणीकरण हुआ था. 80 फीट रोड वाईडिंग में गया था. तात्कालीन नगराध्यक्ष ने इन लोगों से कहा कि आपने यहाँ पर पक्के मकान बनाए है, आगे कुछ नहीं होगा. तात्कालीन नगराध्यक्ष के कहने के अनुसार पक्के घर और दुकानें बनायी. अब एमएमआरडीए ने नया आदेश निकाला कि कल्याण-अंबरनाथ रोड की वाईडिंग चाहिए. दि.4.12.2015 को वाईडिंग किया गया. Shopkeepers are protected by the provisions of the Displaced Persons (Compensation and Rehabilitation) Act, 1954 enacted especially for the rehabilitation of the migrants. मैं माननीय सभापति, माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस और माननीय रेवेन्यू मिनिस्टर श्री एकनाथराव खडसे साहब का दिल की गहराई से अभिनंदन करता हूं उन्होंने कल विधानसभा में सिंधी शरणार्थियों के लिए एक नया बिल पास किया है, जिसके तहत जितने भी शरणार्थी आए हुए है, उनको उनके मालिकाना हक दिए जाएंगे. उल्हासनगर के रोड के बारे में मंत्री महोदय से मेरा प्रश्न यह है कि जिन लोगों को 100 प्रतिशत घर गए हैं, 100 प्रतिशत दुकानें गई है, उन लोगों के बारे में जवाब में बताया गया है कि हम लोग उनको श्रीमती इंदिरा गांधी मार्केट में कम्पेनसेशन देंगे. लेकिन उसमें घर वालों को घर कैसे देंगे ? महानगरपालिका के पास रिजर्वेशन ॲण्ड ॲकोमोडेशन 25 प्रतिशत के तहत कुछ दुकानें और घर पड़े हैं. मंत्री महोदय से मेरा स्पेसिफिक प्रश्न यही है कि क्या उनको रिजर्वेशन ॲण्ड ॲकोमोडेशन में घर दिए जाएंगे ? मुंबई में जो झोपड़पट्टी वाले है, 2005 तक वालों को घर दिए जा रहे है और यहां पर पिछले 60 सालों से लोग बसे हुए है उनको घर से बेघर किया जा रहा है. उनको श्रीमती इंदिरा गांधी मार्केट में घर देंगे, उनको लीज पर देंगे, परमनंट देंगे या किस स्वरूप में देंगे ? एमएमआरडीए के तहत जो रोड की वाईडिंग हुई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

है, वह रोड बनाने के लिए कार्पोरेशन के पास कोई भी फंड उपलब्ध नहीं है. ऐसा न हों कि 2-3 साल तक रोड बने ही नहीं, फिर वे ही लोग अतिक्रमण करें, क्योंकि पहली बार आपने देखा होगा

...4.

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) CC.4

SGB/ ST/ AKN/ 15:20

श्री गुरुमुख जगवानी.....

कि उल्हासनगर के अंदर सीधे तरीके से लोगों ने घर तोड़े, दिल्ली की तरह कोई हंगामा नहीं किया. जैसे ही इन्होंने आदेश दिया, लोगों ने घर तोड़ दिए. इसलिए मेहरबानी करके, जो बेघर हुए है, दिसम्बर का महीना है, सर्दी का मौसम है, मेरी विनती है कि उनको घर दिए जाए. एमएमआरडीए की तरफ से जो पैसा चाहिए या सरकार की ओर से जो फंड रोड वाईडिंग के लिए चाहिए, वह फंड उपलब्ध किया जाना चाहिए.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, उल्हासनगरचा हा विषय आहे. कल्याण-अंबरनाथ महामार्ग क्रमांक 35 आहे. जकात नाक्यापासून फॉरवर्ड लाईनपर्यंत शहरातून जाणारा रस्ता होता, त्याचे रुंदीकरण होणे क्रमप्राप्त होते. आराखड्यामध्ये या रस्त्याचे रुंदीकरण होते ते आम्हाला मान्य आहे. रस्त्याचे रुंदीकरण करताना तोडफोड झाली. जकात नाक्यापासून फॉरवर्ड लाईनपर्यंत आपण येजा करीत असता. 821 अंशत: आणि 195 पूर्णत: बाधित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन करण्याचे शासनाने मान्य केले आहे. त्यापैकी 168 दुकाने आणि 67 निवासी सदनिका 100 टक्के बाधित झाल्यामुळे त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासन आणि महापालिका प्रशासनाने व्यवस्था केली आहे. ज्यांची दुकाने बाधित झाली त्यांचे पुनर्वसन त्या ठिकाणी केले जाणार आहे. परंतु ज्यांची निवासी घरे उद्ध्वस्त झाली, त्यापैकी काही 100 टक्के व काही पार्शली बाधित झाली आहेत, ते आज रस्त्यावर आलेले आहेत. काही लोकांनी धर्मशाळेमध्ये तर काही लोकांनी नातेवाईकांकडे आसरा मिळविला आहे. त्यांचा निवासाचा प्रश्न तातडीने सोडविणे आवश्यक आहे. यासाठी महापालिका प्रशासनाची भूमिका काय आहे? ज्यांचे व्यापारी गाळे काही प्रमाणात तुटले त्यांना बांधकाम करण्यास परवानगी देऊ असे म्हटले आहे. परंतु त्यातील एक वाक्य भविष्यात अडचणीचे ठरणार असून त्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे. ज्यांची दुकाने किंवा निवासी सदनिका अंशत: बाधित झालेल्या आहेत, त्यांना दुकान किंवा सदनिकेचा जेवढा भाग तुटला तेवढे क्षेत्र किंवा भाग त्या बांधकामावर बांधण्यास मान्यता देण्याबाबत महापालिकेकडून तपासून कारवाई करण्यात येईल असे म्हटले आहे. याचा अर्थ ज्यांचे घर किंवा व्यापारी गाळा बाधित झाला आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना 'तपासून' हा शब्द अडचणीचा ठरण्याची शक्यता आहे. म्हणून ज्यांचे घर तुटले त्यांना बांधकाम करण्यास अनुमती देण्याची आवश्यकता आहे. याबाबत प्रशासन दखल घेईल काय?

.....5.

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) CC.5

SGB/ ST/ AKN/ 15:20

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, उल्हासनगरच्या या विषयाबाबत निवेदनामध्ये म्हटले आहे की, 1974 साली विकास आराखडा मंजूर झाला होता. 100 फुटी रस्ता सुचविण्यात आला होता. त्या भागातील आमदार श्रीमती ज्योती कलानी यांच्याकडून मी माहिती घेतली तेव्हा असे लक्षात आले की, वारंवार पाठपुरावा केल्यानंतर 1016 दुकानांचे इंदिरा गांधी मार्केटमध्ये पुनर्वसन करण्यात येणार आहे. तोपर्यंत त्यांची पर्यायी व्यवस्था काय केली जाणार आहे? अनधिकृत बांधकामे उभी होईपर्यंत अधिकारी गप्प बसतात. अनधिकृत बांधकामे तोडल्यानंतर सर्वांना जाग येते. मग पुनर्वसनाच्या गोष्टी केल्या जातात. ही प्रथा सर्वच महापालिका क्षेत्रात सुरु आहे. बांधकामे तोडल्यामुळे ज्यांचा रोजगार बुडाला त्याच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था शासन करणार आहे काय?

...2डी.1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : मी त्या भागातील प्रतिनिधी आहे. मला त्या संदर्भातील थोडी माहिती आपले उत्तर होण्यापूर्वी आपणास सांगावयाची आहे. त्याने आपल्याला उत्तर देण्यासाठी मदत होईल. आज सभागृहापुढे उल्हासनगरचा प्रश्न आलेला आहे. अशी परिस्थिती 5-7 वर्षापूर्वी देखील ओढवली होती. त्यावेळी श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री होते. हा प्रश्न इतका गहन झाला होता की, त्यावेळी या प्रश्नाची सोडवणूक करण्याकरिता संपूर्ण ठाणे भागातील काँग्रेस, शिवसेना, भाजपसह सर्व पक्ष एकत्र झाले होते आणि त्या सर्वांनी तेथील विस्थापितांकरिता सर्वोतोपरी प्रयत्न केले. यात एक गोष्ट महत्त्वाची आहे. या सर्व मंडळींना राज्य शासनाने त्या काळी भरीव मदत केलेली आहे. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी अत्यंत जाणीवपूर्वक आणि सहानुभूतीपूर्वक असा विचार या प्रश्नासंबंधी केला होता. आजही अशाच प्रकारची परिस्थिती ओढविल्यानंतर त्यांना मदत करणे क्रमप्राप्त आहे. हे करीत असताना राज्य शासन स्वत:ची भूमिका बजावते त्याच जाणीवेने नागरिकांनी देखील सतर्क राहिले पाहिजे. यात महत्त्वाची बाब अशी होती की, राज्य सरकारने सर्व नागरिकांची, महानगरपालिकांची एकत्रित बैठक घेऊन हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. ज्या माणसाला त्रास होणार होता, नुकसान होणार होते त्या विस्थापितांना प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळची एक गोष्ट अजूनही झालेली नाही. त्यावेळी श्री.मोते साहेब देखील होते. नागरिकांची सर्व अडचण ओळखून राज्य शासनाने नगरपालिकेला, लोकप्रतिनिधींनी मदत केली. ही मदत करत असताना राज्य शासनाने एक अट घातली होती. जे विस्थापित आहेत त्यांना ती जमीन कायम स्वरूपी त्यांच्या नावावर पाहिजे होती. त्यासाठी विस्थापित भूभाडे देण्यास देखील तयार होते. ती पक्रिया राज्य शासनाने पार पाडली. ते ॲग्रीमेंट अस्तित्वात यावे म्हणून जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती केली. महापालिका, विस्थापित आणि जिल्हाधिकारी यांनी एका ॲग्रीमेंटने करारबद्ध व्हावे असे ठरले होते. त्यानंतर काही रक्कम देखील आकारली होती. परंतु, त्यावेळी काही लोकांनी त्याचा अप्रचार केला. त्यामुळे ते ॲग्रीमेंट आजातागायतपर्यंत झालेले नाही. राज्य शासनाने जमीन दिली आहे. सगळ्या प्रकारची मदत केली. असे असताना त्या मंडळींनी ते शुल्क भरलेले नाही. यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमले होते. ते तसेच गेल्या 8 ते 10 वर्षापासून बसून आहेत. जेव्हा अशा बाबी निर्माण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती .....

होतात तेव्हा हे प्रश्न पुन्हा पुन्हा उभे राहतात. उल्हासनगरमध्ये ही परिस्थिती वारंवार घडण्याजोगी आहे. शासन कायम स्वरूपी जागा देणार आहे, डागडुजी करून देणार आहे. शासनाने 8 ते 10 वर्ष वाट पाहिल्यानंतर सदरची मंडळी ती जागा आमच्या नावावर करीत नाही अशी ओरड करत आहेत. मला वाटते हे फार काळ चालता कामा नये. ते चालू देणे शासनालाही योग्य नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरूमुख जगवानी, रामनाथ मोते, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी जे म्हणणे मांडले त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. त्यांना घर बांधून दिले पाहिजे. त्यांना माणुसकीच्या नात्याने नुकसान भरपाई देत आहोत. परंतु, त्यांना जी बंधने घालून दिलेली आहेत ती त्यांनी पाळली पाहिजेत असे माझे प्रामाणिक मत आहे. हे सर्व करण्यासाठी आपली यंत्रणा सदैव तत्पर राहील असे देखील नाही. येथे जिल्ह्याचे पालक मंत्री देखील आहेत. आपण आपली जबाबदारी पाळाल किंवा पार पाडाल याची मला खात्री आहे. या सगळ्या गोष्टींचे नियंत्रण माननीय पालक मंत्री यांच्याकडे देखील द्यावे असे मला वाटते. हा रस्ता करण्याची जबाबदारी एमएमआरडीएकडे द्यावी. स्थानिक प्रशासनाकडे ही जबाबदारी दिली तर या कामामध्ये स्थानिकांचाच बराचसा हस्तक्षेप होण्याची शक्यता आहे. हा हस्तक्षेप होऊ द्यायचा नसेल तर एमएमआरडीएमार्फत काम करावे अशी माझी विनंती वजा सूचना आहे.

डॉ.रणजीत पाटील : सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरूमुख जगवानी, रामनाथ मोते, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी कल्याण अंबरनाथ राज्य महामार्ग क्र.35 च्या विस्ताराच्या कामासंबंधीची लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. कल्याण अंबरनाथ राज्य महामार्ग क्रमांक 35 हा उल्हासनगर शहरातून जातो. उल्हासनगर महानगरपालिकेचा विकास आराखडा 1974 मध्ये मंजूर झाला असून त्यामध्ये हा 100 फुटाचा रस्ता आहे. दिनांक 14.3.2013 च्या एका पत्राद्वारे एमएमआरडीएने 100 फूट रूंदीच्या रस्त्यामुळे बाधित होणारे अतिक्रमण काढावे असे उल्हासनगर महानगरपालिकेला कळविले होते. बाधित होणाऱ्या लोकांच्या मागणीनुसार उल्हासनगर महापालिकेत ठराव झाला. त्यानंतर हा ठराव विखंडित करण्यासाठी आयुक्तांनी तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाकडे पाठविला. शासनाने कलम 451 अन्वये तो निलंबित केला. 30 दिवसांची मुदत देऊन या कालावधीत एकही निवेदन प्राप्त झाले नाही म्हणून तो ठराव दिनांक 26.11.2015 रोजी विखंडित केला. आता दिनांक 4.12.2015 रोजी सदर रस्त्याचे रूंदीकरणाचे काम सुरू झाले आहे. या रस्त्याच्या आजूबाजूला असणारी एकूण 1016 बांधकामे बाधित होत आहेत. यापैकी 235 बांधकामे 100 टक्के बाधित होत आहेत. यात 168 दुकाने असून 67 निवासी सदनिका आहेत. यासाठी स्थानिक महागरपालिकेने ठराव देखील घेतला आहे. यात जे 100 टक्के बाधित झाले आहेत त्यांना महानगरपालिकेच्या मालकीच्या इंदिरा गांधी मार्केटच्या जागेवर 10 X 20 चौ.फुटाचे दुकान देण्याचा निर्णय महानगरपालिकेच्या विशेष महासभा ठरावानुसार घेण्यात आला आहे. 10 X 20 चौ.फुटाची दुकाने तयार करून ती हस्तांतरित करण्यात येणार आहेत.

अकोमोडेशन अगेन्स्ट रिझर्व्हेशन द्वारे विस्थापितांचे पुनर्वसन करू शकतो काय असा दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.गुरूमुख जगवानी यांनी विचारला आहे. सदनिकांचा आकार यासंबंधातील माहिती आज तरी उपलब्ध नाही. अकोमोडेशन अगेन्स्ट रिझर्व्हेशनमध्ये किती गाळे व किती सदनिका उपलब्ध होऊ शकतात याची देखील माहिती नाही. हे सर्व स्कॅटर्ड आहे. त्यामुळे त्यांना हा प्रस्ताव मान्य होतो किंवा कसे यासंबंधी देखील समुपदेशन करणे आवश्यक आहे. यासंबंधी आपण आयुक्तांकडून एक अहवाल मागवू शकतो. हा रस्ता तयार करणे महापालिकेला शक्य नाही. हा रस्ता महापालिकेमार्फत केला तर बऱ्याच अडचणी येतील. हा रस्ता एमएमआरडीएमार्फत करण्यासंबंधी एमएमआरडीएचा 5 ते 6 वर्षापूर्वी प्रस्ताव आला होता. तेव्हा स्थानिक लोकांनी रस्त्यावर येऊन विरोध केला होता. हा रस्ता एमएमआरडीएकडे असल्यामुळे अतिक्रमण काढलेला तीन कि.मी.चा पार्ट एमएमआरडीने करावा अशा सूचना शासन स्तरावरून एमएमआरडीएला देण्यात येतील.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सदर रस्त्याच्या रूंदीकरणाचे काम एमएमआरडीएच्या माध्यमातून घेण्यात आले आहे. तसे त्यांनी महानगरपालिकेला कळविले असून ती कार्यवाही देखील झाली आहे. यात मोठ्या प्रमाणावर घरांची व दुकानांची तोडफोड झालेली आहे. रस्ता रुंदीकरणामुळे जे बाधित होत आहेत त्यांना इंदिरा गांधी मार्केटच्या जागेवर दुकान बांधून देण्याचा निर्णय महापालिका स्तरावर झालेला आहे. 67 निवासी सदनिका व 100 टक्के जे बाधित झाले आहेत त्यांचे काय करायचे असा प्रश्न आहे. ही घरे साधारणत: 60 ते 65 वर्षापासूनची असून आज तेथे लोक राहात आहेत. उल्हासनगर सारखे विस्थापितांचे जे शहर त्यांच्यासाठी कालच राज्य सरकारने निर्णय घेतला आहे.

EE-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे ....

भारत पाकिस्तानचे विभाजन झाल्यानंतर ज्या ज्या ठिकाणी अशा स्वरुपाच्या वसाहती निर्माण झालेल्या आहेत त्या त्यांच्या मालकी हक्काच्या नाहीत. या वसाहती "बी" टेन्युअर असून त्या "अ" वर्ग म्हणजे "ए" टेन्यूअर करण्याच्या संदर्भातील निर्णय शासनाने कालच घोषित केलेला आहे. त्यांना मालकी हक्काने जागा देण्याच्या संदर्भात निर्णय होत असताना या ठिकाणी जे काही तोडलेले बांधकाम आहे ते अतिक्रमण आहे असे ट्रिट करण्यात येत आहे. पुनर्वसनाच्या माध्यमातून एमएमआरडीएकडे जाऊन यामध्ये ज्यांची घरे गेलेली आहेत त्यांना आपल्याकडे प्रकल्प बाधितांच्या संदर्भात जो कायदा आहे त्या कायद्यानुसार यांना प्रोटेक्शन देता येईल काय यायंदर्भात एमएमआरडीएला सूचना देण्यात येतील व हे सर्वच्या सर्व सदनिकाधारक आहेत त्यांचे पुनर्वसन करण्याच्या संदर्भात एमएमआरडीच्या माध्यमातून पुनर्वसन करण्याच्या सूचना एमएमआरडीएला दिल्या जातील व कायद्याच्या चौकटीत राहून यासंदर्भात एमएमआरडीए निर्णय घेईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, काल माननीय मंत्री महोदयांनी असे धोरण जाहीर केले होते की, जी घरे स्वत:च्या किंवा खाजगी जागेवर अतिक्रमण असेल अशांनाच या धोरणाचा फायदा होणार आहे. परंतु उल्हासनगर येथे सरकारी जागेवर अशा प्रकारची भरपूर बांधकामे झालेली आहेत. ही बांधकामे जर सरकारी जागेवर असेल तर राज्य शासन यासंदर्भात कोणता विचार करणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, काल राज्य सरकारने असा निर्णय घेतला आहे की, ज्या ब वर्ग जमिनी आहेत अशा जमिनींच्या संदर्भात निर्णय घेत असताना 1947 ते 50 च्या दरम्यान म्हणजे भारत आणि पाकिस्तानची फाळणी झाली त्या दरम्यान मोठया संख्येने या राज्यात वेगवेगळया धर्माचे लोक आले होते. यामध्ये प्रामुख्याने सिंधी समाज मोठया प्रमाणावर होता. त्यावेळच्या केंद्रसरकारच्या सूचनेनुसार असेल त्या जागेवर आपले कॅम्प ऊभे करावेत अशा प्रकारच्या सूचना त्यावेळी देण्यात आल्या होत्या. राज्यामध्ये अशा प्रकारच्या प्रामुख्याने 27 वसाहती असून 5 वसाहती वेगवेगळया आहेत. म्हणजे एकंदर 32 ठिकाणी या आहेत. अशा प्रकारचे जे काही सिंधी कॅम्प असतील व जे 1947 ते 50 च्या दरम्यान वसलेले आहेत परंतु तेव्हापासून त्या जागा त्यांच्या नावावर झाल्या नाहीत. उल्हासनगर, अकोला येथील सिंधी कॉलनी, कोल्हापूर येथे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे ....

गांधीनगर अशा वेगवेगळया ठिकाणी वसाहती आहेत. 1947 ते 50 पासून हे लोक त्या ठिकाणी राहत आहेत परंतु ती जागा त्यांच्या नावावर झालेल्या नाहीत. ही जमीन ब वर्ग आहे. या जमिनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात परंतु खरेदी विक्रीचे व्यवहार करीत असताना त्या जागेच्या रेडी रेकनरच्या 50 टक्के रक्कम अनर्जित रक्कम म्हणून भरावी लागते. जेवढे व्यवहार होतील त्या प्रत्येक व्यवहाराच्या वेळेस त्यांना 50 टक्के रक्कम भरावी लागते व त्यानंतर ती जागा दुसऱ्याला विकता येते. आता राज्य सरकारने असा निर्णय घेतला आहे की, अशा प्रकारची जी जागा आहे ती ब वर्गच्या ऐवजी अ वर्ग करण्यात यावी व ही जागा त्यांना मालकी हक्काने देण्यात यावी. म्हणजे पुढील कालखंडात त्यांना अशा प्रकारची अनर्जित रक्कम भरण्याची आवश्यकता राहणार नाही. एकवेळ रेडीरेकनरच्या दराने राज्य सरकार जे दर ठरवेल त्यानुसार एक वेळ पैसे भरल्यानंतर त्यांची मालकी कायमस्वरुपी स्थापित होऊन त्यांच्या नावावर 7/12 चा उतारा देण्याचा निर्णय राज्य सरकारने काल घोषित केलेला आहे. यामध्ये राज्यभरात उल्हासनगर सारखी जी काही शहरे आहेत ते यामध्ये येतात व त्याच बरोबरीला अशा जागा, ज्या सरकारी जागेवर आहेत त्या सोडून काही ठिकाणी आपल्या मालकी हक्काच्या जागेवर म्हणजे काही लोकांनी खाजगी शेत जमिनीवर घरे बांधली आहेत व ती गुंठेवारी पध्दतीने बांधली आहेत. काही लोकांनी शहरालगत खळे प्लॉट म्हणून जमिनी एनए केल्या परंतु त्याला एनएची परवानगी नाही. परंतु त्या ठिकाणी खरेदी विक्रीचे व्यवहार होतात परंतु त्यावर "बेकायदेशीर व्यवहार" असा उल्लेख केला जातो. यामध्ये एनएच्या कोणत्याही नियमांचे पालन केलेले नसल्यामुळे ते नावावर होत नाहीत. ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारची वस्ती आहे व या वस्त्या प्रामुख्याने शहरालगत आहेत. पुणे शहरातील पिंपरी-चिंचवड या ठिकाणी 2.5 लाख जनसंख्येचा भाग आहे. पिंपरी-चिंचवड प्राधिकरण स्थापन होण्याच्या अगोदर काही जमिनींच्या पेपर्सवर पेन्सीलीने लिहिले होते की, येणाऱ्या भविष्यकाळात प्राधिकरणाला ही जमीन लागेल. शेतकऱ्यांनी विकल्या, त्यानंतर एनए करण्यात आले परंतु एनए झाले नाही. ही जमीन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी संपादित करण्यात येणार होती परंतु त्या ठिकाणी प्लॉट पाडून ते प्लॉट विकण्यात आले. याबाबीला आता जवळपास 35-40 वर्षे झालेले आहेत. आता या ठिकाणी इमारती उभ्या राहिल्या असून त्या ठिकाणी जवळपास 2.5 लाख लोक

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे ....

राहत आहेत. या ज्या जागा आहेत त्या मालकीच्या जागा आहेत. या जागेवर अतिक्रमण झालेले नाही. सरकारी जागेवर अतिक्रमण झालेले नाही. खाजगी जागेवर त्यांनी घरे बांधलेली आहेत परंतु त्याला परवानगी मिळालेली नाही. ही जागा इ-रेग्यूलराईज आहे. त्यांनी नियमबाह्य व्यवहार केलेले आहे असा ठपका ठेवलेला आहे. परंतु ज्यांनी स्वत:च्या मालकीच्या जागेवर घरे बांधली आहेत परंतु गंठेवारी पध्द नसल्यामुळे, व काही ठिकाणी तुकडे बंदीचा कायदा आडवा येत असल्यामुळे त्या ठिकाणी तुकडे पाडता येत नाहीत. काही ठिकाणी एक हेक्टरच्या व काही ठिकाणी 2 हेक्टरच्या आत तुकडे पाडता येत नाहीत. परंतु यांनी पाडलेले तुकडे 5,10 गुंठयाचे असल्यामुळे त्याला मान्यता नाही. मान्यता नाही असे सर्व प्लॉट्स रेग्युलराईज करण्याचा निर्णय सरकारने काल घोषित केला आहे. कायद्याने अतिक्रमण आहे परंतु राज्यामध्ये जी घरे स्वत:च्या जागेवर आहेत,ज्या ज्या ठिकाणी अशी घरे आहेत, अशा ठिकाणी रिझर्व्हेशनला धक्का न लागता डीपी प्लॅन असेल, आरपी प्लॅन असेल ड्रॉफ्ट आरपी असेल अशा ठिकाणी जे तात्पुरते अतिक्रमण म्हटले आहे ते त्यांच्या मालकी हक्कावर आहे परंतु एनए न घेतल्यामुळे बेकायदेशीर खरेदी म्हटले आहे असे सर्व कायम करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात महसूल मंत्री व नगरविकास राज्यमंत्र्यांची सकारात्मक भूमिका तसेच आपणही त्यांना निर्देश दिले त्याबद्दल मी आपला आभारी आहे. या विषयाच्या संदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. उल्हासनगर येथे 2 कि.मी. पर्यंतचे अतिक्रमण हटवल्यामुळे झालेल्या तोडफोडीमुळे निर्माण झालेल्या मलब्यामुळे त्या ठिकाणी येण्याजाण्याचा रस्ता ब्लॉक झालेला आहे. दोन्ही बाजूला डेब्रिज पडलेले असून ते डेब्रिज तातडीने उचलण्याची आवश्यकता आहे. प्रशासनाने व शासनाने आता असे आश्वासन दिले आहे की, आम्ही या सर्व विस्थापितांची व्यवस्था करतो. परंतु यापूर्वी सुध्दा असे झाले आहे की, जे लोक विस्थापित झालेले आहेत त्यांना मात्र प्रशासनाने दिलासा दिलेला नाही. उदा.उल्हासनगर येथे महानगरपालिकेत पाणी पुरवठा योजना करण्यासाठी, लोकांच्या भल्यासाठी अनेक लोक प्रकल्पग्रस्त झाले आहेत. या प्रस्तापितांना नोकरीमध्ये सामावून घेण्याचे महापालिकेने सन 2006 मध्ये आश्वासन दिले होते परंतु

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ....

आज या बाबीला 9 वर्षे होऊनही या प्रस्तापितांना नोकरीमध्ये सामावून घेण्यात आलेले नाही, यासंदर्भात कोणताही विचार झालेला नाही. त्यामुळे याबाबतीत शासन काही विचार करणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, उन्हासनगर येथील अतिक्रमण काढल्यामुळे रस्त्यावर जे डेब्रिज पडले आहे त्यामुळे येण्याजाण्याला बाधा झालेली आहे असे सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेबांचे म्हणणे आहे. त्यामुळे मलबा उचलण्याच्या सूचना महानगरपालिकेला आजच्या आज देण्यात येतील. तसेच विस्थापितांना महापालिकेत कायमस्वरुपी नोकरी देण्याच्या संदर्भातील विषय या लक्षवेधी सूचनेमध्ये नाही तरी सुध्दा ही बाब तपासून पाहण्यात येईल व नंतरच त्यावर विचार करण्यात येईल.

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, माझा महसूल मंत्र्यांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, आता मा.महसूल मंत्री जे लोक स्वत:च्या जागेवर राहतात त्यासंदर्भात त्यांनी सविसतर माहिती दिलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, काही गावे अशी आहेत की, जेथे शेती महामंडळाची शासनाची जमीन आहे. त्या ठिकाणी 50 वर्षापासून लोक झोपडया बांधून राहत आहेत. आता त्या गावाला गावठाणच उरलेले नाही. माळशेज तालुक्यात सदाशिव नगर हे कारखान्याचे क्षेत्र आहे. या कारखान्याच्या भोवती शेती महामंडळाची म्हणजे सरकारची जमीन आहे. या ठिकाणी लोक गेल्या 50-60 वर्षापासून झोपडया बांधून राहत आहेत. या संदर्भात आम्ही प्रकरणे केली असून याला जिल्हाधिकाऱ्यांनी मान्यताही दिलेली आहे. परंतु शासनस्तरावरुन कार्यवाही होत नसल्यामुळे त्यांना घरे मिळालेली नाहीत. हे लोक शेतीमहामंडळात काम करीत असल्यामुळे ते कामगार होते. त्यामुळे या लोकांना त्यांच्या जागा कायम केले जाणार आहे काय ? या लोकांच्या नावाने इतर कोणत्याही ठिकाणी जमीन नाही. त्यामुळे ही जागा त्या कामगारांना दिली जाणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय,राज्यामधील गायरान जमिनी वगळून ज्या ज्या ठिकाणी शासकीय जमिनीवर 2000 च्या आत ज्यांनी घरासाठी अतिक्रमण केलेले आहे अशांची संख्या राज्यात 2.5 कोटीच्या वर असून ज्यांनी गावाच्या लगत अतिक्रमण करुन छोटीशी घरे

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे ....

बांधली आहेत,काही ठिकाणी शेती महामंडळाच्या जमिनीवर 40-45 वर्षापूवी घरे बांधली आहेत ही घरे ज्यांनी बांधली आहेत ते शेतमजूर होते व शेतमजूर असल्यामुळे ते त्या ठिकाणी राहत होते. काही ठिकाणी मागासवर्गीयांच्या वस्त्या उभ्या राहिल्या आहेत.

FF-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

अशा स्वरूपाची माहिती राज्य सरकारने घेतली. साधारणत: अडीज कोटींच्यावर ही संख्या आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार गायरान जमिनीवरील अनधिकृत अतिक्रमणे नियमित करण्याचा अधिकार आपल्याला नाही. परंतु शासन मुंबईतील सन 2000 च्या आतील झोपडपट्टयांना रेग्युलराईज करण्याचा विचार करीत आहे. तोच निर्णय या राज्यातील अतिक्रमितधारकांना मग ते ग्रामीण भागात असतील किंवा शहरी भागात असतील या सर्व अतिक्रमित झोपडपट्टीधारकांना संरक्षण देण्याचा विचार राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. या संदर्भात विहीत पद्धत्ती करुन त्यांच्याकडून योग्य तो मोबदला घेऊन, त्या ठिकाणी कोणत्याही सार्वजनिक कामाला अडथळा येणार नाही, कोणत्याही रिझर्व्हेशनला बाधा येणार नाही याची दक्षता घेऊन डीपी, आरपी किंवा ड्रॉप आरपीमध्ये अशा स्वरूपाच्या झोपडपट्टया असतील तर वर म्हटल्याप्रमाणे कोणत्याही गोष्टीला धक्का लागणार नाही याची तपासणी करुन जी अडीज ते पावणेतीन कोटींच्या आसपास घरे आहेत ती नियमाकुल करण्याच्या संदर्भात राज्य सरकार विचार करीत आहे. राज्य सरकार या संदर्भातील निर्णय तातडीने घेईल.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आले की, विस्थापितांना नोकऱ्या देण्याच्या संदर्भात महानगरपालिकेकडे विचारणा करणार आहात. आपण हा निर्णय महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांच्या बाबतीत घेणार आहात काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, जुन्या सर्व विस्थापितांना महानगरपालिकांमध्ये सामावून घेण्यात येईल असे मी बोललो नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी विस्थापितांच्या संदर्भात जो विषय मांडला होता तो आताचा विषय नाही. सन 2006 मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेची जलवाहिनी टाकण्यासाठी ज्यांची घरे उद्ध्वस्त झाली होती त्यावेळी प्रशासनाने आश्वासन दिले होते की, विस्थापितांना महागरपालिकेच्या सेवेमध्ये सामावून घेण्यात येईल. यामध्ये मर्यादित लोक होते. परंतु अद्यापि त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. आता मंत्री महोदय जे आश्वासन देतील त्यावर आमचा विश्वास आहे. पण सन 2006 मध्ये जे आश्वासन देण्यात आले होते त्या आश्वासनांची पूर्तता शासन करणार आहे काय ? ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी एवढेच बोललो की, हा विषय या लक्षवेधी सूचनेच्या कार्यकक्षेमध्ये नाही. सन्माननीय सदस्यांनी त्या विषयावर लक्षवेधी सूचना मांडली तर त्याबाबत विचार करता येईल.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, सन 2000 पर्यंत ज्या अतिक्रमित झोपड्या आहेत त्यांना कायम करण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी दिलेले आहे. मागील सरकारने जानेवारी 2000 पर्यंतच्या झोपडपट्टया रेग्युलराईज करण्याचा निर्णय घेतला होता. आम्ही वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी वाचली की, हे सरकार डिसेंबर 2000 पर्यंतच्या अतिक्रमित झोपडपट्टयांना कायम करणार आहे. मुंबईतील केंद्र सरकारच्या जमिनीवरील अतिक्रमित झोपडपट्टयांच्या संदर्भात जो निर्णय घेतला तो निर्णय राज्यातील इतर भागांमध्ये देखील घेण्यात येईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या विषयाशी संबंधित नाही. सन 1995 पूर्वीच्या झोपड्या नियमित करण्याचा निर्णय आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, सन 2000 पर्यंतच्या झोपडपट्टया नियमित करण्याचा विचार करु त्या संदर्भात अजून निर्णय झालेला नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न मूळ लक्षवेधी सूचनेशी संबंधित नाही. सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देण्यात येईल. या संदर्भात न्यायालयाने जे काही आदेश दिले असतील त्याचे पालन करुन त्या संदर्भात निर्णय घेण्यात येतील.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबईतील बोरिवली पूर्व येथील देवीपाडा येथ सर्व्हे नं. 51/2,55/2, 56/1 या भूखंडाच्या विक्रीमुळे शासनाचा बुडालेला महसूल

मु.शी. : मुंबईतील बोरिवली पूर्व येथील देवीपाडा येथ सर्व्हे नं. 51/2,55/2, 56/1 या भूखंडाच्या विक्रीमुळे शासनाचा बुडालेला महसूल..... यासंबंधी श्री.किरण पावसकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील बोरीवली पूर्व येथील देवीपाडा येथे सर्व्हे नं. ५१/२,५५/२,५६/१ या पाठारे कुटुंबियाच्या मूळ जागेवर कुळ म्हणून आदिवासी श्री.सकूर जाच्या दुभाडे २० वर्षापासून जमीन कसत असणे, सन १९७० साली पाठारे कुटुंबियांनी ही जागा कुळासकट म्हाडास विकून टाकणे, म्हाडाने सदर जमीन काही अटी व शर्तींचा समावेश करुन ९९ वर्षाच्या करारावर टाटा स्पेशल स्टील या कंपनीस विकणे, टाटा स्पेशल स्टिल या कंपनीने ही जागा त्यांना विकता येत नाही किंवा स्थलांतरीत करता येत नसतानाही शासनाची परवानगी न घेता परस्पर ओबेरॉय बिल्डरस व डेव्हल्पर्सला विकणे, म्हाडाने ही जमीन परत न घेता टाटा स्पेशल स्टील या कंपनीला विकण्यास परवानगी दिल्यामुळे शासनाचा हजारो कोटी रुपयांचा महसूल बुडणे, या प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची **प्रतिक्रिया**."

श्री.रविंद्र वायकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांना अधिकारी कशाप्रकारे उत्तरे देतात हे या लक्षवेधीच्या निवेदनावरुन दिसून येते. टाटा स्पेशल स्टील कंपनी ही मुंबईतील बोरिवली भ्ागामध्ये आहे. या जागेसाठी सन 1990 मध्ये करार करण्यात आला. म्हाडाकडून मे. टाटा स्पेशल स्टील कंपनीस ही जागा देण्यात आली. ही जागा देताना काही अटी व शर्ती टाकण्यात आल्या होत्या. त्यातील दोन क्रमांकाच्या अटीमध्ये नमूद केलेले आहे की, "भविष्यात टाटा स्पेशल स्टील कंपनीने कारखाना बंद केला तर कामगारांची कुठेही ओढाताण न करता त्यांना संरक्षित करावे. त्यानंतर ही जमीन म्हाडास बिनशर्त परत करावी. कारण लीजचे स्थलांतर किंवा स्थानांतर करता येत नाही किंवा होणार नाही." उत्तरामध्ये सर्वच गोष्टींबाबत हो म्हटलेले आहे.

सभापती महोदय, लेखी निवेदनामध्ये सिटी सर्व्हे क्रमांक 51/1, 55/2, 57/1 चा उल्लेख केलेला आहे. त्या सिटी सर्व्हे क्रमांना आपण अे असे म्हणू या. लेखी निवदेनामध्ये पुढे असे नमूद केलेले आहे की, सदर जमिनीची अदलाबदल करताना म्हाडाच्या मुंबई मंडळाने मे.स्पेशल स्टील लि.कंपनीची उपरोक्त जमीन रु 6.50 पै.प्रति चौ.वार दराने खरेदी केली व मुंबई मंडळाने आपल्या मालकीची बदली केलेली मौजे मागाठाणे, राजेंद्र नगर, बोरिवली (पूर्व) येथील सर्व्हे नं. 24/4 (पै) व 25 (1) (पै) ही जमीन रुपये 15/- प्रति चौ.वार या दराने 99 वर्षाच्या भाडेपट्टयाने स्पेशल स्टील लि.कंपनीस दिली." म्हणजे आपण अदलाबदल केली हे मान्य करता. सर्व्हे नं. 24/4 आणि 25 (1) ला आपण बी असे समजू. निवेदनात पुढे असे नमूद केलेल आहे की, स्पेशल स्टील कंपनीने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी सेवा निवासस्थानासाठी इमारत बांधली. ही इमारत मी ज्या सर्व्हे नंबरास बी असे संबोधित आहे त्यावर ही इमारत बांधली आहे. निवेदनात पुढे असे नमूद केले आहे की, नमूद जमीन सर्व्हे नं. 51/1, 55/2, 56/1 म्हणजे "ए" ही मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या ताब्यात असल्यामुळे सदर जमिनीवर टाटा स्पेशल स्टील कंपनीने स्टील प्लान्ट चालविण्याचा तसेच ती जमीन ओबेरॉय डेव्हलपर्सला विकण्याचा प्रश्न उद्भवत नाही. स्पेशल टाटा स्टील कंपनीकडून विकत घेतलेल्या जमिनीवर म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळाने गृहनिर्माण योजना राबविलेली आहे. म्हणजे जी "ए" जमीन सांगत आहात त्यावर गृहनिर्माण मंडळाने योजना केली असे दाखवित आहात आणि "बी" म्हणून जो सर्व्हे नंबर दिलेला

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

आहे त्यावर कंपनीने कर्मचाऱ्यांसाठी सेवा निवासस्थाने बांधली असे सांगत आहात. स्पेशल स्टील कंपनीमध्ये माझी युनियन होती म्हणून मला हे माहीत आहे. बॉर्डर कमी होती म्हणून कंपनीने म्हाडाकडून लीजवर जागा घेतली. आता टाटा स्टील कंपनीस ओबेरॉय बिल्डर्सचे पत्रे लागलेले आहेत. तेथील फ्लॅट विकण्यासाठी सेल्स ऑफीस उघडण्यात आलेले आहे. आपण जो "ए" पार्ट सांगत आहात तेथे म्हाडाने स्कीम राबविलेली आहे. "बी" जागेवर कंपनीने कामगारांसाठी स्कीम राबविलेली आहे. मग त्या ठिकाणी चार बिल्डींगचे प्रपोझल आहे ते कोणत्या जागेवर आहे ? आपण दोन्ही प्रकारची उत्तरे देत असालात तरी आपण ती जागा ताब्यात घेतलेली नाही. आपण जो करार केलेला आहे त्या कराराची कॉपी माझ्याकडे आहे. सन 1990 साली करार झाला आणि सन 1993 मध्ये तो अमलात आला. कंपनी बंद झाल्यानंतर ती जमीन आपल्याकडे येणे आवश्यक होते. या कंपनीने दहा वर्षापूर्वी काम बंद केलेले आहे. कंपनीने ती जागा म्हाडाच्या ताब्यात केव्हा दिली ? तीन क्रमांच्या अटीनुसार अन्य काही अटी व शर्तीनुसार हा करारनामा बंद करण्याआधी कामगार आयुक्त किंवा लेबर कोर्टाची परवानगी घेणे आवश्यक आहे. या तीनही अटींचे स्पेशल स्टील कंपनीने उल्लंघन केलेले आहे. आपल्या करारातील तीन क्रमांकाच्या अटीचे देखील उल्लंघन केलेले आहे. त्या संदर्भात शासनाने कोणती कारवाई केलेली आहे ? आता ओबेरॉय कंपनीने जे काम सुरु केलेले आहे तो एकच भाग आहे. आपण 2A आणि 2B दाखविले असले तरी आपण अदलाबदल केली असेल तर बदलामध्ये आपण त्यांना काय दिले ? त्यांनी अदलाबदल केली असेल तर त्यांनी आपणास काय दिले ? आपण लेखी स्वरूपामध्ये धादांत खोटी माहिती दिलेली आहे असे माझे स्पष्ट मत आहे. वरळी येथे कोकाकोला बिल्डींगला 25-30 वर्षे झाल्यानंतर आपण त्या इमारतींचे मजले पाडण्याची कारवाई करीत आहात. दिघीमध्ये 96 इमारती उभ्या राहिल्या. लोक त्या ठिकाणी वर्षानुवर्षे राहत असताना आपण ती बांधकामे पाडत आहोत. बोरिवली येथ कन्स्ट्रक्शन सुरु आहे. लोक अजून तेथे रहावयास गेलेली नाहीत. जर असाच प्रकार सुरु राहिला तर एके दिवशी ओबेरॉयची बिल्डींग पाडावी लागेल. त्याचा भूर्दउ सरकारला आणि अधिकाऱ्यानां बसणार नाही तर हा भूर्दंड जे लोक सदनिका खरेदी करतील त्यांना बसणार आहे.

.....GG-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

म्हणून याला स्थगिती देऊन, मे.टाटा स्पेशल स्टील कंपनीच्या परिसरात जे काम सुरु आहे ते तातडीने थांबविण्यात येईल काय ? म्हाडाचा करार हा 99 वर्षासाठी झालेला आहे, हे आपण मान्य करीत आहात. या कराराला म्हाडाच्या ज्या अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखविली असेल त्या अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ती जागा श्री. पाठारे यांच्याकडून म्हाडाला देण्यात आली होती. म्हाडाकडून मे.टाटा स्पेशल स्टील लि.कंपनीला आणि त्या कंपनीने नंतर ती जागा ओबेरॉय बिल्डर्स व डेव्हलपर्सला विकली. परंतु तसे नाही. ही जागा पाठारेंची होती. त्यांनी ती मे.टाटा स्पेशल स्टील लि.कंपनीला दिली. मे.टाटा स्पेशल स्टील कंपनीने ती जागा म्हाडाला दिली. सन 1990 मध्ये सर्व्हे क्रमांक 51/2, 52/2 व 53/1 हे म्हाडाने मे.टाटा स्पेशल स्टील कंपनीकडून रुपये 6.50 प्र.चौ.आर दराने खरेदी केली. त्यांना तेथे गृहनिर्माण योजना राबवावयाची होती. म्हाडाने सदरहू जमिनीच्या बदल्यात राजेंद्र नगर, बोरीवली येथील सर्व्हे क्र.24/4 व 25/1 येथील भूमापन क्रमांक 106, 108 व 109 मधील जमीन रु 15 प्रती चौरस आर दराने 99 वर्षाच्या भाडे करारावर मे.टाटा स्पेशल स्टील लि.कंपनीला दिली. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, मे.टाटा स्पेशल स्टील लि.कंपनीने ती जागा ओबेरॉय बिल्डरला दिली. म्हाडाने त्यांना 106, 108 व 109 यातील 108 व 109 नंबरची जमीन दिली. त्यावर मे.स्पेशल स्टील कंपनीने सर्व्हीस क्वॉर्टर्स बांधलेली आहेत. 106 हे संक्रमण शिबरासाठी आहे. या बाबतीत काहीच झाले नाही. मी अगोदर सांगितल्यानुसार म्हाडाने ती जागा मे.टाटा स्पेशल स्टील कंपनीला दिली होती व त्या कंपनीने ती जागा म्हाडाला दिली. तो सीटीएस क्रमांक 51/2, 52/2 आणि 26/1 यावर म्हाडाची गृहनिर्माण योजना आहे. 1990 मध्ये करार करण्यात आला, त्यानंतर त्या ठिकाणी म्हाडाने गृहनिर्माण योजना केली. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, ओबेरॉय बिल्डर्स व डेव्हलपर्सला ती जागा दिली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, ज्या जागेमध्ये अदलाबदल झाली त्यापैकी कोणतीही जागा म्हाडाने दिली नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या ठिकाणी सर्व्हे नंबरची अदलबदल करुन उत्तर दिले जात आहे. मे.टाटा स्पेशल स्टील कंपनी ही एकाच कंपाऊंडमध्ये आहे. बाजूच्या जमिनीची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

अदलाबदल करुन ती जागा घेण्यात आल्याचे माननीय मंत्री सांगत आहेत. एकीकडे कामगारांसाठी वस्ती बांधली आहे आणि दुसरीकडे आपण लोकांसाठी योजना राबविली आहे. मी विचारु इच्छितो की, मे.टाटा स्टील कंपनीच्या जमिनीवर ओबेरॉय बिल्डरचे जे संकुल उभे केले जात आहे ते कोणत्या जागेवर उभे केले जात आहे ? कदाचित याचाही भूमापन क्रमांक आपल्याकडे असेल. आपण तो सुध्दा सांगू शकाल.

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे विचारत आहेत तो नंबर सुध्दा माझ्याकडे आहे. ज्या जमिनीची अदलाबदल झाली त्या दोन्ही जमिनींचे सीटी सर्व्हे क्रमांक मी सांगितले आहे. मौजे मागाठाणे, बोरीवली (पूर्व) येथील सर्व्हे नं.51/2, 52/2 व 56/1 येथील सुमारे 6958.27 चौ.मी. क्षेत्रफळाची जागा म्हाडाला देण्यात आली. त्यानंतर स्पेशल स्टील कंपनीला 5471 स्क्वेअर मीटर जागा देण्यात आली. ती जागा त्यांना प्रती चौरस वार 15 रुपये दराने देण्यात आली. त्यांच्याकडून ती जागा 6.50 रुपये प्रती चौरस वार दराने घेण्यात आली. सध्या ओबेरॉय बिल्डर्सचे न.भू.क्र. 107 वर काम सुरु आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या ठिकाणी अदलाबदल करुन सर्व्हे नंबर दाखविले जात आहेत. परंतु ज्या भूखंडावर सध्या काम सुरु आहे तो स्पेशल स्टील कंपनीचा एकच प्रिमायसेस आहे. त्या कंपनीकडे दहा प्रिमायसेस नाहीत. सर्व्हे क्रमांक 24/4 मधील न.भू.क्र. 106, 108 व 109 किंवा सर्व्हे क्रमांक 25/1 मधील न.भू.क्र. 106, 108 व 109 आहे. आपण क्षेत्रफळ आणि सर्व्हे क्रमांकाच्या बाबतीत सांगत आहात. परंतु असे करुन आपण केवळ उत्तरामध्ये धुळफेक करीत आहात. हा प्रकार आज ना उद्या न्यायालयात उघड होईल. हा प्रकार म्हाडाच्या आजपर्यंत असलेल्या करारानुसार ज्या कंपनीला, ज्या कामासाठी दिली आहे तेथील कारखाना बंद झाला असेल तर ती जागा म्हाडाने आपल्या ताब्यात घ्यावयास पाहिजे. मी विचारु इच्छितो की, कंपनी बंद झाल्यानंतर म्हाडाने ती जागा ताब्यात घेतली आहे काय ? नाही. आपण जागेच्या अदलाबदलाबाबत सांगत आहात. परंतु ती जागा दोघेही वापरत आहेत. थोड्या वेळासाठी माननीय राज्यमंत्री जे सांगत आहेत ते खरे मानू या. मी विचारु इच्छितो की, म्हाडाने अदलाबदल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

करुन दिलेली जागा कंपनी बंद झाल्यानंतर ताब्यात घेतली आहे काय ? जर घेतली असेल तर ती कंपनी कधी बंद झाली आहे, कामगारांना देणी कधी देण्यात आली आहेत, याचा सुध्दा उलगडा होणे गरजेचे आहे. तिसरा प्रश्न असा आहे की, माननीय मंत्र्यांकडे 2009, 2011 मध्ये झालेल्या बैठकांची कागदपत्रे माझ्याकडे आहेत. सकूर जान्या दुभाडे या आदिवासी कुळाने 20 वर्षे वापरलेल्या जागेच्या बाबतीत आपल्याकडे वेगळेच अपील आहे. आपण जागेच्या अदलाबदलीबाबत सांगत आहात. परंतु म्हाडाने आजपर्यंत आपला करार बाजूला ठेवून अशा प्रकारची अदलाबदल कधीही केलेली नाही. तसेच अदलाबदल केलेल्या जागेमध्ये त्यांना वाटेल ते करावयास देणे हे म्हाडाने कधीही केले नाही. मी विचारु इच्छितो की, त्या कंपनीला वाटेल ते करायला देणे या बाबत आपल्यामध्ये करार झाला आहे काय ? मी आता जो करार वाचून दाखविला त्यातील अटी व शर्तींचा भंग झाला असेल तर शासन तेथील बांधकाम बंद करुन ती जागा पुन्हा ताब्यात घेणार काय ?

श्री.रविंद्र वायकर : महोदय, मी सांगू इच्छितो की, हे सर्व सिटी सर्व्हे नंबर हे त्याच चौकातील, भागातील आहेत. त्यामुळे एका सीटीएस मधील जागा ज्याने ओबेरॉय बिल्डर्सला विकली त्याचा सीटीएस क्रमांक 107 (ई) आहे. त्याच्याच बाजूला आपला सीटीएस क्र.106, 108 व 109 आहे. त्याच्याच बाजूला लागून सीटीएस क्रमांक 51/2, 52/2 आणि 56/1 आहे. आपण सांगत आहात की, यामध्ये काही फेरफार झाली असेल. परंतु माझ्या मतानुसार असा फेरफार झालेला नाही. परंतु म्हाडाने आतापर्यंत आपली जागा कागदोपत्री दिलेली नाही. त्यांना जी जागा दिलेली आहे ती जागा मे.टाटा स्पेशल स्टील कंपनीला दिली असती तर त्यासाठी म्हाडाची परवानगी घ्यावीच लागली असती. परंतु जी जागा त्यांना ट्रान्सफर केलेली आहे ती सिटीएस क्र.106, 108 व 109 मधील जागा आहे. ती त्यांनी ओबेरॉय बिल्डर्सला दिलेली नाही, माझ्याकडे असलेल्या माहितीवरुन दिसते. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, या बाबतीत न्यायालयात केस होती. अनेक वेळा सुनावणी लागली होती. सन्माननीय सदस्यांना या बाबतीत शंका असेल तर ते माझ्या दालनामध्ये येऊन या विषयावर चर्चा करु शकतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड : महोदय, या जागेचा जो कूळ होता त्या मालकाने कुळासकट ही जागा म्हाडाला विकलेली आहे. त्यामुळे त्या कुळाला काही भरपाई मिळाली आहे की नाही ? तसेच म्हाडाने ओबेरॉय बिल्डर्सला जमीन विकण्यासाठी परवानग्या दिलेल्या आहेत. यामध्ये म्हाडाच्या अधिकाऱ्यांचे हात ओले झालेले दिसतात. यामध्ये फार मोठी अनियमितता झाल्याचे दिसते. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल काय ?

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझ्या माहितीनुसार आदिवासींच्या किंवा कुळांच्या जमिनी अशा प्रकारे विकण्याचा अधिकार नसतो. तरी सुध्दा अक्षरश: प्रति चौरस वार रु. 6.50 दराने या जमिनी नुकत्याच विकल्या आहेत. मुंबईसारख्या शहरातील जमिनीचे स्क्वेअर फुटचे भाव बघता एखादी खिरापत वाटावी तशा या जमिनी विकल्या आहेत. यामध्ये सरळ सरळ भ्रष्टाचार झाला आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी मुंबई महापालिकेत काम केल्यामुळे त्यांना आदिवासींचे कूळ कसे बदलायचे याची चांगली माहिती आहे. यामध्ये ते तज्ज्ञ आहेत. त्यांनी म्हाडाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करु नये. जर म्हाडाने लिजवर जमीन दिली असेल तर ती जमीन शासनाने परत घेतली पाहिजे. गिरण्यांच्या बाबतीत असेच झाले आहे. गिरण्यांना 99 वर्षाच्या लिजवर दिलेल्या जमिनी मोठ्या मोठ्या गिरणी मालकांनी विकून टाकल्या आणि त्या ठिकाणी मोठे मोठे टॉवर उभे राहिले आहेत. त्याच्या किंमती किती आहे हे आपल्याला माहीत आहे. परंतु माननीय मंत्री त्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. त्यामुळे ज्यांनी बेकायदेशीर कृत्य केले आहे त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. तसेच जमिनीचे नंबर सर्रासपणे बदलविले जातात. प्रत्यक्ष जागेवर काहीच नसते. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारते की, ओबेरॉय बिल्डर्सला दिलेली जमीन काढून घेण्यात येईल काय ?

....2एच...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

ऑबेरॉयला दिलेली जमीन काढून घेणार का ?

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, उत्तरात पळवाट काढली आहे. म्हाडाच्या जागांच्या संदर्भात नियमांचे उल्लंघन झाले असेल तर त्या जागा अगोदर ताब्यात घ्याव्यात, अन्यथा याची बैठक लावून उत्तर घ्यावे लागेल.

उप सभापती : आपण म्हाडाच्या सर्व अधिकाऱ्यांची चौकशी लावू. सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी या उत्तरामध्ये सर्व्हे नंबर देऊन पळवाट काढण्याचा प्रयत्न केला आहे. अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहेत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मे. टाटा स्पेशल स्टील या कंपनीसोबत करार झालेला होता, त्यामधील अटी व शर्तींचा भंग झाला असेल तर तो करार रद्द झाला पाहिजे. मे. टाटा स्पेशल स्टीलशी काहीही संबंध रहायला नको. ती जमीन आपल्याकडे परत आली पाहिजे. आपण या दृष्टीने त्या कराराची वैधता पाहिली पाहिजे. अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यावर त्या कंपनीवर काय कारवाई करणार आहात ?

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, पहिला प्रश्न कुळाच्या बाबतीत विचारला होता. सभापती महोदय, ही जागा सन 1933 मध्ये लक्ष्मण बाळाजी यांच्या नावे दर्शविण्यात आली होती. त्यानंतर दिनांक 10.05.1938 रोजी माणिक गोपीनाथ पाठारे यांनी सदर जमीन सावित्रीबाई लक्ष्मण बाळाजी व अज्ञात मुलगा रामकृष्ण लक्ष्मण यांचे पालन करणार म्हणून खताने विकत घेऊन सन 1942 मध्ये श्री. माणिक पाठारे मयत झाल्यानंतर ती जमीन त्यांच्या मुलांकडे आली. त्यांच्या मुलांची नावे कृष्णराव, विश्वासराव अशी आहेत. सदर जमीन परत घेण्यात आल्यावर सदर जमिनीवर सकुर जान्या यांनी 20 वर्षांपासून लागवड करण्यास सुरूवात केली, त्यांनी अशी सुरूवात केल्यानंतर त्यांचे नाव सन 1949 पासून कुळ म्हणून लावण्यात आले. कुळाचे नाव देखील लावण्यात आले. परंतु त्याच वेळी कोर्टात केस गेल्यानंतर त्यांनी सूट दाखल केले. दिनांक 22.10.1962 रोजी सकुर जान्या यांचे नाव कमी करण्यात आले आणि दिनांक 25.04.1966 रोजी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविंद्र वायकर ....

मे. टाटा स्पेशल स्टील यांनी विश्वासराव माणिक पाठारे व कृष्णराव माणिक पाठारे यांच्याकडून खरेदी खताने जागा घेतली. त्याचे कुळ सन 1962 ला कोर्टाच्या माध्यमातून काढून टाकण्यात आले. सन 1990 मध्ये हस्तांतरण केले आहे. सन 1990 मध्ये 51(2), 52(2) 56(1) मे. टाटा स्पेशल स्टीलकडून म्हाडाने 6.50 प्रती चौरस दराने जागा खरेदी केली. त्यांनी आपल्याकडून सर्व्हे क्रमांक 24/4, 25/1, 106, 108, 109 जमीन 15 रुपये प्रतीने 99 वर्षांच्या कराराने घेतली आहे. करारामध्ये व्हायोलेशन झाले असेल तर .... (अडथळा) पण त्यांनी ती जमिनच विकलेली नाही. परंतु सन्माननीय सदस्यांची माहिती सत्य मानून जर या प्रकरणी व्हायोलेशन झाले असेल तर ....

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, आपले उत्तर आहे.

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, हे ऑबेरॉयच्या बाबतीत आहे. ऑबेरॉयला जागा विकली. मी पुन्हा सांगू शकतो की, 107 ई- सीटीएस नंबर हीच जागा विकली आहे. दोघांच्या अदलाबदली सन 1990 मध्ये करण्यात आल्या, ते का केले, कशाला केले ? सन 1990 मध्ये आम्ही नव्हतो, पण झाले. (अडथळा) अदलाबदली झाली आणि व्हायोलेशन झाले असेल तर नक्की त्याची चौकशी करण्यात येईल.

उप सभापती : मी या लक्षवेधी सूचनेवरील आपल्या सर्वांचे म्हणणे ऐकले, माननीय मंत्र्यांचे उत्तरही ऐकले. एकंदरित सर्व प्रकार पाहता, या प्रकरणाची पूर्ण छाननी होणे आवश्यक आहे. परंतु त्याकरिता संबंधित अधिकारी आणि या प्रकरणाशी जे-जे संबंधित असतील त्यांची एक संयुक्त बैठक माननीय सभापतींच्या दालनात येत्या 15-20 दिवसांत, त्यांना योग्य वाटेल त्या वेळी करावी आणि तोपर्यंत दिलेली परवानगी रद्द समजण्यात यावी.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, काम थांबविण्यात यावे.

उप सभापती : काम थांबवले आहे. परवानगी रद्द समजण्यात यावी याचा अर्थ काम करायचे नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 8 पुढे ढकलण्याबाबत</u>

उप सभापती : लक्षवेधी सुचनेतील सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. लक्षवेधी सूचना क्रमांक 8 मी रद्द करत नाही. लक्षवेधी सूचना क्रमांक 8 पुढे ढकलण्यात येत आहे.

ॲड. रामहरी रूपनवर : सभापती महोदय, मी त्या लक्षवेधी सुचनेबाबत प्रश्न विचारतो.

उप सभापती : आपण लक्षवेधी सुचनेतील सन्माननीय सदस्यांच्या वतीने प्रश्न विचारले आणि जर उद्या त्यांनी म्हटले की, मला हे विचारायचे नव्हते, मग कसे विचारले तर काय सांगणार ?

ॲड. रामहरी रूपनवर : सभापती महोदय, आपण अशी परवानगी देतो.

उप सभापती : मी परवानगी देण्यास तयार आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी जर उद्या आक्षेप घेतला तर काय करायचे ?

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लेखी उत्तरे

मु.शी. : लक्षवेधी सूचनेसंदर्भातील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री. बबनराव लोणीकर (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने राज्यातील जिल्हा परिषदांतील माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांची पदे रिक्त असणे या विषयावरील श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेबाबत दिनंक 23 मार्च, 2015 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(**प्रेस** : अधिक माहिती छापावी.)

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : विशेष उल्लेखाच्या सूचना

उप सभापती : आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"राज्यातील शासनमान्य खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांच्या भरतीवर दिनांक 02 मे, 2012 च्या शासन निर्णयानुसार बंदी घालण्यात आली आहे. भरती बंदी येण्यापूर्वी शासनाच्या धोरणानुसार शिक्षकांची पदे भरण्यास सन 2010-11 पासून बंदी घालण्यात आली होती. आकृतीबंधाबाबत अद्यापही निर्णय झालेला नाही. दरम्यान शाळांमधील ज्या संवर्गात मान्य पदांपैकी एकही व्यक्ती कार्यरत नाही, अशा संवर्गातील किमान एका व्यक्तीस नियुक्ती करण्यास सुध्दा शासनाने परवानगी दिलेली नाही. अनेक शाळांनी लिपीक संवर्गात पदे रिक्त असल्याने किमान एका लिपीकाची व एक चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याची संवर्गात पदे रिक्त असल्याने किमान एका पदावर नियुक्ती केली आहे. परंतु या एकाकी पदांना सुध्दा शिक्षण विभागातील अधिकारी मान्यता देत नाहीत. मान्यता मिळत नसल्याने शाळा अडचणीत आहेत. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून प्रत्येक शाळेमध्ये किमान एक लिपीक व एक चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना तातडीने मान्यता देण्याबात शासनाने निर्देश द्यावेत अशी विनंती मी आपल्या माध्यमातून करत आहे"

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"मुंबईवर 26/11 रोजी दहशतवादी हल्ला झाल्यानंतर शहरात तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी एक सुरक्षा दल असावे या विचारातून महाराष्ट्र सुरक्षा दलाची सन 2010 मध्ये स्थापना करण्यात आली असून अवघ्या 250 जवानांच्या साथीने सुरू झालेल्या दलातील या जवानांची संख्या आता 2500 हून अधिक असणे, मात्र सुरूवातीपासून राज्य सरकारचे या दलाकडे दुर्लक्ष झालेले असणे, विशेष पोलिसांचा दर्जा असलेल्या जवानांना असलेले अधिकार आणि शस्त्रास्त्रे यांची वाणवा असतानाच, दलाचे नेतृत्व करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली कार्यकारी संचालक पदे अजूनही रिक्त असणे, कुठलेही अधिकार आणि विशेष काम नसलेल्या या दलातील नियुक्ती म्हणजे शिक्षा असल्याची भावना पोलीस अधिकाऱ्यांमध्ये असणे, सबब शासनाने सन 2010 मध्ये स्थापन केलेल्या सुरक्षा बलाला बल द्यावे अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करत आहे."

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"मौजे भुगाव, जि. वर्धा येथे उत्तम गालवा मेटॅलिक पूर्वीची लायट्स स्टील कंपनी सन 1992 पासून चालू असून सदर कंपनीमार्फत उत्पादित करण्यात येणाऱ्या उत्पादनाच्या रासायनिक पाण्यामुळे त्या परिसरातील मौजे परभडी, भुगाव, चित्तोड, झंजापूर, सेलूकोटे व अन्य गावांमध्ये प्रदुषणाचा विपरित परिणाम होणे, इतकेच नव्हे तर प्रदुषित पाणी प्यायल्यामुळे गावातील नागरिकांना अस्थमा, हृदयविकार, वातरोग, मूळव्याध व इतर रोग हे विकार होऊन गावकऱ्यांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचे तसेच काही ग्रामस्थ मृत्यूमूखी पडल्याचे दिनांक 01 नोव्हेंबर, 2015 रोजी व त्या सुमारास निदर्शनास येणे,

....2l

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे.....

या खेरीज भुगावच्या अंगणवाडीत प्रवेशित 50 बालकांपैकी 24 बालके कुपोषित असल्याचे व या बालकांना वर्धा येथील सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आल्याचे त्या सुमारास निदर्शनास येणे, उन्हाळ्यात स्लॅक जमा करणे हे नियमाबह्य व शासन आदेशाचे उल्लंघन करणारे असताना महाराष्ट्राच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आदेश डावलून कंपनीमार्फत स्लॅक जमा करण्यात येत असल्यामुळे तेथील रासायनिक प्रक्रिया पाणी झिरपून त्या परिसरातील झाडेझुडपे मृत पावून जमिनीदेखील नापिक होणे. तसेच त्या विरोधात समस्त ग्रामस्थांनी व काही राजकीय पक्ष कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन दिनांक 4 नोव्हेंबर, 2005 रोजी मोर्चा काढून जिल्हाधिकारी, वर्धा यांना निवेदन सादर केले आहे. सदरची घटना अत्यंत गंभीर असताना उत्तम मेटॅलिक कंपनी व्यवस्थापनाविरूध्द अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून या संदर्भात तातडीची कारवाई व्हावी, अशी मी विनंती करतो.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात विक्रीकर विभागामार्फत मूल्यवर्धित कर प्रणाली (व्हॅट) व्यवस्था सुरु आहे. या व्यवस्थेत 1 टक्क्यांपासून ते 27 टक्क्यांपर्यंत गट निहाय कर आकारणी केली जात आहे. या कर आकारणीनुसार लहान व्यापाऱ्याने माल खरेदी करताना जरी व्हॅटचा भरणा केला असेल आणि संबंधित कंपनीने वा व्यापाऱ्याने त्या मालाचा व्हॅट सरकारी तिजोरीत भरला नसेल तर तो पुन्हा लहान व्यापाऱ्यालाच भूर्दंडासह भरावा लागत आहे. मुलतः लहान व्यापारी मोठ्या व्यापाऱ्याकडून वा कंपनीकडून आपला माल घेतानाच व्हॅटचा भरणा करून माल घेत असतो. तरी देखील त्याच्याकडून पुन्हा भूर्दंडासह व्हॅटचा भरणा करीत असल्यामुळे लहान व्यापाऱ्यांचे या प्रकारामुळे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. तसेच, लहान व्यापाऱ्यांना विक्रीकर विभागाकडून येणारा सर्व पत्रव्यवहार हा इंग्रजीमधून येतो. ग्रामीण भागातील अनेक लहान व्यापाऱ्यांना इंग्रजी मधील पत्रव्यवहार नीट समजत नसल्यामुळे त्यांची फार अडचण होते. हा पत्रव्यवहार राज्यभाषेतून झाल्यास लहान व्यापाऱ्यांना पत्राचा आशय समजण्यास मदत होईल. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, मुंबई येथील गोवंडी भागातील पालिकेच्या पंडित मदनमोहन मालवीय शताब्दी रुग्णालय कार्यरत असून सदर रुग्णालयाच्या शस्त्रक्रिया विभागाच्या छतातून सांडपाणी गळती होत असल्याचे उघडकीला येणे, त्यामुळे सदर रुग्णालयातील शेकडो रुग्णांचे जीव धोक्यात येणे, सदर रुग्णालयात योग्य सुविधा व स्वच्छता नसल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होणे, सदर प्रकाराबाबत पालिकेला संबंधित नागरिकांनी तक्रार दाखल करुनही याकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होणे, त्यामुळे नागरिकांना साथीच्या आजाराशी सामना करावा लागणे, रुग्णालयात बऱ्याच ठिकाणी गळती होत असल्यामुळे जागोजागी बकेट लावून सांडपाणी त्यात जमा करीत असल्याचा प्रकार घडत असणे, परंतु, पालिका प्रशासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर योग्य कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकरिता वरील विषयावर मी विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात आदिवासींचा विकास व्हावा, यासाठी आदिवासी विकास योजनेतून 480 कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या सुर्या प्रकल्पातील कवडास आणि धामणी धरणांचे पाणी शेतीला पुरविण्यासाठी 30 वर्षापूर्वी डावा तीर आणि उजवा तीर कालवे बांधण्यात येणे, धामणी धरणाची पाणी साठवण क्षमता 28.31 दशलक्ष मीटर एवढी व कवडास धरणाची क्षमता 13.70 दशलक्ष मीटर एवढी असून कालव्याचे झालेले निकृष्ट बांधकाम आणि त्यांच्या देखभाली आणि दुरुस्तीकडे होणारे दुर्लक्ष यामुळे कालव्यांना गळती लागून लाखो लीटर पाणी वाया जात असणे, कालव्याच्या पाटाबरील अतिक्रमणे आणि फांद्यांची पाटाच्या प्रवाहास होत असलेली अडचण, कालव्यामध्ये पाण्याऐवजी झाडेझुडपे आणि असंख्य गवतच मोठ्या प्रमाणावर वाढले असून ही झाडेझुडपे तोडावीत, अनेक वर्ष पात्रात जमा झालेला गाळ काढावा, पाटात पडलेले मोठमोठे खड्डे बुजावेत, अशी येथील जनतेकडून सातत्याने शासनाकडे होत असलेली मागणी, दरवर्षी लाखो रुपये खर्च करुनही पाटाची अवस्था भयावह असून पाटबंधारे खात्याने पाटाच्या देखभालीकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, सदर विषय सार्वजनिक महत्वाचा असल्याने विशेष उल्लेखाव्दारे मी शासनास शिफारस करीत आहे.

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पाथर्डी तालुक्यातील (जि.अहमदनगर) दुष्काळी भागाची पहाणी माननीय नामदार मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. सातवड (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) या गावाने दुष्काळावर मात करण्यासाठी जलमीटर योजना सुरु करण्यात आल्यामुळे पाण्याची मोठी बचत झाली असून सातवड गावात एकही पाण्याचा टँकर लागत नाही, असे प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून माननीय मुख्यमंत्री यांना सांगण्यात आलेले आहे. यावरुन माननीय मुख्यमंत्री यांनी या योजनेचा आदर्श राज्यातील गावांनी घ्यावा, अशी तत्काळ घोषणा करण्यात आली आहे.

सभापती महोदय, मात्र या योजनेची रितसर पहाणी केली असता मुळात ज्या विहिरीवर ही योजना आहे ती विहीर वर्षभरापासून बंद असून उपसा करणारी योजनाही गंज लागून बंद पडलेली आहे. सध्या गाव तीव्र पाणीटंचाईला सामोरे जात असून त्यासाठी प्रशासनाकडे पाण्याचे टँकर मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविले असूनही ते मंजूर केले जात नाहीत, अशी माहिती उघडकीस येत आहे. सबब या योजनेची माननीय मुख्यमंत्री यांना खोटी माहिती देऊन ज्या अधिकाऱ्यांनी प्रताप केला आहे त्या संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यासाठी व दुष्काळावर मात करण्यासाठी शासनाने याकडे लक्ष द्यावे, यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

...6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात माननीय उच्च न्यायालयाच्या दिनांक 9/05/2014 च्या आदेशाने कला, शारीरिक शिक्षण व आरोग्य आणि कार्यानुभव या तीन विषयांसाठी अंशकालीन निदेशकांची पदे, बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील कलम 19 नुसार दिनांक 30/09/2013 च्या यु डायट गटानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या ज्या उच्च माध्यमिक शाळांची (इ.6 वी ते 8 वी) संख्या 100 पेक्षा जास्त आहे, अशा 1835 शाळांमध्ये प्रत्येकी 1 या प्रमाणे 5505 अंशकालीन निदेशकांची पदे निर्माण करण्यास कंत्राटी पध्दतीने मान्यता देणेबाबत दिनांक 21/08/2014 रोजी शासन निर्णय काढण्यात येणे, सदर आदेशात बदल करुन अतिथी निदेशकांचे पथक निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, अशा प्रकारचे शिक्षण देण्यासाठी भरपूर लोक तयार आहेत तसेच याबाबत राज्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या उच्च प्राथमिक शाळांच्या इ.6 वी, 8 वी वर्गातील पटसंख्या 100 पेक्षा जास्त आहे, अशा 1835 शाळात अतिथी निदेशकांचे प्रत्येकी 3 पॅनल करण्याच्या आदेशाची तातडीने नियुक्ती करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास करीत आहे.

...7.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, सन 2012-13 पासून राज्याच्या 21 जिल्ह्यातील 194 तालुके व 21 नागरी विभागात राबविण्यात येत असलेला कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम निधीअभावी राज्य शासनाने आकस्मात बंद केला आहे. त्यामुळे या योजनेत कार्यरत असलेल्या सुमारे 236 कर्मचाऱ्यांवर बेरोजगाराची पाळी आली आहे. सदर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया राबवून मार्च, 2014 पर्यंत त्यांना नियुक्ती आदेश दिले होते. 2014-15 या वर्षात सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुर्ननियुक्तीचे आदेश देण्यात आले. मात्र सन 2015-16 मध्ये पुर्ननियुक्तीचे आदेश देण्यास सहसंचालक कुष्ठरोग, पुणे यांच्या कार्यालयाकडून विलंब झाला आहे. विलंबाने का होईना परंतु पुर्ननियुक्तीचे आदेश देऊन 6 महिन्याच्या आतच 15 ऑक्टोबर, 2015 पासून सदर कर्मचाऱ्यांना तडकाफडकी कार्यमुक्त करण्यात आले. राज्यात अद्यापही कुष्ठरोगाचे 100 टक्के निर्मूलन झाले नाही. त्यामुळे ही योजना बंद न करता पुढे चालू ठेवण्यात यावी, अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास विनंती करीत आहे.

...8.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली या शहरांमध्ये वाढते नागरीकरण झाल्यानंतर अपुऱ्या नागरी सुविधांची बाब मी या विशेष उल्लेखाव्दारे निदर्शनास आणून देत आहे. विशेष करुन कल्याण-डोंबिवली या शहरांना प्रमुख 3 समस्यांचा सामना करावा लागत आहे. पहिली म्हणजे ट्रॅफिक, दुसरी डंम्पिंग ग्राऊंड आणि तिसरा प्रदूषणाचा प्रश्न आहे. ट्रॅफिकच्या मुद्यावर मागे मी मुद्दा उपस्थित केला होता व नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठकही घेतली होती

...JJ-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त.....

त्या बैठकीत जे ठरले त्याचे पालन झालेले नाही. म्हणून माझी विनंती आहे की, त्या संबंधी पुन्हा आढावा बैठक घेऊन त्याचा पाठपुरावा करण्यात यावा.

सभापती महोदय, माननीय उद्योग राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. डोंबिवली शहरातील प्रदूषणाच्या समस्येच्या संदर्भात बैठक आयोजित करण्यात येईल, असे त्यांनी आश्वासन दिले होते. त्यांनी या विषयावर बैठक बोलवावी, अशी माझी आपल्या माध्यमातून त्यांना विनंती आहे. तसेच, डम्पिंग ग्राऊंडच्या विषयाबाबत देखील शासनाने त्वरीत निर्णय घ्यावा, अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, बैठक घेण्यात येईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती स्मिता वाघ (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडते.

सभापती महोदय, सहायक आयुक्त कार्यालय, मुंबई येथे औषध प्रशासन विभागात कार्यरत असलेले तीन अन्न सुरक्षा अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला लाच घेतल्या प्रकरणी आढळून येणे, मात्र सदर तीन अधिकारी जबाबदार असताना केवळ एकाच व्यक्तीवर दिनांक 11 मार्च, 2014 रोजी निलंबनाची कारवाई करण्यात येणे, परिणामी सदर प्रकरणी प्रथमदर्शनी अर्थपूर्ण देवाण-घेवाण होऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात न येणे, याबाबत सखोल चौकशी करून सदर प्रकरणात दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात सन 2014-15 मध्ये अन्न सुरक्षा अभियान आणि मळीत धान्य योजने अंतर्गत डिझेल मोटर पंप, पाईप संच शेतकऱ्यांना देण्यात येणे, परंतु यावर्षी या योजना गुंडाळून केंद्र शासनातर्फे डीबीटी बेनिफिशरी ट्रान्सफर योजना सुरु करण्यात येणे, या योजने अंतर्गत अगोदर शेतकऱ्यांनी शंभर टक्के रक्कम भरल्यानंतर 50 टक्के अनुदान घ्यावे अशी तरतूद असणे, राज्यातील शेतकरी संकटात सापडलेला असताना शंभर टक्के रक्कम भरुन डिझेल मोटर पंप, पाईप संच घेऊन आपले शिवार जलयुक्त करु शकत नाहीत. शेतकऱ्यांना पडलेला हा गंभीर प्रश्न आहे. याबाबत जलयुक्त शिवार योजनेच्या अनुदानाबाबत घालण्यात आलेल्या अटी व शर्तीत बदल करुन शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदान देऊन डिझेल मोटर पंप उपलब्ध करुन देण्यात यावेत, अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रात इतर भाषिक साहित्य पुरस्कार प्राप्त मान्यवर साहित्यिकांना शासनाकडून ज्या सुविधा व सवलती उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत त्या उर्दू भाषिक पुरस्कार प्राप्त मान्यवर साहित्यिकांना उपलब्ध नसल्याने याबद्दल वारंवार विचारणा करुन सुद्धा राज्य उर्दू साहित्य अकादमीच्या प्रशासनाकडून समाधानकारक उत्तर मिळत नसणे, तसेच दिनांक 30 मे, 2014 रोजी अल्पसंख्याक विभागाकडे मागणी करुन प्रतिसाद न मिळणे, परिणामी उर्दू साहित्य पुरस्कार प्राप्त साहित्यिकांनी प्राप्त पुरस्कार परत करण्याची भूमिका घेणे, यामुळे उर्दू साहित्यिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत सदर साहित्यिकांना इतर भाषिक पुरस्कार प्राप्त मान्यवरांना देण्यात येणाऱ्या सुविधा व सवलती उर्दू साहित्यिकांना पुरविण्यात याव्यात, अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, गिरणी कामगारांना कमीत कमी किंमतीत घर मिळावे ही राज्य शासनाची भूमिका असून सरकारकडून त्यानुसार उपक्रम राबवून गिरणी कामगारांना कमीत कमी किंमतीत घरे उपलब्ध करुन दिली जात आहेत. परंतु, स्टँडर्ड मिल प्रभादेवी येथे म्हाडाने गिरणी कामगारांसाठी बांधलेल्या बिल्डींगमध्ये गिरणी कामगार रहिवाश्यांकडून प्रत्येकी 3,555/- रुपये मासिक सेवा कर आकारत येत आहे. म्हाडाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आकार पत्रकात प्रत्येक कामगारांकडून प्रत्येक रुम मागे दरमहा रु.2011/- रुपये मालमत्ता कर वसूल केला जात आहे. प्रत्येक गिरणी कामगाराला सरकारने पिवळी शिधापत्रिका दिलेली आहे. गिरणी कामगार रहिवाश्यांकडून प्रत्येकी 3,555/- रुपये मासिक सेवा कर आकारण्यात येत आहे, तो कर 2011/- रुपये आकारला पाहिजे. शासनाने याची गंभीर दखल घेऊन गिरणी कामगारांकडून कमीत कमी मालमत्ता कर आकारुन त्यांना न्याय द्यावा, अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे.

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्याच्या महाधिवक्त्यांनी केलेल्या वक्तव्याबाबत शासनाने करावयाचे निवेदन

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, काल माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिले होते की, श्री.अणे साहेबांनी केलेल्या मुद्याबाबत शासनाने आज सकाळी निवेदन करावे. मी सकाळी हा मुद्दा उपस्थित केला होता. माननीय सभापतींनी पुन्हा आठवण करुन दिली की, शासनाने याबाबत आज संध्याकाळ पर्यंत निवेदन करावे. आता 5.00 वाजत आहेत. परंतु, शासनाने अद्याप याबाबत निवेदन केलेले नाही. यामुळे माननीय सभापतींच्या निर्देशाचा अवमान होत आहे आणि असे असेल तर सभागृहाचे कामकाज चालविणे अवघड होईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्याचे महाधिवक्ता यांनी त्यांच्या पुस्तकाचे विमोचन करताना एक स्टेटमेंट केले. त्या स्टेटमेंटमुळे अखंड महाराष्ट्राच्या विभाजनाची चर्चा पुन्हा एकदा सुरु झाली. ते राज्याचे महाधिवक्ता आहेत. त्यांचे म्हणणे संपूर्ण राज्याच्या, अखंड राज्याच्या हिताचे असले पाहिजे. परंतु, त्या दिवशी ते विदर्भ राज्य वेगळे करण्याबाबत बोलले. सभागृहात एकदा नाही, दोनदा नाही तर तीन वेळा सन्माननीय सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला. त्यावेळी माननीय सभापतींनी शासनास निवेदन करावे, असे सांगितले. आज सकाळी शासनाच्या वतीने या संदर्भात निवेदन करण्यात येणार होते. परंतु, आज सकाळी शासनाच्या वतीने निवेदन करण्यात आले नाही. आता 5.00 वाजत आहेत. आज संध्याकाळ पर्यंत या संदर्भात निवेदन करण्यात येईल, असे शासनाने सांगितले होते. परंतु, शासनाकडून या संदर्भात निवेदन होईल असे वाटत नाही. या संपूर्ण प्रकरणाकडे शासन गांभीर्याने लक्ष देणार नसेल तर महाधिवक्ता यांनी जे सांगितले ते आम्ही खरे समजावयाचे काय, ते शासनाचे मत समजावयाचे काय, हे जोपर्यंत या ठिकाणी स्पष्ट होत नाही तोपर्यंत आणि आपल्या खुर्चीचा जर अशा प्रकारे शासनाकडून अपमान होत असेल तर या सभागृहात बसलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचा देखील हा अपमान आहे. शासनाकडून या संदर्भात निवेदन होणे आवश्यक आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना एवढी काय घाई झालेली आहे की, आज संध्याकाळ पर्यंत वाट न बघता त्यांना अवमान, अपमान, सन्मान झाल्याचे वाटते. रात्री 8.00 वाजता देखील निवेदन होऊ शकते. सभागृहाचे कामकाज सुरु असे पर्यंत केंव्हाही निवेदन होऊ शकते.

..7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, शासनाने या संदर्भात याच क्षणी निवेदन करावे. शासन संध्याकाळ पर्यंत वाट का बघत आहे ? शासनाने या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करावी.

उप सभापती : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या संदर्भात आपले म्हणणे मांडले आणि आपणही आपले म्हणणे मांडले आहे. आपण त्यांना बोलण्याची संधीच दिलेली नाही. आज संध्याकाळ पर्यंत निवेदन करण्यात येईल, असे शासनाने सांगितले होते. आता 5 वाजत आहेत. शासनाने संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत या संदर्भात निवेदन करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी हा मुद्दा मांडला होता.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया माझे म्हणणे ऐकून घ्यावे. माझे असे म्हणणे आहे की, त्यांनी आपल्याला विनंती केलेली आहे. त्यांनी त्यांचे म्हणणे सभागृहात मांडलेले आहे आणि माननीय सभापतींनी निर्देश दिल्यानंतर आज संध्याकाळ पर्यंत शासनाने या संदर्भात निवेदन करावयाचे आहे. शासनाने संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत निवेदन करावे, अशी मी सर्वांच्या वतीने आपल्याला विनंती करतो.

सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(दुपारी 4.39 ते 5.00 वाजेपर्यंत मध्यंतर)

..2K...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)

ॲड. राहूल रार्वेकर : सभापती महोदय, आताच या सभागृहात आश्वासन देण्यात आले होते की, माननीय मुख्यमंत्री आज सायंकाळपर्यंत ॲडव्होकेट जनरल यांनी जे स्टेटमेंट केले त्याबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करतील. आम्हाला अपेक्षित होते की, कोणत्याही प्रकारचा वेळ न घालविता...

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मला येथून निदेश आल्यामुळेच मी सभागृहात आलो आहे. सकाळी मी सभापती महोदयांना प्रत्यक्ष भेटून विनंती केली होती की, ॲडव्होकेट जनरल नेमके काय बोलले आहेत, याची माहिती त्यांच्याकडून मागवित आहोत, ती माहिती आल्यानंतर त्यासंदर्भातील निवेदन केले जाईल. त्याबाबत सभापती महोदयांनी संमती दिली होती. त्यामुळे सभापती महोदयांच्या संमतीनेच आम्ही वागत आहोत, संमती शिवाय आम्ही वागत नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, विषय इतकाच आहे की, या चेअरवरून माननीय सभापती यांनी सभागृहाला आश्वासित केले होते व सरकारला सांगितले होते की, आज संध्याकाळपर्यंत महाधिवक्ते सन्माननीय श्री.अणे यांच्या बाबतीतील निवेदन सरकारने करावे. आमची अशी मागणी आहे की, सरकारने याबाबत स्पष्ट निवेदन करावे. महाधिवक्ता जे बोलले त्याबाबत सरकार सहमत आहे काय ? त्यांनी जी भूमिका मांडली ती बरोबर आहे काय ? किंवा आता सरकार जे म्हणते ते बरोबर आहे काय ? सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय आहे. उप राजधानीत अधिवेशन होत असताना सरकारची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे अशी आमची मागणी आहे.

ॲड.राहूल नार्वेकर : सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल हे घटनात्मक पद आहे. घटनेमध्ये ॲडव्होकेट जनरल यांचा नेमका रोल काय आहे ते नमूद केलेले आहे. ॲडव्होकेट जनरल सरकारची भूमिका कोर्टात मांडतात व सरकारला कायदेशीर सल्ला देण्याची त्यांची भूमिका असते. जेव्हा ॲडव्होकेट जनरल एखादी भूमिका मांडतात तेव्हा ती भूमिका सरकारची असते असे ग्राह्य धरले जाते. तेव्हा या पार्श्वभूमीवर सरकारची नेमकी भूमिका काय आहे हे जाणून घेणे अखंड महाराष्ट्रासाठी अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते. हीच सदनाची भूमिका आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. राहूल नार्वेकर...

सदनाचे सेंटीमेंट आहे, सदनाच्या सेंटीमेंटचा आदर करुन माननीय मुख्यमंत्री यांनी सरकारची भूमिका काय आहे याबाबत स्पष्टीकरण करावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या सभागृहाची प्रथा आणि परंपरा अशी आहे की, पेपरात छापून आलेल्या बातमीला सत्य मानून या ठिकाणी चर्चा करता येत नाही. त्यामुळे मी सभापती महोदयांना विनंती केली होती की, ॲडव्होकेट जनरल काय म्हणाले हे त्यांच्याकडून आम्ही समजून घेऊ व त्यानंतर सभागृहात भूमिका मांडता येईल. एखाद्या वर्तमानपत्रात आलेल्या बातमीच्या संदर्भात सभागृहात भूमिका मांडता येणार नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाधिवक्ता जे बोलले ते बोलले नाहीत असे मुख्यमंत्री महोदयांनी स्पष्ट करावे. महाधिवक्ता बोलले असतील तर त्याबाबत सरकारची भूमिका काय आहे हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. अखंड महाराष्ट्राच्या संदर्भातील हा विषय अतिशय महत्वाचा आहे. या विषयाबाबत सरकारकडून निवेदन होणे अपेक्षित आहे. वेगळ्या विदर्भाच्या बाबतीत महाधिवक्ता बोलले असतील तर त्यासंदर्भातील त्यांचे निवेदन खरे असेल व सरकार जर याकडे दुर्लक्ष करीत असेल तर वेगळ्या विदर्भाच्या मागणीकडे सरकारचे दुर्लक्ष आहे काय ? यासंदर्भातील विषयाची स्पष्टता होणे आवश्यक आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देतात)

तालिका सभापती : मी दहा मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 05.04 ते 05.14 वाजेपर्यंत स्थगित झाली)

.....LL-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या सार्वभौम सभागृहामध्ये एक धोरणात्मक मुद्दा म्हणून सर्वपक्षीय माननीय सदस्यांकडून राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांच्याबद्दल भूमिका मांडली गेली. त्या भावनांशी निगडित होऊन माननीय सभापतींनी सरकारला आज निवेदन करण्याचे निर्देश दिले. यामध्ये काही धोरणात्मक मुद्दे उपस्थित झालेले आहेत. पहिली गोष्ट म्हणजे ॲडव्होकेट जनरल यांनी वेगळया विदर्भ राज्याची मागणी केली. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न केला, मोघम उत्तर दिले. आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांचा सन्मान करतो. जर या सभागृहात चुकीचा पायंडा पडला तर त्याचे देशव्यापी परिणाम होऊ शकतात. मी माहिती घेतली असता मला असे कळले की, आपल्या राज्यात नव्हे तर देशातील इतर कोणत्याही राज्यात ॲडव्होकेट जनरल यांनी आपले व्यक्तिगत मत सार्वजनिकरित्या व्यक्त करण्याची प्रथा नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यानंतर ॲडव्होकेट जनरल यांनी दिलगिरी व्यक्त केली असती किंवा मी असे बोललो नाही वा मीच असे कोट केले असे म्हटले असते तर माननीय सदस्यांना ती भावना समजू शकली असती. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी इशारा दिल्यानंतर देखील पुन्हा त्यांनी ती भूमिका मांडली.

2एम.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त...

महाराष्ट्र राज्याचे ॲडव्होकेट जनरल म्हणून शपथ घेतल्यानंतर ते वेगळ्या राज्याची मागणी करीत आहेत. त्यांना व्यक्तिगत मत मांडावयाचे असेल तर त्यांनी आपल्या पदाचा खुशाल राजीनामा द्यावा. तसा त्यांना लोकशाहीमध्ये अधिकार आहे. ॲव्होकेट जनरल हा सरकारचा प्रवक्ता असतो. ते अशी भूमिका मांडून माननीय मुख्यमंत्र्यांना अडचणीत आणत आहेत. आम्हाला त्यांची काळजी वाटते. एक चुकीचा मेसेज जाईल. आज माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी सांगितले की, खुलासा मागविला आहे. ते नागपूर मध्ये आहेत, आम्ही सर्व देखील नागपूरमध्ये आहोत. उद्या सकाळ पर्यंत खुलासा येईल. उद्या सरकारच्यावतीने यासंबंधी निवेदन व्हावयास पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये कोणत्या विषयाला प्रॉयॉरिटी द्यायची याचा आपण विचार केला तर ज्यावेळी घटनात्मक मुद्दा तयार होतो त्यावेळी सरकार पक्षाने त्या विषयाला प्राधान्य द्यायला हवे. घटनेच्या कलम 165 प्रमाणे ॲडव्होकेट जनरलची कर्तव्य काय आहेत? विधि विषयक त्यांना जी कामे देण्यात येतील त्या व्यतिरिक्त दुसरे कुठलेही काम त्यांना नाही. त्यांना फक्त शासनाला विधि संबंधी सल्ला देण्याचे काम आहे. पण ते वारंवार वक्तव्य करीत आहे. आम्ही वर्तमानपत्राच्या बातम्यांवर विश्वास ठेवत नाही. पण आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांकडून यासंबंधी त्यांची भूमिका जाणून घ्यायचे आहे. मी या संदर्भात शासनाची भूमिका जाहीर करेन असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. आपण धनगर, मराठा, मुस्लिम आरक्षणावर आपली भूमिका कधी जाहीर करणार आहात ? ती तारीख कधी जाहीर करणार आहात हेच मला माहीत नाही. हे अधिवेशन संपेपर्यंत आपण निवेदन करणार नाही. त्यामुळे हा घटनात्मक प्रसंग असाच राहील. तो राहू नये म्हणून माझी विनंती अशी आहे की, सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आजचा दिवस गेला तरी उद्या कोणत्याही परिस्थितीत या सभागृहामध्ये निवेदन करावे.

उप सभापती : आता आपण विचारले की, प्रॉयॉरिटी कशाला देणार आहात. आपल्या या डिबेट नंतर मी पुरवणी मागणीच्या चर्चेला प्रॉयॉरिटी देणार आहे. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाअधिवक्त्याच्या स्टेटमेंटमुळे राज्यातील जनतेच्या ज्या निर्माण झालेल्या आहेत त्यासंबंधी सरकारने भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी वर्तमानपत्रातील बातमीचा संदर्भ दिला आहे. त्यासंबंधी या सदनामध्ये बोलता येत नाही असे त्यांनी सांगितले. दुसऱ्या दिवशी ही देखील बातमी आली होती की, माझी नेमणूक ही राज्यपालांनी केलेली आहे. राज्य सरकारचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. त्याचेही स्पष्टीकरण व्हावयास पाहिजे. एक स्पष्ट आहे की, संपूर्ण राज्यात यासंबंधी चर्चा सुरू आहे. एका गंभीर विषयासंबंधी राज्य सरकार निवेदन करणार नसेल तर ते चुकीचे आहे. आज सरकारची अडचण असेल तर ठीक आहे. या प्रकरणी सरकारने पूर्ण माहिती घेऊन उद्या निवेदन करावे. आम्ही माहिती घेतो अशी कारणे एक सारखी न देता किमान उद्या पर्यंत यासंबंधी शासनाकडून निवेदन व्हावे अशी आमची अपेक्षा आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, यासंदर्भात उद्या सभागृहाचे कामकाज संपण्याच्या आधी निवेदन केले जाईल.

.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2015-16 च्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

उप सभापती : आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. सोमवार दिनांक 14 डिसेंबर 2015 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात 9 मंत्र्यांचे विभाग दर्शविण्यात आले होते. तथापि, उक्त दिवशी चर्चा होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांचा समावेश आजच्या कामकाजाच्या क्रमात करण्यात आला आहे. पुरवणी मागण्या आणि त्या खालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रस्तुत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगावा. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहेच. सदर चर्चा व मंत्र्यांचे उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया धान्यात घ्यावे.

शीर्षक : विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या.

उप सभापती : खालील विभागाच्यां पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील:-

1 सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9, व्ही-2, व्ही-3, व्ही-5

2 आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक टी-2, टी-5, टी-6, टी-7

3 अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2, एम-3, एम-4, पी-1

4 जलसंपदा मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक आय-1, आय-3, आय-5

5 उद्योग मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक के-3, के-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

6 ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक के-6

7 पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक वाय-2, वाय-5

8 सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक आर-1, आर-2

9 सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एन-3, एन-4

10 मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ए-2, ए-4,ए-6,बी-1, बी-4, बी-5, बी-10,बी-11,एफ-2, एफ-3, एफ-4, एफ-5, जे-1, जे-2, जे-4, झेडए-1, झेडीडी-4

11 महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक, विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्या क्रमांक बी-2,सी-1, सी-4, सी-5, सी-6, सी-8, डी-3, डी-4, डी-5, डी-6, डी-9, झेडई-1

12 वित्त आणि नियोजन, वने मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्या क्रमांक सी-7, सी-10, जी-1, जी-4, ओ-7, ओ-9, ओ-10, ओ-13, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-35, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47, ओ-48, ओ-49

13 शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्या क्रमांक ई-2, ई-3, ई-4, एस-1, एस-3, एस-4, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6, झेडडी-2

14 गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्या क्रमांक के-4, के-8

15 ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक एल-2, एल-3, एल-4, एल-5, एल-7, ओ-3, एक्स-1

16 परिवहन मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्या क्रमांक बी-3, बी-7, बी-10

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. एक म्हण आहे. लोका सांगे ब्रह्म ज्ञान, आपण मात्र कोरडे पाषाण. ही म्हण चपखलपणे कोणाला लागू पडत असेल तर ती या राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री आणि राज्याच्या माननीय वित्तमंत्र्यांना. याला कारण आहे. गेली पंधरा वर्षे राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाची सत्ता या राज्यावर होती. ही सत्ता असताना स्वाभाविकपणे भाजप आणि शिवसेना विरोधामध्ये होते. त्यावेळचे सन्माननीय सदस्य श्री.सुधीरभाऊ मुनगंटीवार हे आता राज्याचे वित्त मंत्री आहेत. त्यांची विरोधी पक्षात असतानाची पुरवणी मागण्यांवरील सर्व भाषणे मी वाचली आहेत. चालू वर्षी पावसाळी आणि हिवाळी अधिवेशनात मिळून 35 हजार कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्याचा एक विक्रम श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी केलेला आहे. आज पर्यंत महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये दोन अधिवेशनामध्ये 35 हजार कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या कोणीही मांडलेल्या नाहीत. पण त्या त्यांनी मांडून विक्रम केलेला आहे. महाराष्ट्रात डाळीचे भाव पाचपट वाढत असताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.बापट साहेबांकडून काय झाले हे आपणा सर्वांना माहीत आहे. केंद्र सरकारच्या सूचना असताना ते गप्प का राहिले हे देखील माहीत नाही. पुरवणी मागण्यांवर माननीय वित्त मंत्र्यांनी पूर्वी जी भाषणे केली आहेत ती माझ्याकडे आहेत. ते म्हणाले होते की, अशा पुरवणी मागण्या मांडता येत नाही, एवढ्या कोटीच्या मागण्या सादर करता येत नाहीत, हे सरकार चुकीचे आहे. पण असे बोलणारेच आज वित्त मंत्र्यांच्या खुर्चीत बसले असून त्यांनी 35 हजार कोटीच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर सादर केल्या आहेत. तेव्हा यासंबंधी देखील माननीय वित्त मंत्र्यांकडून स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. हिवाळी अधिवेशनात 16 हजार कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या असून वित्त वर्षाच्या शेवटच्या तीन महिन्यांमध्ये हे 16 हजार कोटी रूपये आपण कसे खर्च करणार आहात, हे देखील स्पष्ट केले पाहिजे. कारण आता डिसेंबर महिना संपत आलेला आहे. काही बाबींवर 15 फेब्रुवारी नंतर खर्च करण्याची अनुमतीच नाही. त्यामुळे हे पैसे कसे काय खर्च होणार आहेत, यासंबंधी आमच्या मनात शंका आहे. त्या शंकेचे निरसन होणे आवश्यक आहे. पुन्हा आचारसंहिता आहे. आताचे सन्माननीय मुख्यमंत्री, वित्त मंत्री विरोधी पक्षात असताना पुरवणी मागण्यांवर बोलताना त्यांचे स्पष्ट मत असायचे की, राज्यपालांच्या निदेशानुसार विभागनिहाय पुरवणी मागण्या विधिमंडळाकडे सादर कराव्यात.

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, मी देखील गेल्या 20 वर्षापासून विधिमंडळाचा सदस्य आहे. मी जेव्हा दुसऱ्या मंत्र्यांचे भाषण वाचतो तेव्हा ते त्यांना पाठवितो. तीच अपेक्षा माझी विरोधी पक्ष नेत्यांकडून राहील. ते जेव्हा माझ्या भाषणातील वाक्य वाचून दाखवितात तेव्हा त्यांनी त्या भाषणाची प्रत दिली तर योग्य होईल. हे खरे आहे की, माझ्या 20 वर्षातील स्वत:च्या भाषणावर मी श्वेतपत्रिका काढत आहे. त्यात मी कोणते मुद्दे मांडले व पाच वर्षात काय करणार आहे हे नमूद करणार आहे. ईश्वरीकृपेने मला माझ्या भाषणातील प्रत्येक वाक्य आठवते.

NN-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार .....

माझ्या भाषणाची प्रत माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पाठवली पाहिजे नाहीतर माननीय श्री.गिरीष महाजन साहेबांचे भाषण माझ्या नावाने खपवले जाणार असेल तर मग अडचण होईल.मला विरोधी पक्ष नेत्यांनी माझ्या भाषणाची फक्त प्रत पाठवावी एवढीच विनंती आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय वित्त मंत्र्यांना प्रत पाठवली जाईल.

सभापती महोदय, चालू आर्थिक वर्षात मुळ अर्थसंकल्पात 30-30 टक्क्यापर्यंत विक्रमी पुरवणी मागण्या घेतल्या आहेत परंतु त्या विभाग निहाय दिलेल्या नाहीत. राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार एकून विभागनिहाय तरतुदी किती झाल्या, खर्च किती झाला याचा काहीही बोध पुरवणी मागण्या मांडताना होत नाही. खरे तर यासंदर्भातील आकडेवारी सभागृहासमोर येणे आवश्यक आहे व तो या सभागृहाचा अधिकारसुध्दा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांची आणि वित्त मंत्र्यांची एकंदर पध्दत पाहता विदर्भाला काय मिळाले, काय मिळाले नाही हे समजणे आवश्यक आहे. कारण हे अधिवेशन विदर्भामध्ये होत असून विदर्भाला काय मिळाले हे समजणे आमच्यादृष्टीने आणि जनतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. विदर्भाला पुरवणी मागण्यांमध्ये किती पैसे मिळाले हे स्पष्ट झाले असते. माननीय मुख्यमंत्री विदर्भाचे, वित्तमंत्री विदर्भाचे असतांना तसेच विदर्भामध्ये अधिवेशन होत असताना विदर्भाला नेमके काय मिळाले ही स्पष्टता दिसून आलेली नाही हे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात शासनावरील कर्ज 3 लाख 55 हजार कोटी रुपये इतके झाल्याची माहिती सन्माननीय अर्थमंत्र्यांनी एका वर्तमानपत्रात दिली होती. कदाचित ती वर्तमानपत्राची बातमी असेल. परंतु खरी काय परिस्थिती आहे ती या पुरवणी मागणीच्या उत्तरामध्ये माननीय वित्तमंत्र्यांकडून आम्हाला कळाली पाहिजे. यासंदर्भात राज्यात गत वर्षी सत्तांतर झाले त्यावेळेस या राज्यावरील कर्जाचा बोला हा 2 लाख 98 हजार कोटी रुपये इतका होता. अर्थमंत्र्यांची बातमी छापून आल्याचा संदर्भ पाहता राज्यावर 2 लाख 98 हजार कोटी रुपयांचे कर्ज असताना त्यानंतर 50 हजार कोटी रुपयांचे कर्ज एका वर्षात झाले असून आमच्या सारख्यांचे नाही तर ज्याला अर्थकारणाच्या बाबतीत काही ज्ञान आहे त्या प्रत्येकाला वाटते की, राज्यावर एका वर्षात 50 हजार कोटी रुपयांचे कर्ज झाले असेल तर हे पैसे नेमक्या कोणत्या मुलभूत बाबीवर खर्च झाले ?एकूण कर्जाच्या 20 टक्के कर्ज एका वर्षात घेतले गेले असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे यासंदर्भातील स्पष्टता होणे आवश्यक आहे. ...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 5, पृष्ठ क्रमांक 5 वर मी विचार व्यक्त करणार आहे.

सभापती महोदय, राष्ट्र पुरुष व थोर पुरुष यांची स्मारकासाठी 3 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. छत्रपती शाहू महाराजांची जयंती दिन निश्चित करण्यासाठी संचालक पुराभिलेख,इतिहासतज्ञ डॉ.जयसिंगराव पवार, डॉ.रमेश जाधव,प्रा.अरुण भोसले,तत्कालीन इतिहास विभाग प्रमुख तसेच शिवाजी विद्यापीठाचे प्रा.राजा दिक्षीत,तत्कालीन इतिहास प्रमुख, पुणे विद्यापीठाचे श्री.य.दी.फडके तसेच श्री. विश्वास पाटील यांची समिती शासनाने सन 2005 मध्ये नियुक्त केली होती. सदर समितीने सखोल संशोधन करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधनकार श्री.ठाकरे यांनी छत्रपती शाहू महाराजांनी लिहिलेल्या अभिष्टचितन पत्राचा व त्यातील तारखांचा अभ्यास करुन तसेच तत्कालीन पुराभिलेखामध्ये संशोधन करुन छत्रपती शाहू महाराजांची जन्म दिनांक 26 जून, 1874 असल्याचा अहवाल शासनाला दिला गेला. सदर अहवालान्वये 27 मार्च, 2006 रोजी सामाजिक न्याय विभागाने शासन निर्णय निर्गमित करुन छत्रपती शाहू महाराजांची जन्मतारीख 26 जून,1874 असल्याचे घोषित केले होते. त्यानुसार 28 एप्रिल, 2006 च्या शासन निर्णयानुसार 26 जून हा दिवस प्रतिवर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली. तथापि सामाजिक न्याय विभागाच्या 30 नोव्हेंबर, 2015 रोजीच्या परिपत्रकान्वये अचानक कोणतीही कारणमिमांसा न देता शासनाने छत्रपती शाहू महाराजांची जन्मतारीख बदलून ती 26 जुलै अशी निर्धारित केली आहे. महापुरुषांच्या जन्मतारखेमध्ये सुध्दा या सरकारला वाद निर्माण करावयाचा आहे काय, आणि तोही छत्रपती शाहू महाराजांच्या जन्मतारखेच्या बाबतीत ? 2006 मध्ये समितीने छत्रपती शाहू महाराजांची जन्मतारीख 26 जून ही तारीख निश्चित केली असताना आता मात्र शासन निर्णय काढून नोव्हेंबर महिन्यात छत्रपती शाहू महाराजांची जन्मतारीख 26 जुलै करण्यात आली असून त्याचे शासन परिपत्रक मी आपल्याकडे सादर करतो. हे सरकार महापुरुषांची तारखा बदलण्यासाठी सत्तेमध्ये आले आहे काय ? छत्रपती शाहू महाराजांची जन्मतारीख बदलण्याचे कारण काय आहे ? सन 2005 साली जन्मदिन ठरविण्यासाठी जी समिती

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

नियुक्त केली होती व त्या समितीने छत्रपती शाहू महाराजांचा जन्मदिन 26 जून,1874 असल्याची निष्कर्ष काढला असेल व हे सरकार अशा पध्दतीने थोर पुरुषांच्या जन्मतारखा बदलवत असेल तर या महापुरुषांचा अपमान आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या राज्याचे माजी मुख्यमंत्री आदरणीय मारोतराव कन्नमवार साहेबांच्या स्मारकासाठी 3 कोटी रुपयांची पुरक मागणी सादर केली आहे. आम्ही या गोष्टीचे स्वागत करतो. विदर्भाच्या विकासात आदरणीय कन्नमवार साहेबांचे योगदान लक्षात घेऊन त्यांचे भव्यदिव्य प्रेरणादायी स्मारक उभे रहावे ही विदर्भातीलच नव्हेतर महाराष्ट्रातील कोणत्याही नेत्याची त्या पदावर गेल्यानंतर इच्छा असू शकते व ती इच्छा पूर्ण होऊ शकते त्यामुळे याबाबतीत आम्ही स्वागत करतो. एकीकडे राष्ट्रपुरुषांची स्मारके ही समाजासाठी मार्गदर्शक, प्रेरणादायी असतात,स्मृती जपण्याबरोबरच राष्ट्रपुरुषांचे विचार व कार्य समाजात पोहचण्याचे काम या स्मारकांच्या माध्यमातून होत असते. त्यामुळे स्मारकाची उभारणी हा राजकारणाचा मुद्दा न बनता स्वच्छ भावनेने याकडे पाहिले पाहिजे, ती भावना याबाबतीत सन्माननीय वित्तंत्र्यांची दिसून येत असल्यामुळे आम्ही त्यांचे स्वागत करतो.

सभापती महोदय, दुसरीकडे परमपुजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भातील भुमीपुजन कार्यक्रम हा मात्र पक्षीय सोहळा झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भात ज्यांची श्रध्दा आहे त्या प्रत्येकाच्या मनात तशा प्रकारची भावना निर्माण झाली असेल. परमपुजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारक सोहळयाच्या कार्यक्रमामध्ये एका पक्षाच्या विचारधारेत बांधणे बरोबर नाही ही माझ्या मनातील खंत मी सभागृहापुढे मांडली आहे.

सभापती महोदय, शिवसेना प्रमुख हिंदू हृदयसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे मुंबईत भव्यदिव्य स्मारक व्हावे अशी संबंध महाराष्ट्राची आणि सपूर्ण मराठी माणसांची इच्छा आहे. शासनाने 18 नोव्हेंबर, 2015 रोजी मुंबईत दादर भागातील महापौरांच्या बंगल्यामध्ये शिवसेना प्रमुखांचे भव्य स्मारक करण्याचा निर्णय घेतला. मला यासंदर्भात सरकारला एवढेच विचारावयाचे आहे की, खरच सरकारची भावना हिंदू हृदय सम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याचे आहे काय ? शासकीय निवासस्थानी नेत्यांची स्मारके उभारण्यास जुलै, 2013 मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली असताना आणि त्या पार्श्वभूमिवर केंद्रसरकारने जुलै, 2014

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

मध्ये आदेशही निर्गमित केलेले असताना याची माहिती भाजपाच्या सरकारला नव्हती की, माहिती असताना फक्त राजकारण करावयाचे म्हणून करावयाचे त्यामुळे याबाबतीतील खुलासा सरकारकडून होणे आवश्यक आहे. जर या निमित्ताने फक्त सरकारने हिंदू हृदयसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाची घोषणा केली. घोषणा करावयाची व अडकवून ठेवायचे आणि उद्या सांगावयाचे की, केंद्र सरकारकडून आदेश आहेत, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत त्यामुळे स्मारक करता येत नाही, खरे म्हणजे हा हिंदू हृदयसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा अवमान नाही काय ? खरे म्हणजे हा आपल्या नेत्याचा अवमान आहे. मुंबईतील महापौरांचा बंगला ही एक हेरिटेज इमारत आहे. कदाचित हेरिटेज इमारतीच्या बाहेरील भागात काही करणारही नसाल परंतु मा.सर्वौच्च न्यायालयाने आणि केंद्र सरकारने जारी केलेल्या निर्देशानुसार शासकीय निवासस्थानी नेत्यांची स्मारके न करण्याचा निर्णय असताना सुध्दा या सरकारने अशा प्रकारचा निर्णय का घेतला याचेही स्पष्टीकरण या निमित्ताने होणे आवश्यक आहे.

OO-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय,लोकनेते स्व. गोपीनाथजी मुंडे यांचे स्मारक औरंगाबाद येथे करण्याचा निर्णय सरकारने घेतला. ज्यांच्या संघर्षामुळे आज राज्यात सत्ता आली. भारतीय जनता पक्षाला चांगले दिवस आले. ते स्व.गोपीनाथजी मुंडे यांचे स्मारक उभारण्याची घोषणा होऊन एक वर्ष झाली. हे स्मारक उभारण्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली याची काहीच माहिती सरकारने दिलेली नाही. हा या नेत्याचा अपमान नाही काय ? सरकारने ज्या घोषणा केल्या त्याचा मी उल्लेख करीत आहे. मी वैयक्तिक सांगत नाही. हा कोणाचा वैयक्तिक विषय नाही. सरकारला आपल्या घोषणाचा विसर पडलेला दिसतो.

सभापती महोदय, मुंबईतील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याबाबत सरकारने पुढे काय केले ? या संदर्भात केंद्र सरकारकडून आवश्यक त्या परवानगी घेतल्या जात आहेत असे सांगण्यात येते. या कामाच्या संदर्भात दोनवेळा निविदा काढण्यात आल्या. त्या निविदांचे पुढे काय झाले याची राज्यातील जनतेला काहीच माहिती नाही. मार्च 2015 च्या अधिवेशनात मी हा विषय उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित होते. मी त्यांच्याजवळ तक्रार मांडली होती की, या विषयाच्या संदर्भात आम्ही माहितीच्या अधिकारात सरकारजवळ मागणी करीत आहोत. या कामाच्या संदर्भात केंद्र सरकारकडून किती परवानगी मिळाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्या संदर्भातील काम कोठपर्यंत आले, किती दिवसात हे स्मारक उभारणार आहात, या कामासाठी आर्किटेक्ट नेमण्यात आला आहे काय या प्रश्नांच्या संदर्भातील माहिती मिळत नसल्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले होते की, या संदर्भात विरोधी पक्ष नेत्यांच्या कार्यालयाला जी काही माहिती पाहिजे असेल ती माहिती देण्यात यावी. परंतु आतापर्यंत या संदर्भातील माहिती मिळालेली नाही. ही माहिती लपविण्याचे कारण काय आहे ? छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्या संदर्भातील पूर्व माहिती सरकार का लपवित आहे ? कदाचित सरकारचा चांगला हेतू असेल, परंतु माहिती लपवित असल्यामुळे आमच्या आणि जनतेच्या मनात संशय निर्माण होतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

सभ्‌ापती महोदय, कै.आर.आर.पाटील यांनी राज्याचे गृहमंत्री म्हणून कणखरपणे काम केलेले आहे. त्यांनी ग्रामीण विकास विभागाचे मंत्री म्हणून देखील चांगले काम केलेले आहे. ग्राम स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून त्यांनी एक लोक चळवळ उभी केली. तंटामुक्त गाव अभियान राबविण्याचे एक ऐतिहासिक पाऊल त्यांनी उचलले. त्याचबरोबर ऐतिहासिक डान्सबार बंदी करुन लाखो कुटुंब वाचविण्याचे काम त्यांनी केले. आपण महान पुरुषांचे आणि महान नेत्यांचे स्मारक करणार असाल आणि ते स्मारक आपल्या सर्वांसाठी आणि पुढच्या पिढीसाठी प्रेरणा देणारे ठरणार असतील तर स्व.आर.आर.पाटील यांचे सार्वजनिक जीवनातील काम लक्षात घेऊन त्यांचे देखील स्मारक उभारण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

सभ्‌ापती महोदय, बाब क्रमांक 25, पृष्ठ क्रमांक 19 - परिवहन विभाग - रेल्वे प्रकल्पामध्ये राज्य शासनाच्या सहभागासाठी 20 कोटी 58 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. राज्यातील परळी-बीड-नगर मार्गासह चार मार्गांचा 50 टक्के खर्च करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. हा निर्णय आज झालेला नाही. तत्कालीन मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांनी त्यावेळी निर्णय घेतला होता. राज्यातील महत्वाचा आणि बहुप्रतिक्षित परळी-बीड-नगर मार्गासाठी 50 टक्के खर्च करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असताना या कामासाठी केंद्र सरकारकडून 125 कोटी रुपये आले. परंतु या रकमेची मॅचिंग ग्रांटची तरतूद राज्य सरकारकडून होत नाही. अशा परिस्थित्‌ीत परळी-बीड-नगर रेल्वेचे कै.गोपीनाथजी मुंडे यांचे स्वप्न कसे पूर्ण होणार ? राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिनांक 12 डिसेंबर रोजी हे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प घेतला. कै.गोपीनाथजी मुंडे यांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाकडे पैसे नाहीत. त्यांच्या स्वप्नातील रेल्वे सुरु करण्यासाठी पैसे नाहीत. या संदर्भात वित्त मंत्री महोदयांनी रेल्वेच्या प्रकल्पासंदर्भातील मॅचिंग ग्रांटची तरतूद केली तर तो प्रकल्प पूर्ण होऊ शकतो.

सभापती महोदय, महसूल व वन विभाग, बाब क्रमांक-41, पृष्ठ क्रमांक 36- कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी करावयाच्या प्रयोगावरील खर्च भागविण्यासाठी 27 कोटी रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. दुष्काळात होरपळणाऱ्या जनतेला 27 कोटी रुपयांच्या कृत्रिम पावसाचा खरोखर किती फायदा झाला हे या ठिकाण्‌ी स्पष्ट होणे आवश्यक आहे. 27 कोटी रुपयांमध्ये किती टीएमसी पाऊस पडला याची माहिती सभागृहाला होणे आवश्यक आहे. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, कृषी व पदुम विभाग बाब क्रमांक 59, पृष्ठ क्रमांक 55 - पीक विमा निधी दाव्यापोटी देण्यात येणारी नुकसान भरपाईसाठी 92 कोटी 94 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. हे सरकार गतिमान प्रशासनाची जाहिरात करु शकते. मात्र हे सरकार नक्कीच गतिमान नाही हे या मुद्यावरून स्पष्ट होते. रब्बी हंगाम 2014 च्या पीक विम्याच्या राज्याच्या हिश्श्या पोटी 93 कोटी 94 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. विमा कंपनीने ऑक्टोबर, 2015 च्या पहिल्या आठवड्यात रब्बी हंगामाचा विमा मंजूर केला व राज्य शासनाकडे त्यांच्या हिश्श्याची रक्कम मागितली. सरकारने त्याचवेळी ही रक्कम दिली असती तर कदाचित राज्यातील शेतकऱ्यांना दिवाळीच्या तोंडावर विम्याचे पैसे मिळून त्यांना दिवाळी गोड साजरी करता आली असती. राज्याच्या हिश्श्यामध्ये शेतकऱ्यांनी स्वत:चा हिस्सा देखील भरलेला आहे. राज्य सरकार आपला हिस्सा देत नसल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत नसेल तर आजच्या या गंभीर परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांची जी अवस्था झालेली आहे त्याला कोण जबाबदार आहे ? आम्ही कालपासून सभागृहात चर्चा करीत असताना सरकारकडे बोट दाखवीत आहे, याला सरकार जबाबदार नाही काय, याचे स्पष्टीकरण व्हावे. सरकारने पीक विम्याच्या पैशामध्ये मॅचिंग अमाऊन्ट दिली नसल्यामुळे शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे मिळत नाही. शेतकऱ्यांच्या या अवस्थेला हे सरकार जबाबदार आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बाब क्रमांक 202, पृष्ठ क्रमांक 180 - विमुक्त व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परीक्षा फी प्रदान करण्यासाठी 102 कोटी 64 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री.रमेश बनसोड यांना नुकतीच अपंग व वित्त विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर नेमणूक दिल्याचे प्रकरण सध्या बरेच चर्चेमध्ये आहे. श्री.रमेश बनसोड यांची वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळावर झालेली नियुक्ती हीच नियमबाह्यरित्या आहे. महामंडळाच्या घटनेनुसार महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

नियुक्ती माननीय राज्यपालांच्या आदेशानुसार आणि आयएएस अधिकाऱ्याच्या दर्जाच्या व्यक्तीची असावी अशी तरतूद आहे. असे असताना महामंडळात एक कर्मचारी असणारे श्री.बनसोड यांची या महामंडळावर नियुक्ती कशी करण्यात आली असा प्रश्न या समाजातील माणसे आम्हाला विचारत आहेत. श्री.बनसोड यांची नियुक्ती करताना त्यांची शैक्षणिक पात्रता पाहिली नाही. त्यांचा अनुभव लक्षात घेण्यात आला नाही. श्री.बनसोड हे विविध पदावर काम करीत असताना त्यांनी करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी आहेत. त्यांनी जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या म्हणून त्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत. असे असताना कोणत्याही गोष्टीची शहानिशा न करता आणि सेवाज्येष्ठता यादीमध्ये 15 व्या क्रमांकावर असताना ती यादी डावलून त्यांना एम.डी.चे पद कसे देण्यात आले याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी श्री.बनसोड यांना विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विकास महामंडळाचे एम.डी.तर केलेच परंतु त्यांची अपंग व वित्त विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर देखील नियुक्ती केलेली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे.

.... PP-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

त्यांना अशा प्रकारे नियुक्ती देताना विभागाच्या प्रधान सचिवांनी श्री.बनसोड यांच्यावर दोन-दोन महामंडळांचा कारभार सोपवू नये असे स्पष्ट लेखी अभिप्राय फाईलवर नमूद केले होते. तरी सुध्दा प्रधान सचिवांचे अभिप्राय डावलून श्री.बनसोड यांची नियुक्ती करण्यात माननीय मंत्र्यांना काय रस होता, हे त्यांनी स्पष्ट केले पाहिजे. सभापती महोदय, या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याबाबत मी दिनांक 16 ऑक्टोबर, 2015 रोजी माननीय मंत्र्यांना पत्र दिले. परंतु माननीय मंत्र्यांनी त्या पत्राची साधी दखल सुध्दा घेतली नाही. पुरवणी मागण्यांवरील माझ्या भाषणाचा समारोप करताना मी मागणी करतो की, या संपूर्ण विषयाच्या संदर्भात माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, ही चर्चा किती वाजेपर्यंत सुरु राहणार आहे आणि माननीय मंत्र्यांच्या उत्तराला कधी सुरुवात होणार आहे ?

तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) : पुरवणी मागण्यांवरील चर्चा सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत सुरु राहणार आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सायंकाळी 7.00 वाजेनंतर उत्तराला सुरुवात होईल काय ? मला वाटते आपण उत्तराची वेळ निश्चित केली पाहिजे. वाटल्यास 7.30 वाजेपर्यंत चर्चा घ्यावी व त्यानंतर उत्तराला सुरुवात करावी.

तालिका सभापती : माननीय सभापतींनी सांगितले आहे की, सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत जेवढी चर्चा करता येईल तेवढी करावी. मला वाटते सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आणि मुद्देसूद विचार मांडले तर माननीय मंत्र्यांचे उत्तर सुध्दा वेळेत सुरु करता येईल.

आता काँग्रेस पक्षाच्या वतीने सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या बाब क्र.5 व पृष्ठ क्र.5 च्या अनुषंगाने विचार मांडले. या मागणीमध्ये राष्ट्रपुरुष आणि थोर नेत्यांची स्मारके आणि पुतळ्यांच्या बांधकामाचा समावेश आहे. त्यामुळे या मागणीच्या अनुषंगाने माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे वक्तव्य केले त्याची शासनाने दखल घ्यावी हे मला या निमित्ताने आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, विदर्भातील ज्येष्ठ नेते, राज्याचे दिवंगत मुख्यमंत्री मा.सा.कन्नमवार यांचे स्मारक उभे करण्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. कन्नमवार साहेबांचे स्मारक नागपूर, चंद्रपूर, मुंबई येथे किंवा नेमके कोणत्या ठिकाणी करावे या बाबत शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, अनेक वर्षापूर्वी अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु अर्थसंकल्पात किंवा पुरवणी मागण्यांमध्ये छत्रपती शिवरायांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. तसेच मुंबईचे व महाराष्ट्राचे थोर नेते बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा विषय सुध्दा प्रलंबित आहे. त्यामुळे या सर्व विषयांकडे सरकारने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारने इंदू मिलच्या जागेवर परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाचे भूमीपूजन केले. देशातील नव्हे जगातील तमाम जनतेला या गोष्टीचा मोठा आनंद झाला. परंतु भूमीपूजनाच्या कार्यक्रमात सर्वच पक्षाच्या लोकांना सहभागी करुन घेतले असते तर या आनंदात आणखीनच भर पडली असती, असे मला वाटते. परंतु तसे होऊ शकले नाही.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती केंद्र आणि राज्य सरकार साजरी करीत आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाने पुतळा आणि स्मारकांच्या बाबतीत ज्या गोष्टी करण्याचे ठरविले आहे त्या पूर्णत्वास नेल्या पाहिजेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) PP-4

SJB/ AKN/ ST/ 17:50

प्रा.जोगेंद्र कवाडे....

सभापती महोदय, नागपूरच्या बाजूला असलेल्या यशवंत स्टेडीयम जवळ पटवर्धन मैदान आहे. त्या ठिकाणी 1991 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला होता. नागपूर महानगरपालिकेने पटवर्धन मैदानावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला होता. या कामासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद सुध्दा केली होती. त्यावेळी राज्यामध्ये भारतीय जनता पक्ष किंवा शिवसेना पक्षाची सत्ता नव्हती. त्या कालखंडात माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी असतील, माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस असतील हे नागपूर महापालिकेमध्ये काम करीत होते. त्यावेळी आताचे सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले हे महापौर होते. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये सुध्दा त्यावेळी महापालिकेचे सदस्य होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शताब्दी वर्षानिमित्त नागपूर महापालिकेने पटवर्धन मैदानावर शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला होता. परंतु त्यासाठी केवळ महसूल विभागाची अडचण असल्यामुळे 1991 सालापासून तो प्रश्न प्रलंबित पडलेला आहे. सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले, सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो गाणार, भाई गिरकर, प्रकाश गजभिये आणि इतर अनेकांनी माननीय महसूल मंत्री आणि माननीय मुख्यमंत्र्यांना या बाबतचे निवेदन दिलेले आहे. आजच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने मी मागणी करतो की, महसूल विभागाची अडचण दूर करुन त्या मैदानावर शताब्दी भवन आणि संशोधन केंद्र विनाविलंब उभारण्यात यावे.

सभापती महोदय, नागपूरमध्ये जगात न भूतो न भविष्यती अशा प्रकारची रक्ताचा एकही थेंब न सांडविता, हातामध्ये शस्त्र न घेता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मक्रांती केली. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चार दिवस नागपूर येथील शाम हॉटेलमध्ये मुक्कामी राहिले होते. त्या ठिकाणी धम्मक्रांती स्मृती स्मारक व्हावे अशी आम्ही शासनाकडे वारंवार मागणी करीत आहोत.

सभापती महोदय, मुंबईत दादर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राजगृह नावाचे निवासस्थान आहे. सरकारचा इरादा आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान असलेले राजगृह हे राष्ट्रीय स्मारक करावे. या बाबत आम्ही वारंवार मागणी केली होती. सरकारने आमच्या मागणीबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. तसेच दुसरी गोष्ट अशी की, मुंबईतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्ही.टी. रेल्वे स्टेशनला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात आले आहे, कुर्ला येथील

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) PP-5

SJB/ AKN/ ST/ 17:50

प्रा.जोगेंद्र कवाडे....

टर्मिनलला लोकमान्य टिळकांचे नाव देण्यात आले आहे. आम्ही सुध्दा दादर रेल्वे स्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे म्हणून वारंवार मागणी करीत आहोत. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनी म्हणजेच 6 डिसेंबर रोजी लाखो लोक चैत्यभूमीवर दर्शनासाठी येतात. शिवाय दादर येथेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे निवासस्थान आहे. त्यामुळे दादर रेल्वे स्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याबाबत शासनाने गंभीरपणे विचार करावा. या ठिकाणी माननीय वित्त व नियोजन मंत्री बसलेले आहेत. मी ज्या बाबी सांगत आहेत त्यामध्ये ते नक्कीच लक्ष घालतील अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, बाब क्र.9 पृष्ठ क्र.7 ही मागणी माहिती, प्रसिध्दी आणि चित्रपटाबाबतची आहे. चित्रपटाच्या माध्यमातून, माहिती विभागाच्या माध्यमातून आपल्या राज्यातील थोर पुरुषांवर लघु चित्रपट तयार करुन ते सर्वसाधारण लोकांपर्यंत पोहचविले तर त्यांचे विचार आणि माहिती राज्यातील जनतेपर्यंत पोहचेल, असे वाटते.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक-91, पृष्ठ क्र.72 वर मी बोलत आहे.ही राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान योजनेबाबतची आहे. या योजनेमध्ये केंद्र सरकारचा 60 टक्के आणि राज्य सरकारचा 40 टक्के वाटा आहे. परंतु मला सांगताना अतिशय खेद होतो की, अपंग समावेशित शिक्षकांकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. हे शिक्षक अपंग विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करुन त्यांना समाजासमोर ताठ मानेने व सन्मानाने वावरण्याची संधी उपलब्ध करुन देत असतात. परंतु 2013 पासून राज्यातील अपंग समावेशित शिक्षकांचा 3 कोटी 60 लाख रुपये इतक्या रकमेचा पगार झालेला नाही. सभापती महोदय, सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार एक दिवस उशिरा झाला तर लगेच सगळीकडे बोंबाबोंब होते.

..2क्यू...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

सन 2013 पासून अजूनपर्यंत अपंग सर्वसमावेशित शिक्षकांना वेतन मिळालेले नाही, त्यांची अवस्था काय असेल ? त्यातील एका शिक्षकाने वर्ध्यामध्ये आत्महत्या केली अशी भयानक परिस्थिती आहे. माननीय अर्थमंत्र्यांना विनंती आहे की, त्याकरिता देखील योग्य प्रकारचा प्रयत्न करावा.

सभापती महोदय, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग - आपले राज्य फार भाग्यशाली राज्य आहे. देशात कोणत्याही राज्यात जेवढी कृषी विद्यापीठे नसतील तेवढी म्हणजे् 4 कृषी विद्यापीठे आपल्या राज्यात आहेत, मग ते रत्नागिरीचे बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ असेल, विदर्भातील अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ असेल, परभणीचे वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ असेल, राहुरीचे महत्मा ज्योतिबा फुले कृषी विद्यापीठ असेल. परंतु असे असतानाही राज्यातील आमच्या शेतकऱ्यांची जी अवस्था आहे, त्यावर काय उपाययोजना करता येतील, पिकांचा पॅटर्न बदलता येऊ शकतो का, पिके कशा पध्दतीने घेतली पाहिजेत, शेतकऱ्यांना प्रशिक्षणाची गरज आहे का ते पाहणे गरजेचे आहे. इतर राज्यात म्हणजे हरयाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश अशी मोठी राज्ये असून देखील तेथे एक कृषी विद्यापीठ आहे. आपल्याकडे 4 कृषी विद्यापीठे आहेत. आपण त्या दृष्टीने लक्ष दिले पाहिजे. बाब क्रमांक 69, पृष्ठ क्रमांक 58, 59 - पशु संवर्धन विभागामध्ये काही कर्मचारी अनेक वर्षांपासून पदोन्नतीसाठी पात्र आहेत, ज्याला कालबध्द पदोन्नती म्हटले जाते, अशा प्रकारचे 10 कर्मचारी 20 वर्षांपासून एकाच पदावर काम करत आहेत. ते असिस्टंट कमिशनरच्या पदोन्नतीसाठी पात्र आहेत. परंतु अद्यापपर्यंत या विभागाने, माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांच्या विभागाने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. माझी माननीय पशु संवर्धन विकास मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी याकडे लक्ष द्यावे. उप आयुक्तांच्या पदोन्नतीमध्ये कमाल अधिकारी मंडळी एससी, एसटी, ओबीसी, अल्पसंख्याकांची आहेत, त्यांची पदोन्नती करण्याकडे लक्ष द्यावे अशी विनती आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभाग, बाब क्रमांक 277, पृष्ठ क्रमांक 239 - शिक्षण फी, परीक्षा फी प्रदानासाठी 9 कोटी 62 लाख रुपयांची तरतूद केली आहे. फार बरे केले. वित्तीय वर्ष् सन 2015-16 करिता ही तरतूद आहे. अतिरिक्त निधी उपलब्ध करता यावा यासाठी तरतूद केली आहे. परंतु एका गोष्टीची काळजी घेतली पाहिजे की, ज्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

प्रकारची फी माफी, परीक्षा फी साठी तरतूद केली, त्यापासून आमचे आदिवासी विद्यार्थी वंचित राहता कामा नयेत, याची दक्षता घेतली पाहिजे. जर कोणी आमच्या विद्यार्थ्यांना वंचित ठेवण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी मी मागणी करतो. बाब क्रमांक 278, 279 मध्ये सरकारने लक्ष द्यावे अशी विनंती आहे. बाब क्रमांक 283, पृष्ठ क्रमांक 241 - मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृह यासाठी 13 कोटी 72 लाख रूपयांची पुरक मागणी करण्यात आली आहे, याचे मी समर्थन करतो. बाब क्रमांक 284, पृष्ठ क्रमांक 241 - अनुसूचित जनजाती विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमिक निवासी शाळांमध्ये शिकता यावे यासाठी 43 कोटी 66 लाख 78 हजार कोटी रूपयांची तरतूद केली आहे, त्याचे मी समर्थन करतो, त्याचा योग्य वापर करून आदिवासी विद्यार्थ्यांना देखील इंग्रजी शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न शासनाने करावा अशी मी मागणी करतो. सभापती महोदय, बाब क्रमांक 287, पृष्ठ क्रमांक 288 - गडचिरोली जिल्ह्यामध्ये आदिवासी बांबू प्रक्रिया सहकारी संस्थांच्या माध्यमातून काम केले जात असते. बांबूचा व्यवसाय करणाऱ्या आदिवासी संस्था आहेत, त्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज देण्याची व्यवस्था करण्यासाठी केलेली तरतूद फक्त 70 लाख रूपयांची असून ती अपूर्ण आहे, त्यामध्ये वाढ केली तर जास्तीत जास्त आदिवासी लोकांना या व्यवसायामध्ये काम मिळू शकते.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभाग - पृष्ठ क्रमांक 263, बाब क्रमांक 317 "बेटी बचाओ, बेटी पढाओ" हा कार्यक्रम टीव्हीवर केलेला आम्ही पाहिला, या सुंदर कार्यक्रमासाठी आपले अभिनंदन करतो. सरकारचे अभिनंदन करतो. शंभर टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे आणि त्यासाठी राज्य शासनाने 2 कोटी 40 लाख 73 हजार रूपयांची तरतूद केली आहे. ही योजना अत्यंत समर्पकपणे, समर्थपणे, प्रभावीरित्या राबवावी अशी विनंती करतो. पोषण आहारामध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजना, विशेष पोषण आहारामध्ये 113 कोटी 39 लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. फक्त नागपूर जिल्हा सोडला तर सर्व ठिकाणी टीएचआर योजना सुरू आहे. टीएचआर म्हणजे दुपारचा पोषण आहार योजना सुरू केली आहे. आपण पत्र देऊन देखील नागरपूरच्या अधिकाऱ्यांनी अद्यापपर्यंत पात्र संस्थांना परवानगी दिली नाही. त्यांनी 50, 60, 70

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

लाख रूपये बँकांकडून कर्ज घेऊन मंजुरी मिळाल्यामुळे कारखाने उभे केले. मात्र अद्याप ते सुरू केले नाहीत. माझी विनंती आहे की, आपण याकडे लक्ष द्यावे. नागपूरमध्ये टीएचआर पात्र संस्थांना संधी देण्याचा प्रयत्न सुरूकरावा.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग - बाब क्रमांक 198, पृष्ठ क्रमांक 179 डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन यासाठी अतिरिक्त तरतूद 15 कोटी 70 लाख 80 हजार रूपयांची असून ती फर्निचर व इतर सामुग्रीसाठी केली आहे, त्याचे मी समर्थन करतो. बाब क्रमांक 199, पृष्ठ क्रमांक 179 - मुलामुलींच्या वसतिगृहांसाठी, कर्मचाऱ्यांच्या मानधनासाठी, इमारतीचे भाडे देण्यासाठी, विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्यासाठी 64 कोटी 27 लाख 11 हजार रूपयांची तरतूद केली आहे, त्याचे मी अभिनंदन करतो. परंतु शासकीय वसतिगृहे उत्कृष्ठपणे आहेत की नाहीत, मुलामुलींच्या वसतिगृहात उत्कृष्ठ पध्दतीच्या सेवा आहेत का, सुरक्षेची, खाण्याची, अभ्यासाची, राहण्याची, बाथरूमची, टॉयलेटची सर्व व्यवस्था आहे की नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, 7 तारखेला मुंबईतील कांदिवली पूर्व येथील दामुनगर नावाच्या झोपडपट्टीत आग लागली. अपघात होता की घातपात होता हे समजण्यास मार्ग नाही. आम्ही माननीय मुख्यमंत्री साहेबांनी तपास करण्याची विनंती केली आहे. तेथे पाहिजे त्या प्रमाणात मदत मिळाली नाही. युध्द पातळीवर मदत मिळाली नाही. चेन्नईमध्ये महापूर आला. आपण येथून मदत पाठविली, पण आपल्या घराजवळ आग लागली तेथे मात्र मदत करण्यासाठी आपण कोतेपणा दाखवितो ही बाब बरोबर नाही, त्याकडे लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग - बाब क्रमांक 190, पृष्ठ क्रमांक 167 यामध्ये यात्रा स्थळांचा विकास हा भाग आहे. नागपूरमध्ये मधल्या काळात मोठे वादंग निर्माण झाले होते. नागपूर जिल्ह्याचे माननीय पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली डीपीडीसी बैठक झाली. तेव्हा एक मुद्दा लक्षात आला की, जगप्रसिध्द नागपूर येथील क्रांतिकारी दिक्षाभूमीला तीर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा देण्यात आला. संपूर्ण नागपूरमध्ये संतापाची लाट उसळली आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

मागणी करण्यात आली. आम्ही तर मागितले नव्हते, कोणता दर्जा द्यावी ही मागणी कोणीही केली नव्हती, परस्पर मागणी केली आणि तीर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा दिला. ही अत्यंत अपमानास्पद बाब आहे. त्यामुळे डीपीडीसीने राज्य सरकारला, केंद्र सरकारला पाठविण्यासाठी एकमताने ठराव केला.

....2R

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

केंद्र सरकारला राज्य सरकारने प्रस्ताव पाठवावा आणि नागपूर येथील दिक्षाभुमीला "अ" दर्जा देण्यात यावा, अशी विनंती आम्ही या माध्यमातून करीत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या भाषणात उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संदर्भात महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. बाब क्रमांक 314, पृष्ठ क्रमांक 259 अंतर्गत थोर राष्ट्रीय व्यक्तींच्या साहित्याच्या प्रकाशनासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ प्रकाशन समितीची स्थापना झाली होती. अण्णाभाऊ साठे चरित्र ग्रंथ प्रकाशन समितीचीही स्थापना झाली. अण्णाभाऊ साठे चरित्र ग्रंथ प्रकाशन समितीची दिनांक 16 जून, 2014 रोजी स्थापना झाली आणि या समितीच्या प्रशासकीय खर्चासाठी 123 लक्ष 20 हजार रुपयांची तरतूद केली आहे. त्याचे मी स्वागत करतो. अनेक वर्षांपूर्वी महाराष्ट्र सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ प्रकाशन समितीची स्थापना केली आहे. या विभागाचे माननीय मंत्री श्री.विनोदजी तावडे सभागृहात उपस्थित असते तर बरे झाले असते. महात्मा ज्योतिबा फुले चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती देखील या राज्य सरकारने निर्माण केली. त्यानंतर राजर्षी शाहु महाराज चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती गठीत केली. सुरुवातीला प्रत्येक समिती वेगवेगळे काम करीत होती. त्यानंतर काही दिवस या समित्यांचे कामकाज एकत्रितपणे चालत होते. पुन्हा ते वेगवेगळे करण्यात आले. मला आश्चर्य वाटते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती शासनाने निर्माण केली असली तरी ती सध्या अस्तित्वात आहे का ? हे सरकार येऊन एक वर्षाचा कालावधी झाला आहे. परंतु, अद्याप एकदाही या समितीची बैठक झालेली नाही. या संदर्भात संपूर्ण राज्यभर नाराजीची भावना आहे. वर्तमानपत्रातून वारंवार बातम्या छापून येत आहेत. आपण इंदू मिल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या स्मारकाचे भूमीपुजन केले, लंडन येथील बाबासाहेबांचे वास्तव्य असलेले घर विकत घेण्यासाठी करार केला पण त्याच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र, त्यांची ग्रंथसंपदा जगापुढे आली पाहिजे, सर्व साहित्य जनतेपुढे आले पाहिजे, केवळ दलितच नाही तर देशाला कळले पाहिजे, यासाठी चरित्र

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

ग्रंथ प्रकाशन समितीच्या माध्यमातून ग्रंथ प्रकाशनाचे काम ताबडतोब सुरु करावे, अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे. यासाठी शासनाने कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही, ही देखील एक दु:खाची आणि खेदाची बाब आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती, महात्मा ज्योतिबा फुले चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती, छत्रपती शाहु महाराज चरित्र ग्रंथ प्रकाशन समिती या समित्यांची अवस्था आज वेठबिगारांसारखी झालेली आहे. माझी अर्थ मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी याकडे लक्ष द्यावे. तसेच, शिक्षण मंत्री महोदयांनाही विनंती आहे की, त्यांनीही याकडे लक्ष द्यावे आणि हे काम ताबडतोब सुरु करावे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. या विभागाच्या बाब क्रमांक 261, पृष्ठ क्रमांक 221 च्या माध्यमातून क्षयरोगग्रस्तांच्या आरोग्यधामासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. दिवसेंदिवस राज्यातील क्षयरोगाचे प्रमाण वाढत चालले आहे. क्षयरोगग्रस्तांना या रोगापासून मुक्ती देण्यासाठी आरोग्यधामाची संकल्पना शासनाने मांडली आहे. पूर्वी हा रोग नियंत्रणात होता. अलीकडे विविध कारणांमुळे या रोगाचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आरोग्यधामासाठी शासनाने 39 लक्ष 73 हजार एवढी केलेली तरतूद अतिशय कमी आहे. या रकमेत वाढ झाली पाहिजे आणि जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे या रोगावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशी विनंती मी करतो.

सभापती महोदय, मला आणखी काही मुद्दे मांडावयाचे होते. तथापि, वेळेची मर्यादा लक्षात घेऊन मी माझे भाषण पूर्ण करीत आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

जय भीम, जय विदर्भ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) RR-3

SRR/ AKN/ ST/ 18:10

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शासनाने एकूण 16094 कोटी रुपयांच्या मागण्या सादर केल्या आहेत. राज्य सरकारचे वार्षिक अंदाजपत्रक 2 लाख 43 हजार 26 कोटी रुपयांचे आहे. त्यामध्ये 5300 कोटी रुपये दुष्काळ निवारणासाठी असल्याचे माननीय अर्थ राज्यमंत्री श्री.दीपक केसरकर यांनी पत्रकार परिषदेत पुरवणी मागण्या सभागृहाकडून मंजूर होण्यापूर्वीच जाहीर करुन टाकले आहे. (अडथळा...) सन्माननीय श्री.दिवाकर रावतेजी आपण सकाळी सभागृहात उपस्थित नव्हता. शासनामध्ये गेल्यानंतर तुमची भूमिका बदलली आहे. मी सकाळी आपली वाट बघत होतो. मी सकाळी दुष्काळाच्या चर्चेत बोलत होतो. पण आपण आला नाही. मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य आणि परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते यांना बजेटमध्ये पैसे दिले नाहीत आणि या 16 हजार कोटी रुपयांच्या मागण्यांमध्ये त्यांच्या विभागाला फक्त 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याच मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य आणि माननीय उद्योग मंत्री श्री.सुभाष देसाई यांच्या विभागासाठी 11 कोटी रुपये, सन्माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत यांच्या विभागासाठी 356 कोटी रुपये एवढीच तरतूद करण्यात आलेली आहे. हा एक प्रकारचा भेदभाव आहे.

श्री.प्रकाश महेता : आम्ही रायगडच्या बाबतीत भेदभाव केला आहे का ? आपण सांगितले तसे केले आहे ना ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 16 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांमध्ये शिवसेनेच्या मंत्र्यांच्या विभागांसाठी केवळ 467 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. हा किती अपमान आहे ? मागील अर्थसंकल्पाच्या वेळी देखील मी ही बाब निदर्शनास आणून दिली होती. त्यावेळी आपण असे सांगितले होते की, पुढील वेळी यामध्ये सुधारणा होईल, आपण काळजी करु नका.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) RR-4

SRR/ AKN/ ST/ 18:10

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, मी आठ ते दहा मागण्यांवर बोलणार आहे. या राज्यामध्ये एकूण 17 लाख 92 हजार शासकीय कर्मचारी आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या अनुदानित आणि शासकीय शाळा, महाविद्यालयांचे कर्मचारी 7 लाख 73 हजार 131 आहेत. शिक्षकांच्या वेतनावर आपण 27334 कोटी रुपये खर्च करीत असतो. गृह विभागाच्या पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी यांची संख्या 2 लाख 28 हजार 650 एवढी असून त्यांच्य वेतनावर 10 हजार कोटी रुपये खर्च करीत असतो. आता सातवा वेतन आयोग येऊ घातला आहे. त्याबाबत या सभागृहात चर्चा झाली पाहिजे. या ठिकाणी अर्थ मंत्री महोदय उपस्थित असावयास हवे होते. वेतन आयोग मंजूर होण्यापूर्वीच मी शासनाला याबाबतची जाणीव करून देत आहे. राज्य शासनावर एकूण 16 हजार कोटी रुपयांचा भूर्दंड या माध्यमातून पडणार आहे. आज शेतकऱ्यांना देण्यासाठी शासनाकडे पैसा नाही, दुष्काळग्रस्त, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंबीय, पाणी पुरवठा यासाठी शासनाकडे पैसा नाही. मी सन्माननीय पाणी पुरवठा मंत्री श्री.बबनराव लोणीकर यांच्याकडे गेलो होतो. ते असे म्हणाले की, पैसे नाहीत. केंद्र सरकारने सर्व योजना बंद केल्या आहेत. या बाबतची गंभीर दखल शासनाला घ्यावी लागणार आही. भविष्यात कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी देखील शासनाला कर्ज काढावे लागणार आहे. आपण या विषयावर निर्भिडपणे बोलले पाहिजे. महाराष्ट्र राज्याच्या 12 कोटी लोकसंख्येपैकी 17 लाख लोकसंख्येवर राज्य शासन एकूण बजेटच्या 85 टक्के रक्कम खर्च करीत आहे. आजच्या चर्चेत शासनाने याबाबतचा खुलासा केला पाहिजे. आपण सातव्या वेतन आयोगाचे काय करणार आहोत, हे पैसे देत असताना आमच्या शेतकऱ्यांना आपण काय देणार आहात, हे आम्हाला शासनाने या चर्चेच्या निमित्ताने सांगितले पाहिजे, अशी मागणी मी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / परीक्षेसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

मी या मागणीद्वारे शासनाला जाणीव करून देऊ इच्छितो की, आपण कशा प्रकारे बजेट प्रमाणे कामे करणार आहोत आणि आता आपली कर्ज काढण्याची मर्यादा देखील संपत आलेली आहे. माननीय वित्तमंत्री आणि आम्ही ज्यावेळी खाजगीमध्ये चर्चा करतो त्यावेळी माननीय वित्तमंत्री सांगतात की, आता आपल्याला कर्ज देखील काढता येणार नाही. आपली कर्ज काढण्याची मर्यादा आता संपत आलेली आहे. हे राज्य कसे चालवायचे हा मोठा प्रश्न आहे.

सभापती महोदय, बाब क्र.4, पृष्ठ क्र.5- दिल्ली, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि तेलंगणा राज्यात ज्येष्ठ नागरीकांना 1 हजार रूपये पेन्शन दिले जाते. महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरीक महासंघाने राज्य शासनाकडे मागणी केलेली आहे की, आम्हाला 60 वर्षानंतर किमान 2 हजार रूपये पेन्शन दिले गेले पाहिजे. शासनाने याचा विचार करावा, अशी मागणी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्र.14, पृष्ठ क्र.15, गृह विभाग- कै.गोविंद पानसरे यांच्या खुनाचा तपास लागला. या प्रकरणाचा तपास ज्या गतीने चालला त्यामध्ये सनातन संघटनेचे सर्व कार्यकर्ते आणि सनातनचे साधक यांचे सर्व पुरावे मिळाले आहेत. राज्य शासनाने या प्रकरणी कालच चार्जशिट दाखल केली आहे. पोलीस अधीक्षक डॉ.मनोज कुमार यांनी या प्रकरणाचा गतीने तपास केला. ते दबावाला बळी पडले नाहीत. या प्रकरणी तपास होणारच नाही असे चित्र महाराष्ट्रात असताना एक कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक या प्रकरणी काम करीत असताना तपास पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची आज बदली करण्यात आली आहे, ही गंभीर बाब आहे. डॉ.दाभोळकर यांच्या खुनाचा अद्याप तपास लागलेला नाही. कर्नाटकचे कलबुर्गी यांच्या प्रकरणाचा देखील अद्याप तपास लागलेला नाही. त्याचे धागेदोरे देखील सांगलीमध्ये आहेत आणि त्यामध्ये तुम्ही देखील समाविष्ट आहात, असे पोलीस यंत्रणा सांगत आहे. माननीय श्री.प्रकाश महेता साहेब, गतीने तपास होत असताना त्या पोलीस अधीक्षकांची बदली करणे बरोबर नाही, असे आम्हाला वाटते. (...अडथळा...) या प्रकरणाचा तपास लागला पाहिजे. जो अधिकारी तपास करतो त्या अधिकाऱ्याची अशा प्रकारे बदली करणे म्हणजे संशयास्पद आहे. तिकडे गेल्यानंतर तुमचा विचार बदलला काय ? राज्य शासनाने याची

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

दखल घेतली पाहिजे. आम्हाला याचा खेद वाटतो. मी कोणावर आरोप करीत नाही. कोणत्या अधिकाऱ्याची कोठे बदली करावी, कोणत्या अधिकाऱ्याला कोठे ठेवावे, हा शासनाचा अधिकार आहे. त्यांची बदली होणार अशी चर्चा सुरु असताना मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, या प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत आम्ही त्यांची बदली करणार नाही. परंतु, त्यांची बदली करण्यात आली याचा मला खेद वाटतो. अशा प्रकारे कामकाज होत असेल तर ते बरोबर नाही.

सभापती महोदय, बाब क्र.30, पृष्ठ क्र.31, महसूल विभाग- रायगड जिल्ह्यात जमिनीचे भाव गगनाला भिडलेले आहेत. अलिबाग तालुक्यात जमिनीचे भाव जास्त आहेत. माननीय पालकमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मोठ्मोठ्या दलिवांना सरकारी जागा विकण्याचा घाट चालला आहे. अलिबाग तालुक्यातील परुर आणि आवास ही गावे समुद्र किनारी आहेत. त्या ठिकाणी एका गुंठ्याला 1 कोटी रुपये भाव आहे. ती सरकारी जागा ग्रामपंचायतीने, गावातील पंचांनी विकली आणि त्यांनी 75 लाख रुपये स्वतःच्या खात्यात जमा केले. तेथे करोडो रुपयांचे बंगले बांधण्यात आलेले आहेत. आजच सभागृहात सांगण्यात आले की, गुरुचरणाची जागा विकता येणार नाही. मी माननीय पालकमंत्र्यांना देखील सांगू इच्छितो की, (...अडथळा....) मी शासनाकडे मागणी करतो की, तेथील सर्व व्यवहारांची उच्च पातळीवर चौकशी झाली पाहिजे आणि ज्या जमिनी विकलेल्या आहेत त्या संदर्भात तातडीने कारवाई झाली पाहिजे. सरकारी जागा विकण्याचा कोणालाही अधिकार नाही, कोणत्याही संस्थेला तो अधिकार नाही. त्या जमिनी गावातील पंचांच्या नावावर आहेत. शासनाने 40 वर्षापासून म्हणजे ब्रिटीश काळापासून ते पंच नियुक्त केलेले आहेत आणि आता तेथे राजरोसपणे जो व्यवहार सुरु आहे तो थांबविला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्र.30, पृष्ठ क्र.31, महसूल व वन विभाग- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी मोठ्या प्रमाणावर वन जमीन घेण्यात आली आहे. वन कायद्यानुसार वन जमिनीच्या बदल्यात वन विभागाला पर्यायी जमीन द्यावी लागते. त्यासासाठी शासन अलिबाग तालुक्यातील अष्टागारातील चौल येथील चांगल्या गुरुचरणाच्या लगतची जागा देऊ पहात आहे. रायगड जिल्ह्यात आपल्याला चिकार पर्यायी जागा उपलब्ध आहे. मी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले आणि सांगितले की,

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

हे बरोबर नाही. त्यांनी सांगितले की, शासनाचा आदेश येईल. मग आम्ही कोण आहोत ? शासनाच्या वतीने मंत्री महोदय काम करतात. मग आमदार म्हणून आम्ही कोण आहोत ? शासकीय अधिकारी ज्या पद्धतीचे उत्तर देतात ते बरोबर नाही. आम्ही सांगतो की, अशा पद्धतीचे काम होत आहे आणि ते चुकीचे आहे. डोंगरामध्ये हजारो एकर जागा पडलेली आहे. तुम्हाला रेकॉर्डवर पर्यायी जागा द्यावयाची आहे. परंतु, तुम्ही ती अलिबाग तालक्यातच देत आहात. तुम्ही इतर जिल्ह्यात जागा द्यावी. तुम्ही कोठेही जागा देऊ शकता. सभापती महोदय, अधिकाऱ्यांची ही भाषा बदलली पाहिजे. माननीय श्री.प्रकाश महेता साहेब, माझ्या विचाराला तुमची संमती असेल. अधिकारी जर असे बोलत असतील तर ते बरोबर नाही. आम्ही अलिबाग तालुक्यातील दोन आमदार आहोत. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आहेत, पंचायत समितीचे सभापती आहेत, तेथील ग्रामपंचायतीचे सरपंच आहेत. मग लोक प्रतिनिधींना विचारावयाचे नाही काय ? तुम्ही लोक प्रतिनिधींना विचारणार नाही काय ? कोणत्याही पक्षाचा आमदार असला तरी लोक प्रतिनिधींना विश्वासात घेऊनच पर्यायी जागा घेतली पाहिजे आणि या संदर्भात कायदा करण्याची गरज आहे. मी या निमित्ताने मागणी करतो की, हजारो कोटी रुपये किंमतीची जागा मुद्दाम वाया घालवायची आणि या पद्धतीचे काम करावयाचे ही चुकीची पद्धत आहे. लोकशाही नोकरशाहीकडे जात आहे की काय, असे मला वाटते. आज आपण नोकरशाहीच्या हातामध्ये लोकशाही देतो आहोत की काय अशी परिस्थिती निर्माण होत आहे. म्हणून वन विभागाला द्यावयाच्या पर्यायी जागेसाठी सुरु असलेले संपादन ताबडतोब थांबविले पाहिजे. महसूल विभागाने पर्यायी जागा निश्चित करीत असताना लोक प्रतिनिधींना विश्वासात घेऊन या संदर्भात कार्यवाही केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्र.37, पृष्ठ क्र.34- मी दुष्काळाच्या निमित्ताने मराठवाड्यात फिरत असताना बिलोली-देगलूर या तालुक्यात गेलो होते. 10 हजार ब्रासची रॉयल्टी घेत असताना त्या ठिकाणी 1 लाख ब्रास रेती काढण्यात आली. आम्हाला महसूल मंत्री महोदयांनी सांगितले की, यापुढे राज्यात कोणी बेकायदेशीर रेती उत्खनन करील तर त्याला मोक्का लावला जाईल.

..2T...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, आमच्या रायगड जिल्ह्यात बसवा व माड तहसीलदार यांच्यावर रेती माफीयांनी हल्ला केला होता. गुन्हेगारावर पोलीस केस दाखल झालेली आहे. सरकारकडे माझी अशी मागणी आहे की, मोक्का कायदा अस्तित्वात आल्यापासून किती लोकांवर मोक्का कायदा लावण्यात आलेला आहे. दररोजचे वर्तमानपत्र पाहिले की, रेती माफीयांनी हल्ले केल्याच्या बातम्या आपणाला वाचावयास मिळतात. त्यामुळे या कायद्यात सुधारणा केली पाहिजे. डीपीसीच्या बैठकीत मी एसपी यांना याबाबत विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, या कायद्यात अपुरेपणा आहे. चार ते पाच गुन्हे झाल्याशिवाय गुन्हेगारावर मोक्का कायदा लावता येत नाही. माझ्या मते या रेती माफियांचा ट्रक तातडीने जप्त केला पाहिजे व त्या ट्रकचा लिलाव केला पाहिजे. या सर्व बाबी या ठिकाणी थांबविल्या पाहिजेत. (...अडथळा...) सभापती महोदय, दोन दिवसांच्या पुरवणी मागण्यांवर आपण आज एकत्रित चर्चा करीत आहोत, मी माझे म्हणणे थोडक्यात मांडणार आहे. रात्रभर बसण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे पहिल्या आठवड्यात कामकाज झालेले नाही आता दुसऱ्या आठवड्यात कामकाज होत आहे.

तालिका सभापती : पुरवणी मागणीवरील चर्चा आणि उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अधिवेशन 23 तारखेपर्यंत असल्यामुळे आपणाला इतर कामकाजासाठी भरपूर वेळ आहे. आज आपण भरपूर काम केले आहे, कामकाजाचे पुस्तक वाचा तेथे सचिव आहेत ते तुम्हाला माहिती देतील. पाच तासाच्यावर काम करण्याची क्षमता या सभागृहातील सदस्यांची राहत नाही. मी जलसंपदा विभागावर बोलणार नाही, मंत्री महोदय माझे चांगले मित्र आहेत. ते अजून सिंचनाचा अभ्यास करीत आहेत. माझा त्यांना सल्ला आहे की, महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांचा देखील त्यांनी थोडा सल्ला घेतला पाहिजे. आता ते सल्ला थोडा कमी घ्यावयास लागले आहेत. म्हणून त्यांना मी हा सल्ला देत आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 37 बाब क्रमांक 34 महसूल व वन विभागावर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, ज्या गतीने नागरीकरण होत आहे, तालुक्या लगतच्या जमिनी व गावे विस्तारली जात आहेत, त्यामुळे बेकायदेशीर बांधकामे नियमित करण्यासाठी आपणाला कायदा करावा लागतो. यासाठी कमीत कमी 500 मीटर पर्यंत गावठाण विस्तार करण्याची गरज निर्माण झालेली आहे. याबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी अशी माझी मागणी आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, महसूल विभागाचे कोणीच मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत, उत्तर कोण देणार आहेत, सभापती महोदय, गावठाण विस्तार झाला पाहिजे. अलिबाग तालुक्यात बोरगर, गोंधळपाडा व वाघ्रण या ठिकाणचा गावठाण विस्तार जलद गतीने होण्याची आवश्येकता आहे, आता गावात जागाच शिल्लक राहिलेली नाही.

सभापती महोदय, पान क्रमांक 100 वरील बाब क्रमांक 120 सार्वजनिक बांधकाम विभागावर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, जोडपत्र 'आय' व विवरणपत्र 'ए' नुसार क्रमांक 640 वर येऊर येथे भुयारी मार्ग बांधणे, तालुका करमाळा, टेभूर्णी रोड, प्रसमा-8 किलोमीटर 112/600 करिता सन 2015-2016 मध्ये 77 लाख 73 हजार रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. रेल्वे प्रशासनाने 7 कोटी 40 लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाने न करता रेल्वे प्रशासनाच्या तांत्रिक विभागाकडून काम करण्याचे मान्य केल्यामुळे शासनाने प्रस्तावित भुयारी मार्गाच्या कामासाठी दिलेली रक्कम दोन कोटी 50 लाख रुपये रेल्वेला देण्यासाठी शासनाने शिफारस करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 128 पान क्रमांक 143 छत्रपती शाहू महाराज यांनी 1952 मध्ये राधानगरी येथे धरण बांधले होते, तेथे पॉवर हाऊस तयार केले होते. तेथील पॉवर हाऊस चांगले असताना नवीन पॉवर हाऊस बांधण्यासाठी बीओटीवर ते चालविण्यास दिले आहे. तेथील जुने पॉवर हाऊस तसेच भंगारात असून ते बंद अवस्थेत आहे. तेथील स्थानिक शेतकऱ्यांनी स्वत: एक संस्था काढून हे पॉवर हाऊस चालू करण्याची मागणी केली आहे. कोल्हापूर मध्ये शाहू महाराजांबाबत एक वेगळी आत्मियता आहे. शाहू महाराजांबाबत देशात व राज्यात आत्मियता आहेत. परंतु करवीरवासियांना शाहू महाराजांबाबत एक वेगळी भावना आहे. तेथील प्रत्येकांच्या घरात शाहू महाराजांचा फोटो लावण्यात आलेला आहे. जुने पॉवर हाऊस तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने आश्वासन द्यावे. त्याची किंमत फक्त प्रतियुनिट एक रुपया येते. आपण सात रुपये प्रति युनिट प्रमाणे वीज उपलब्ध करीत आहोत. जुने पॉवर हाऊस चालू असताना नवीन पॉवर हाऊस तयार करुन बीओटी तत्वावर का देण्यात आले याची देखील चौकशी झाली पाहिजे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

नवीन बीओटीवरील पॉवर हाऊस सुरु ठेवायचे असले तरी देखील जुने पॉवर हाऊस सुरु करण्यात यावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 189 ग्रामविकास विभागाबाबत मी बोलत असताना मंत्री महोदयांना असे सांगू इच्छितो की, घरपट्टी वसुली अनेक ठिकाणी कोर्टाच्या निर्णयानुसार बंद आहे. याबाबत शासन कोणती पर्यायी व्यवस्था करणार आहे. उच्च न्यायालयाने स्टे दिल्यानंतर राज्य शासन त्या निर्णयाविरोधात सुप्रीम कोर्टात गेले काय ? घरपट्टी बसविण्याचे जे सुत्र आहे त्याबाबत काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. आर.सी.सी. बांधकाम, लोडबेअरिंग बांधकाम, साधे छपराचे घर, टीनपत्राचे घर यासंदर्भातील नॉर्म्स् ठरवून घरपट्टीची आकारणी केली पाहिजे. गावातील पुढारी, सरपंच, आमदार यांच्या घराची घरपट्टी कमी असते व गरीब माणसाठी घरपट्टी जास्त असते. घरपट्टीची संपूर्ण आकारणी ग्रामसेवकाकडे असायला पाहिजे. सरपंचाचे त्यावर बंधन असायला नको. यासंदर्भातील कायद्यात सुधारणा करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, राज्यात धान खरेदी व कोकणात भात खरेदी आजपर्यंत देखील सुरु करण्यात आलेली नाही. गेल्या तीन वर्षापासून रायगड जिल्ह्यात भात पडून आहे. डीपीसीच्या बैठकीत आम्ही पालकमंत्री महोदयांना प्रश्न विचारला होता. या ठिकाणी पर्यायी गोडाऊन्स उभारली पाहिजेत. जिल्हा बँकेतर्फे 100 गोडाऊन बांधण्याची माझी तयारी आहे. मंत्री महोदयांना देखील डीपीसीच्या बैठकीत मी हे सांगितले आहे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. गिरीष बापट उपस्थित नाहीत त्यांनी देखील मला सांगितले आहे की, तुम्हाला लागणारी सर्व मदत आम्ही करतो. यासंदर्भात सर्व तरतूद करण्यात आलेली आहे नाबार्ड 25 टक्के रक्कम देते बँकेकडून 25 टक्के रक्कम घेऊन 50 टक्क्यांमध्ये कामे केली जातील. रायगड जिल्ह्याला भाताचे कोठार म्हणून ओळखल जात होते, गेल्या तीन वर्षापासून रायगड जिल्ह्यात भाताला भाव मिळत नाही. मोठ्या प्रमाणात व्यापारी शेतकऱ्यांची पिळवणूक करीत आहेत, यासंदर्भातील निर्णय या अधिवेशनात व्हावा अशी मी विनंती करतो. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, काल सभागृहात दुष्काळावर चर्चा सुरु झाली होती. त्यावेळी देखील आम्ही पाहिले आहे. सभागृहातील संख्येचा विचार केला तर राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाच्या सदस्यांची संख्या जास्त आहे. या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बोलायला संधी मिळत नाही असे दिसून येते. आता सायंकाळी 5.30 च्या दरम्यान मागण्यांवरील चर्चा सुरु झालेली आहे. आता साडेसहा वाजले असून या बाजूचा एकही सदस्य बोलला नाही. पुरवणी मागण्या मंजूर करुन घ्यावयाच्या असल्यामुळे आपण असेही ठरवू शकतो की, सत्ताधारी बाकावरील सन्माननीय सदस्यांनी बोलायचे नाही. त्याबाबत आमचे काहीच म्हणणे नाही. मागील वेळी जेव्हा आम्ही पुरवणी मागण्या मांडल्या होत्या त्यावेळी सभागृहात आम्हाला असे सांगण्यात आले होते की, ज्या सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्या दिल्या आहेत किंवा जे सभागृहात बोलले आहेत त्यांना मंत्री महोदयांकडून लेखी उत्तरे मिळतील. परंतु मला एकाही मंत्री महोदयांकडून पुरवणी मागणीचे लेखी उत्तर प्राप्त झालेले नाही. इतर सन्माननीय सदस्यांना लेखी उत्तर आले असतील तर त्याबाबत मला आनंद आहे.

.....UU-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

मी अगदी नम्रपणे सरकारचे लक्ष वेधू इच्छिते. वेळेची मर्यादा असली तरी प्रत्येक मंत्री महोदयांनी उत्तर देण्याची गरज आहे. उत्तर द्यायचे की नाही हा निर्णय सरकारचा असणार आहे. परंतु सदस्य म्हणून आम्हाला वाटते की, आम्ही जे मुद्दे मांडले आहेत त्यावर सरकार धोरणात्मक निर्णय घेणार असेल तर त्या त्या विभागाच्या मंत्री महोदयांचे उत्तर रेकॉर्डवर आले तर आम्हाला पाठपुरावा करणे सोयीचे होते. म्हणून माझी विनंती आहे की, वेळ कधीच पुरेसा नसतो. त्यामुळे पुरवणी मागण्यांमधील वेगवेगळया बाबींचा उल्लेख करुन मुद्दे मांडले जातात त्यावेळेला त्या त्या विभागाच्या मंत्री महोदयांनी त्या मुद्यांची दखल घेऊन दिलेले उत्तर रेकॉर्डवर आले तर ते योग्य होईल. अन्यथा 15 दिवसांनी उत्तर पाठवायचे आणि नंतर आम्ही त्याबाबत पाठपुरावा करायचा हे योग्य नाही.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभाग पृष्ठ क्रमांक 6, बाब क्रमांक 8. अधिकृत पत्रकारांना बस भाड्यामध्ये सवलत देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. ही प्रथा अनेक वर्षापासून सुरु आहे. अत्यंत स्वागतार्ह भूमिका आहे, मी या भूमिकेचे स्वागत करते. परिवहन विभागाची वेगळी मागणी दिसून आली नाही. परंतु मला उल्लेख करणे आवश्यक वाटते. एस.टी.स्थानकावरील उपाहारगृहे बचत गटांना देण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे तो निर्णय स्वागतार्ह आहे. त्याचा निश्चितपणे ग्रामीण भागातील बचत गटांना फायदा होईल.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 7, बाब क्रमांक 9. आकाशवाणीवरील दिलखुलास व सह्याद्री वाहिनीवरील जय महाराष्ट्र या कार्यक्रमासाठी 85.35 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सह्याद्री ही सरकारशी संबंधित दूरचित्रवाहिनी आहे. माझ्या माहितीप्रमाणे कमीत कमी 3 वर्षापासून सायंकाळी 7.00 च्या बातम्यानंतर सह्याद्री वाहिनीवर विधिमंडळ समालोचन या कार्यक्रमामध्ये विधानसभा व विधानपरिषदेमध्ये दिवसभर काय कामकाज झाले याचे समालोचन केले जायचे. खेड्यापाड्यातील माणसे ते समालोचन लक्ष देऊन ऐकायचे. आपल्या आमदारांनी सभागृहात काय भूमिका मांडली, काय पाठपुरावा केला हे त्यांना कळायचे. केंद्रीय प्रसारण मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांच्याशी मी स्वत: बोलले होते. त्यांना पत्र देखील दिले होते. त्यांनी याबाबत पाठपुरावा केला होता. सह्याद्री वाहिनीच्या प्रतिनिधींचे म्हणणे आहे की, आम्हाला 5-5

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

मिनिटाच्या प्रसारणाबद्दल पैसे मिळाले पाहिजेत. विधिमंडळाची भूमिका आहे की, राज्यासाठी वृत्त दिले जाते, त्यामुळे आम्ही पैसे देणार नाही. माझी शासनाला विनंती आहे की, जय महाराष्ट्र कार्यक्रमासाठी, दिलखुलास कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो, त्यामुळे विधिमंडळ समालोचन प्रसारणासाठी सुध्दा आर्थिक तरतूद करावी. मी माननीय अर्थमंत्र्यांशी सुध्दा बोलले आहे. मला ही बाब रेकॉर्डवर आणली पाहिजे. कॅबिनेटमधील सर्व सदस्यांना विनंती आहे की, सरकार आणि माननीय सभापती यांनी धोरणात्मक निर्णय घेऊन विधिमंडळ समालोचन कशाप्रकारे प्रसारित करता येईल यासाठी लक्ष घालावे.

सभापती महोदय, गृह विभाग पृष्ठ क्रमांक 14, बाब क्रमांक 11. यंत्रसामुग्री खरेदीसाठी भरघोस तरतूद केली आहे. परंतु केंद्र सरकारने एक अतिशय महत्वाचा सीसीटीएनएस प्रकल्प हाती घेतला आहे. ज्यामधून मोठया प्रमाणात संगणकीकरण करून ही प्रणाली स्वीकारण्यासाठी हजारो कोटी रूपयांची तरतूद केली आहे. त्यामधून किती निधी महाराष्ट्र सरकारने मिळविला, त्यातून ही तरतूद केली आहे की राज्य सरकारने स्वतः तरतूद केली हे सभागृहाला कळले पाहिजे. इंटिग्रेटेड क्राईम जस्टीस सिस्टीम यासाठी केंद्र सरकारने तरतूद केली आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 13, पृष्ठ क्रमांक 14. डीएनए आणि अंगुली मुद्रा तंत्रज्ञान विषयक रसायनासाठी 4 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. अनेक माध्यमांनी यासाठी पाठपुरावा केला होता. अनेक गुन्हे घडतात, त्यावेळी तपासासाठी उत्तर देताना डीएनए अहवाल येणे बाकी आहे किंवा अंगुली मुद्रा विभागात काम करणारे तंत्रज्ञ उपलब्ध नाहीत म्हणून विलंब होतो असे सांगितले जाते. याबद्दल जो निर्णय घेतला त्याचे मनापासून स्वागत करते. या प्रकारच्या तंत्रज्ञानासाठी जेवढी तरतूद करता येईल ती करावी, जेणेकरून गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण वाढू शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभाग पृष्ठ क्रमांक 101, बाब क्रमांक 124. एशियाटिक ग्रंथालयाच्या दुरूस्तीसाठी तरतूद करण्यात आली आहे ती योग्य आहे. एशियाटिक ग्रंथालय अत्यंत महत्वाचे आहे. त्याचबरोबर दादर मराठी ग्रंथालयाची दुर्दशा झालेली आहे. पाणी गळती होत आहे, इमारत जीर्ण झाली असून पडण्याच्या अवस्थेत आहे. दादर मराठी ग्रंथालय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

त्याचप्रमाणे वांद्रे (पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथालय, नांदेड येथील नरहर कुरुंदकर स्मृती केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ स्मृती केंद्र यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने आर्थिक तरतूद करावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने मुंबईतील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी तरतूद केली आहे, ती स्वागतार्ह आहे. बीडीडी चाळींसाठी भरीव प्रमाणात तरतूद केली पाहिजे. 15-20 वर्षापासून तेथील रहिवासी अत्यंत वाईट अवस्थेत जीणे जगत आहेत. कॅबिनेट मंत्री श्री.प्रकाश महेता व राज्यमंत्री श्री.रवींद्र वायकर यांनी या विषयाला चालना देण्याचे काम केले आहे. हे काम वेगाने पूर्ण व्हावे अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभाग, पृष्ठ क्रमांक 148 वर औरंगाबाद खंडपीठामध्ये 11 न्यायालय सभागृहे निर्माण करण्यास तरतूद केली आहे. पुणे आणि कोल्हापूर येथे खंडपीठ निर्माण करण्याचा कॅबिनेटने निर्णय घेतला होता. पुणे व कोल्हापूर येथे खंडपीठ करण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. मला अशी अपेक्षा होती की, पुरवणी मागण्यांमध्ये कोल्हापूर आणि पुणे येथे खंडपीठासाठी प्रतिकात्मक तरतूद झालेली नाही ही चिंतेची बाब आहे. याकडे मी सरकारचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग बाब क्रमांक 175. वाईन उद्योगाला चालना देण्यासाठी 11.67 लाख रुपयांची मदत दिली गेली आहे. माझा या विषयासाठी विरोध नोंदविते. एकीकडे महिला दारूबंदी व्हावी म्हणून मोर्चे काढत असताना आपल्याला काळजी वाटते की, सरकारचा महसूल बुडेल. निदान या उद्योगाला आर्थिक मदत देणे बंद केले पाहिजे. वाईन उद्योगाला चालना देणे आवश्यक नाही असे मला वाटते. सरकारने याबाबत जरूर पुनर्विचार करावा. वाईन उद्योगासाठी सरकारी तिजोरीतून पैसे देऊ नयेत. बँक किंवा अन्य मार्गाने पैसे घेणे याचे व्यवसायाप्रमाणे स्वातंत्र्य आहे. परंतु सरकारने वाईन उद्योगाला चालना देण्यासाठी निधी देणे योग्य नाही, याबद्दल जरूर पुनर्विचार करावा.

सभापती महोदय, ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग. पृष्ठ क्रमांक 167, बाब क्रमांक 190. तीर्थ स्थळ विकास अंतर्गत पारुंडेश्वरला मदत केली त्याबद्दल मी सरकारचे आभार मानते. परंतु तुळजापूर आणि अन्य तीर्थ स्थळांच्या विकासाबद्दलचा प्रश्न प्रलंबित आहे. देवस्थाने नियमित

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला तो स्वागतार्ह आहे. मंत्री महोदयांनी केलेली घोषणा स्वागतार्ह आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभाग, बाब क्रमांक 200, पृष्ठ क्रमांक 215. लंडन येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे घर स्मारक करण्याचा निर्णय घेतला तो स्वागतार्ह आहे. एक चांगला पायंडा पाडला आहे. थोर नेते आहेत, त्यांची प्रेरणा देशाच्या भिंतीआड समृध्द करु नये. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे घर विकत घेतले त्याबद्दल मी सांस्कृतिक कार्यमंत्री श्री.विनोद तावडे यांचे अभिनंदन करते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य महान आहे. अन्य काही विचारवंत आहेत, ज्यांनी देशासाठी बलिदान केले, त्याग केला आहे. त्यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी फ्रान्समधून जुलमी राजवटीशी संघर्ष केला होता. त्या फ्रान्समध्ये त्यांचे स्मारक करण्याबाबत राज्य सरकारने विचार करावा याकडे मी लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत हे आमचे सहकारी आहेत.

...2व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

त्यामुळे मला टीका करावयाची नाही. बाब क्र.259, पृष्ठ क्र.220 वर अंधत्व निवारण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. डॉक्टरांना बोलण्याची संधी मिळावी म्हणून मी हा मुद्दा मुद्दामहून मांडत आहे. त्यामुळे मला एका गंभीर या गोष्टीकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे. वाशिम येथे अंधत्वाच्या शस्त्रक्रिया करताना 32 रूग्णांना डोळे गमवावे लागले आहेत. या प्रकरणी आपण चौकशी करून डॉक्टर्सना निलंबित केले आहे. सरकारकडून ज्यावेळी अंधत्वाच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात त्यावेळी डॉक्टर्सच्या मूल्यमापनाकरिता फ्रेशर कोर्स सुरू करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. दुसरी एक गंभीर बाब सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित आहे. गेल्या महिन्याभरामध्ये मला पाच गंभीर घटना आढळून आलेल्या आहेत. ठाणे जिल्ह्यामध्ये मोखाडा, खोडाळा येथे तर दुसरी घटना सोलापूर येथे घडली आहे, तर तिसरी घटना कोल्हापूर येथे घडली आहे. ही घटना ऊस तोड कामगार महिलेशी संबंधित आहे. कोल्हापूर देवस्थानमध्ये देखील घटना घडली आहे. या घटना म्हणजे रस्त्यावरच महिलेची प्रसुती झालेली आहे. त्या महिलेने कोयत्याने नाळ कापून त्या बाळाला जन्म दिलेला आहे. गरोदर महिलेला रूग्णालयापर्यंत पोहोचण्यासाठी अनंत अडचणी असतात. अशा परिस्थितीमध्ये महिलेची प्रसुती होते तेव्हा डोअर फुट सारखे डॉक्टर्स उपलब्ध करून अशा महिलांना मदत केली पाहिजे. यासाठी आपण आशा स्वयंसेविका नेमल्या. पण आशांना दुर्दैवाने मोर्चा काढावा लागला. त्यांना प्रसुती रजा आणि पैसे मिळणार नाही असा केंद्र शासनाचा निर्णय होता. तेव्हा आपणच त्या कंत्राटावर असल्या तरी त्यांना प्रसुती रजा देण्यात येईल असे सांगितले. त्यामुळे महिला नर्सेस, आशा स्वयंसेविका यांच्या शारीरिक आरोग्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. त्यांना देखील योग्य ते मानधन मिळणे आवश्यक आहे. त्याकडे देखील मी आपले लक्ष वेधित आहे.

यानंतर मी महिला व बाल विकास विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. महिला व बाल विकास विभागामार्फत अनेक योजना राबविल्या जातात. मी अनेक वर्षापासून पाहते आहे की, महिला व बालविकास विभागाची बजेटची पाने फार कमी होत आहेत. महिला व बाल विकास विभागाची तरतूद ही एक-दोन पानांमध्येच असते. आपण सर्वांनी मिळून सन 2013 मध्ये महिला धोरण तयार केले होते. त्यासंबंधी सरकारने कृती कार्यक्रम आखला आहे असे मला अजून तरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

दिसलेले नाही. सरकारने तसा कार्यक्रम तयार केला असेल तर तो मांडला पाहिजे किंवा यासंबंधी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत त्याची माहिती देणे आवश्यक आहे. बाल हक्क आयोग आणि महिला आयोग यासाठी देखील योग्य ती तरतूद आपण केली पाहिजे.

माझा शेवटचा मुद्दा अल्पसंख्याक विभागाशी संबंधित आहे. मी बाब क्र.332 पान क्र.283वर आपले लक्ष वेधणार आहे. यात आपण नोंदणीकृत मदरशांना अनुदान देण्याचे प्रस्तावित केले आहे. मला येथे मांडावेसे वाटते की, ज्ञान प्रबोधिनी, पुणे, पैठण, आळंदी, नाशिक येथे वेद पाठशाळा आहेत. अशा प्रकारच्या अनेक संस्था संस्काराचे काम करीत आहे. या संस्कृत व मराठी पाठशाळा आहेत. येथे ज्यांना ज्यांना पुजा करावयाची असते त्यांना सर्व धार्मिक विधीचे प्रशिक्षण देण्यात येते. मी यासंबंधी मागणी केली आणि मला प्रतिगामी म्हटले तर त्याची मला पर्वा नाही. सरकार मदरशांना जसे अनुदान देते तसे हिंदु, बौद्धधर्मीयांचे संस्कार वर्ग चालविणाऱ्या ज्या संस्था किंवा बालवाड्या असतील त्यांना सरकारने अनुदान द्यावे अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. या पुरवणी मागण्यांबरोबर सरकारने ज्या घोषणा केलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी होणे अत्यावश्यक आहे. मागील वर्षी आमच्या सरकारने दहा घोषणा केल्या होत्या. गोरे वाडा येथे प्राणिसंग्रहालय, तलाठ्यांची 3084 पदे भरणार, ओबीसी क्रीमिलेअरची मर्यादा वाढविणार, सिंचनासाठी कालबद्ध कार्यक्रम, काटोलचे संत्रा प्रक्रिया केंद्र सुरू करणार, बुद्धिस्ट सर्किटचा आराखडा तयार करणार, गोरेवाडा रेस्क्यु सेंटर, आयआयटी आणि एम सुरू करणार अशा प्रकारच्या घोषणा केल्या आहेत. त्यामध्ये कोणती प्रगती झाली आहे हे नागपूरच्या अधिवेशनाच्या निमित्ताने जनतेला कळले तर लोकांचा विश्वास देखील निश्चितपणे वाढू शकेल. धन्यवाद. जय भीम, जय महाराष्ट्र.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला संधी दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. मी बाब क्रमांक 102 अग्शिमन सेवा व आणिबाणीच्या सेवा यासाठी रूपये 10 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. मुंबईमध्ये काळबादेवी येथील एका इमारतीला आग लागल्याचे आपण पाहिले होते. त्यानंतर मुंबईमध्ये दामू नगरला आग लागली. परंतु, आग विझविण्यासाठी अग्निशमन यंत्रणा कमी पडते आहे असे दिसते. मुंबई शहरामध्ये 55, 65, 75 मजल्याच्या इमारती बांधण्यासाठी परवानगी दिली जात आहे. पण अग्निशमन दलाची शिडी ही 20 मजल्यापर्यंतच जाते. लोटस इमारतीला आग लागली तेव्हा 23 व्या मजल्यावर आपला अग्निशमन कर्मचारी गेला. परंतु, अग्निशमन यंत्रणा वीस मजल्यापर्यंत असल्यामुळे त्या कर्मचाऱ्याचे निधन झाले. तेव्हा संपूर्ण महाराष्ट्रासाठी अग्निशमन यंत्रणा आपण उभारली पाहिजे. आग विझविण्यासाठी हेलिकॉप्टरमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याचे ठरले होते. मुंबईसह वाशी, पनवेल, येथे गगनचुंबी इमारती होत आहेत. त्यासाठी कुठल्याही प्रकारची अग्शिमन यंत्रणा नसल्यामुळे हेलिकॉप्टरचा वापर आग विझविण्यासाठी करणार होतो. आताच आपण पाहिले की, दामू नगर मधील झोपड्यांना आग लागल्यानंतर ती आग विझविण्यासाठी कोणतीच यंत्रणा आपल्याकडे नव्हती. हेलिकॉप्टरची व्यवस्था असती तर अनेक झोपड्या आगीपासून वाचल्या असत्या. त्या झोपड्यापर्यंत जाण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था नव्हती, सोय नव्हती. त्या आगीमुळे गरीबांचे संसार उघड्यावर आले आहेत.

यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 125 वर बोलणार आहे. मुंबईतील बीडीडी चाळींच्या दुरूस्तीसाठी 15 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. खरे म्हणजे 80 कोटी रूपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. या बीडीडी चाळीमध्ये 3 हजार पोलीस देखील राहतात. या सर्व चाळी मोडकळीस आलेल्या आहेत. त्यामुळे त्या चाळींचा स्लॅब कधी पडेल अशी भीती पोलिसांच्या मनात असते. तेव्हा आपण जी 15 कोटी रूपयांची तरतूद केली आहे ती 80 रूपये करावी अशी मी मागणी करीत आहे. आता बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाचा एक आराखडा तयार करण्यात आला आहे. बीडीडी चाळी ह्या सन 1920 च्या आहेत. बीआयटी चाळी देखील खूप जुन्या आहेत. केवळ मलमपट्टी न करता या चाळींचा पुनर्विकास करण्यात यावा अशी विनंती मी शासनाला करीत आहे. तसेच, इतरांना ज्या प्रमाणे मोफत घरे देणार आहात त्याप्रमाणे तेथे राहणाऱ्या पोलिसांना देखील मोफत घरे देण्यात यावीत. ..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

मुंबई ते गोवा हायवेवरील पनवेल ते इंदापूर असा प्रवास करण्यासाठी 3 ते 4 तास लागतात. यात सुप्रीमोने आपल्याला धुऊन खाल्ले आहे. त्यांनी काहीच शिल्लक ठेवलेले नाही. मुंबई गोवा मार्गाचा सर्वात जास्त वापर होळी, गणपतीसाठी केला जातो. पण आता कोकणात जाणाऱ्या लोकांना पुणे मार्गे जावे लागते. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, पनवेल ते इंदापूर हा मार्ग लवकरात लवकर हातामध्ये घ्यावा. त्यापुढील मार्गाचे काम केंद्र शासनाने हातामध्ये घेतले आहे. गेल्या दहा वर्षापासून या मार्गावरील काम रखडलेले आहे. तेव्हा यातील कंत्राटदाराला बदलून किंवा ज्या यंत्रणेने यात गैरव्यवहार केला असेल त्या यंत्रणेची चौकशी करून लवकरात लवकर या मार्गावरील काम हाती घेण्यात यावे.

तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

WW-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भाई गिरकर .....

त्यामुळे मुंबई-गोवा महामार्ग लवकरात लवकर पूर्ण होणे आवश्यक असून जेणेकरुन कोकणाकडे जाणाऱ्या लोकांची सोय होऊ शकेल. रायगड आणि त्या विभागातील पत्रकारांनी मुंबई-गोवा महामार्गासाठी अनेक वेळा आंदोलने केली परंतु परिस्थितीमध्ये फरक पडलेला नाही. दिवडी घाटात काही दिवसापूर्वी एसटीचा अपघात होऊन त्यामध्ये 7 प्रवासी मृत्यू पावले असून 22 प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे लवकरात लवकर पणवेल ते इंदापूर मार्गाचे काम होणे आवश्यक आहे. या रस्त्याचे काम करण्यासाठी अगोदरच्या ठेकेदार बाद झाला असेल तर नवीन ठेका देऊन या रस्त्याचे काम करावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष विभागाच्या संदर्भात मी विचार व्यक्त करणार आहे. गेल्या 15 वर्षापासून इंदू मिलचा प्रश्न रखडला होता परंतु हा प्रश्न केंद्रसरकार व महाराष्ट्र शासनाने दीड वर्षात, विशेषत: मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि या देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांनी सोडवला असल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. मागे जे सरकार सत्तेवर होते त्यांनी दर 6 डिसेंबर रोजी इंदू मिल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे भूमीपूजन केले जाईल अशा घोषणा केल्या होत्या परंतु इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे भूमिपूजन केले नाही. परंतु आमच्या सरकारने या ठिकाणी भूमिपूजन केले असून लवकरात लवकर तरतूद करुन इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जागतीक दर्जाचे भव्य स्मारक लवकरात लवकर निर्माण करावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 1920-21 मध्ये लंडन येथील घरात वास्तव्य करीत होते. आपले शिक्षण मंत्री मध्यंतरीच्या काळात लंडन येथे गेले होते व त्याच वेळेस डॉ.बाबासाहेबांचे राहते घर लिलावात निघाले होते त्यावेळेस त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांशी संपर्क करुन समाजकल्याण खात्यातर्फे यासाठी 36 कोटी, 60 लक्ष, 37 हजार रुपयांची तरतूद केली आहे. एवढेच नव्हेतर गेल्या 14 नोव्हेंबर रोजी या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मा.मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस,सामाजिक न्यायमंत्री मा.श्री. बडोले साहेब आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये लोकार्पण सोहळा पार पडलेला आहे. अनेक वर्षापासून हा प्रश्न रखडला होता परंतु सहा महिन्याच्या आत केंद्रसरकार व राज्य सरकारने त्वरीत निर्णय घेतल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भाई गिरकर .....

सभापती महोदय, अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारकाचे लवकरात लवकर भूमिपूजन करण्याचा निर्णय माननीय मुख्यमंत्री घेतील याची मला खात्री आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारका बरोबर इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाच्या कामास लवकरात लवकर सुरुवात करावी अशी सूचना करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 284 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित निवासी इंग्रजी शाळेत शिक्षण देण्यासाठी 43 कोटी,66 लाख, 78 हजार रुपयांची तरतूद केली आहे. आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थिनींना चांगले शिक्षण व चांगले जीवन जगण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. या ठिकाणी मी ज्या काही सूचना केल्या आहेत त्या शासनाने अंमलात आणाव्यात अशी विनंती करतो व मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आपले धन्यवाद मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.:अर्ध-न्यायिक कामकाज शीघ्रगतीने व परदर्शकपणे होण्याबाबत.

मु.शी.: अर्ध-न्यायिक कामकाज शीघ्रगतीने व परदर्शकपणे होण्यासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन.

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

सभापती महोदय, या शासन स्तरावर तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यात विविध जमीन विषयक कायद्यांतर्गत अर्ध-न्यायिक कामकाज हाताळताना अवलंबविण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीत एकसूत्रता व एक वाक्यता असावी ही बाब विचारात घेऊन अर्ध-न्यायिक कामकाज शिघ्र गतीने, अधिक पारदर्शकपणे हाताळण्याच्या उद्देशाने अपिलकर्ता/अर्जदार यांनी दाखल केलेली अपिले किंवा पुनरीक्षण अर्ज हाताळण्या संदर्भात सुस्पष्ट निर्देश निर्गमित करणे आवश्यक झाले होते.

सभापती महोदय, अर्ध-न्यायिक प्रकरणांच्या संदर्भामध्ये अनेक प्रकरणे राज्यसरकारकडे दाखल होत असतात. या प्रकरणांचा निर्णय विशिष्ट कालावधीमध्ये करण्यासंदर्भात अनेकांचा आग्रह असतो. परंतु वर्षानुवर्षे ही अपिल प्रलंबित राहतात. कधी तलाठयाची नोंद असली तर तहसिलदारकडे काही दिवस जातात, याच्या नोंदी प्रांताकडे गेल्यानंतर त्यासाठी अपिलिंग ॲथोरिटी अजून काही कालावधी घेते. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्याकडूंन आयुक्तांकडे व आयुक्तांकडून मंत्र्यांकडे व मंत्र्याकडून हे अपिल उच्च न्यायालयात जाते. यामध्ये खूप वर्षे निघून जातात व न्याय मिळण्यास विलंब होतो. अशा ठिकाणी एका विशिष्ट कालावधीमध्येच त्यांनी निर्णय घेतले पाहिजेत. न्यायालयाने निर्णय देत असताना त्यांनी विलंब टाळला पाहिजे. काही प्रकरणाचा निकाल तिसऱ्या पिढीला मिळाल्याची काही प्रकरणे आपल्याला आढळून आली असतील. त्यामुळे न्याय नाकारल्यासारखी स्थिती निर्माण होते. त्यामुळे शासनाच्या माध्यमातून यासंदर्भात काही मार्गदर्शक सूचना, जीआर काढून लागू करीत आहोत. यामध्ये अपील/पुनरीक्षण अर्ज दाखल करुन घेण्यासाठी संबंधित महसूली प्राधिकाऱ्याच्या कार्यालयात स्वतंत्र व्यवस्था करण्यात येईल व तीन दिवसात छाननी करुन त्यास अपील/पुनरीक्षण क्रमांक देण्यात येईल. यासाठी कायदे निहाय "विशेष नोंदवही" ठेवण्यात आली पाहिजे. प्रकरणनिहाय नोंदवही ठेवली गेली पाहिजे. नाही तर एकत्रित नोंदवहीमधून कोणते प्रकरण कोणत्या विभागाला पाठवायचे यासाठी 15-20 दिवस किंवा महिना लागत असतो. अंतरिम ओदशाची मागणी असल्यास 30 दिवसाच्या आत सुनावणी घेऊन अंतरीम

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

आदेश पारित करण्याविषयी निर्णय घेण्यात येईल. स्टे देत असताना सरपंचाला अपात्र केले आणि त्याने स्थगिती मागितली तर त्या प्रकरणाला स्थगिती देण्यासाठी 6-6 महिने 1-1 वर्ष निघून जाते व वर्षभर सरपंच त्याच ठिकाणी राहतो. अशा प्रकरणात स्टेही दिला जात नाही व हेअरिंग सुध्दा होत नाही. अशा स्थितीत 30 दिवसाच्या आत एस ऑर नो असा जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो त्यांनी 30 दिवसाच्या आत दिला पाहिजे.

सभापती महोदय, सर्व प्रकरणांच्या सुनावण्या सर्वसाधारणपणे कालानुक्रमाने करण्यात येतील. अर्जाबाबत सुनावणी पुर्ण झाल्यानंतर सर्वसाधारणपणे 30 दिवसात व उशिरात उशिरा विलंबाच्या कारणासह 60 दिवसात आदेश पारित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. पहिल्यांदा 30 दिवसाच्या आत निर्णय दिलाच पाहिजे व विलंबाच्या कारणासह 60 दिवसाच्या आत निर्णय देण्याचे बंधन घालण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, क्षेत्रीय महसूल प्राधिकाऱ्याकडे अर्ध-न्यायिक प्रकरणे दाखल झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत निर्णयित करणे बंधनकारक राहील. वर अपील केले तर एक वर्षाच्या आत निर्णय घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, महसूल विभागाच्या विविध अर्धन्यायिक प्राधिकाऱ्याकडे दाखल करण्यात येणाऱ्या अर्धन्यायिक प्रकरणांकरिता एनआयसी या संस्थेच्या मदतीने "इ-डिस्ट्रीक इन्फॉरमेशन सिस्टिम ऑफ एनआयसी(ई-डिसनीक)या अंतर्गत आज्ञावली विकसित करण्यात आली आहे.

XX-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...

सदर आज्ञावली सर्व जिल्हयांमध्ये राबविण्यात येणार आहे.

सभापती महोदय, जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अपिलांची संख्या वाढत आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारची अपीले येतात. काही महसूल विभागाची अपीले असतात, काही वाळुच्या संदर्भातील अपीले असतात. काही ग्रामपंचायतीच्या संदर्भात अपीले असतात, अशी अनेक अपीले येत असल्यामुळे अपिलांची संख्या वाढत आहे. अपिलांची संख्या वाढत असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांवर त्याचा लोड येतो. आपण त्यांना मदतीसाठी एक अतिरिक्त जिल्हाधिकारी दिला असला तरी कामाचा व्याप लक्षात घेता त्यांच्याकडून 30 दिवसांच्या आत किंवा 60 दिवसांच्या आत निर्णय होणे् अवघड जाईल म्हणून राज्य सरकारने जिल्हाधिकाऱ्यांना आणखी एक अतिरिक्त जिल्हाधिकारी देण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजे आता प्रत्येक जिल्ह्यामध्ये दोन अतिरिक्त जिल्हाधिकारी असतील. एक अतिरिक्त जिल्हाधिकारी नियमित कामकाज पाहील तर दुसरा अतिरिक्त जिल्हाधिकारी हे अपीले आणि जात पडताळणीची कामे पाहतील. अपिलाची प्रकरणे लवकरात लवकर निकाली लागावीत यासाठी दुसऱ्या अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यादृष्टीने या संदर्भातील जी.आर.या लागू करण्यात येईल.

श्री.हेमंत टकले :सभापती महोदय, सर्व सुनावण्या कालानुक्रमाचे करण्यात येतील अशी अट टाकण्यात आली आहे. म्हणजे जी सूचना पहिली येईल त्यावर पहिला निर्णय लागेल असाच त्याचा अर्थ घ्यायचा काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, यामध्ये जी अपील येतील त्यांची नोंदणी होईल आणि नोंदणीक्रमानुसार त्या करण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2015-2016 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरू..

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभाग, बाब क्रमांक 106, पृष्ठ क्रमांक 82 - पुणे शहराचा समावेश स्मार्ट सिटीच्या यादीमध्ये होणार असा ढिंढोरा मागील चार महिने पिटून पुणेकरांना विकासाची विविध स्वप्ने दाखविली गेली. पुण्याच्या आयुक्तांनी स्वत:ची प्रतिष्ठा पणाला लावून यासाठी कष्ट घेतले तेव्हा खरोखरच ते अभिनंदनास पात्र आहेत.

सभापती महोदय, स्मार्ट सिटी अभियानासाठी महानगरपालिकांसाठी 184 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. हा महत्वाकांक्षी असा प्रकल्प आहे. परंतु यामध्ये अनेक त्रुटी आहेत. या संदर्भात केंद्र सरकारने ज्या गाईड लाईन्स दिलेल्या आहेत त्याप्रमाणे आपल्या परिसरातील एक विभाग निवडून त्या विभागामध्ये तो सर्व खर्च करून एक रोल मॉडेल तयार करावे. यासाठी पुण्याच्या आयुक्तांनी पुण्यातील 30 लाख लोकांना विचारले की, आपणास कोणत्या परिसरामध्ये राहायला आवडेल. त्यावर या लोकांना औंध आणि बाणेर हा परिसर निश्चित केला. ज्यावेळी इतके लोक सांगत आहेत की, आम्हाला त्या परिसरामध्ये राहायला आवडेल त्याचा अर्थ त्या भागाचा विकास अगोदरच झालेला आहे. या कामासाठी केंद्र सरकार दरवर्षी 100 कोटी रूपये देणार आहे. राज्य सरकार दरवर्षी 50 कोटी रूपये देणार आहे. म्हणजे या योजनेसाठी पाच वर्षात 750 कोटी रूपये मिळणार आहेत. परंतु पुण्याच्या आयुक्तांनी जो प्रस्ताव तयार केलेला आहे त्याची किंमत 3500 कोटी रूपये आहे. हा जो प्रस्ताव तयार केलेला आहे त्यातील सर्व खर्च पुण्यातील एका भागामध्ये म्हणजे औंध-बाणेर-बालेवाडी याठिकाणी होणार आहे. म्हणजे हा असमोल विकास आहे. केंद्रात युपीए सरकार असताना त्यांनी जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून हजारो कोटी रूपये शहरांसाठी दिले. या हजारो कोटी रूपयांचा विनियोग संपूर्ण शहरासाठी करण्यात आल्यामुळे

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

शहरांचा समतोल विकास झालेला आहे. परंतु या प्रकल्पामध्ये फक्त एका भागामध्ये 3500 कोटी रूपये खर्च होणार असल्यामुळे संपूर्ण् पुणे शहराचा विकास केव्हा होणार आहे असा प्रश्न माझ्याप्रमाणे् अनेक सामान्य लोकांना पडलेला आहे.

सभापती महोदय, या कामासाठी केंद्र सरकारने आठ कन्सल्टन्ट निवडलेले आहेत आणि या आठ कन्सल्टन्टपैकी आपण निविदा काढून कोणासही निवडावे असे सांगितलेले आहे. या कामाच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेने निविदा मागविल्या. ज्यावेळी या निविदा उघडण्या आल्या त्यावेळी सर्वात जास्त रेट मॅकेन्झी कंपनीचा होता. असे असताना ही कंपनी टेक्निकलमध्ये चांगले आहे असे दाखवून त्या कंपनीला हे काम देण्यात आले आणि जी सर्वात कमी किमतीची निविदा होती त्या कंपनीला नागपूर महानगरपालिकेचे काम मिळालेले आहे. केंद्र सरकारने सांगितले होते की, या आठही कन्सल्टन्ट योग्य आहेत तर मग मॅकेन्झी कंपनी नेमण्याचा अट्टाहास कशासाठी धरण्यात आला ? कारण सर्वात कमी आणि सर्वात जास्त किमतीच्या निविदेमध्ये खूप फरक आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी स्पेशल परपज कंपनी स्थापन करण्यात आलेली आहे. या कपंनीची आवश्यकता काय याचे उत्तर मिळाले पाहिजे. मुंबई महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका आपले काम करण्यासाठी सक्षम आहेत. या महानगरपालिकांमध्ये जेएनएनयुआरएमच्या माध्यमतून हजारो कोटी रूपये खर्च झालेले आहेत. 74 वी घटना दुरूस्ती झाली त्यावेळी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना..

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. या ठिकाणी नगर विकास विभागाचे राज्यमंत्री उपस्थित होते. परंतु आता ते उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्या नगर विकास विभागावर अत्यंत महत्वाची चर्चा उपस्थित करीत आहे. माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.गिरीष बापट हे वेगवेगळ्या फाईल्स काढण्यामध्ये दंग आहेत. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री सांगत आहेत की, आम्ही नोंद घेत आहोत. परंतु मी बारकाईने पाहत आहे की, त्यांचे देखील सन्माननीय सदस्यांच्या भाषणाकडे लक्ष नाही. माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांनी मांडलेल्या मुद्यांची नोंद घेणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मंत्री महोदयांना माननीय सभापतींनी बोलाविले असल्यामुळे ते तेथे गेले आहेत.

तालिका सभापती : या ठिकाणी सन्माननीय सदस्य अतिशय पोटतिडिकेने आपले विचार मांडत असतात तेव्हा त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेणे आवश्यक आहे. आता सायंकाळचे सव्वासात वाजले आहेत. अजूनही काही सन्माननीय सदस्यांना यावर बोलायचे आहे. तेव्हा त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद संबंधित मंत्री महोदयांनी घ्यावी अशी विनंती आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, स्मार्ट सिटीच्या योजनेसाठी स्पेशल परपज कंपनी स्थापन करावी अशाप्रकारच्या केंद्र सरकारच्या गाईड लाईन्स आहेत. ऑक्ट्रॉय बंद झाल्यामुळे महानगरपालिकांचा कणा मोडलेला आहे. आता एलबीटी बंद झालेली आहे. अशा वेळेला महानगरपालिकांनी कोठून पैसे उभे करायचे अशी परिस्थिती आहे. एलबीटीचा पैसा बंद झाला त्यावेळी महानगरपालिकांना पैसा देण्यासाठी पेट्रोलवर सेस लावला. त्यावेळी सांगण्यात आले की,या रकमेमधून शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार आहे. पण प्रत्यक्षात तसे झाले नाही. एलबीटी बंद झाल्यामुळे महानगरपालिकांना दर महिन्याला जो पैसा द्यावा लागतो त्यासाठी ते पैसे द्यावे लागत आहेत. असे असताना पुणे महानगरपालिका 3500 कोटी रुपये कोठून उभे करणार आहे ? केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून पाच वर्षात 750 कोटी रुपये जमा होणार असले तरी उर्वरित 2500 कोटी रुपये कोठून उभे करणार आहेत याचे कोणतेही फायनान्शिअल मॉडेल आम्हाला दाखविण्यात आलेले नाही. हा पैसा उभारण्यासाठी कर्ज घेणार आहात काय, टॅक्सेस वाढविणार आहात काय ? हा सर्व बोजा पुणेकरांच्या माथी पडणार आहे काय ? तसेच महामुष्कीलीने ॲमिनिटीज स्पेस ताब्यात आलेल्या आहेत त्या ॲमिनिटीज स्पेस विकणार आहात काय ? 2500 कोटी रुपये ही फार मोठी रक्कम आहे. आपण ही रक्कम कोठून उभी करणार आहात ? आणि हा सर्व खर्च एका भागासाठी करणार आहात हे कोणालाही मान्य होण्यासारखे नाही. त्याबाबत आयुक्तांनी खुलासा करण्याची आवश्यकता आहे. तसेच मॅकेन्झी कंपनीने सर्वात जास्त रकमेची निविदा भरलेली असताना त्या कंपनीची निवड करण्यात आलेली आहे. मॅकेन्झी कंपनीने जो अहवाल दिलेला आहे तो अजून पर्यंत आमच्यापर्यंत आलेला नाही. तो अहवाल का दडवून ठेवण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

येत आहे ? या सर्व गोष्टींना आमचा आक्षेप आहे. कोणत्याही व्यक्तीला मग ती आमदार असो वा सामान्य नागरिक असो प्रत्येकाला आपली सिटी स्मार्ट झाली पहिजे असे वाटत असते.

....YY-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

कोणाचाही स्मार्ट सिटी योजनेला विरोध असण्याचे कारण नाही. पण या योजनेमध्ये फार मोठ्या प्रमाणावर त्रुटी राहिलेल्या आहेत. 74 व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी देण्याचे काम करण्यात आले. परंतु आता मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांवर घाला घातला जात आहे. कारण स्पेशल पर्पज कंपनी निर्माण होणार असल्यामुळे महानगरपालिकेवर किंवा तिच्या हक्कांवर गदा येणार आहे. 250 कोटी रुपये महानगरपालिकेलाच उभे करावयाचे असतील तर मग स्पेशल पर्पज कंपनी कशासाठी आहे ? एवढे सर्व असूनही जर राज्य सरकारला स्पेशल पर्पज कंपनी निर्माण करावयाची असेल तर त्या कंपनीमध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग असावयास पाहिजे. पूर्वी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कंपनीचे विलीनीकरण करुन पीएमपीएल ही स्पेशल पर्पज कंपनी स्थापन केली होती. परंतु त्या कंपनीच्या निर्णय प्रक्रियेत लोकप्रतिनिधींचा समावेश नाही. लोकप्रतिनिधींना कोणत्याही निर्णय प्रक्रियेत सामावून घेतले जात नाही, हे आम्ही अनुभवलेले आहे. एकदा कंपनी स्थापन झाल्यानंतर त्या कंपनीला महानगरपालिकेसारखे सर्व अधिकार देण्यात येतात. त्यामुळे त्या कंपनीला महानगरपालिकेसारखे अधिकार कशाला द्यावयाचे, हा माझा मूळ प्रश्न आहे.

सभापती महोदय, स्मार्ट सिटी योजना हा भूल-भूलय्या आहे. या योजनेच्या माध्यमातून लोकांची दिशाभूल करण्याचे काम सरकार करीत आहे. मी विचारु इच्छिते की, ही कंपनी नॉन प्रॉफीट कंपनी म्हणून नोंदविणार आहात काय की, ती प्रायव्हेट लिमिटेड कंपनी असणार आहे की, पब्लिक लिमिटेड कंपनी असणार आहे ? या कंपनीकडून लाभांश देण्याचे सुतोवाच आयुक्तांनी केले आहे. त्यामुळे ती कंपनी साहजिकच नफा कमविणार आहे. याचा महापालिकेला काय फायदा होणार आहे हे समजले पाहिजे. तसेच त्या कंपनीने किती नफा कमवावा हे कोण ठरविणार, हे सुध्दा ठरविले पाहिजे. जर त्या कंपनीला तूट आली तर ती तूट भरुन देण्याची जबाबदारी कोणाची हे देखील समजले पाहिजे. सभापती महोदय, स्पेशल पर्पज कंपनीला पर्याय असावयास पाहिजे. पुणे, मुंबईसारख्या महापालिका सक्षम आहेत. त्यांनी जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून आपल्या शहरांमध्ये हजारो कोटी रुपयांची कामे केलेली आहेत. त्यामुळे स्पेशल पर्पज कंपनी स्थापन न करता महापालिकांना स्वत:ला अधिकार दिले पाहिजेत. जर ही कंपनी सुरु

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

करायचे ठरविल्यास त्या कंपनीच्या संचालक मंडळावर लोकप्रतिनिधींची संख्या वाढविली पाहिजे. तसेच त्या कंपनीच्या दैनंदिन कामकाजामध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश असावयास पाहिजे, अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, या योजनेसाठी केंद्र व राज्य सरकारकडून मिळणारे अनुदान अतिशय तुटपुंजे आहे. पुणे आणि मुंबई महापालिकांचे हजारो कोटी रुपयांचे बजेट आहे. परंतु त्यांना या योजनेतून मिळणारे 100 कोटी रुपये अनुदान हे खूपच तुटपुंजे आहे. कारण 10 लाख लोकसंख्या असलेल्या शहराला 100 कोटी आणि 1 कोटी लोकसंख्या असलेल्या शहराला सुध्दा 100 कोटी अनुदान देण्यात येणार आहे. हा या योजनेतील विरोधाभास आहे. त्यामुळे या योजनेमध्ये असलेल्या त्रुटी राज्य सरकारने निश्चितपणे दूर केल्या पाहिजे. सर्व पक्षाच्या नेत्यांना एकत्र करुन या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला तर निश्चितपणे ही योजना यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही, एवढेच या निमित्ताने सांगते.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानते व माझे भाषण संपविते.

धन्यवाद. जय हिंद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी सन 2015-16 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मी नगर विकास विभागाच्या पृष्ठ क्र.81 वरील मागणी क्र.103 वर बोलत आहे. स्वच्छ भारत अभियानासाठी नागरी स्थानिक संस्थांना सहाय्य करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. या मध्ये नगरपालिका असतील, महानगरपालिका असतील त्यांच्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. आज राज्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शहरीकरण वाढत आहे, परिणामी त्या भागातील लोकसंख्या वाढत आहे. अनेक ठिकाणी ग्रामपंचायतीचे स्थांतर नगरपालिकांमध्ये होत आहे. हे करीत असताना त्या भागात कचऱ्याची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. त्यामुळे राज्य सरकारने जी तरतूद केली आहे ती अपुरी आहे. कारण कचऱ्यासाठी जागा उपलब्ध करुन देणे, ट्रिटमेंट प्लांट करणे, कचरा जिरविण्याची सोय करणे या बाबीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येतो. सभापती महोदय, पुणे शहरात कचऱ्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. फुरसुंगी गावात कचरा डेपो आहे. परंतु त्या गावातील लोक गावामध्ये कचरा टाकू नये म्हणून त्रास देतात. तशीच समस्या काही कालावधीनंतर नगरपालिका क्षेत्रात निर्माण होणार आहे. त्यामुळे कचऱ्याचा प्रश्न सोडविण्यासठी जी तरतूद करण्यात आलेली आहे ती अपूर्ण आहे. त्यामुळे ही तरतूद वाढविण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, आता मी पृष्ठ क्र.82 वरील बाब क्रमांक-104 वर बोलणार आहे. या मागणी अंतर्गत स्मार्ट सिटी अभियानासाठी महानगरपालिकांना सहाय्य करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. कालच पुणे महानगरपालिकेने स्मार्ट सिटीबाबत ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. माझ्या माहितीनुसार राज्यातील 10 शहरे ही स्मार्ट सिटीसाठी निवडली आहेत. पुण्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी पुणे महापालिकेने स्मार्ट सिटी योजनेत भाग घेण्याचा पहिला निर्णय घेतला. स्मार्ट सिटी योजनेत समावेश झालेल्या शहराला केंद्र सरकारकडून दरवर्षी 100 कोटी रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. तसेच 50 कोटी रुपये राज्य सरकार देणार आहे आणि महानगरपालिकेला 250 कोटी रुपयांचा हिस्सा द्यावा लागणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकार कंपनी स्थापन करणार आहे. या योजनेसाठी केंद्र सरकार

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले....

वार्षिक 100 कोटी रुपये प्रमाणे पाच वर्षात 500 कोटी रुपये देणार आहे. हे त्या कंपनीचे भाग भांडवल राहणार आहे. राज्य सरकारचे 50 कोटी रुपये आणि महापालिकेच्या हिश्शाचे 250 कोटी रुपये हे विकास कामासाठी वापरण्यात येणार आहेत.

सभापती महोदय, मागच्या सरकारने जेएनएनयुआरएम योजना सुरु केली. या योजनेतून पुणे शहरात 2700 कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला. त्यातून रस्ते, पाणी अशी विविध विकासात्मक कामे करण्यात आली. काल मी स्मार्ट सिटी योजनेचा करार वाचला. त्या करारामध्ये स्वच्छतेच्या बाबतीत असे नमूद केले आहे की, कचरा उचलण्याची जबाबदारी पूर्णत: महानगरपालिकेची राहणार आहे. याचा अर्थ त्या कंपनीने तो कचरा उचलायचा नाही. या योजनेच्या समितीचे अध्यक्ष आयुक्त होते. परंतु कालच सर्वपक्षीय नेत्यांनी निर्णय घेऊन महापौरांना अध्यक्ष केले. त्या समितीमध्ये सर्वपक्षीय 8 नगरसेवक आणि उर्वरित 7 सदस्य हे बाकीचे असणार आहेत. या योजनेच्या अनुषंगाने चर्चा करीत असताना माननीय मुख्यमंत्री आणि सर्वपक्षीय सदस्यांना विनंती आहे की, स्मार्ट सिटी करीत असताना सर्व नेते मंडळींनी एकत्र बसून या योजनेच्या बाबतीत चर्चा केली पाहिजे. स्मार्ट सिटी योजनेला यशस्वी करीत असताना कोणते प्रश्न उद्भवणार आहेत, यावर त्यांनी साधकबाधक चर्चा केली पाहिजे. आज या योजनेंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या कंपनीच्या बाबतीत राज्यामध्ये आणि महापालिकांमध्ये गैरसमज निर्माण झालेले आहेत. त्यामुळे हे गैरसमज दूर करण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांना एकत्र येऊन काही तरी चांगला निर्णय घ्यावा लागेल. तसेच कंपनी करावयाची की नाही, या बाबत सुध्दा निर्णय घ्यावा लागेल. काल पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी 2900 कोटी रुपयांचा आराखडा सादर केला. त्यांनी आम्हाला अगोदरच्या दिवशी सांगितले की, राज्याच्या काही योजनेतून शहरामध्ये 3500 कोटी रुपयांची कामे झाली आहेत. त्यांनी असेही सांगितले की, अजूनही विकासात्मक कामावर अन्य योजनांतून निधी खर्च करण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या योजनेतून सुध्दा हा खर्च करण्यात येणार आहे. कर्ज घेणे हा महापालिकेचा अधिकार आहे तसाच राहणार आहे. उद्या या कंपनीच्या माध्यमातून जमीन गहाण ठेवली जाणार नाही अशा उप सूचना आलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले....

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

सभापती महोदय, या सर्व बाबी करीत असताना सदरहू कंपनी त्या भागाचा विकास करणार आहे. एका भागात 39 हजार लोक राहतात आणि पुणे शहरात 40 लाख लोक राहतात. राज्य सरकारने एल.बी.टी. रद्द केल्यामुळे महापालिकेचे उत्पन्न कमी झाले आहे. आता महापालिकेला उत्पन्नाचा दुसरा मार्ग राहिलेला नाही. त्यामुळे राज्य सरकारने महापालिकेच्या स्मार्ट सिटी व्यतिरिक्त, अन्य नवीन योजनांच्या माध्यमातून काही तरी आर्थिक तरतूद केली पाहिजे.

..2झेड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले ....

जेणेकरून आपल्याला भविष्य काळात मुंबई असेल, पुणे असेल, नागपूर असेल फायदा होईल. त्यामुळे या दृष्टीने आपल्याला पुण्यालाही महत्व दिले पाहिजे. आयटी सेक्टर असेल, अनेक कॉलेजेस असतील, पुण्यात बाहेरच्या लोकांची संख्या वाढत चालली आहे. स्मार्ट सिटीबाबत सर्वांनी विश्वासात येऊन बसून निर्णय केला पाहिजे. काल पुणे मनपाचा ठराव आला असेल. माझ्या माहितीप्रमाणे आयुक्तांनी तो दिल्लीला दाखल केला. आपण याबाबत पुनर्विचार करून सर्वांनी एकत्र बसले पाहिजे. कंपनीबाबत सर्वांचा गैरसमज आहे, त्याबाबत विचार केला पाहिजे. केंद्र सरकारचे 100 कोटी रूपये आणि राज्य शासनाचे 50 कोटी रूपये याकरिता सर्व गहाण ठेवायचे का, ही कंपनी ठेवायची का ? उद्या मनपा स्वत:च्या पैशावर या स्मार्ट सिटीपेक्षा चांगला प्रस्ताव करू शकते. स्मार्ट सिटी पाहिजे म्हणून आदरणीय साहेब व आदरणीय दादांनी सांगितले आणि त्या पध्दतीने आम्ही या स्मार्ट सिटीमध्ये भाग घेतला आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 82, बाब क्रमांक 106 - नगरपरिष्देतील तीर्थक्षेत्रांकरिता तरतूद केली आहे. माझ्या जिल्ह्यात आळंदी, देहू या ठिकाणांसाठी तरतूद करण्यात आली आहे. ती तरतूद 28 कोटी रूपयांची असून कमी आहे. आळंदीला पालखीची सुरूवात होते, त्याकरिता स्पेशल आराखडा तयार करून या नगरपालिकांना निधी दिला पाहिजे. देहू, आळंदी या नगरपालिकांना 28 कोटी रूपयांपेक्षाही जास्त पैसे लागणार आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या बाबतीत योग्य तो निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, गृह विभाग - पृष्ठ क्रमांक 14, बाब क्रमांक 12 - मे. पवनहंस हेलिकॉप्टर लिमिटेडकडून राज्यातील नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये टेहळणी करण्यासाठी भाड्याने घेतलेल्या हेलिकॉप्टर्ससाठी 10 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. माझी विनंती आहे की, राज्यात कोणत्याही ठिकाणी आपत्तीमध्ये सदर कंपनीच्या हेलिकॉप्टर्सचा वापर करण्याकरिता त्या दृष्टीने या तरतुदीत अजून वाढ करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले ....

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभाग - पृष्ठ क्रमांक 172, बाब क्रमांक 193 - राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेखालील तूट भरून काढण्यासठी अर्थसहाय्य करण्याकरिता 300 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. दारिद्र्यरेषेखालील लोकांना शिधा वाटप दुकानामध्ये अन्नधान्य मिळत नाही. नेहमीच अन्नधान्याचा तुटवडा असतो, त्यासाठी शासनाने विशेष नियोजन केले पाहिजे आणि याचा उपयोग झाल पाहिजे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग - पृष्ठ क्रमांक 220, बाब क्रमांक 258 - राज्य कामगार विमा योजना, रूग्णालय यांना पुरवठा व सामुग्रीसाठी 15 कोटी 61 लाख रूपयांच्या अतिरिक्त अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. कामगार विमा योजनेकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे ती बंद पडली आहे. त्यामुळे याकडे प्रामुख्याने लक्ष देऊन ही योजना सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा. एवढे बोलून मी थांबतो.

श्री. प्रकाश महेता : सभापती महोदय, आपण रूलिंग दिले होते की, सायंकाळी साडे सात वाजेपर्यंत सन्माननीय सदस्य चर्चा करतील आणि अर्ध्या तासात विभागांचे माननीय मंत्री उत्तर देतील आणि रात्री आठ वाजता सभागृह स्थगित करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. रामहरी रूनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलताना मी पहिल्यांदा महसूल व पुनर्वसन विभाग - बाब क्रमांक 30, पृष्ठ क्रमांक 34 वर बोलणार आहे. मी पुरवणी मागण्यांच्या चर्चेमध्ये शासन चुकीच्या पध्दतीने निर्णय घेऊन किती महसूल बुडवत आहे हे निदर्शनास आणणार आहे.

सभापती महोदय, मी माननीय महसूल मंत्र्यांना निवेदन दिले आहे की, सोलापूर जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात वीट भटट्यांचा धंदा 11 व्या शतकापासून सर्व कुंभार करत आहेत. मात्र फक्त सोलापूर जिल्ह्यात 10 लाख रूपयांची चिमणी बसविल्याशिवाय वीट भटट्यांचा धंदा करू देणार नाही असे सांगितले आहे. त्यामुळे तेथील वीट भट्ट्यांचा धंदा बंद आहे. पुणे, सातारा, सांगली येथे सर्व ठिकाणी वीट भट्ट्या सुरू आहेत. सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. तुकाराम मुंढे साहेब यांनी अजब नियम काढला आहे की, 10 लाख रूपयांची चिमणी बसविली पाहिजे. मी स्वत: भेटून सांगितले की, वीट भट्टी ही काही इंडस्ट्री नाही. 2 लाख लोकांचा उद्योग सध्या बंद आहे. शेजारच्या जिल्ह्यात नदीच्या पलीकडे पुणे जिल्ह्यात वीट भट्टयांचा धंदा सुरू आहे. पुणे, सातारा जिल्ह्यात वीट भट्टयांचा धंदा सुरू आहे, सोलापूरात नाही. माझे एकच सांगणे आहे की, वीट भट्टया सुरू झाल्यावर मातीची रॉयल्टी मिळेल आणि सरकारचे उत्पन्न वाढेल. लोकांना रोजगार मिळेल. 2 लाख लोक बसून आहेत. तो काही 2 नंबरचा धंदा नाही, कसलीही हेराफेरी नाही. विनाकारण लाकांना वेठीस धरले आहे. सरकारपुढे अनेक वेळा हा विषय मांडून सुध्दा साधे प्रश्न सुटत नाहीत. माझी एक मागणी आहे की, सर्व जिल्ह्यांत सारखा न्याय व्हावा. वीट भट्ट्यांबाबत आपले कोणतेही धोरण ठरवा, पण ते सर्व जिल्ह्यांना सारखे पाहिजे. एका जिल्ह्याला एक अधिकारी वेठीस कसा धरू शकतो ?

सभापती महोदय, शासनाचे वाळूबाबतही धोरण नाही, त्यातून करोडो रूपये मिळण्यासारखे आहेत. पण शासनाचे निश्चित असे धोरण नाही. त्यामुळे सरकारला महसूल मिळत नाही. पुरवणी मागण्यांमध्ये सरकारने आपले सोर्सेस काय आहेत हे पाहिले पाहिजे. सरकारला विनंती आहे. तुम्ही खंडकरी जमीन मालकाला शेती महामंडळाची शेती दिली. पण शेती महामंडळातील पाण्याचा

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. रामहरी रूपनवर ....

ठराव करून एक हक्क दिला नाही. परिणामी त्या जमिनीला पाणी नाही म्हणून उत्पन्न नाही. शासनाचे निर्णय लांबत आहेत म्हणून केवळ हे होत आहे. मी महसूल व पुनर्वसन विभागाच्या बाब क्रमांक 30, पृष्ठ क्रमांक 34 बाबत बोलत आहे. काही गावे अशी आहेत की, त्या गावास गावठाण नाही. ग्रामपंचायत 25 वर्षांपूर्वी झाली. लोकसंख्या 5 हजार आहे. मात्र गावाला एक गुंठा गावठाण नाही. राज्यामध्ये कसे शक्य आहे ? आम्ही गावठाण मागतो. लोक तेथे राहत आहेत, त्यांचे क्रमित केले पाहिजे आणि घरपट्टी घेतली पाहिजे. शेवटी महसूल सरकारला मिळणार आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे महसूल मिळत नाही.

सभापती महोदय, कृषी, पशु संवर्धन विभाग - बाब क्रमांक 56, पृष्ठ क्रमांक 55 - ठिबक योजना महत्त्वाची आहे. पश्चिम महाराष्ट्रात सर्वांत जास्त कमी पाऊस पडला आहे. मात्र ठिबक योजनेला प्रोत्साहन देण्याऐवजी ती बंद केली. ठिबकची सबसिडी कमी केली. चुकीचे धोरण होत आहे. कृषी प्रयोग उद्योगाबाबत काहीही हालचाल नाही. केंद्र सरकारचा भरपूर पैसा येत आहे. मात्र तो नियोजनाअभावी परत जात आहे. कृषी प्रयोग उद्योगाचे धोरण ठरविले पाहिजे. शेती मालाच्या दराबाबत विचार केला पाहिजे. सध्या दुष्काळासाठी डिझेल, पेट्रोलवर 2 रूपये टॅक्स लावला आहे, पण दुष्काळ कुठेच जाहीर केला नाही. आता शेतकऱ्याने काय करायचे ? दुष्काळासाठी आमच्या खिशातून प्रत्येक लिटरला 2 रूपये घेतले, मात्र दुष्काळ जाहीर केला नाही. पुरवणी मागण्यांमध्ये याचा विचार झाला पाहिजे असे माझे मत आहे.

....3A

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रूपनवर.....

सभापती महोदय, राज्यातील ऊसाची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. महागाईचा दर तिपटीने वाढला आहे. 3 वर्षापूर्वी आम्ही ऊसाला टनाला 2700 रूपये भाव घेत होतो. आता तो 900 रूपयांवर आला आहे. एवढी विचित्र अवस्था आहे. सोलापूर जिल्ह्यात 32 साखर कारखाने आहेत आणि पश्चिम महाराष्ट्रात 200 कारखाने आहेत. ही कारखानदारी कोलॅप्स झाली तर राज्य शासनाला या माध्यमातून मिळणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील महसुलाला मुकावे लागणार आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 200, पान क्रमांक 179 यावर बोलत असताना भटक्या, विमुक्तांच्या आश्रमशाळांना वेळेवर अनुदान मिळत नाही, शिक्षकांना पगार मिळत नाही, ही बाब मी निदर्शनास आणीत आहे. हे अनुदान आणि पगार वेळेवर मिळाले पाहिजे. त्या ठिकाणी आठवी पर्यंत वर्ग आहेत, काही तालुक्यांमध्ये एक शाळा आहे, त्या ठिकाणी 9 वी चा वर्ग नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत शिक्षण घेऊन थांबावे लागते. नैसर्गिक वाढीनुसार नियमाप्रमाणे 9 वी च्या वर्गाला परवानगी दिली पाहिजे आणि भटक्या व विमुक्तांच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली पाहिजे.

सभापती महोदय, अहिल्याबाई होळकर पुरस्कार योजना या सरकारने सुरु केली. पण ती मधूनच खंडित केली आहे. धनगर समाजाला आरक्षण नाही, हे मी समजू शकतो. परंतु, पुरस्कार देण्याचेही बंद केले आहे. जिल्हा स्तरावर, राज्य स्तरावर पुरस्कार वितरण नियमितपणे होत नाही. यापूर्वी पुजा होत होती, तीही बंद केली आहे. अहिल्याबाईंचे नाव यादीतून वगळून टाकले आहे. एवढी मोठी चीड आणणारी ही गोष्ट आहे. मी हे निदर्शनास आणून देत आहे की, ही योजना सुरु केली पाहिजे.

सभापती महोदय, धनगर समाजाला आरक्षण देण्यासाठी केंद्र शासनाला एक शिफारस करावयाची आहे. सत्तेवर येण्यापूर्वी पहिल्या दिवशी आरक्षण देऊ, असे आपण जाहीर केले. परंतु, आता आपण धनगड आणि धनगर या आरक्षणाचा अभ्यास करण्याचे काम टाटा सोशल सायन्सेस यांच्याकडे दिले आहे. बिहार सरकारने भाषा विभागाचा अभिप्राय घेऊन आरक्षण दिले.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रूपनवर.....

यापूर्वी छत्तीसगड, ओरिसा या राज्यांनी धनगर समाजाला आरक्षण दिलेले आहे. मागील दोन महिन्यांपूर्वी या घटना घडल्या आहेत आणि आपला महाराष्ट्र प्रतिगामी होत आहे. एखाद्या जातीला आरक्षण द्यावयाचे की नाही, याचा अभ्यास करण्याचे काम आपण टाटा सोशल सायन्सकडे दिले, याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. मोटारी बनविण्याचे काम करणाऱ्या टाटा सोशल सायन्सेसला आपण आरक्षणाचे काम दिले आहे ? समाजामध्ये याबाबत फार मोठ्या प्रमाणावर चिडीची भावना आहे. आपण एकवेळ आरक्षण देऊ नका पण या समाजाची चेष्टा तरी करु नका. एवढे तरी सरकारने केले पाहिजे.

सभापती महोदय, उद्योग विभागाच्या बाब क्रमांक 324, पृष्ठ क्रमांक 271 च्या अनुषंगाने माझा एक छोटा मुद्दा आहे. आपण कौशल्य विकासाची चांगली योजना काढली आहे, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. परंतु, ती अपुरी आहे. आता आपण आय.टी.आय. कॉलेजेसना मान्यता दिली पाहिजे. क्रमिक शाळांना अनुदान देत असताना व्यावसायिक शिक्षणाच्या शाळांना अनुदान दिले जात नाही, हे बरोबर नाही. या शाळा मुलांना पोट भरण्याचे साधन मिळवून देणाऱ्या आहेत. शिक्षण पूर्ण केल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांना नोकरी मिळणार आहे. या शाळांना आपण अनुदान देणार आहात की नाही ? व्यवसाय शिक्षणाच्या शाळा फार महत्वाच्या आहेत. क्रमिक शाळांना अनुदान देण्याचे आपण मान्य करता आणि व्यवसाय शिक्षणाच्या शाळांना देत नाही. राज्यात उद्योग कसे उभे राहणार आहेत ? आपण कुशल कामगार कसे तयार करणार आहात ? आपण राज्यात उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करीत आहात आणि दुसरीकडे कुशल कामगार नसल्यामुळे उद्योग उभे रहात नाहीत. त्यामुळे या शाळांना अनुदान देऊन त्या सक्षम केल्या पाहिजेत, असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 192, पृष्ठ क्रमांक 172 वर मी बोलणार आहे. सध्या महागाई वाढलेली आहे, जीवनावश्यक वस्तुंचे भाव वाढले आहेत.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रूपनवर.....

यापूर्वी रेट होल्डिंग कंट्रोल ॲक्ट होतो, तो शासनाने रद्द केला आहे. त्यामुळे व्यापारी साठा करु लागले आहेत. हा ॲक्ट रिव्हाईज करावयास हवा होता. तो केला नाही म्हणून तुरीचा भाव 70 रूपयांवरून 200 रूपयांवर आला आहे. आता तरी सरकार या मध्ये बदल करून काही कंट्रोल आणणार आहे की नाही ?

सभापती महोदय, मी मांडलेल्या सूचनांचा शासनाने विचार करावा आणि हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा, अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)

तालिका सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांना मी बोलण्याची संधी देणार आहे. परंतु, सन्माननीय सदस्यांनी आपले मुद्दे थोडक्यात मांडावेत.

आता सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 89, पृष्ठ क्रमांक 71 अन्वये पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीसाठी 1 कोटी 13 लक्ष 54 हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या राज्यामध्ये प्रत्येक वर्षी किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यावयाची आहे, ही संख्या ठरलेली आहे, शिष्यवृत्ती कोणत्या दराने द्यावयाची आहे, हे सुध्दा ठरलेले आहे. त्यामुळे ही बाब पुरवणी मागण्यांमध्ये न येता वार्षिक नियोजनात यावयास हवी, असे मला वाटते. सर्व विद्यार्थ्यांसाठी पूर्ण रकमेची तरतूद व्हावयास हवी होती. गेल्या अनेक वर्षांपासून आपण शिष्यवृत्ती देत आहोत. परंतु, एवढ्या वर्षात शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ झालेली नाही. या निमित्ताने माझी शासनाला अशी विनंती आहे की, 100 रुपये आणि 150 रुपये या शिष्यवृत्ती दरामध्ये शासनाने वाढ करावी. शिक्षण मंत्री महोदय सकारात्मक आहेत. त्यांना असे वाटते की, विद्यार्थ्यांना भरघोस फ्रीशिप मिळाली पाहिजे. त्यानुसार त्यांनी या रकमेत वाढ करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा विषय असा आहे की, आपण जी शिष्यवृत्ती देत आहोत ती शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्याला मिळाली तर शिष्यवृत्तीच्या रकमेतून त्या विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य घेता येईल आणि त्यांना या पैशांचा उपयोग होऊ शकेल.

सभापती महोदय, शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 90, पृष्ठ क्रमांक 72 वर बोलत असताना मला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या राज्यामध्ये उच्च माध्यमिक 936 वाढीव पदांना आपण मान्यता दिली होती. परंतु, त्यांना वेतन मिळाले नव्हते. मी शिक्षण मंत्री महोदयांना धन्यवाद देईन की, ज्या शिक्षकांना शिक्षण उपसंचालकांनी मान्यता दिलेली आहे, अशा मान्यताप्राप्त

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

शिक्षकांना, ज्यांची संख्या 334 आहे, त्यांच्यासाठी 13 कोटी, 92 लक्ष, 20 हजार रूपयांची तरतूद तुम्ही केलेली आहे, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. परंतु, 936 पैकी 334 शिक्षकांचा प्रश्न सुटला असला तरी अन्य शिक्षकांच्या बाबतीत बजेटच्या अधिवेशनामध्ये पूर्ण वेतनाची तरतूद होईल, या दृष्टीकोनातून आपण सकारात्मक विचार करावा, अशी विनंती आहे. ज्या 334 पदांना वेतन दिले आहे ती पदे सन 2008-2009, सन 2009-2010, सन 2010-2011 या काळातील आहे. सन 2011-2012, सन 2012-2013, सन 2013-2014 आणि सन 2014-2015 या पाच वर्षातील एकाही पदाच्या प्रस्तावांना शासनाने मान्यता दिलेली नाही. माझी अशी विनंती आहे की, त्या त्या वर्षातील पदांना त्याच वर्षात मान्यता देण्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा.

सभापती महोदय, शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 87, पृष्ठ क्रमांक 71 अंतर्गत वेतनावरील खर्चासाठी 145 कोटी 86 लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. शिक्षकांना वेळेवर वेतन मिळाले पाहिजे, त्यासाठी शासनाने तरतूद केली आहे, त्याबद्दल मी या सरकारचे अभिनंदन करतो. परंतु, ज्या शिक्षकांना उशिरा मान्यता मिळते त्या शिक्षकांची मागील महिन्यांची देयके सप्लिमेंटरी बिले म्हणून गणली जातात आणि ती चार-सहा महिने मंजूर केली जात नाहीत. वास्तविक पाहता, ही नियमित पगाराची थकबाकी असते. त्यामुळे त्या देयकांना नियमित देयके समजली पाहिजेत आणि मंजूर केली पाहिजेत. नियमित वेतन जर त्यांना चार-सहा महिने किंवा वर्ष-दोन वर्षे मिळत नसेल तर ते बरोबर नाही. त्यामुळे नियमित वेतनातील थकबाकीच्या संदर्भात पुरवणी देयक गणले जाणे, याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट केली पाहिजे आणि त्यांना ही देयके तातडीने कशी मिळतील, या दृष्टीकोनातून उपाययोजना केली पाहिजे. मेडिकलच्या बिलांची सुध्दा अशीच अडचण आहे, ती देयके देखील कशी लवकर मिळतील, यादृष्टीकोनातून शासनाने दखल घ्यावी.

सभापती महोदय, क्रीडा विभागाच्या बाब क्रमांक 95, पृष्ठ क्रमांक 73 अन्वये क्रीडा संकुलांसाठी 10 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. क्रीडा विकासासाठी शासन प्रयत्न करीत आहे आणि निधीची तरतूद देखील करीत आहे. परंतु, सध्या अस्तित्वात असलेली तालुका क्रीडा संकुले

...6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

किंवा जिल्हा क्रीडा संकुले यावर आतापर्यंत किती निधी खर्च झाला, कोणकोणत्या ठिकाणी निधी देण्यात आला आणि खरोखरच या निधीचा योग्य विनियोग झाला का की, केवळ नावाला क्रीडा संकुले आहेत, याची चौकशी शासनाने केली पाहिजे. असा अनुभव आहे की, या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा विकास झालेला नाही, त्या ठिकाणी कोच नाही, विद्यार्थी खेळण्यासाठी येत नाहीत. एकदा शासनाने या बाबींचा आढावा घेणे गरजेचे आहे. कोणत्या क्रीडा संकुलांवर किती खर्च झाला आहे, त्यामधून आऊटपुट काय मिळाला आहे, हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, पालघर जिल्हा होऊन एक वर्षाचा कालावधी झाला आहे. परंतु, या तालुक्यामध्ये किंवा जिल्ह्यामध्ये क्रीडा संकुल नाही. या ठिकाणी जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धामध्ये भाग घेऊन नैपुण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या सरकारने काल चांगली योजना आणली आहे. ज्या शाळा चांगल्या प्रकारचे क्रीडा नेतृत्व सिध्द करतील, गुणवत्ता सिध्द करतील त्या पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाने येणाऱ्या शाळांना भरीव आर्थिक मदत देण्याची घोषणा सरकारने केलेली आहे.

...BBB-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

परंतु, आमच्या तालुक्यात क्रीडा स्पर्धाच होत नाहीत. पालघर जिल्हा आदिवासी जिल्हा आहे. यावर्षी पालघर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी क्रीडा स्पर्धांची योजनाच नाही. पालघर जिल्ह्याची निर्मिती होऊन आता एक वर्ष झालेले आहे. पालघर जिल्ह्यात क्रीडा अधिकारी नाही, क्रीडा स्पर्धा होत नाहीत. मग त्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात कशा प्रकारे प्रगती करावयाची ? म्हणून शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब 214, पृष्ठ क्र.183, सामाजिक न्याय विभाग- सामाजिक न्याय विभागाने पुरवणी मागणीद्वारे वेतनासाठी 86 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. परंतु, सामाजिक न्याय विभागाच्या ज्या विशेष शाळा आहेत त्या शाळांमध्ये मागील 10 वर्षापासून जे अर्धवेळ शिक्षक काम करतात त्यांना जुन्या वेतनश्रेणी प्रमाणेच अर्धवेळ शिक्षकाचे वेतन मिळते. त्यांना अद्याप सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही. जवळपास 40 ते 42 अर्धवेळ शिक्षक आहेत. आयुक्तांचा प्रस्ताव येऊन आज 3 वर्षे झालेली आहेत. हे 42 कर्मचारी काम करतात. परंतु, ते फक्त अर्धवेळ आहेत. म्हणून त्यांना वेतनश्रेणीचा लाभ द्यावयाचा नाही काय ? याबाबत तातडीने विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यात सामाजिक न्याय विभागाच्या फक्त 4 आश्रमशाळा आहेत. परंतु, एकाही शाळेतील कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळत नाही. माझे संबंधित खात्याला आवाहन आहे. त्या आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना 3 महिन्यातून एकदा वेतन मिळते. त्यांना जून महिन्याचा पगार सप्टेंबर महिन्यात मिळतो आणि सप्टेंबर महिन्याचा पगार आता जानेवारी महिन्यात मिळेल. हे एका वर्षाचे नाही. मी मागील 4 वर्षापासून या संदर्भात सातत्याने डीपीडीसीमध्ये भांडत आहे. या संदर्भात अनेक बैठका झालेल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाचे सचिव श्री.बक्षी साहेबांनी या संदर्भात अनेक बैठका घेतल्या आणि निर्देश दिले. परंतु, त्यांनी निर्देश देऊनही सामाजिक न्याय विभागाच्या आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळत नाही. त्यांना वेळेवर वेतन देण्याच्या संदर्भात कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

सभापती महोदय, अनुदानित वसतिगृहांचा विषय आहे. आपणही त्यासाठी संघर्ष करीत आहात. अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना अद्याप देखील केवळ मानधन मिळते. शासकीय वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी मिळते आणि अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना मात्र मानधन मिळते. म्हणून केव्हा तरी त्यांचाही विचार होण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात अनेक बैठका झालेल्या आहेत. माननीय सभापतींनी देखील या संदर्भात निर्देश दिलेले आहेत. माननीय वित्तमंत्र्यांनी त्याला संमती दिलेली आहे. परंतु, ती फाईल मात्र पुढे जात नाही, याचाही गांभीर्याने विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्र.34 ते 42, पृष्ठ क्र.34 ते 36- माझी महसूल विभागाच्या संदर्भात माननीय महसूल मंत्री, माननीय सभागृह नेते श्री.एकनाथराव खडसे साहेबांकडे महत्वाची मागणी आहे. आपण प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तहसीलदाराचे पद निर्माण केले आहे. राज्यात अनेक तालुके मग ते आदिवासी भागातील असतील किंवा बिगर आदिवासी भागातील तालुके असतील. त्या तालुक्यांना ग्रामीण भाग देखील जोडलेला आहे आणि शहरी भाग देखील जोडलेला आहे. महसुली कामाच्या संदर्भात शहरी भागातील आणि ग्रामीण भागातील नागरीकांना तालुक्याच्या ठिकाणी तहसीलदारांकडे जावे लागते. त्यांना कधी कधी तर 10-10 फेऱ्या माराव्या लागतात. परंतु, तरीही त्यांचे काम होत नाही. म्हणून याचे कोठे तरी विभाजन होण्याची आवश्यकता आहे. पालघर जिल्ह्यात वसई तालुका आहे. वसई शहर खूप मोठे आहे. वसई तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांची कामे चेळेवर होऊ शकत नाहीत. म्हणून ज्या तालुक्यांमध्ये ग्रामीण आणि शहरी भाग आहे त्या ठिकाणी ग्रामीण भागासाठी वेगळा तहसीलदार आणि शहरी भागासाठी वेगळा तहसीलदार असला पाहिजे. आता संपूर्ण तालुक्यासाठी एकच तहसीलदार आहे. या निमित्ताने माझी आग्रहाची मागणी आहे की, सर्व सामान्य नागरीकांना दिलासा देण्यासाठी तालुका स्तरावरील तहसीलदार कार्यालयात एक तहसीलदार पद असावे आणि एक अतिरिक्त तहसीलदार असे नवीन पद निर्माण करावे. यामुळे शासनावर थोडा आर्थिक बोजा पडेल. परंतु, शासनाच्या सर्व योजना सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मग ते शहरी भागातील असतील, ग्रामीण भागातील

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

असतील किंवा आदिवासी दुर्गम भागातील असतील, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी याचा चांगला उपयोग होऊ शकतो. माननीय महसूल मंत्र्यांनी याचा जरूर विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

धन्यवाद.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्र.80, पृष्ठ क्र.80, नगर विकास विभाग- मागील 5-6 वर्षांपासून म्हणजे सन 2009 पासून ठाणे जिल्ह्यातील विधीमंडळ सदस्य, लोक प्रतिनिधी ठाणे मेट्रो प्रकल्पा संदर्भात शासनाकडे वारंवार मागणी करीत आहेत. मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक 8 एप्रिल, 2015 रोजी ठाणे मेट्रो प्रकल्पाचे भूमिपूजन याच वर्षी होईल, असे सभागृहात घोषित केले होते. आता 2015 हे वर्ष संपत आले आहे. परंतु, याबाबत आजतागायत पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नाही. ठाणे शहरातील नागरीक मुंबई शहरात रोजंदारीसाठी येतात. म्हणून ही मेट्रो लवकरात लवकर होणे अतिशय गरजेचे आहे. ठाणे शहरावर कोणताही दुजाभाव होऊ नये आणि ठाणे मेट्रो प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लागावा, अशी मी मुख्यमंत्री महोदयांना पुरवणी मागणीच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्र.80, पृष्ठ क्र.80, नगरविकास विभाग- ठाणे येथे कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात यावे अशी ठाणे शहरातील जनतेची मागणी आहे आणि आम्ही सातत्याने ती मागणी सभागृहात मांडलेली आहे. मागील अधिवेशनात मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, आम्ही याबाबत एका महिन्यात कार्यवाही करु आणि हॉस्पिटल बांधण्याचे काम सुरु करु माननीय मंत्री श्री.रवींद्र वायकर साहेब सभागृहात उपस्थित आहेत. आपण मुंबईचे प्रतिनिधीत्व करता. टाटा कॅन्सर हॉस्पिटलवर किती लोड आहे याची आपल्याला कल्पना आहे. त्यामुळे आमची अशी मागणी आहे की, टाटा हॉस्पिटलचेच कॅन्सर हॉस्पिटल ठाणे शहरात झाले तर पीडित रुग्णांना चांगली सेवा मिळू शकेल. याबाबतीत देखील लवकरात लवकर कार्यवाही व्हावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र.103, पृष्ठ क्र.81, नगर विकास विभाग- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सर्व्हिस टॅक्समध्ये 5 टक्के वाढ करण्यात आली होती. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 5 टक्के वाढ केली गेली आणि आता आपण पुरवणी मागणीद्वारे 461 कोटी 11 लाख रुपयांची तरतूद करीत आहात. याबाबत माझ्या मनात एक प्रश्न चिन्ह आहे. यामध्ये 200 कोटी रुपये केंद्र शासनाचा

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे.....

हिस्सा आहे. राज्य शासनाचा 193 कोटी 11 लाख रुपयांचा हिस्सा आहे. आपण 68 कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी करीत आहात. ही 68 कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी कशासाठी करण्यात आली आहे याबाबत खुलासा व्हावा. आपण मागील वेळी बजेटमध्ये तरतूद करु शकलो नाही म्हणून आपण पुरवणी मागणीद्वारे 461 कोटी 11 लाख रुपयांची मागणी करीत आहात. पुढील वर्षीच्या बजेटमध्ये देखील एवढ्याच रकमेची मागणी असणार आहे, त्यामध्ये वाढ होणार आहे का ती मागणी कमी होणार आहे ? राज्यातील जनता 5 टक्के सर्व्हिस टॅक्स भरत आहे. मग आपण स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून जी मागणी करीत आहात ते डबल टॅक्सेशन नाही काय ? आपण राज्यातील जनतेवर डबल टॅक्स लावत आहोत काय याबाबत मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र.96, पृष्ठ क्र.73, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग- कुस्ती व तालिम केंद्रांचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्यात यावी यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आली आहे. तथापी राज्यातील युवकांसाठी शासनाने दिनांक 14 जून, 2012 रोजी युवा धोरण जाहीर केले होते. सभागृहातील सर्व पक्षीय सनमाननीय सदस्यांनी शासनाकडे युवा धोरणाच्या संदर्भात मागणी केली होती. परंतु, 3 ते 4 वर्षे कालावधी होऊनही युवा धोरणाबद्दल शासनाकडून आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. किंबहुना प्रशासकीय पातळीवर हा प्रस्ताव पडून आहे. युवा धोरणाच्या बाबतीत शासनाने सुस्पष्ट अहवाल सभागृहात मांडावेत, अशी मी पुरवणी मागणीच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो. सन 2020-25 पर्यंत युवकांच्या सख्येत वाढ होणार आहे असे आपण म्हणतो. आज सोशल मीडिया देखील मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. म्हणून काळानुरुप युवा धोरण आखून या संदर्भात मंत्री महोदयांनी सभागृहाला माहिती द्यावी, अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्र.128, पृष्ठ क्र.104, सार्वजनिक बांधकाम विभाग- जिल्हा मार्ग व पूल यांच्या बांधकामावरील खर्च भागविण्यासाठी पुरवणी मागणीद्वारे आर्थिक तरतूद उपलब्ध करण्यात आली आहे.

..3C-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे...

तथापि रायगड जिल्ह्यातील गृप ग्रामपंचायत नाथे महाड येथील काळेसे ते नाथे या गावातील जोड रस्ता पुलाच्या कामासाठी शासनाने सन 2008 मध्ये मंजुरी दिली होती. ती मंजुरी प्रदान केल्यानंतर 40 टक्के काम पूर्ण झाले आहे, उर्वरित काम सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी व निधी अभावी प्रलंबित आहे. परिणामी त्या परिसरातील ग्रामस्थांना रहदारीच्या दृष्टीकोनातून अतिशय अडचणीचे झाले आहे. वेळप्रसंगी दोन दोन दिवस लोकांना त्या बाजूला मुक्काम करावा लागतो.

सभापती महोदय, भारताचे पहिले अर्थमंत्री स्वर्गीय सी.डी.देशमुख यांचे हे गांव आहे. तसेच वनराईचे प्रणेते स्वर्गीय मोहन धारिया यांचे जन्मगांव आहे. यासंदर्भातील मागणी मी मंत्री महोदयांकडे केलेली आहे. पालकमंत्री महोदयांच्या निदर्शनास ही बाब आणून देण्यात आली आहे. त्यामुळे गृप ग्रामपंचायत नाथे तालुका महाड जिल्हा रायगड येथील काळोसे ते नाथे गांव जोडरस्ता पुलाच्या कामासाठी कृपया सुधारित प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मागणी मी सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांकडे करीत आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभाग बाब क्रमांक 283 पृष्ठ क्रमांक 241 वर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, या बाबीद्वारे वित्तीय वर्षात शासकीय वसतीगृहांसाठी निर्वाह भत्ता आणि शालेय गणवेश व अन्य शैक्षणिक बाबींसाठी निधीच्या पुरवणी मागणीद्वारे तरतूद करण्यात आली आहे. तथापि ठाणे पूर्व येथील कोपरी कॉलनी भागात असलेल्या साईनाथ को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या सातव्या मजल्यावर आदिवासी मुलींसाठी वसतीगृह आहे. या वसतीगृहाची स्थिती आता अतिशय दयनीय झालेली आहे. दिनांक 6 ऑक्टोबर रोजी वसतीगृहाच्या छताचा एक भाग अचानकपणे कोसळला होता त्या दुर्घटनेत एक विद्यार्थीनी गंभीर जखमी झाली होती. ठाणे महानगरपालिकेने या इमारतीला धोकादायक असल्याची नोटीस लावलेली आहे. माननीय आदिवासी मंत्री महोदयांचे मी अभिनंदन करीन की, त्यांनी या वसतीगृहला सप्टेंबर महिन्यात अचानक भेट दिली होती व त्यासंदर्भातील चौकशी देखील केली होती. तेथील अवस्था पाहून सदर वसतीगृह सुरक्षीत ठिकाणी स्थलांतर करण्याचे आदेश मंत्री महोदयांनी दिले आहेत. आजपर्यंत तेथील अधिकाऱ्यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. येथील विद्यार्थीनी मृत्युच्या सापळ्यात राहत आहेत अशी त्यांची अवस्था झालेली आहे. या प्रकरणात शासनाने गांभीर्याने लक्ष घालून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे...

सदरचे वसतीगृह सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावे अशी मी आदिवासी विभागाच्या मंत्री महोदयांकडे मागणी करीत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाबाबत मी बोलत असताना असे सांगू इच्छितो की, ठाणे आणि मुलुंड स्टेशन दरम्यान नवीन प्रस्तावित विस्तारीत ठाणे रेल्वे स्टेशनसाठी ठाणे येथील मनोरुग्णालयाच्या अखत्यारित असलेल्या 31 हेक्टर जमिनीपैकी सात हेक्टर जागेचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेकडून सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे. तसेच अशा स्वरुपाचे प्रस्ताव आल्यास या प्रकरणी सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे माननीय आरोग्य मंत्री यांनी 23 मार्च 2015 रोजी ठाणे येथे घोषित केले होते. तथापि सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर केलेल्या प्रस्तावाबाबत शासनाने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे ठाणे शहरवासियांमध्ये व अन्य नागरिकांमध्ये निर्माण झालेली उदासिनतेची भावना लक्षात घेता याबाबत आरोग्य मंत्री महोदयांनी लक्ष घालावे व ही विनंती मान्य करुन तातडीने योग्य ती कार्यवाही करावी.

सभापती महोदय, आपण मला पुरवणी मागण्यांवरील चर्चेत बोलण्याची संधी दिली त्याबाबत आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 10 वर बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, नक्षलवादी क्षेत्रात गोपनीय माहिती देणाऱ्या व्यक्तींना बक्षीस देण्याच्या संदर्भातील ही बाब आहे. यासंदर्भात महाराष्ट्रातील ज्वलंत समस्या नक्षलवाद ही आहे. हा अतिशय भीषण विषय महाराष्ट्रातील सरकार समोर आलेला आहे. सभापती महोदय, पूर्वी पेक्षा नक्षलवादी वाढले असून त्यांच्या कारवाया सुध्दा मोठ्या प्रमाणात सुरु झालेल्या आहेत. सुरुवातीला नक्षलवादी म्हणून काही युनिट गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर जिल्ह्यात कार्यरत होते. त्यावेळी जास्त घटना आंध्रप्रदेश व छत्तीसगड येथे घडत होत्या. महाराष्ट्रात फारशा घटना घडत नव्हत्या. नक्षलवादी लपण्यासाठी महाराष्ट्रातील जंगलात येऊन थांबत होते. अलिकडील काळात म्हणजे मागील दहा वर्षापासून माओवादी व नक्षलवाद्यांचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झालेला आहे. संपूर्ण केरळच्या बॉर्डरवरुन शस्त्र येऊ लागली आहेत. अशा प्रकारची शस्त्रे माओवादी नक्षलवाद्यांच्या हातामध्ये आली आहेत. यादृष्टीकोनातून ज्या घटना घडत आहेत त्याकडे बारकाईने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्या घटनांना फारशी प्रसिध्दी मिळत नाही. स्थानिक स्तरावर राहणाऱ्या लोकांवर प्रसिध्दीचा दबाव येतो. बऱ्याच घटना महाराष्ट्राला अंधारात ठेऊन होत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात नक्षलवादी मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्यांना पायबंद घालण्याच्या दृष्टीकोनातून जे खबरे आहेत त्यांच्यावर नक्षलवाद्यांकडून सतत दबाव येत असतो. कोणी खबर दिली तर त्यांना चौकात बोलावून लोकांच्या समोर गोळ्या घातल्या जातात. कोणत्याही पक्षाच्या व्यक्तीने काही स्टेंटमेंट केले व नक्षलवाद्यांना विरोध करण्याचा प्रयत्न केला आणि तेथील कोणताही मोठा नेता असला तरी त्यांना मारण्याचा प्रयत्न होत असतो. नक्षलवादी भागात सर्वात महत्वाचा दुवा पोलिसांचा खबऱ्या असतो. त्यांना बक्षीस देणे हा एक भाग झाला आहे, उत्तरेकडील लहान राज्ये आहेत, त्यांच्या बॉर्डरवर वेगवेगळ्या घटना घडविण्याचे काम नक्षलवादी संघटना करीत आहेत. खबऱ्यांना बक्षीस देण्यापुरता हा विषय मर्यादित नाही. त्या गावात पोलिसांच्या माध्यमातून रिलेशन कसे निर्माण करता येईल त्यासाठी त्या गावात होणाऱ्या कार्यक्रमांना किंवा त्या गावातील प्रधानाला बक्षीस देण्याची आवश्यकता आहे. कारण त्या गावातील समन्वय जोपर्यंत प्रतिष्ठीत व्यक्ती किवा तेथील प्रधानाशी

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

येत नाही, तोपर्यंत पोलीस अधिकारी त्या गावातून पाहिजे तशा प्रकारची माहिती काढून नक्षलवाद्यांचा शिरकाव होण्यापासून रोखू शकत नाही. खबऱ्यांना बक्षीस देण्याची व्यवस्था आपण नेहमीच्या पध्दतीने करतो. परंतु वेगळया पध्दतीने आणखी प्रभावीपणे ही यंत्रणा कशी उभी करता येईल व पोलिसांच्या हातामध्ये जास्त अधिकार देऊन त्या गावातील प्रमुखाशी जास्त चांगल्या प्रकारे संपर्क कसा ठेवता येईल हे पाहिले पाहिजे. ज्या गावात नक्षलवादी येतात, जेवण करतात, राहतात आणि परत वापस जंगलात जातात अशा नक्षलवाद्यांचा संपर्क त्या गावतील प्रमुखाशी असतो तशाच प्रकारे त्या अधिकाऱ्यांचा संबध त्या गावातील प्रमुखाशी ठेवण्याच्या दृष्टीकोनातून त्यांना अधिक आर्थिक मदत देण्यात यावी. यासाठी जास्त निधी खर्च झाला तरी चालेल व नक्षलवाद्यांपेक्षा पोलिसांकडे गावातील लोकांनी अत्यंत चांगल्या नजरेने पाहिले पाहिजे.

....3D-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

याही दृष्टीकोनातून प्रयत्न करावा. या खबऱ्यांच्या संदर्भात महाराष्ट्राएवढी दहशत कुठेही नसेल. मुंबईतील गँगवारच्या माध्यमातून एखादा खून झाला की वृत्तपत्रातील रकाने भरुन बातम्या प्रसिध्द होतात. दुस-या दिवशी त्यावर चर्चा सुरु होते. जणू काही फार मोठी घटना घडली आहे. यापेक्षा महाराष्ट्रातील दोन-तीन जिल्हे, नेपाळपासून आसाम, बिहार, छत्तीसगड ते आंध्रप्रदेश पर्यंतचा टापू या नक्षलवाद्यांनी तयार केला आहे. या भागामध्ये एखादी कारगिलसारखी घटना घडू शकते, एवढी ताकद त्यांनी या भागामध्ये निर्माण केली आहे. नक्षलग्रस्त क्षेत्रासाठी केंद्र सरकारने निधी खर्च करण्याचा निर्णय घेतला. कारण कारगिल युध्द झाले त्यावेळी दिवसाला 4 हजार कोटी रुपये खर्च आला होता. भविष्यात नक्षलवाद्यांनी बाह्यशक्तीच्या आधारे या भागात युध्द पेटविण्याचा प्रयत्न केला तर मोठया प्रमाणात पुन्हा एकदा आर्थिक खर्च करण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून आज त्या भागासाठी वेगळा निधी देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला.

वर्षाला किमान 300 ते 400 कोटी रुपये केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्य सरकारला उपलब्ध होत आहेत. पूर्वी कधीही एवढा निधी केंद्र सरकारकडून दिला जात नव्हता. सर्वंकष विचारानंतर केंद्र सरकारने हा निर्णय घेतला. या महत्वाच्या विषयाकडे केंद्र सरकारचे लक्ष असल्यामुळे खबऱ्यांना जपणे महत्वाचे आहे. एकही महिना असा जात नाही, ज्या महिन्यामध्ये खबऱ्याची किंवा त्याच्या जवळच्या नातेवाईकाची हत्या होत नाही. 15 दिवसांपूर्वी एका खबऱ्याची हत्या झाली. एका गावाच्या सरपंचाची हत्या करण्यात आली. जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांनी नक्षलवाद्यांना विरोध केला. त्यांना गावातून जात असताना नक्षलवाद्यांनी त्यांना झाडाला बांधून त्यांच्या शरीरावर 200 ते 250 गोळया झाडल्या. अशा प्रकारची दहशत त्या भागात असल्याची लोकांना जाणीव आहे. महाराष्ट्रातील नक्षलग्रस्त भागात मोठया संख्येने लोक रहात आहेत. त्यांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने प्रभावीपणे खबऱ्यांची व्यवस्था उभी केली पाहिजे. त्यांच्याशी संपर्क ठेवण्यासाठी यंत्रणा अधिक प्रभावी कशी करता येईल याचा विचार झाला पाहिजे. वेगवेगळया संघटना शासनाच्या विरोधात लढत असतात. परंतु नक्षलग्रस्त भागाचा बारकाईने अभ्यास केला तर आपल्याला वस्तुस्थिती कळून येईल. मी स्वत: अधिकाऱ्यांशी चर्चा केली. कशाप्रकारे आम्ही त्यांच्याजवळ जातो, तेथील प्रधानांशी चर्चा करुन बैठक घेतो, संपर्क ठेवून त्या भागातील दहशत कशी कमी करतो हे त्यांनी मला सांगितले. या यंत्रणेचा उपयोग करुन घेऊ शकलो तर शासनाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

जो उद्देश आहे तो सफल होऊ शकतो. खबऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने यशस्वी होऊ शकतो. ज्याप्रमाणे आपण भारित खर्चाबाबत चर्चा करीत नाही, त्याच धर्तीवर अशा प्रकारचा खर्च करीत असताना त्याची जाहीरपणे चर्चा होऊ नये. जेणेकरुन नक्षलवाद्यांची शंका दुपटीने वाढू शकते आणि ते खबऱ्यांना वेचून मारल्याशिवाय राहणार नाहीत. या विषयाला किती प्रसिध्दी द्यायची आणि कशाप्रकारे निधी द्यायचा याबाबत गुप्तता राखणे आवश्यक आहे. तरच पोलीस प्रभावीपणे काम करु शकतील असे मला वाटते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 184 द्वारे थोर व्यक्तींचे स्मारक उभारण्यासाठी 12 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बंजारा समाजाचे पोहरादेवी हे तीर्थक्षेत्र फारच प्रसिध्द आहे. सेवालाल महाराज यांच्या दर्शनासाठी आम्ही नेहमी जातो. प्रचंड मोठी यात्रा भरते. ते लोकांचे श्रध्दास्थान असल्यामुळे मोठया प्रमाणात भाविक तेथे येतात, परंतु त्यांना पुरेशा सुविधा मिळत नाहीत ही वास्तवता आहे. 6 कोटी रुपयांची तरतूद या तीर्थक्षेत्रासाठी केली आहे. यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांनी 10 कोटी रुपयांची तरतूद जिल्हाधिकाऱ्यांकडे उपलब्ध करुन दिली होती. त्या ठिकाणी दोन वेगवेगळे ग्रूप आहेत. त्यांना एकत्र आणून हा निधी खर्च झाला पाहिजे. जमीन उपलब्ध झाली पाहिजे. गावाच्या सरपंचांना विश्वासात घेऊन प्लॅन तयार केला पाहिजे. मागील वेळी उपलब्ध करुन दिलेला 10 कोटी रुपयांपैकी फक्त 3 कोटी रुपये खर्च झाले व आजही जिल्हाधिकाऱ्यांकडे 7 कोटी रुपये बऱ्याच काळापासून पडून आहेत. सुप्रसिध्द तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. त्यासाठी केलेली तरतूद अयोग्य आहे असे आम्ही म्हणणार नाही. परंतु मागील 7 कोटी रुपयांचा शिल्लक निधी व आता उपलब्ध करुन दिलेले 6 कोटी रुपये कशा पध्दतीने खर्च होतील व यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना कशा प्रकारे सुविधा पुरविता येतील, त्यासाठी महसूल विभागाचे नियम बदलावे लागले तरी चालेल, परंतु खास बाब म्हणून या तीर्थक्षेत्रासाठी उपलब्ध झालेला निधी खर्च करु शकलो तर भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देता येतील. फक्त निधीची तरतूद करुन चालणार नाही. त्यासाठी पुरेशा सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे? त्याची सद्यस्थिती काय आहे किंवा कोणते काम सुरु झाले आहे हे सभागृहाला कळले पाहिजे. जेणेकरून राज्यातील जनतेच्या मनामध्ये असलेला संभ्रम दूर होईल. पुरवणी मागणीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन येथील घराचे स्मारकात स्थांतर करण्याचा उल्लेख केलेला आहे. या विषयाशी सर्वांच्याच भावना जोडल्या गेल्या आहेत. त्या संदर्भात जरुर विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 193. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या संदर्भात तरतूद केली आहे. महाराष्ट्र राज्यात स्वस्त धान्य दुकानाची अत्यंत चांगली व्यवस्था उभी केलेली होती. राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी जास्तीत जास्त लोकांना या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत स्वस्त दरात धान्य पुरविले जात होते. महाराष्ट्रातील 11 कोटी लोकसंख्येपैकी 8.70 कोटी लोकसंख्येला स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमातून स्वस्त दरात धान्य पुरवठा केला जात होता. केंद्र सरकारने संपूर्ण देशाकरिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना लागू केली. ही योजना गरीब लोकांच्या दृष्टीने महत्वाची आहे. कोणीही नागरिक उपाशी राहू नये, किमान स्वस्त धान्य त्याच्या दारापर्यंत पोहोचले पाहिजे हा या योजनेमागचा उद्देश होता. संपूर्ण देशाला ही योजना लागू करीत असताना देशातील तामीळनाडू, महाराष्ट्र, छत्तीसगड अशी तीन-चार राज्ये वगळली तर कोणत्याही राज्यामध्ये स्वस्त धान्य दुकानाची व्यवस्था पुरेशा प्रमाणात नव्हती. उत्तरप्रदेश सारख्या राज्यात महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत 10 टक्के सुध्दा स्वस्त धान्य दुकाने नव्हती. बिहार राज्यात सुध्दा हीच परिस्थिती होती. देशामध्ये केंद्र सरकारकडून स्वस्त धान्याचे समान वाटप केले जात असल्यामुळे महाराष्ट्राला उपलब्ध होणारे धान्य 8.70 कोटी लोकांच्या मानाने अपुरे पडत होते. त्यामुळे राज्यातील 1.70 कोटी लोक या योजनेच्या फायद्यापासून वंचित रहात आहेत. केंद्र सरकारकडून जे मोफत धान्य उपलब्ध होते, त्याचा लाभ एपीएल खालील 1.70 कोटी लोकसंख्येला मिळत नव्हता. मी काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष होतो त्यावेळी मी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या विषयाच्या संदर्भात बैठक घेतली होती. कोणत्याही परिस्थितीत ही 1.70 कोटी लोकसंख्या या अन्न सुरक्षा योजनेच्या लाभापासून वंचित राहता कामा नये यासाठी सातत्याने मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आग्रह धरला आणि शासनाने शेवटी निर्णय घेतला की, 1.70 कोटी लोक या योजनेपासून वंचित राहू नयेत म्हणून वेगळी तरतूद केली पाहिजे.

....3इ.1....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

ही तरतूद करण्यासाठी 1600 कोटी रूपये राज्य शासनाला द्यावे लागतील असे समोर आले. त्याप्रमाणे दर महिन्याला 125 कोटी रूपये देण्यासंबंधीचा जी.आर.काढण्यात आला. सहा-सात महिने अशा प्रकारची तरतूद केल्यामुळे 1 कोटी 70 लाख लोकांना स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळण्यास सुरूवात झाली. परंतु, नंतरच्या काळात सरकार बदलले. यात आज 300 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे 300 कोटी रूपये भरपाई करण्याकरिता आहे. केंद्र शासनाकडून आपल्याला धान्य मिळणार आहे. ते धान्य पुरेसे नाही म्हणून राज्य सरकारने आपला निधी दिला पाहिजे. हा निधी 1 कोटी 70 लाख लोकांसाठी आहे काय ? मागच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी भाषणामध्ये सांगितले की, आम्ही दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना 3 रूपये, 2 रूपये दराने धान्य देण्याचा निर्णय घेतलेला आहे. 99 टक्के शेतकऱ्यांचा एपीएल खाली समावेश होता. ठराविक शेतकऱ्यांचा वर्ग काढून बाकीच्यांना वंचित ठेवत असाल तर ते योग्य नाही आज आपण फक्त 40 लाख लोकांना धान्य देत आहात. मागच्या सरकारने शेतकऱ्यांना धान्य देण्यासाठी तरतूद केली होती. यावेळी 1600 कोटी रूपयांची तरतूद करणे गजरेचे होते. तेथे फक्त 300 कोटी रूपयांची तरतूद आपण केली आहे. आज आपण 1 कोटी 30 लाख लोकांना स्वस्त धान्य दुकातून मिळणाऱ्या धान्यापासून वंचित ठेवले आहे. त्यादृष्टीने ही तरतूद फार अपुरी आहे. तेव्हा या 1 कोटी 30 लाख लोकांचा समावेश कसा करण्यात येणार आहे यावर विचार करण्याची आज खरी गरज आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अजून किती सन्माननीय सदस्य बोलावयाचे बाकी आहेत ?

तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) : 3-4 सन्माननीय सदस्य बोलावयाचे बाकी आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी सन्माननीय महसूल मंत्री श्री.खडसे साहेबांना सांगू इच्छितो की, आम्ही पुरवणी मागण्यावंरील चर्चेला रात्रौ 10.00 वाजेपर्यंत बसलो होतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आम्हाला उत्तरे पण द्यायची आहेत. जवळ जवळ 14-15 खाती आहेत. त्यामुळे उत्तरासाठी देखील वेळ लागेल. जे आता सन्माननीय सदस्य हजर आहेत त्यांच्याच प्रश्नाला उत्तरे देण्यात येतील.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी यवतमाळ जिल्ह्यातील जल युक्त शिवार अभियानासंबंधी बोलणार आहे. येथील कामासाठी 7 कोटी रूपये प्राप्त झालेले आहेत. पण तेथे 397 कोटी रूपयांची कामे झालेली आहेत. जल युक्त शिवार अभियानासाठी राज्य शासन अमूक इतका निधी देणार आहे अशा प्रकारची घोषणा करण्यात आली होती. जवळ जवळ सहा पद्धतीने टॅक्स गोळा होता. प्रोफेशनल टॅक्सच्या माध्यमातून रोजगार हमी योजनेसाठी जवळ जवळ पाच ते सहा हजार कोटी रूपये जमा होतात. आता आपण रोजगार हमी योजने ऐवजी मनरेगा आणली आहे. रोजगार हमी योजनेचा सगळा पैसा राज्य शासनाकडे शिल्लक आहे. रोजगार हमी योजनेसाठी जमा होणारा निधी अन्य कामांवर खर्च करण्यासंबंधीचा कायदा आमच्या वेळीच करण्यात आलेला आहे. आपल्याकडे किती टॅक्स गोळा होतो याची कल्पना वित्त मंत्र्यांना आहे. पाच हजार कोटी रूपयांपैकी 1200 कोटी रूपये आपण जलयुक्त शिवार अभियानासाठी देत आहात आणि आपण सांगत आहात की, आम्ही आमच्या तिजोरीतून, बजेटमधून 1200 कोटी रूपये देत आहोत. रोजगार हमी योजनेसाठी दरवर्षी जमा होणाऱ्या निधीपैकी अर्धा निधी या योजनेसाठी दिला पाहिजे. आपली योजना चांगली आहे. पण या अभियानासाठी आपण पाहिजे तेवढी तरतूद करीत नाही.

यानंतर मी महिला व बालकल्याण विभागावर बोलणार आहे. महाराष्ट्रामध्ये हजारो बालगृहे आहेत. परंतु, काही बालगृहांना निधी न मिळाल्यामुळे तेथील मुलांना जेवण देखील मिळत नाही. तेव्हा याकडे देखील लक्ष देण्याची गरज आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

यानंतर मी आरोग्य विभागाच्या बाबीवर बोलणार आहे. अंधत्व निवारण कार्यक्रमांर्तगत रूपये 40 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. नागपूर येथे अंधत्व निवारण केंद्र व्हावे अशी देखील मागणी आहे. कॅन्सरसंबंधी अलीकडेच आपला सर्व्हे आलेला आहे. सर्वात जास्त कॅन्सरग्रस्त रूग्ण नागपूरमध्ये आहेत. तसा रिपोर्ट आपल्याकडे आला असेल तर नागपूर येथे अद्ययावत सेंटर सुरू करण्याची आवश्यकता आहे. त्यासंबंधी माननीय आरोग्य मंत्र्यांनी भाष्य करावे अशी आमची अपेक्षा आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 172 वर बोलणार आहे. आज राज्यामध्ये विजेचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर आहे. आज लोकांना फक्त 4 ते 6 तास वीज मिळते. आज शेतकऱ्यांना रब्बीचे किंवा उन्हाळी पीक काढण्याकरिता वीज मिळत नाही. तेव्हा आपण याचा देखील विचार करावा.

कृषि पंप आणि सौर ऊर्जेसंबंधातील बाब क्रमांक 175 आहे. सौर ऊर्जेसंबंधी देखील आपण स्पष्टपणे भूमिका घेतली पाहिजे. आपण तरतूद केलेली आहे. पण दरवर्षी आपण पाच लाखाचे टार्गेट कसे काय पूर्ण करणार आहात ? ते देखील आम्हाला समजले पाहिजे. धन्यवाद.

.....

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधान सभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, मी बोलणार नव्हतो. परंतु, माननीय वित्त मंत्री येथे उपस्थित असल्यामुळे मी एक सूचना करणार आहे.

पान क्रमांक 199 वरील बाब क्रमांक 220 आमदार स्थानिक विकास कार्यक्रमावर मी बोलणार आहे. यात आपण 174 कोटी रूपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. मला फक्त एकच सूचना करावयाची आहे. आमदार निधी हा वषानुवर्षे या राज्यात सुरू आहे. परंतु, गेल्या 2-5 वर्षात असे दिसून येत आहे की, या आमदार निधीची कामे आम्ही नगरपालिका क्षेत्रात, ग्रामपंचायत क्षेत्रात सुचविली तर तेथे कामे घेण्यात येत नाहीत. त्या ग्रामपंचायती ह्या विविध पक्षांच्या असतात. त्यामुळे आम्ही जी कामे सुचवितो त्यास ते ना हरकत प्रमाणपत्र देत नाही. त्यामुळे तो पैसा परत जातो. आम्हाला 2-2, 3-3, 4-4 महिने वाट पहावी लागते. चार महिने वाट पाहून देखील ना हरकत प्रमाणपत्र न दिल्याने तो पैसा परत जातो. त्यामुळे आमचे नुकसान होते. आमच्या निधीतून ग्रामीण भागाचा विकास आम्ही करू इच्छितो. पण एखादी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद वेगळ्या पक्षाची असेल तर ते ना हरकत प्रमाणपत्र देत नाही. त्यामुळे लाखो रूपयांचा आमचा निधी परत जात आहे. माझ्याकडे जवळपास 50 आमदार आले आणि म्हणाले की, आता आपण काय करायचे. मी त्यांना म्हणालो की, आपण सुधीरभाऊंना भेटू या. यातून काही तरी मार्ग काढला पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थेने ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही तर 30 दिवसानंतर डिम्ड परमिशन आहे असे ग्राह्य धरून तो निधी खर्च करण्यासाठी परवानगी द्यावी अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

यानंतर मी पान क्रमांक 210 वरील बाब क्रमांक 253 वर बोलणार आहे. या राज्यात जल युक्त शिवार योजना सुरू झालेली आहे.

FFF-1 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, या राज्यात 25-30 वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्यापैकी 90 टक्के कोल्हापुरी बंधाऱ्यांचे गेट व वॉशर चोरीला गेल्यामुळे त्यामध्ये पाणी अडले जात नाही. म्हणून माझी माननीय जलसंधारण मंत्र्यांना विनंती आहे की, जर कोल्हापुरी बंधारे सिमेंटच्या सहाय्याने 2 किंवा 2.5 मीटरची भींत बांधण्यास परवानगी दिली तर आपल्या राज्यात प्रचंड प्रमाणात पाण्याचा साठा होऊ शकतो. त्यामुळे कोल्हापुर बंधाऱ्यासाठी वेगळ्या हेडची तरतूद तसेच कोल्हापुरी बंधाऱ्याची दुरुस्तीसंबंधी धोरणात्मक निर्णय घेतला तर त्याचा चांगला फायदा होऊ शकेल. कोल्हापुरी बंधाऱ्यास 2 किंवा 2.5 फूटाची भित्त बांधली तर काय होईल असा प्रश्न अधिकाऱ्याना विचारला असता अधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्हाला तसे करता येणार नाही. त्यामुळे कोल्हापुरी बंधाऱ्याच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतला तर जलयुक्त शिवाराचे अर्धे काम या माध्यमातून होऊ शकते.

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांना माझ्या एकटयाचीच नाही तर सर्व आमदारांची मागणी आहे त्यामुळे ही मुदत 30 दिवसावर आणावी एवढीच या निमित्ताने विनंती करतो.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर साहेबांनी जे दोन विषय मांडले आहेत ते अतिशय महत्वाचे मांडले आहेत. आमदार फंडाच्या बाबतीत मलाही अनुभव आला आहे. तसेच कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्यामध्ये आता लिकेजचे प्रॉब्लेम्स येत आहेत. लीकेज काढता येत नसल्यामुळे या बंधाऱ्यातील पाणी वाहून जाते. हे बंधारे आता कृष्णा खोरे मधून आता वर्ग झालेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी चांगले मुद्दे सुचवले असून त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी योग्य ती कारवाई करावी.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी पुरवणी मागण्या मंजुरीसाठी ठेवलेल्या आहेत. माननीय वित्त मंत्र्यांवर आमचा विश्वास आहे. रघुकुल रीत सदा चली आई, प्राण जाई पर वचन न जाई असे आपण आपल्या भाषणात सांगितले होते. प्राण गेला तरी चालेल परंतु मी या राज्याला एका वेगळ्या दिशेने व वेगळ्या गतीने घेऊन जाईन.

सभापती महोदय, 13 जुलै, 2015 रोजी पुरवणी मागण्या सादर केल्या होत्या व आज या ठिकाणी पुन्हा एकदा पुरवणी मागण्या सादर केलेल्या आहेत. या पुरवणी मागण्या 30 हजार 887 कोटी 21 लक्ष 68 हजार रुपयांच्या सादर केलेल्या आहेत. पुरवणी मागण्यावर या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. मार्च महिन्याचे बजेट मांडल्यानंतर सन्माननीय सदस्यांना आपण एक मोठी सुटकेस दिली होती व त्यामध्ये बजेटची पुस्तकेही दिली होती. त्या पुस्तकांच्या प्रिंटिंगचा खर्च किती आला त्याबाबत कोणीही विचारणा केली नाही.

सभापती महोदय, पुरवणी मागण्याच्या पृष्ठ क्रमांक 8 वर आपल्या राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. कन्नमवार यांच्या स्मारकाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत.

सभापती महोदय, कोल्हापूर येथे शाहू-आंबेडकरांचे संयुक्त स्मारक झाले पाहिजे याकरिता मी मागच्या बजेटच्या भाषणात विचार मांडले होते परंतु त्यासंदर्भात काहीही निर्णय झाला नाही. छत्रपती शाहू महाराज हे आरक्षणाचे जनक आहे. मागच्या बजेटच्यावेळी मी सभागृहात शाहू महाराजांची प्रतिमा लावावी अशी सूचना केली होती परंतु शाहू महाराजांची प्रतिमा देखील लावली गेली नाही. त्यामुळे कोल्हापूर येथे शाहू-आंबेडकरांचे संयुक्त स्मारक होणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लंडनवरुन आले होते त्यावेळेस छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर जिल्हयातील मानगाव येथे त्यांचा पहिला सत्कार केला होता. आपले सरकार फक्त सबका साथ,सबका विकास म्हणते की, सबका विनाश व आमचाच विकास असे म्हणत असेल तर ते बरोबर नाही. कोल्हापूर येथे शाहू-आंबेडकरांच्या स्मारकासाठी शासनाने निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या कामास अजून सुरुवात झाली

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये ....

नाही. या ठिकाणी केवळ 3 कोटी रुपये ठेवण्यात आले आहे. मी मागच्यावेळेस आपल्याकडे अण्णाभाऊ साठे स्मारक, बुध्दीस्ट थिम पार्क तसेच कोल्हापूर येथे शाहू-आंबेडकरांचे संयुक्त स्मारकासाठी मी 25 कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यासाठी मी 4-5 दिवस आपल्या मागे-पुढे फिरलो परंतु आजपर्यंत पैसे मिळाले नाही म्हणून आपले ब्रीद वाक्य आहे की, "प्राण जाई पर वचन न जाई" हे आम्हाला शेवटपर्यंत म्हणावे लागेल की, काय असे वाटू लागले आहे.

सभापती महोदय, आपण स्मारके बांधण्याचे काम करीत आहात परंतु नागपूर येथे बुध्दीस्ट थिम पार्क झाले पाहिजे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, एकदा सत्तेमधून गेल्यानंतर आपल्यावर अशी वेळ येणार नाही. आता वेळ चांगली आहे, आता आपण अण्णाभाऊ साठे, नागपूर येथे बुध्दीस्ट थिम पार्क आणि कोल्हापूर येथे शाहू-आंबेडकराच्या संयुक्त स्मारकासाठी 25 कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावे अशी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमाक 8, बाब क्रमांक 6 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यातील पत्रकारांना बसभाडयात सवलत देण्यासाठी 1 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. भारतीय जनता पक्षाच्या जाहिरनाम्यामध्ये या राज्यातील पत्रकारांना मा.सुरेश भट साहेबांच्या नावाने पेन्शन योजना लागू करण्याचे अभिवचन दिले होते. परंतु या सरकारला आज जवळपास सव्वा वर्ष व केंद्रसरकाला दीड वर्ष होत आहेत तरी सुध्दा सुरेश भट साहेबांच्या नावाने पत्रकारांना पेन्शन योजना लागू करण्याकरिता किती निधी इयर मार्क करावयाचा हे मात्र आपण विसरलात. हे विसरुन चालणार नाही. पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ असून त्या चौथ्या स्तंभाला आपण न्याय देणार का? पत्रकारांच्या पेन्शनसाठी पुढील बजेटमध्ये 10 कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मी या निमित्ताने विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 9 वर मी माझे विचार मांडणार आहे. सह्याद्री चॅनलसाठी 85 लक्ष 35 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. या ठिकाणी सामाजिक न्याय मंत्री उपस्थित आहेत मी त्यांना सांगू इच्छितो की, सह्याद्री चॅनलची टिम त्यांच्या घरी आली होती त्यावेळेस आम्ही सुध्दा त्यांना भेटावयास गेलो होतो. देशामध्ये 14 ऑक्टोबरचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दिक्षाभूमीचा कार्यक्रम लाईव्ह दिसावयास पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपले स्फुर्तीस्थान

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये ....

आहे. गाव-खेडयातील लोक सह्याद्री कार्यक्रम बघत असतात त्यामुळे दिक्षाभुमीचा लाईव्ह कार्यक्रम गोरगरीब जनतेला दिसण्याची आवश्यकता आहे. दिक्षाभुमी आमचे स्फुर्तीस्थान आहे. मी सभापती महोदयांच्या माध्यमातून वित्त मंत्र्यांना विनंती करतो की, चंद्रपूर येथे सुध्दा चैत्यभुमी आहे. चंद्रपूर आणि नागपूर हे डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या चरणस्पर्शाने पावन झालेले स्थळ आहे. सह्याद्री चॅनलवर चैत्यभुमीचा किंवा दिक्षाभुमीचा सोहळा लाईव्ह बघण्याकरिता देशातील लोक आतुर असतात.

3G-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

त्या प्रक्षेपणासाठी जो निधी लागत असेल तो देण्यात यावा अशी विनंती आम्ही सामाजिक न्याय मंत्री महोदयांना केली होती. परंतु आपण हतबल आहात. आपणास माननीय मुख्यमंत्र्यांनी किंवा वित्त मंत्री महोदयांनी पैसे दिले नाहीत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 12, पृष्ठ क्रमांक 14- हेलिकॉप्टर भाड्याने घेण्याकरिता 10कोटी रूपयांची मागणी केलेली आहे. या रकमेमध्ये शासनाच्या मालकीचे हेलिकॉप्टर विकत घेता येईल आणि अशाप्रकारची योजना असेल तर ती आपण आणावी, अशी माझी मागणी आहे.

सभ्ापती महोदय, बाब क्रमांक 13, पृष्ठ क्रमांक 14 - वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये गुन्हेगारांच्या रक्ताचे नमुने तपासले जातात. नागपूर येथे अशी अत्याधुनिक प्रयोगशाळा नाही. अन्य ठिकाणी अशी प्रयोगशाळा आहे किंवा कसे याची मला माहिती नाही. मागच्या वेळेस एक टेस्ट करण्यासाठी आपणास गुजरात राज्यामध्ये जावे लागले. तेव्हा आपल्याकडे अत्याधुनिक अशी यंत्रणा उभी करावी. या कामासाठी चार कोटी रूपयांची मागणी करण्यात आलेली आहे. माझे असे म्हणणे आहे की, आपल्याकडे अत्याधुनिक प्रयोगशाळा तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून द्यावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 23, पृष्ठ क्रमांक 18 - कारागृहात बांधकाम करण्यासाठी 34 लक्ष 71 हजार रूपयांची मागणी करण्यात आलेली आहे. आपल्या सर्वांना माहिती आहे त्या कारागृहातून कैदी पळाले होते, असे असताना आपण फक्त त्यासाठी 30 लक्ष रूपयांची मागणी केलेली आहे. तेव्हा माननीय वित्त मंत्र्यांनी याचा विचार करावा. कारागृहाच्या कंपाऊंड वॉलवरून हे कैदी पळाले आणि त्या ठिकाणी मोबाईल रॅकेट सापडले हे सर्व आपणास माहीत आहे. तेव्हा त्या ठिकाणी अत्याधुनिक पद्धतीची व्यवस्था निर्माण करावी अशी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 26, पृष्ठ क्रमांक 19 - प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याकरिता फक्त हजार रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. हजार रूपये ही रक्कम चुकीने झालेली किंवा कसे हे तपासावे अशी विनंती आहे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

सभापती महोदय, बाब क्रमांक 35, पृष्ठ क्रमांक 34 - पीक नुकसानीसाठी शेतकऱ्यांना 4 हजार कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी आमच्या सरकारवर टीका केली. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, युतीच्या काळात राज्याचे उत्पन्न अडीज लाख कोटी रुपये होते. आज आपल्या राज्याचे उत्पन्न बारा लाख कोटी रुपयांवर गेले आहे. सन्माननीय सदस्यांनी वांरवार सांगितले की, हे तुमचेच पाप आहे, तुमचेच पाप आहे. त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, आदरणीय श्री.शरद पवार यांनी जे करुन दाखविले ते कोणी करुन दाखविणार नाही. मागील 14 वर्षात राज्यातील उत्पन्न पाच पटीने वाढविले आहे. देशाच्या एकूण उत्पन्नामध्ये राज्याचा हिस्सा 15 टक्के आहे तर गुजरात राज्याचा हिस्सा साडेसात टक्के आहे. आम्ही 15 वर्षात काही केले नाही असे नाही तर युतीच्या काळापेक्षा आमचे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार चांगले काम करीत होते, एवढे बोलून वेळेअभावी मी माझे भाष्ण पूर्ण करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती स्मिता वाघ (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी सन 2015-2016 च्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 144, पृष्ठ क्रमांक 159 - जलसंपदा विभाग - तापी विकास महामंडळ जळगाव अंतर्गत अमंळनेर तालुक्यातील पाडळसरे धरण आहे. 1995 साली तत्कालीन पाटबंधारे मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब यांनी त्या धरणास मंजुरी दिली होती. या धरणावर आमचा निम्मा जिल्हा अवलंबून आहे. या जिल्ह्यातील अंमळनेर, चोपडा, चाळीसगाव, यावल, धरणगाव, एरंडोल हे तालुके त्या धरणावर अवलंबून आहेत. या तालुक्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे छोटे मोठे उद्योगधंदे नसल्यामुळे हे सर्व तालुके शेतीवर अवलंबून आहेत. शेतीच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. सन 1995 मध्ये तत्कालीन पाटबंधारे मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी या धरणास मंजुरी दिली होती. त्यावेळी या प्रकल्पाची किंमत 400 कोटी रुपये होती. आता त्या प्रकल्पाची किंमत 1200 कोटी रुपयांच्यावर गेली आहे. मागील 20 वर्षापासून या प्रकल्पाच्या कामासाठी तुटपुंजी रक्कम देण्यात आल्यामुळे हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. हा प्रकल्प तेथील लोकांच्या अस्मितेचा प्रश्न आहे. तेव्हा या प्रकल्पाच्या कामासाठी निधीची तरतूद करावी, अशी मी विनंती करुन माझे दोन शब्द पूर्ण करते.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी सन 2015-2016 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग, बाब क्रमांक 96ते 99, पृष्ठ 73-74- खेळाडू आणि त्यांच्या प्रशिक्षणासाठी किंवा आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार करण्यासाठी जी तरतूद करण्यात आलेली ती अत्यंत कमी आहे. आज आपण कुस्तीसाठी 50 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु एक कुस्तीगार तयार करण्यासाठी महिन्याला 50 हजार रुपये खर्च येतो. मी असे कुस्तिगार तयार करीत असल्यामुळे मला ही माहिती आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर किंवा ऑलिम्पिक स्पर्धेसाठी जाणारे किंवा राष्ट्रकुल स्पर्धेसाठी जाणारे जे काही होतकरु खेळाडू असतात त्यांना भाडे किंवा आहार परवडत नाही. तेव्हा यामध्ये वाढ करावी अशी माझी क्रीडा मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग, बाब क्रमांक 258 पृष्ठ क्रमांक 220 ते 222 - यामध्ये व्यावसायिक सेवा आणि पुरवठा यासाठी 18 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

..... 3H-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगन्नाथ शिंदे....

परवा एका ग्रामीण रुग्णालयामध्ये एक इमर्जन्सी हार्ट पेशंट आला होता. परंतु त्या ग्रामीण रुग्णालयात त्या पेशंटची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी ई.सी.जी. मशीन नव्हते. त्यामुळे त्या रुगणाला गोल्डन हवर उपलब्ध करुन देता आला नाही. तो गरीब कुटुंबातील रुग्ण होता. त्यांना खाजगी रुग्णालयात जाणे परवडत नव्हते. त्यानंतर त्या रुग्णाची प्रकृती खूप गंभीर झाली. तसेच दुसरा प्रकार हा डोंबिवली येथे अनुभावयास आला. त्या ठिकाणी एम.डी. पॅथॉलॉजी डॉक्टरला सांगितले जाते की, रात्रीच्या वेळी तुम्ही इमर्जन्सी कॅज्युल्टी सांभाळावी. रात्रीच्या वेळी विष प्यायलेला रुग्ण आला तर त्याला रुग्णालयात कॅथेटर मिळत नाही. साधनसामुग्री नसल्यामुळे डॉक्टरांकडून रुग्णांना प्राथमिक उपचार देता येत नाहीत. महोदय, आज डॉक्टरांवर हल्ले होतात. यामागील मुख्य कारण म्हणजे सर्व आरोग्य केंद्रांमध्ये मशिनरी नाहीत, डॉक्टर नाहीत किंवा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नाही. या निमित्ताने मी मागणी करतो की, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून ज्या आरोग्य सेवा पुरविल्या जातात त्याचे ऑडिट झाले पाहिजे. आज राज्यातील 340 ग्रामीण रुग्णालयामध्ये कसल्याही प्रकारच्या सोयी नाहीत. त्यामुळे या कामासाठी 18 कोटी रुपये नव्हे तर 180 कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 259 मध्ये वैद्यकीय शिबिरे आयोजित करण्यासाठी तरतूद केली आहे. यवतमाळमध्ये शिबिरात शस्त्रक्रिया झालेल्या काही लोकांचे डोळे गेले. तसेच दुसरी बाब म्हणजे सरकारी रुग्णालयात जे डॉक्टर शस्त्रक्रिया करतात ते शिक्षित नसतात. ते डॉक्टर शिकाऊ असतात. त्यांना शस्त्रक्रियेसाठी आवश्यक ती सामुग्री मिळत नाही. त्यामुळे असे प्रसंग उद्भवतात. मी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी या मागणीसाठी 40 लाख रुपयांची जी तरतूद केलेली आहे ती कमी असल्यामुळे त्यात भरीव वाढ करावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक-261 अंतर्गत क्षयरोगाच्या आजाराला आळा घालण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. क्षयरोग हा जीवघेणा आजार आहे. भारतात क्षयरोग असलेल्या रुग्णांपैकी दररोज किंवा दर महिन्याला अंदाजे 1000 रुग्ण मृत्युमुखी पडतात. क्षयरोगमुळे एड्सचे प्रमाण वाढते. या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी केवळ 40 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगन्नाथ शिंदे....

ही तरतूद अत्यंत कमी आहे. एडस्ला दोन नंबरचा आजार मानले जाते. परंतु यासाठी केवळ 92 लाख रूपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे मी मागणी करतो की, या कामी जास्तीत जास्त तरतूद करावी.

महोदय, आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्र.239 वरील बाब क्रमांक 278 वर मी बोलतो. आदिवासी विद्यार्थ्यांना आहार भत्ता द्यावा लागतो. आदिवासी शाळा चालविणाऱ्या लोकांसाठी जो भत्ता दिला जातो तो अतिशय तुटपुंजी आहे. यामध्ये पुरेशा प्रमाणात वाढ व्हावयास पाहिजे. जेणेकरून आदिवासी विद्यार्थ्यांना सकस आहार देता येईल, एवढेच या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2015-16 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 47 वरील कृषी विभागाची बाब क्रमांक-77 वर मी बोलते. राज्यात शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत असताना सुध्दा कृषी विभागासाठी कमी प्रमाणात निधी दिला जातो. शेतीला पूरक असलेले खते, बी-बियाणे किंवा इतर सामुग्री पुरविण्यासाठी कृषी विभागाला पुरेशा प्रमाणात आणि प्राधान्याने निधी दिला पाहिजे. सभापती महोदय, इतर विकास कामे झाली नाही तरी चालतील, परंतु राज्यातील शेतकरी वाचविण्यासाठी कृषी विभागाला जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे.

सभापती महोदय, नगर विकास विभागाची पृष्ठ क्र.81 वरील बाब क्र.103 वर मी बोलते. स्वच्छता अंतर्गत शहरी आणि ग्रामीण भागात 461 कोटी 11 लाख रुपयांची तरतूद केली आहे. परंतु आजही ग्रामीण व शहरी भागात स्वच्छता गृहे, गटारे यांची योग्यप्रकारे व्यवस्था नाही. त्यामुळे या कामासाठी राज्य सरकारने भरीव तरतूद करावी.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.105 वरील बाब क्रमांक 131 वर मी बोलते. ही बाब न्यायालयीन इमारतीतील स्वच्छतेबाबतची आहे. न्यायालयात गेल्यानंतर मला खूप आश्चर्य वाटते. आपण सर्वजण न्यायालयाचा आदर करतो. पण त्या इमारतीची अवस्था अतिशय वाईट आहे. त्या ठिकाणी स्वच्छतागृहे नाहीत. त्या इमारतीच्या अनेक भागामध्ये पानाच्या पिचकाऱ्या मारलेल्या असतात. न्यायालयाच्या इमारतीमध्ये वर्षानुवर्षाचे रेकॉर्ड ठेवण्यासाठी जागा नाही. त्यामुळे या सर्व कामांसाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.118 वरील बाब क्र.141 वर मी बोलते. सार्वजनिक रुग्णालयामध्ये ऑपरेशन थिएटर, जनरल वॉर्ड, डॉक्टरांचे निवासस्थान, शिकाऊ डॉक्टरांचे निवासस्थान, स्वच्छतागृहे, पोस्ट मार्टेम रुम, शवगृहे आणि महिलांच्या प्रसृतीगृहांची खूप दुर्दशा आहे. त्यामुळे या कामासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागासाठी 113 कोटी 39 लाख रुपयांची तरतूद केली आहे. मला असे वाटते की, ही रक्कम खूपच अपुरी आहे. पुरवणी मागण्यांचे एवढे मोठे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

पुस्तक असताना यातील केवळ दीड पानांमध्ये महिला व बालविकास विभागाच्या मागण्या दर्शविण्यात आल्या आहेत. महिला या अर्ध्या संख्येने आहेत. महिलांमध्ये कुपोषित महिला, गरोदर महिला असताना त्यांच्यासाठी कोणतीच तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे या कामाकडे राज्य सरकारचे पूर्णत: दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे या कामासाठी जास्तीत जास्त तरतूद करावी, अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाची पृष्ठ क्र.267 वरील बाब क्र.320 वर मी बोलते. ही मागणी दुर्बल घटकांसाठी केलेली आहे. दुर्बल घटकांना विहिरी आणि नळ जोडण्यांसाठी केलेली तरतूद अपुरी आहे. त्यामध्ये वाढ केली पाहिजे.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पृष्ठ क्र.123 वरील बाबीच्या अनुषंगाने सांगते की, या विभागासाठी जेवढी तरतूद करावयास पाहिजे तेवढी केलेली नाही. आघाडी सरकारच्या काळात एपीएलसह जवळजवळ 8 कोटी 70 लाख लोकांना धान्य पुरवठा केला जात होता. त्यासाठी दरमहा 125 कोटी रुपयांची तरतूद केली जात होती. परंतु आता केवळ 300 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यातून 40 लाख लोकांना सुध्दा धान्य देऊ शकत नाही. याशिवाय रॉकेल पुरविण्यासाठी सुध्दा काही प्रमाणात तरतूद करणे आवश्यक होते. परंतु या कामी तरतूद केली नाही. त्यामुळे मी ज्या बाबी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत त्यासाठी भरीव तरतूद करावी, अशी अपेक्षा करते.

महोदय, मला बऱ्याच मुद्यांवर माझे विचार मांडावयाचे आहेत. परंतु आपण थोडक्यात विचार मांडण्यास सांगून मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानते व माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार (वित्त व नियोजन मंत्री) : सभापती महोदय, सन 2015-16 च्या पुरवणी मागण्या या सभागृहासमोर विचारार्थ ठेवण्यात आलेल्या आहेत. सभागृहाने त्या मागण्यांवर विचार करुन काही अनमोल सूचना सुध्दा केल्या आहेत. तसेच अनेक सन्माननीय सदस्यांनी सरकारला मार्गदर्शक ठरतील अशा प्रकारची भाषणे सुध्दा केली. काही मुद्दे कदाचित संदिग्धता किंवा पूर्ण माहिती नसल्यामुळे उपस्थित करण्यात आले. त्या मुद्यांवर सर्व विभागांच्या माध्यमातून सारांश स्वाने सरकारचे मत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक 1 ते 16 मंत्री महोदयांच्या विभागाच्या सर्व मागण्यांवर सभागृहाने विचार केला असे मी आपल्या अनुमतीने समजतो.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी अनमोल सूचना केल्या. वास्तविक पाहता पुरवणी मागण्या विधिमंडळासमोर मांडताना अपेक्षा हीच असते की, आपल्या अनुभवाच्या आधारे समाजात विविध समुहामध्ये जाताना सरकारच्या योजना, सरकारच्या माध्यमातून होणारी कामे ही त्यांच्यापर्यंत योग्य पध्दतीने पोहचविताना काही नवीन मुद्दे उपस्थित होत असतील तर ते सरकारपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी विरोधी पक्षाच्या सर्वच सन्माननीय सदस्यांवर आहे. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना निश्चितपणे सांगेन की, ते असे मुद्दे सरकारपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पहिला मुद्दा हा पुरवणी मागण्यांचे आकारमान वाढल्याबाबत उपस्थित केला. होय. हे खरे आहे. पावसाळी अधिवेशनातील एकूण पुरवणी मागण्या 14793.7 कोटी स्वयांच्या होत्या. आता आपण 16094.15 कोटी स्वयांच्या मागण्या मांडल्या आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर पुरवणी मागण्या मांडण्याचा पहिल्याच वेळी विश्वविक्रम केला असे नाही. माझे दुर्दैव आहे की, हा विश्वविक्रम मला माझ्या नावाने नोंदविता आला नाही. हा विक्रम अगोदरच्या सरकारच्या नावे नोंदविला गेला आहे. निवडणुकीच्या पूर्वी आघाडी सरकारने मोठ्या प्रमाणात पुरवणी मागण्या मांडल्या होत्या. त्या कालखंडात निवडणुका असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पुरवणी मागण्या मांडाव्या लागल्या हे उत्तर असू शकत नाही. पुरवणी मागण्या मांडण्याचा अर्थ काय आहे, त्या कशासाठी असतात याचे एक तर्कशास्त्र असते. आघाडी

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार....

सरकारने जुलै-2009 मध्ये 30,320 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या होत्या. कदाचित विरोधी पक्ष नेत्यांकडून असे सांगितले जाईल की, या पुरवणी मागण्या जुलै आणि डिसेंबर या दोन अधिवेशनातील एकत्र करुन मांडल्या होत्या. परंतु हे खरे आहे की, अगोदरच्या सरकारचा मोठ्या प्रमाणावर पुरवणी मागण्या मांडण्याचा विश्वविक्रम त्या सरकारच्या नावानेच जमा आहे. भविष्यात तो विक्रम अर्थमंत्री म्हणून मोडण्याचा माझ्या हातून कधीही प्रयत्न होणार नाही. तो विश्वविक्रम 100 टक्के तुमच्याच नावे राहील याची मी पूर्णपणे खबरदारी घेईन.

..3 आय...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार ....

जून, 2014 मध्ये 20338 कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या एक वर्षात मांडल्या. दोन्ही एकत्र होऊन 30 हजार कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या मांडताना मलाही वित्त मंत्री म्हणून काही आनंद होत आहे असे नाही. मात्र एका गोष्टीचा आनंद आहे. पुरवणी मागण्या मांडताना या दोन्हीही एकत्रितपणे 30 हजार कोटी रूपयांच्या होत असतील. पण मी हे अभिमानाने सांगतो की, तुम्ही माझी इतकी भाषणे वाचली, पण त्यातून एक भाषण मात्र सुटले. मी त्याच्यात सांगितले होते की, राज्यकर्त्याने शेतकऱ्यांसाठी जेव्हा आपले प्रश्न सोडवायचे असतात, तेव्हा साधारणत: पैशाची कमतरता पडू देता कामा नये. मला अभिमान आहे की, माननीय कृषी मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांच्या नेतृत्वामध्ये हा पूर्णपणे आम्ही विचार केला आणि शेतकऱ्यांसाठी पैसे दिले. मी आकडे वाचतो. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये साहेब सांगत होते की, अडीच लाख कोटी रूपयांचे उत्पन्न होते. 15 लाख कोटी रूपये आहे. महागाई इंडेक्सनंतर हे वाढत असते. पण मी तुम्हाला आकडे सांगतो. शेतकरी राजा आहे, हा या देशाचा कणा आहे. या जगात 201 देश आहेत, एकमात्र देश भारत असा आहे की, ज्या देशातील विद्यार्थी निबंध लिहिताना लिहितो की, भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील जनता शेतीवर उपजीविका करते. शेतकरी या देशाचा कणा आहे. मागच्या सरकारने किती मदत केली हे तुम्ही संगितले, उत्पन्न वाढले आहे. सन 2010-11 मध्ये मागच्या सरकारने संपूर्ण मदत चारा, पाणीपुरवठा विभाग, अवर्षण, अतिवृष्टी, गारपीट, अवेळी पाऊस यासाठी 933 कोटी रूपये दिले. सन 2011-12 मध्ये 1909 कोटी रूपये दिले. मागच्या वर्षी माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांच्या नेतृत्वामध्ये या सरकारने 6187 कोटी रूपयांची मदत केली. हे आकडे आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना जेव्हा हे आकडे पाहिजेत तेव्हा ते आकडे मी कधीही उपलब्ध करून देईन. पण आता आपल्याला पुरवणी मागण्यामध्ये आकडे दिसत आहेत, त्यावर येतो. आम्ही शेतकऱ्यांसाठी मदत केली आहे. आपण विरोधासाठी विरोध करीत नाही. माझा विश्वास आहे की, 5 वर्षे जेव्हा हे सरकार काम करेल तेव्हा महाभारतात द्रोणाचार्य कौरवांच्या बाजूने होता पण आशीर्वाद अर्जुनाच्या बाजूने होता, तसाच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार ....

तुमचाही आशीर्वाद या बाजूने राहिल्याशिवाय राहणार नाही. एका कागदावर लिहून घ्या. तुम्ही सांगितले की, सन 2010-11 मध्ये पीक विम्यासाठी 14 कोटी 97 लाख रूपये दिल. सन 2011-12 मध्ये 174 कोटी रूपये दिले. सरकारने सन 2014-15 मध्ये 1887 कोटी रूपये पीक विम्यासाठी दिले. आपण आपला हिस्सा देतो. लोकांनी हप्ता भरला आहे. लोकांचा विमा हप्ता किती आहे ते सांगातो. सन 2014-15 मध्ये लोकांचा जमा विमा हप्ता 392 कोटी रूपये आहे, म्हणजेच 392.92 कोटी रूपये आहे. सन 2014-15 मध्ये नुकसानभरपाईस पात्र शेतकरी संख्या 47 लाख 11 हजार आहे आणि पीक विमा 1887 कोटी रूपये दिला आहे. ही चूक केली का ? तुम्ही म्हणता की, पुरवणी मागण्या वाढल्या आहेत. मात्र त्या कशासाठी वाढल्या आहेत ? (अडथळा) मी कर्जावरच येत आहे. जुलै, 2015 चा अर्थसंकल्प मांडला. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांची सूचना मूल्यवानच आहे की, पुरवणी मागण्यांचा आकारमान वाढता कामा नये. मी तुमच्या मताशी 101 टक्के सहमत आहे. आपले मत याबाबतीत एक आहे, जसे अगोदर राहायचे. माझ्या मनात याबाबतीत शंका नाही की, पुरवणी मागण्यांचे आकारमान जास्त होता कामा नये. पण यातील काही तात्विक, तांत्रिक अडचणी समजून घेतल्या पाहिजेत. जेव्हा निती आयोग बसला, तेव्हा केंद्र सरकारचा हिस्सा, राज्याचा हिस्सा यामध्ये संभ्रम होता, तो आता दूर झाला. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेब, तुम्ही यातील अर्थशास्त्र जाणता. आता आपल्याला लक्षात आले की, या योजनेमध्ये त्यांनी 60:40 चा हिस्सा केला. आपल्याला 1970 कोटी रूपये त्यापोटी द्यावे लागत आहेत. पुरवणी मागण्यांमध्ये ते येईल. आता शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री विठ्ठलाच्या पुजेला जातात, माननीय कृषी मंत्री विठ्ठलाच्या पुजेला जातात. विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना करतात की, हे वर्ष आमच्या शेतकऱ्यांसाठी चांगले जाऊ दे. पण मार्चमध्ये आपण असे मनात थोडेच धरतो की, येणारे वर्ष शेतकऱ्यांसाठी वाईट जाणार आहे. दुर्दैवाने याही वर्षी दुष्काळसदृश परिस्थिती होती आणि त्यासाठी या पुरवणी मागण्यांमध्ये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करणे यासाठी 4002 कोटी रूपये तरतूद केली. नुसते एवढेच केले नाही तर यामधील निव्वळ भार 11603 कोटी रूपये आहे. मी नम्रपणे सन्माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार ....

विरोधी पक्षनेत्यांच्या, सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून देतो की, निव्वळ भार यापैकी 5351.8 कोटी रूपये हे आपण शेतकऱ्यांसाठी खर्च करीत आहोत. मला वाटते की, याचे आपण कौतुक केले पाहिजे. सभागृहात कौतुक करताना काही विरोधी मतमतांतराच्या अडचणी येत असतील तर एका कागदावर लिहून पाठवावे की, हे कौतुकास्पद आहे. आम्हालाही बरे वाटेल की, असा विरोधी पक्ष आम्ही पाहत आहोत. चांगल्या गोष्टीला चांगले म्हणत आहेत. जेथे आम्ही वाईट करतो, जेथे चुकतो, तेथे तुम्ही आमच्या मागे लोकशाहीचा हंटर घेऊन उभे राहिलात तर आम्ही त्याचे स्वागत करू. पण जे चांगले आहे, त्याला चांगले म्हटले पाहिजे. या सरकारची निती काय आहे ते पहा की, जे बोलले ते पूर्ण केले पाहिजे. (अडथळा) कर्जमाफीचा शब्द काढू नका. शेतकऱ्यांना माफी हे तुमचे म्हणणेच चूक आहे. त्यांना माफी म्हणूच नका. तुमचे रक्तमांस त्याच्या धान्याने आहे, त्याला काय माफी देणार ? त्याला माफीचा विषय नाही. हे खरे आहे की, शेतकरी अडचणीत आहे. मी विस्तृत भाषण देणार नाही. मी त्याचेही आकडे वाचेन. पुरवणी मागण्यांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केले. पुरवणी मागण्या शेतकऱ्यांसाठी वाढल्या हे निश्चित आहे. भविष्यात पुरवणी मागण्यांचे आकारमान मर्यादित असावे. शास्त्रशुध्द नियोजन करू, पण काही विषय शास्त्रशुध्द नियोजनाच्या बाहेर असतात. जेव्हा सरकार नवीन आले तेव्हा पथकराच्या संदर्भात याच सभागृहात विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य म्हणायचे की, तुम्ही शब्द दिला होता की, पथकर रद्द करणार. पथकराच्या संदर्भात सरकारची भूमिका काय आहे ? तेव्हा आम्ही सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरेजी तुमच्यासारखे प्रिंटिंग मिस्टेक आमच्या जाहिरनाम्यात म्हटले नाही. आम्हीही म्हणू शकलो असतो की, ही आमची प्रिंटिंग मिस्टेक आहे. मी चांगल्या अर्थाने उल्लेख केला.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. माननीय मंत्री शेतकऱ्यांना कशी मदत करतो ते सांगण्याचा प्रयत्न त्यांच्या परीने करीत आहेत. युपीयएच्या सरकारने त्यावेळी कर्जमाफीच्या संदर्भातील निर्णय घेतला होता. महाराष्ट्रातील 7 हजार कोटी रूपयांचे शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले होते. मात्र आज 7 हजार कोटी रूपयांचे सांगितलेले दिसत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

नाही. शेतकऱ्यांना त्यावेळी मदत केली. आज येथे त्यांनी संगितले की, फक्त 1100 कोटी रूपये माफ केले म्हणजे मदत केली असा उल्लेख केला. सर्व आकडेवारी काही वाचून दाखविली नाही. अलीकडच्या काळातीलही दाखविली नाही. विम्याची सुध्दा एकाच वर्षाची आकडेवारी दाखविली. माननीय मंत्र्यांनी अशा प्रकारे प्रत्येकामधून खुबीने काही गोष्टी बाजूला काढण्याचा प्रयत्न केलाआणि आपण कसे सरळ आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास येत आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात सांगितले पाहिजे. विदर्भाचे माननीय वित्तमंत्री आहेत, त्यांनी ते सांगितले तर एकाही माननीय मंत्र्यांनी उत्तर देण्याची गरज नाही.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, कर्जमुक्तीच्या संदर्भात बोलत आहे. कर्जमाफी शब्द योग्य नाही. शेतकऱ्यांना माफी देणारे तुम्ही आम्ही कोणीही होत नाही. एक एकर शेती नांगरायची असेल तर साडे तेरा कि.मी. आडवे-उभे चालावे लागते. आपण येथे एसीमध्ये बसतो, आपले नशीब आहे. कष्टकऱ्याचे जीवन त्याला माहीत आहे. आपण त्याला माफी देण्याचा विषय डोक्यात आणू नका. माफी नाही. त्याला स्वतःच्य पायावर उभे केले पाहिजे, यासाठी विस्तृत चर्चा विधिमंडळात झाली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या अधिवेशनात विधानपरिषदेत उत्तर दिले. अजून चर्चा करता येईल. आता त्यावर आपण चर्चा करायला बसलेलो नाही. पण हे खरे आह की, शेतकऱ्यांना कितीही मदत केली तरी ती कमी आहे, मी तुमच्या या मताशी एकदम सहमत आहे. साधे कारण असे आहे की, आपल्या जीएसडीपीमध्ये शेतकऱ्यांचे 11.3 टक्के उत्पन्न आहे. रोजगारामध्ये 52 टक्के हिस्सा शेतकऱ्यांचा कृषी क्षेत्रातील आहे त्यांना जितकी मदत दिली ती कमी आहे. तुम्हाला माहीत आहे की, मराठवाडा आणि विदर्भात कृषी पंपासाठी पहिल्यांदा 5 वर्षांची आपली आकडेवारी एकत्र होईल, त्याच्या तिप्पट पैसे एका वर्षात माननीय मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अतिशय सक्षम नेतृत्वात 1039 कोटी रूपये दिले. आता आपण जलयुक्त शिवार योजनेमध्ये 600 कोटी रूपये दिले.

....3J

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

जलयुक्त शिवार योजनेसाठी 600 कोटी रूपये दिले. नियमाच्या आणि निकषांच्या अधीन राहिलेच पाहिजे. परंतु, जलयुक्त शिवार योजनेसाठी 600 कोटी रूपये देत असताना त्या त्या जिल्ह्यांना अधिकारही दिले आहेत. आपल्याही जिल्ह्याला अधिकार दिले आहेत. जलसंपदा विभागाला 7272 कोटी रूपये दिले आहेत. आपण गेल्या 10 वर्षातील आकडेवारी बघितली तर जलसंपदा विभागालाही कट लावण्यात आला होता. आपण पहिल्यांदा जलसंपदा विभागाच्या माध्यमातून पाण्याचा थेंबनथेंब शेतकऱ्यांसाठी अडविला पाहिजे, या उद्देशाने तरतूद केली आहे.

सभापती महोदय, आपल्याकडे जादुची कांडी नाही किंवा अल्लाऊद्दिनचा दिवा नाही की ज्यामुळे 15 वर्षाचे साठलेले सर्व प्रश्न एका वर्षात आपण सोडवू शकू आणि ते तसे सोडविण्याचा दावाही मी अर्थ मंत्री म्हणून करणार नाही. मात्र एक दावा मी निश्चितपणे करणार आहे की, कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या राज्यामध्ये विकासाची गाडी ताशी 20 किलो मिटर वेगाने धावत होती. पण आमच्या सरकारची गाडी ताशी 100 किलो मिटर वेगाने धावत आहे. हेही मान्य आहे की, आमच्या समोरील लक्ष्य अजून दूर आहे. पण तेथेपर्यंत आम्हाला पोहोचायचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एक अतिशय महत्वाचा मुद्दा मांडला आहे. माझा दृष्टीकोन असा आहे की, एकदा राज्यावरील वाढत्या कर्जाबाबत सभागृहात सर्वंकष चर्चा झाली पाहिजे. कर्जाबाबत मी प्रयत्न केला. आपण असा प्रश्न उपस्थित केला की, 50 हजार कोटी रूपयांचे कर्ज काढले, त्याचे काय केले ? हाच प्रश्न माझ्याही मनात होता की, मागील सरकारने 3 लक्ष कोटी रूपयांचे कर्ज काढले, हे कर्ज कोठे खर्च झाले ? त्यामुळे मी या संदर्भात श्वेतपत्रिका काढली. श्वेतपत्रिका काढल्यानंतर लक्षात आले की, आपल्याला या संदर्भात शास्त्रशुध्द नियोजन करण्याची आवश्यकता आहे. उत्पादकता वाढविण्याची आवश्यकता आहे. उत्पादक कामासाठी खर्च करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या सरकारचे पहिले वर्ष होते. मार्चमधील बजेटचे आकडे पाहिल्यानंतर आपल्या लक्षात आले असेल की, अनेक वर्ष या सरकारची कॅपिटल इन्व्हेस्टमेंट 18

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

हजार कोटी रूपयांच्या आसपास होती, ती 28 हजार कोटी रूपयांपर्यंत आपण नेली आहे. तेवढेच केले नाही तर पुढील चार वर्षात या विधिमंडळाच्या पवित्र सभागृहाच्या साक्षीने आपण स्वत:ला असे बांधून घेतले आहे की, पाचव्या वर्षी ही कॅपिटल इन्व्हेस्टमेंट 40 हजार कोटी रूपयांपर्यंत गेली पाहिजे. आपण जोपर्यंत भांडवली खर्च वाढविणार नाही तो पर्यंत विकास दर वाढणार नाही आणि जो पर्यंत कृषी क्षेत्रामध्ये निगेटिव्ह ग्रोथ रेट आहे, त्यांना विकासाच्या माध्यमातून आपण वाढविणार नाही तो पर्यंत आपण या ठिकाणी कितीही चर्चा केली तरी काही साध्य होणार नाही. तुम्हालाही अंत:करणापासून असे वाटते की, शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये आनंदाचे दिवस यावेत, आम्हालाही तसेच वाटते. कुणाच्याही मनात ही भावना नाही की, शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये चांगले दिवस येता कामा नयेत. जेव्हा तुम्ही आमच्या भूमिकेची चिकित्सा करता तेव्हा आपल्या लक्षात येईल की, शेतकऱ्यांच्या दिशेने जाणारा विकासाचा जो मार्ग आहे तेथपर्यंत वेगाने पोहोचण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

सभापती महोदय, अनेकदा असे होते की, आपल्याला जी माहिती प्राप्त होते ती अर्धवट असते. संस्कृतमधील एक श्लोक आहे. "माकडास पुच्छ, तीन हत्तीस दंत सहा" आता जर आपण वाचताना चुक केली आणि असे वाचले की, "माकडास पुच्छ तीन..." तर आपल्या मनात असा प्रश्न निर्माण होईल की, माकडाला तीन शेपट्या कशा असू शकतील ? पुढे "हत्तीस दंत सहा...." असे वाचल्यानंतर आपल्या मनात दुसरा प्रश्न निर्माण होईल की, हत्तीला सहा दात कसे असू शकतील ? वाक्य बरोबर आहे. फक्त वाचनात चुक आहे. त्या ऐवजी "माकडास पुच्छ," असे वाचून थोडे थांबले पाहिजे आणि पुढे "तीन हत्तीस दंत सहा..." असे वाचले पाहिजे. म्हणजे, तीन हत्तींना सहा दात आहेत आणि माकडास एक शेपटी आहे, असा अर्थ निघू शकेल.

सभापती महोदय, कर्जाच्या बाबतीत ज्यावेळी आपण विचार करतो त्यावेळी हीच भावना निर्माण होते. मी या संदर्भातील प्रयत्न केला. तुम्हाला हे लक्षात आणून देतो की, मी पूर्ण आकडे सांगितले तर तुम्हालाही स्वत:बद्दल इतका राग येईल. नागपूरमध्ये तुम्ही कोणी अर्ज भरला नाही,

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

अविरोध निवडून दिले. मी सर्व आकडे सांगितले तर 288 सदस्यांची ही विधानसभा आपण आम्हाला बिनविरोध द्याल. एका वर्षाची आमची एवढी कामगिरी आहे. सर्व निवडणुका अविरोध होतील.

सभापती महोदय, आज आपण 24 हजार कोटी रुपयांची मुद्दल आणि 27 हजार कोटी रुपयांचे व्याज भरत आहोत आणि त्यासाठी कर्ज काढण्याचा प्रयत्न करीत आहोत. निव्वळ कर्ज 30581 कोटी रुपयांचे आहे. त्यात काय चुक आहे ? 24 हजार कोटी रुपयांची मुद्दल भरावयाची आहे आणि 27 हजार कोटी रुपयांचे व्याज भरावयाचे आहे. हे खरे आहे की, एका वर्षात राज्य कर्जमुक्त करता येणार नाही. कर्ज काढून मागील सरकारने चुक केली, असे मी म्हणणार नाही. मागील सरकारच्या माननीय अर्थ मंत्र्यांचे मी कौतुक करीन की, काही बाबतीत त्यांनीही प्रयत्न केला होता. शेवटी एका व्यक्तिने प्रयत्न करुन एखादी व्यवस्था बदलता येणार नाही. त्यासाठी सामुहिक प्रयत्न लागतात. सन्माननीय सदस्य श्री.माणिकरावजी ठाकरे यांना सांगू इच्छितो की, मागील सरकारमध्ये सामुहिक प्रयत्न नव्हते आणि त्याचा परिणाम कर्जबाजारी होण्यामध्ये झाला.

सभापती महोदय, आज आपल्या राज्याची आर्थिक अवस्था काय आहे ? राज्याची सन 2015-2016 साठी आपण अंदाजित अपेक्षा केली आहे की.....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, हे बरोबर नाही. अनेकदा आम्हालाही वाटते की, मध्येच उभे रहावे. पण आम्ही आमच्यावर संयम ठेवतो.

सभापती महोदय, मी जी आकडेवारी दिली आहे, त्या आकडेवारीबाबत सन्माननीय सदस्यांची हरकत असेल तर तो हरकतीचा मुद्दा ऐकून घेण्यास आम्ही तयार आहोत. परंतु, अशा प्रकारे भाषणात अन्य कारणांसाठी व्यत्यय आणणे बरोबर नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चा होत असताना प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपल्या जिल्ह्यातील, आपल्या मतदार संघातील मुद्दे मांडण्याचा प्रयत्न

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार.....
केलेला आहे व त्यासंदर्भात प्रत्येक विभागाच्या मंत्री महोदयांकडून खुलासा होईल, अशी त्यांची अपेक्षा आहे. या ठिकाणी 15 मंत्री महोदय उपस्थित आहेत. आम्हाला असे वाटले होते की, त्या त्या सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना मंत्री महोदयांकडून काही तरी न्याय मिळेल आणि सर्व मंत्री महोदय उत्तर देतील. परंतु, एकाच मंत्री महोदयांनी राजकीय भाषण करायचे आणि पुरवणी मागण्या मान्य करायच्या, ही पध्दत अलीकडेच निर्माण झाली आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुद्दे मांडले आहेत. प्रथा, परंपरेनुसार सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे प्रत्येक वाक्य महत्वाचे आहे. या लोकशाही राज्य व्यवस्थेमध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना मुख्यमंत्री महोदयांच्या बरोबरीने स्थान आहे. त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या मुद्यांना समर्पक उत्तरे देणे सन्माननीय सदस्य श्री.माणिकरावजी ठाकरे यांना पटत नसले तरी लोकशाहीमध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे महत्व अबाधित आहे, तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी त्यांच्या प्रत्येक प्रश्नांना मी उत्तरे देईन, देईन आणि देईन. त्यांना मुख्यमंत्री महोदयांच्या बरोबरीचे स्थान आहे, आपण मला अशा प्रकारे थांबवू शकणर नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सर्वांच्या वतीने मंत्री महोदय उत्तर देत आहेत.

तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) : ज्यावेळी मंत्री महोदयांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, मी सर्वांच्या वतीने बोलणार आहे. त्याचवेळी सन्माननीय सदस्यांनी हा विषय उपस्थित केला असता तर मी देखील त्यावर बोललो असतो. आता ते त्यांच्या भाषणाच्या शेवटाकडे आले आहेत आणि त्यानंतर राईट टु रिप्लाय देखील होणार आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, आम्ही सुध्दा सरकारी पक्षाला सहकार्य करु, असे सकाळच्या बैठकीत सांगितले होते. प्रत्येक विभागाच्या मंत्री महोदयांनी जबाबदारीने उत्तर दिले पाहिजे. एकाच मंत्री महोदयांनी उत्तर देणे, हे अभिप्रेत नाही. परंतु, आम्ही मान्य केले. पण वित्त मंत्री महोदयांनी मेहरबानी करुन राजकीय भाषण करु नये. त्यांनी आपले भाषण अर्थ तज्ज्ञ म्हणून करावे, अर्थ मंत्री म्हणून करावे, एवढीच आमची विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3J-5

SRR/ ST/ 21:10

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, अर्थ मंत्री म्हणून माझी सभागृहाकडून एकच अपेक्षा आहे की, राज्याचे उत्पन्न कसे वाढेल, या महत्वाच्या विषयावर आपल्याला चर्चा करावी लागणार आहे. आपण राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत चिंता व्यक्त करतो. मी सभागृहाला आवाहन करतो की, राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत चिंता व्यक्त करीत असताना राज्याची स्थिती सुधारण्यासाठी चांगल्या मौल्यवान सूचनाही आमच्यापर्यंत याव्यात. अन्यथा भाषणाची सुरुवात राज्याच्या आर्थिक स्थितीच्या चिंतेपासून होते आणि राज्याची आर्थिक स्थिती आणखी चिंताजनक करणाच्या 50 खर्चाच्या बाबी मांडल्या जातात. एकीकडे आर्थिक चिंता व्यक्त करायची आणि पुन्हा खर्च कसा वाढेल याबाबतच्या मागण्या करायच्या. यामध्ये बदल केला पाहिजे.

सभापती महोदय, मी माझे भाषण दोन ते तीन मिनिटात संपविणार आहे. आम्ही जी आश्वासने दिली होती त्यापैकी काही आश्वासने पहिल्या वर्षात पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न केला. एलबीटीचा निर्णय आम्ही घेतला. ज्यावेळी एलबीटी साफ करण्यात आला त्यावेळी अशीही चर्चा झाली की, दुसरा नवीन कर लावला जाईल. परंतु, आम्ही तसे केले नाही. एलबीटीसाठी वेगळी तरतूद केली. आम्ही पथकर काढून टाकला. पथकराच्या बाबतीत 799 कोटी रुपये द्यावयाचे होते तेही आम्ही दिले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, प्रोफेशनल टॅक्स रोजगार हमी योजनेशी निगडित होता.

...3K-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

मी त्यांच्या लक्षात आणून देतो की, तो प्रोफेशनल टॅक्स अगोदर रोजगार हमी योजनेसाठी होता. परंतु, मागील सरकारने तो स्टेट पुलमध्ये टाकलेला आहे. आता प्रोफेशनल टॅक्सचा रोजगार हमी योजनेशी संबंध नाही. आम्ही मागील सरकारला त्यावेळी विनंती केली होती. परंतु, त्यावेळी सरकारने ते ऐकले नाही. आता आपल्याला पुन्हा प्रोफेशनल टॅक्स, रोजगार हमी योजना किंवा जलयुक्त शिवार असे करणे शक्य नाही. माझे असे मत आहे की, मागील सरकारने त्यावेळी अतिशय विचारपूर्वक ते पाऊल उचलले होते. त्यावेळी विचारपूर्वक उचलण्यात आलेले पाऊल आता बदलता येणे शक्य आहे, असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत नगरपालिका, जिल्हापरिषद ना हरकत प्रमाणपत्राच्या अभावी निधी अखर्चित राहतो याबद्दल भूमिका व्यक्त केली आहे. आपण मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात निश्चितपणे बैठक घेऊ. यामध्ये काही अडचणी आहेत. इतर विषयांच्या संदर्भात संबंधित विभागाचे मंत्री आपल्या विभागाला सूचना देतील की, सभागृहात जे प्रश्न उपस्थित झाले त्या प्रश्नांची माहिती किंवा त्या प्रश्नांचे उत्तर त्या विभागाच्या माध्यमातून दिले जाईल.

सभापती महोदय, सभागृहाने या पुरविणी मागण्यांवर विचार करावा, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेला एकत्रित उत्तर दिले आहे. माननीय वित्तमंत्र्यांना जेवढे बोलावयाचे होते तेवढे ते अतिशय पद्धतशीरपणे बोलले. परंतु, सर्वच सन्माननीय सदस्यांनी ज्या मूलभूत मागण्या केल्या होत्या त्या ते सोपस्कारपणे विसरले. सन्माननीय सदस्यांनी ज्या मागण्या केल्या त्याचा कोणत्याही उल्लेख मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात केलेला नाही. विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी माझा सन्मान ठेवला, हे ठीक आहे. परंतु, मी जे मुद्दे उपस्थित केले त्याबाबत माननीय वित्तमंत्र्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात उल्लेख केलेला नाही. एकीकडे त्यांनी आम्ही शेतकऱ्यांना किती मदत केली, काय झाले, 7 कोटी हजार रुपये याबाबत सांगितले. परंतु, आपण सेस देखील 2 टक्क्यांनी वाढविला आहे. राज्यातील सर्वसामान्य जनतेकडून पेट्रोल, डिझेलवरील टॅक्सच्या माध्यमातून 1600 कोटी रुपये जमा होणार आहेत. (...अडथळा...) मी कोठे म्हटले की, आपण थोडक्यात उत्तर द्यावे. आपण स्व.गोपीनाथ मुंडे साहेबांच्या स्मारकासाठी निधीची तरतूद केली. त्याबाबत आपण उल्लेख केला नाही. ज्या महान नेत्याच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आम्ही मागणी केली. त्याबाबत देखील आपण उल्लेख केला नाही.

सभापती महोदय, आम्हाला सामाजिक न्याय मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित होते. तुम्ही जर राज्यातील महापुरुषांच्या जन्म तारखा बदलणार असाल तर याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या मंत्री महोदयांनी उत्तर द्यावयाव नको होते ? छत्रपती शाहू महाराजांची जन्म तारीख का बदलण्यात आली, सामान्य प्रशासन विभागाने याबाबत शासन निर्णय का काढला आणि सामान्य प्रशासन विभागाने तो शासन निर्णय काढताना सामाजिक न्याय विभागाकडे विचारणा केली होती काय ? सामान्य प्रशासन विभागाने काढलेल्या शासन निर्णयाची प्रत सामाजिक न्याय मंत्रालयाकडे नाही. सामाजिक न्याय मंत्रालय माझ्या कार्यालयाकडे त्या शासन निर्णयाची कॉपी मागते, ही वस्तुस्थिती आहे. आम्ही सांगितले की शासनाने कर्ज घेतले आहे. कर्ज का घेतले, किती घेतले याबाबत त्यांनी स्पष्टता केली. परंतु, तुम्ही आता पुरवणी मागणीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर नियोजन समोर ठेवले आहे. आमची एवढीच अपेक्षा होती की, माननीय राज्यपालांनी जे निर्देश दिलेले आहेत ते आपण या पुरवणी मागणीमध्ये विभाग निहाय का दाखविले नाहीत याचेही उत्तर

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

आम्हाला अपेक्षित होते. आम्हाला याबाबत उत्तर का मिळाले नाही ? आमची एवढीच माफक अपेक्षा होती. विरोधाला विरोध करावयाचा, शासनावर टिका करावयाची, म्हणून आम्ही पुरवणी मागण्यांवर चर्चा केली नाही. आम्हाला शासनाला माफक सूचना करावयाच्या होत्या. आम्ही काय केले, काय केले नाही, त्याची जी शिक्षा द्यावयाची होती, ती जनतेने आम्हाला दिलेली आहे आणि आम्ही ती आनंदाने स्वीकारली आहे. परंतु, मागील 15 वर्षात तुम्ही ज्या भूमिकेत होता त्या भूमिकेत आज आम्ही आहोत. मागील 15 वर्षात तुम्ही सत्ताधारी पक्षाला ज्या सूचना केल्या त्या सूचना आम्ही करीत असू तर आमच्या सूचना चुकीच्या आहेत काय ? आम्ही आज त्या सूचना मांडल्या आणि मागील 15 वर्षात तुम्ही ज्या सूचना मांडत होता त्या सूचना आम्ही बरोबर म्हणावयाच्या का चुकीच्या म्हणावयाच्या ? याचा काही अर्थ असूच शकत नाही. आमची अपेक्षा एवढीच आहे की, तुम्ही विरोधी बाकावर असताना शिस्त लावण्याच्या बाबतीत बोलत होता. आता आम्ही त्याची आठवण करुन दिली तर त्याचा कोणाला राग येण्याचे काही कारणच नाही. कोणाला त्याचा राग का यावा ? तुम्ही तुमच्या भाषणात शासनाने शिस्त लावावी असे सांगत होता. आज ती शिस्त लागावी एवढीच आमची अपेक्षा आहे. तुम्ही जे बोललात ते व्हावे एवढीच आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक करण्याची घोषणा आम्ही केलेली नाही, ती घोषणा तुम्ही केलेली आहे. महापुरुषांच्या जन्म तारखा बदलल्या नाही पाहिजेत, ही भूमिका सर्वांचीच असली पाहिजे. महापुरुषांच्या जन्म तारखा बदलल्या तर त्या बाबतीत देखील खुलासा व्हावयास पाहिजे. शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी का कर्जमुक्ती द्यावी, हा विषय वेगळा आहे. आपण सांगता की, आम्हाला शेतकऱ्यांना त्यांच्या पायावर उभे करावयाचे आहे. आम्हाला ते मान्य आहे. कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्याला आपल्या शेतकरी भावाला त्यांच्या पायावर उभे करावेच लागेल. परंतु, ते करण्यासाठी आपण एलबीटी दिला, एलबीटी देत असताना कर माफी दिली, ती कर माफी होत असताना व्यापाऱ्याला उभे करण्याच्या बाबतीत आपण भूमिका नाही घेतली ? प्रत्येक वर्षी 7 हजार रुपये याप्रमाणे 5 वर्षात 35 हजार कोटी रुपयांचा व्यापाऱ्यांच्या बाबतीत विचार केला गेला. आमचे म्हणणे आहे की, त्यांच्या बाबतीत जसा विचार केला तसा

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

शेतकऱ्यांच्या बाबतीत देखील विचार करावा. या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून आम्ही कोणती अपेक्षा ठेवावी ? पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून 16 हजार कोटी रुपयांचा विषय आलेला आहे. सरकार खरोखर 15 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करणार आहे काय ? आपल्याकडून कर्जमुक्ती होणार आहे किंवा नाही याबाबत देखील उल्लेख होणे आवश्यक होते. म्हणून आमची विनंती होती की, माननीय राज्यपालांनी विभाग निहाय जे निर्देश दिलेले आहेत त्याबाबत उल्लेख होणे आवश्यक होते. आम्ही माननीय वित्त मंत्र्यांकडून जी अपेक्षा केली होती ती अपेक्षा मावळलेली आहे. आम्ही सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या विषयांच्या संदर्भात मागणी केलेली आहे त्याबाबत उल्लेख व्हावयास नको ? वसंतराव नाईक विकास महामंडळ आणि अपंग कल्याण विकास महामंडळाच्या संदर्भातील एका अधिकाऱ्याच्या बाबतीत मी स्पष्ट उल्लेख केलेला आहे. वित्तमंत्री महोदय विरोधी पक्षात असताना त्यांनी जी भाषणे केली होती ती भाषणे मी वाचलेली आहेत. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत मंत्री महोदयांकडून उत्तरे मिळाली आणि एखादा मुद्दा जरी राहिला तरी सन्माननीय सदस्य संबंधित मंत्री महोदयांकडून आग्रहपूर्वक उत्तर घेत होते. मग आम्ही तशी अपेक्षा केल्यानंतर एकाच मंत्री महोदयांनी एकत्रित उत्तर द्यावयाचे हेही या सभागृहाला शोभणारे नाही. म्हणून माझी एवढीच अपेक्षा आहे की, तुम्ही जी शिस्त लावण्याची भाषा केली, ती शिस्त तुमची तुम्हीच लावून घ्यावी आणि ती शिस्त का लावून घ्यावी याबाबत आम्ही म्हटले तर त्याचा दोष आम्हाला देऊ नका. आम्हाला आपल्याकडून खूप अपेक्षा आहेत. मागील 15 वर्षात काय केले, तुम्ही 288 आमदारांच्या संदर्भात विषय उपस्थित केला. नागपूर येथील विधान परिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत भाऊंनी या ठिकाणी उल्लेख केला. माझी एवढीच अपेक्षा आहे की, भारतीय जनता पार्टीला 20 सिटरची बस द्यायची वेळ आमच्यावर येऊ देऊ नका. आपला असाच कारभार राहिला तर 20 सिटर बस द्यावी लागेल. आपण जे राजकीय बोलला त्याला माझ्याकडे राजकीय उत्तर आहे. मला पुरवणी मागण्यांवर बिलकुल राजकीय बोलावयाचे नव्हते. परंतु, अपेक्षा एवढीच आहे की, आपण जी शिस्त सांगितली ती शिस्त आपण लावावी. सन्माननीय सदस्यांनी खातेनिहाय मागण्यांवर चर्चा करताना जे मुद्दे उपस्थित केले, ज्या सूचना केल्या, त्याबाबत संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांनी आम्हाला लेखी उत्तर तरी द्यावे.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

त्याबाबत कार्यवाही करावी, अशी आमची अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्य बाब क्रमांक सांगून विषय मांडतात. संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांनी त्याबाबत काही तरी उत्तर द्यावे, अशी सन्माननीय सदस्यांची माफक अपेक्षा असते. तुम्ही विरोधी पक्षात असताना तुमची ती अपेक्षा नव्हती काय ? माननीय ऊर्जा मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेब आपली ती अपेक्षा नव्हती काय ? आपली तीच अपेक्षा होती. मग आज आम्ही जर ती अपेक्षा केली तर अशा पद्धतीने आमच्या अपेक्षेला तिलांजली द्यावयाची असे आपल्याकडून काही घडू देऊ नका. आम्ही ज्या मागण्या केलेल्या आहेत त्या रास्त मागण्या आहेत. परंतु, आम्हाला त्याबाबत मंत्री महोदयांकडून समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. ज्या गोष्टींबाबत आम्हाला त्यांचे आभार मानावयाचे होते त्याबाबत आम्ही त्यांचे आभारही मानले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांची कर्जमाफी केली पाहिजे. त्यासाठी आणखी 10-15 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढावे आणि शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी. आम्ही विरोधी पक्ष म्हणून एकत्रितपणे त्यासाठी शासनाचे स्वागत करु आणि कर्ज का घेतले म्हणून आम्ही पुढील 5 वर्षे टिका करणार नाही, याचीही हमी देऊ. आम्ही शासनावर टिका करणार नाही. आज शेतकरी अडचणीत आहे. त्यासाठी आणखी 15 हजार कोटी रुपयांचे कर्ज घ्यावे लागले तरी चालेल. शासनाची कर्ज घेण्याची ऐपत आहे. शासनाने कर्ज घ्यावे. परंतु, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी.

धन्यवाद.

..3L-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील प्रत्येक मुद्यांचे विस्तृत उत्तर देण्यास आम्ही तयार आहोत, रात्री एक वाजला तरी हरकत नाही. यामध्ये कोणतीही अडचण नाही. आपण एकत्रित उत्तर देण्याचे सांगितले म्हणून आम्ही एकत्रित उत्तर देत आहोत. विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार राज्य योजनेच्या मंजुर आकारमानाच्या अंतर्गत या पुरक मागण्या येतात. त्यामुळे विभाग व मंडळनिहाय तरतुदीत कोणताही बदल होत नाही. नियमानुसार पुरवणी मागण्या मंडळनिहाय मांडण्याची पध्दत नाही. या अगोदर किती वेळा पुरवणी मागण्या मांडल्या आहेत त्याबाबतचे आपण रेकॉर्ड काढावे. मार्च महिन्यातील बजेटमधील तरतूदीला अधीन राहून पुरवणी मागण्या येतात. पुरवणी मागण्यांच्यावेळी पुन्हा विभागवार मांगण्या मांडण्याची आवश्यकता नसते. आपल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, आम्ही नियमानुसार कार्यवाही करीत आहोत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी अनेक वर्षापासून विधानसभा किंवा विधानपरिषद सभागृहात काम करीत आहे. सदारूढ पक्षात असताना आम्ही बऱ्याचवेळा 10 ते 11 वाजेपर्यंत सभागृहात बसत होतो. पुरवणी मागणीसाठी प्रत्येक मंत्री महोदयांचा संबध येत असल्यामुळे त्यांनी उपस्थित रहावयाचे असते, आज मंत्री महोदय उपस्थित आहेत. मंत्री महोदयांना उपस्थित राहण्याचे आपण सूचित केल्यामुळे त्यांनी त्यांच्या विभागाच्या मागण्यांवर सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले ते त्यांनी लिहून घ्यावयाचे असतात. त्यानंतर त्या प्रश्नांना उत्तर देण्याची कोणतीही प्रक्रिया होत नसेल तर ही पध्दत बंद केली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या विषयाला न्याय मिळाला पाहिजे. मागील अधिवेशनापासून पुरवणी मागणीला त्या खात्याच्या मंत्री महोदयांनी उत्तर देण्याचे बंद केले आहे. मी सतत सदनामध्ये उपस्थित असतो. ज्या माननीय मंत्र्यांच्या विभागाचा प्रश्न असेल ते मंत्री उत्तर देतात. आता आपण नवीन प्रथा सुरु केली आहे की, जे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित असतील त्यांच्याच प्रश्नाला आम्ही उत्तर देऊ ही बाब मला मान्य आहे. सन्माननीय सदस्यांना त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची काळजी नसेल तर आपण त्यांच्या प्रश्नांना उत्तर देऊ नका. सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित असताना त्यांनी उपस्थित केलेल्या एकाही प्रश्नाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

शासन उत्तर देत नसेल व फक्त राजकीय भाषणे करून पुरवणी मागण्या मान्य कराव्यात इतकाच सोपस्कार पार पाडावयाचा असेल तर पुरवणी मागण्या विधानपरिषद सभागृहात मांडण्यात येऊ नयेत अशा प्रकारचा तरी आपण निर्णय घ्यावा. सन्माननीय सदस्यांना न्याय द्यावयाचा असेल तर ज्या विभागाच्या मागण्या चर्चेला घेण्यात आल्या आहेत त्या खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे त्याच मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे. फक्त ठराविक एका मंत्र्यांनी किंवा फक्त वित्त मंत्री महोदयांनी सर्व विभागाच्या मागण्यांना एकत्रित उत्तर द्यावयाचे व उपस्थित केलेल्या प्रश्नांपैकी 99 टक्के प्रश्नांना उत्तर द्यावयाचे नाही, हे बराबर नाही. त्यामुळे ही प्रथा पुढील अधिवेशनापासून तरी बंद करण्यात यावी. तसे होत नसेल आणि आपणाला सभागृहाचे कामकाज असेच चालवायचे असेल तर आपण सभागृह अशाच पध्दतीने चालवावे. ही पध्दत चुकीची आहे यापूर्वी असे कधीही झालेले नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी बोलत आहे. पुरवणी मागण्याच्या माध्यमातून आम्हाला वेगळे प्रश्न मांडता येतात. सभागृहातील हे एक माध्यम आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून वेगळे प्रश्न उपस्थित करता येतात, त्यामुळे हे माध्यम तोडू नका. आता वेळ झालेली आहे, त्यामुळे याबाबत आमचे काहीही म्हणणे नाही.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे मागच्या पुरवणी मागण्यांच्या वेळी लेखी उत्तर देण्यात येईल असे मंत्री महोदय श्री.विनोद तावडे यांनी आम्हाला सांगितले होते. ती प्रथा तरी सुरु करण्यात यावी. अधिकारी येथे अदृश्य म्हणून बसले आहेत. ते लिहित असतात आम्ही ज्या प्रमाणे विशेष उल्लेख मांडत असतो व विशेष उल्लेखाचे उत्तर आम्हाला येते, त्यातून आम्हाला न्याय मिळतो. तशा प्रकारची कार्यवाही याबाबत करण्यात यावी.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्हाला असे वाटते की, या सर्व प्रथा परंपरा आपण मोडत आहोत. मी येथे मुद्दाम सांगते की, विधानपरिषदेमध्ये माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते आहेत, विधानपरिषदेतील सदस्य शेवटपर्यंत उपस्थित असायचे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर, असे आम्ही सर्व साडेनऊ ते दहा वाजेपर्यंत थांबून सर्व मंत्री महोदयांची उत्तरे ऐकली आहेत. याचा अर्थ ती उत्तरे समाधानकारक होती अशी पाठ थोपटून आपण घेऊ नका. दुसरी विनंती अशी आहे की, मी सुरुवातीला देखील म्हटले की, आम्ही गेल्या वेळी ज्या मागण्या मांडल्या होत्या त्याची लेखी उत्तरे कोणत्याही मंत्रालयाकडून आली नाहीत हे योग्य नाही. तुम्हाला वेळ नसतो हे खरे असले तरी मंत्री महोदयांकडून पाच किंवा दोन मिनिटांचे उत्तर रेकॉर्डवर आले तर त्या मागण्यांच्या संदर्भात संबंधित सदस्यांचे समाधान होते, ही वस्तुस्थिती आहे. पुढच्या काळात वेळेचे नियोजन कसे करावे याबाबत संसदीय कार्य मंत्री महोदयांनी त्यांचे कौशल्य वापरले तर त्याचा फायदा होईल असे मला वाटते. यादृष्टीकोनातून माननीय सभापती महोदयांनी दखल घ्यावी.

तालिका सभापती : मला असे म्हणावयाचे आहे की, ज्या वेळी पुरवणी मागण्याबाबत आपण चर्चा करतो त्यावेळी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा असते की, प्रत्येक मंत्र्यांनी आपल्या खात्याचे उत्तर दिले पाहिजे. परंतु वित्त मंत्री महोदय बोलण्यास उभे राहिले तेव्हा त्यांच्या अर्ध्या भाषणापर्यंत हा विषय कोणीच उपस्थित केला नाही. त्यामुळे सभागृहातील सदस्यांची देखील जबाबदारी असते की, त्यांनी सतर्क राहिले पाहिजे. राईट ऑफ रिप्लाय हा विरोधी पक्ष नेत्यांचा अधिकार असतो. राईट ऑफ रिप्लाय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडतांना काही सूचना केल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी देखील काही सूचना केल्या आहेत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काही सूचना केल्या आहेत. त्या सूचनांचा मंत्री महोदयांनी विचार करावा.

सन 2015-2016 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. XIII OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री (शहरे)) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-13 फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

तालिका सभापती : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव आहे, त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक-13 फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2015 विधानपरिषदेची सहमती घेऊन विधानपरिषदेच्या 10 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

तालिका सभापती : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव या दोन्ही प्रस्तावांवर एकत्रित चर्चा होईल, त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल, तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणाला सुरुवात करावी.

.....3M-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, फौजदारी प्रक्रिया संहिता विधेयकावर बोलत असताना कलम 156 (3) अन्वये आपल्याला जो अधिकार दिलेला आहे त्यानुसार सरकारी नोकरदार, राजकीय नेते या सर्व संबंधितांवर आपण कोर्टात जाऊन केस दाखल करु शकत होतो. त्यामुळे प्रशासकीय कामामध्ये अनेक अडचणी येत असत. त्याबाबत हे विधेयक अत्यंत महत्वाचे आहे. या विधेयकाबाबत आम्ही काही सुधारणा सुचविल्या होत्या. त्या सुधारणांचा सरकारने विचार केला आणि सुधारणेसह हे विधेयक सभागृहापुढे मंजुरीसाठी आलेले आहे. या विधेयकानुसार जे लोकसेवक आपले कर्तव्य पार पाडताना सद्भावनेने काम करतात, त्यांना संरक्षण देणे आवश्यक आहे. अन्यथा लोकसेवकास कोणतेही भय न बाळगता कोणताही पक्षपात न करता आपले कर्तव्य पार पाडणे शक्य होणार नाही. म्हणून फौजदारी प्रक्रिया संहितेतील 1973 (1974 चा 2) याच्या कलम 156 व 190 मध्ये यथोचितरित्या सुधारणा करुन लोकसेवकांविरुध्द खटला दाखल करण्यासाठी पूर्वमंजुरी घेण्याची स्पष्ट तरतूद करणे इष्ट आहे असे राज्य शासनाला वाटते ही वस्तुस्थिती आहे. कदाचित कोर्टात कलम 156 (3) अंतर्गत खटला दाखल करण्याबाबत अर्ज सादर केला आणि कोर्टाने आदेश दिले तर ज्या अधिकाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करावयाचा आहे, ज्या लोकसेवकाविरुध्द गुन्हा दाखल करावयाचा आहे त्या लोकसेवकाच्या वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्याची परवानगी घेऊन, सचिवाची परवानगी घेऊन कारवाई करण्याबाबतची तरतूद या विधेयकामध्ये आहे. ते राज्य सरकारच्या कामकाजाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे हे विधेयक सभागृहाने मंजूर करण्याबाबत मी सहमती देत आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानपरिषद सदस्यांच्या प्रवर समितीकडे हे विधेयक पाठविण्याबाबतचा जो प्रस्ताव मी दिलेला आहे त्या मागची भावना हीच आहे की, कलम 156(3) बद्दल लोकप्रतिनिधी, लोकसेवक यांच्या भावना काय आहेत याची आम्हाला जाणीव आहे. आमची त्याबाबत असहमती आहे असे नाही. सरकारने जी भूमिका घेतली आहे त्याबाबत आम्ही सहमत आहोत. परंतु महिलांवर होणारे अत्याचार, अनुसूचित जाती जमातीवर होणारे अत्याचार याबाबत एखाद्या अधिकाऱ्याने वेगळे वळण लावले किंवा गैरवापर केला तर सरकारचे त्यावर बंधन राहणार नाही. म्हणून या विधेयकाच्या निमित्ताने सरकारला मी हे सांगू इच्छितो की, आम्ही त्या दृष्टीने सुधारणा दिलेली आहे. 'मंजूर प्राधिकाऱ्याकडून मंजुरी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल, म्हणजे जो मंजुरी प्राधिकारी आहे त्याच्याकडून मंजुरी दिल्याचे मानण्यात येईल' आणि त्याला सब क्लॉज आहे. 'तसेच मंजुरी प्राधिकाऱ्याविरुध्द कर्तव्यात कसूर केल्याबद्दल उचित कारवाई करण्यात येईल.' संबंधित अधिकाऱ्याला तुम्ही पॉवरफूल करीत आहात. सर्व अधिकार देत आहात. महिला अत्याचार, बाल अत्याचार, अनुसूचित जाती जमातीवर होणारे अत्याचार, खैरलांजीसारखी प्रकरणे घडतात अशा वेळी या अधिकाऱ्याकडून वेगळा विचार केला जातो. न्यायालयाकडून काही वेळेला वेगळया पध्दतीने विचार केला जातो. परंतु न्यायालयावर टीका केली जात नाही. अशा लोकसेवक असलेल्या कोणत्याही व्यक्तीने आपली पदीय कर्तव्ये पार पाडण्याच्या ओघात कार्य करीत असताना किंवा ते कार्य करणे अभिप्रेत असताना अपराध केला असल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीला जबाबदार धरायचे नाही का? राज्य सरकारने याबाबत काहीही तरतूद केलेली नाही. म्हणून खंड 2 ला आम्ही सुधारणा दिली आहे. खंड 3 मध्ये तोच भाग आहे. 'मंजुरी प्राधिकाऱ्याकडून मंजुरी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. तसेच मंजुरी प्राधिकाऱ्याविरुध्द कर्तव्यात कसूर केल्याबद्दल उचित कारवाई करण्यात येईल.' हा भाग राज्य शासनाने विधेयकामध्ये कुठेही समावेश केलेला नाही. अधिकाऱ्यांना मोकळे रान सोडलेले आहे. त्याचा दुरुपयोग होऊ शकतो. दुरुपयोग होऊ नये म्हणून अधिकाऱ्याला अधिकार द्यायचे, पण त्याच्यावर कोणाचा वचक नाही. अशा परिस्थितीत तो मंत्र्यांना सुध्दा विचारणार नाही. सोलापूरला काय घडले? सोलापूरला जिल्हाधिकाऱ्यांविरुध्द पालकमंत्र्यांना मोर्चा काढावा लागला. माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांचा सोलापूरशी फार जवळचा संबंध आहे. ते सोलापूरचे अनेक

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे.....

वर्षे प्रभारी होते. जिल्हाधिकाऱ्यांनी उद्या असे गृहित धरले की, या अधिकाराचा वापर करून पालकमंत्र्यांविरूध्द अधिकाऱ्याला गुन्हा दाखल करावयास सांगायचे, तर तुम्ही काय करणार आहात? तुमचा त्याच्यावर चेक नाही. तुमचा त्या अधिकाऱ्यावर वचक नाही. शेवटी शासन म्हणजे मंत्रिमंडळ असते. या सभागृहात अधिकारी उत्तर द्यायला येत नाहीत. अधिकारी अदृश्य गॅलरीमधून चिठ्ठया पाठवित असतात, त्या चिठ्ठयांमुळे शिक्षणमंत्री, वित्तमंत्री तोंडघशी पडतात. माझे म्हणणे हेच आहे की, राज्य शासनाने, मंत्रिमंडळाने अशा प्रकारे कोणत्याही अधिकाऱ्याला 100 टक्के अधिकार देऊ नयेत. त्यासाठी मी जी सुधारणा दिलेली आहे ती सरकारला पोषक आहे. सरकारच्या विरोधात नाही. विधेयकाच्या विरोधात नाही. मंत्र्यांना, लोकप्रतिनिधींना अधिकारी वाईट वागणूक देतात. त्यावेळी सरकारला त्यांना संरक्षण द्यावे लागेल. म्हणून या बिलाच्या निमित्ताने संबंधित प्राधिकाऱ्यावर वचक राहिला पाहिजे. त्या अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. त्या प्राधिकाऱ्याने कर्तव्यात कसूर केली तर त्या प्राधिकाऱ्यावर कारवाई करता आली पाहिजे. म्हणून मी जी सुधारणा सुचविली आहे ती शासनाला सुध्दा उपयोगाची आहे आणि आम्हाला सुध्दा उपयोगाची आहे. लोकप्रतिनिधी, लोकसेवकांना उपयोगाची आहे. ती सुधारणा आपण स्वीकारावी. आम्हाला हे विधेयक मंजूर करण्यामध्ये कोणतीही अडचण वाटत नाही. परंतु कोणत्याही परिस्थितीत सुधारणा स्वीकारावी अशी विनंती करतो.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, वि.प.वि.विधेयक क्रमांक 13 बाबत मी काही सुधारणा सुचवू इच्छितो. हे एक अत्यंत चांगले विधेयक आहे. विधेयकाचा उद्देश चांगला आहे. लोकसेवकांना मोकळेपणाने काम करण्याची संधी मिळाली पाहिजे.

3एन.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.राहुल नार्वेकर...

त्यांनी कोणत्याही दबावाखाली काम करू नये हे या विधेयकामागचे उद्दिष्ट आहे. प्रत्येक वेळी आपण जेव्हा एखादे विधेयक आणतो तेव्हा त्याच्या पाठीमागे उद्देश व कारणे असतात. शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांना त्यांचे काम करण्याची मुभा देण्यासाठी आपण हे विधेयक आणलेले आहे. या विधेयकातील उद्देश व कारणे वाचलीत तर माझ्या दृष्टीने कोर्टाच्या कार्यप्रणालीवर ठपका ठेवण्याचे हे विधेयक काम करीत आहे असे मला वाटते. उद्देश व कारणातील परिच्छेद तीन मध्ये नमूद केले आहे की, "In several cases in connection with the public servants, it is observed that the power under sub-section (3) of section 156 of the said Code has been exercised by the Magistrate in a mechanical or casual manner." तेव्हा माझ्या दृष्टिकोनातून न्यायालय कॅज्युयल मॅनरमध्ये काम करते म्हणून हे विधेयक आणले आहे असे सांगणे अत्यंत चुकीचे ठरेल. त्यामुळे मी शासनाला विनंती करतो या विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये सुधारणा करावी. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधेयकावर चर्चा करणे हा आमचा अधिकार आहे. मी माननीय वित्त मंत्र्यांना गेल्या 20 वर्षापासून सभागृहात बघत आहे. या सभागृहाचे सन्माननीय नेते श्री.एकनाथराव खडसे हे विधेयकावर तीन-तीन तास बोलल्याचे आम्ही पाहिलेले आहे. तेच तेच बोलल्याचे देखील आम्ही ऐकलेले आहे. बिल हे आमचे एक हत्यार आहे. आम्ही बिलावर वेगवेगळ्या अर्थाने बोलू शकतो. तेच हत्यार आपण गाडायला निघाला आहात. रोज दोन बिले करण्याचे ठरलेले आहे. आम्ही गुरूवार पर्यंत बिले काढून देण्याचे कबूल करतो. आम्ही बिले काढून देत नाही असे म्हणत नाही. हे बिल फार महत्त्वाचे आहे. आज पालकमंत्र्यांचा पिंजऱ्यात उभा असलेला फोटो आला आहे. हे किलीही बोलले तरी ते चुकीचे आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुढारी हे एक अग्रगण्य दैनिक आहे. त्यात पालकमंत्री पोलिसांच्या पिंजऱ्यात असल्याचे चित्र आहे. ते स्वत: बोलत असतानाचे चित्र आहे. त्यामुळे ते सभागृहात बसत नाही. मी मघाशी पुरवणी मागण्यांवर बोलताना म्हणालो की, ही लोकशाही आपण नोकरशाहीकडे नेत आहात. हे काय चालले आहे. रायगडच्या पालकमंत्र्यांचे जिल्हाधिकारी काहीही ऐकत नाही. हे आपण कुठल्या थराला नेणार आहात. विधिमंडळातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख आमचे नेत असून ते बोलले की, सर्व पक्षीय आमदार कलेक्टरच्या विरोधात आहोत. सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख कधीही जोरात बोलत नाही. ते कधीही वेडेवाकडे बोलत नाही. असंसदीय कधीच बोलत नाही. ते पण त्या कलेक्टरकडे जात नाही. श्री.बापट साहेब हे आपल्याला भूषणावह आहे काय ? तरी आपण यावर असे स्टेटमेंट करत असाल तर ते चुकीचे आहे. मी आज पण असे सांगतो की, सोलापूर मधील एक आमदार सोडून सर्व आमदार एकत्र आलेले आहेत. आमदारांपेक्षा कलेक्टर मोठा आहे काय ? असे असेल तर आम्हाला या सभागृहात कामच करायचे नाही. या सभागृहात आम्हाला बोलायचेच नाही. अशा प्रकारचे कामकाज होत असेल तर ते आपल्याला भूषणावह नाही. माझे तर असे म्हणणे आहे की, माजी आमदाराला देखील सन्मान मिळाला पाहिजे. आपण पण माजी होणार आहोत. आपण कोणीही कायमचा 7/12

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

लावून आलेलो नाहीत. त्यामुळे या बिलावर मला खऱ्या अर्थाने चर्चा करावयाची आहे. आम्ही हतबल आहोत. सन्माननीय मंत्री श्री.गिरीष महाजन कुठे आहेत ? आमचे पालकमंत्री हतबल आहेत. आमच्या रायगडला महिला जिल्हाधिकारी आहे. त्या कोणाचेही ऐकत नाही. ती आम्हाला भेटत नाही. आम्हाला साधा फोन करीत नाही. मी समजतो की, माझ्या एवढा ॲक्टीव्ह आमदार कोणीही नाही. आज मी 40 वर्षे काम करीत आहे. असा कुठलाही कलेक्टर नाही की, ज्याने मला फोन केला नाही. ही काय कलेक्टरची खाजगी मालमत्ता आहे काय ? ते आमचे नोकर आहेत. त्यांनी लोकप्रतिनिधीना येऊन सांगितले पाहिजे की, या या योजना असून या पद्धतीने ग्रँट येते. येथे एवढ्या योजना मिळत आहेत. ते त्यांनी आम्हाला समजावून सांगितल पाहिजे. या लोकशाहीमध्ये माझ्या सारखा अडाणी माणूस सुद्धा येथे येऊ शकतो. त्याला मार्गदर्शन करण्याचे काम आय.ए.एस.मधील अधिकाऱ्यांनी केले पाहिजे. आम्ही त्यांच्या सारखे काही शिकलेलो नाही. मी सर्व सदस्यांमध्ये सर्वात कमी शिकलेलो आहे.

सभापती महोदय, मी येथे अंत:करणाने आणि चिडीने बोलत आहे. येथे सन्मान आपल्याला मिळाला पाहिजे तसा तो अधिकाऱ्यांना देखील मिळाला पाहिजे. काही अधिकाऱ्यांकडे जाऊन मी अजूनही चर्चा करतो. मी त्यांना मानतो. पण काही अधिकारी आम्ही किस झाड की पत्ती आहे असे समजतात. आज काय चालले आहे ? या शासनामधील प्रशासकीय अधिकारी मंत्र्यांचे देखील ऐकत नाही. या शासनातील राज्यमंत्र्यांकडे कोणीही अधिकारी लक्ष देत नाही. त्याची आम्ही चर्चा करायची नाही ? सन्माननीय सदस्य बोलले ती खरी गोष्ट आहे. सभापती महोदय, आपण स्वत: एलएलएम आहात. आपण उच्च विद्याविभूषित आहात. आपण लॉ कॉलेजला प्रोफेसर होता. हा कायदा बनवित असताना त्यात धोका काय आहे ते आपण बघितले आहे काय ? कायदा करताना आपण हे बघणार आहात की नाही ? मी आपली अनेक भाषणे ऐकली आहेत, वाचली आहेत. मी माननीय श्री.खडसे साहेबांची भाषणे वाचली आहेत. असे असताना आपण आम्हाला या बिलावर न बोलण्यासाठी दाबत आहात.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, माझा दुसरा एक मुद्दा आहे. ज्या अधिकाऱ्यांना आता पर्यंत ॲन्टी करप्शनने पकडले आहे त्यापैकी किती अधिकारी घरी गेले आहेत. एक सुद्धा अधिकारी घरी गेलेला नाही. हे बिल आता घेणार आहे हे मला माहीत असते तर मी माझे सर्व पेपर घेऊन आलो असतो. पण त्यातील काही पेपर मी आता माझ्याकडे आहेत ते मी माननीय अर्थमंत्र्यांना देतो. आम्ही तत्त्वाने काम करणारे आहोत. आम्ही विचाराने काम करणारे आहोत. आम्ही आणि सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी चळवळीतून काम केलेले आहे. आपण जसे काम केले आहे तसे आम्ही देखील काम केले आहे. कोणीही नोट देतो आणि जयंत पाटलावर आरोप करतो हे चुकीचे आहे. मी घाम गाळून माझे सर्व व्यवसाय उभे केलेले आहेत. असे नसेल तर मी माझी आमदारकीच नाही तर त्याला माझे सर्व व्यवसाय देखील द्यायला तयार आहे. मी आपल्याकडे माझ्या व्यवसायासाठी कधी आलो आहे काय ? येथे उपस्थित असलेल्या कोणीही मंत्र्यांनी सांगावे. मी माझ्या कष्टाने आणि मेहनतीने माझे व्यवसाय उभे केले आहेत. व्यवसाय करणे हा गुन्हा आहे काय ? मी माझे व्यवसाय स्वत: उभे केले आहेत. या मुंबईच्या फुटपाथवर मी झोपत होतो. मी बालभारतीची 40 लाख पुस्तके छापत होतो. या कोकणात पहिले दैनिक मी काढले आहे. या कोकणात पहिले ऑफसेट मशीन जर्मनीतील हेडनबर्ग येथे जाऊन मी आणले आहे. मी बाहेर होतो. मला श्री.गडकरी साहेबांचा फोन आला की, आपल्या विरूद्ध तक्रार आहे. त्या तक्रारीची आपण आज चौकशी करावी. माझी एक इंच जागा बेकायदेशीर निघाली तर मी राजकारणातून बाहेर जाईन. माझ्या घरातील टी.व्ही., सोफासेट सर्व काही इन्कम टॅक्सला दाखविले आहे. हे सर्व मी माझ्या हिंमतीवर केले आहे. कोण पोलीस चर्चा करतो आणि टी.व्ही.वर बातमी देतो, ही काही लोकशाही आहे काय ? अशा प्रकारे कोणी कायदा वापरणार असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. मी येथे माझ्या फाईल्स आणलेल्या आहेत. मी प्रत्येक व्यवसायाची फाईल आणलेली आहे. ती मी आपणास दाखवितो. अर्थ मंत्री तर तज्ज्ञ आहात. श्रीमती मिनाक्षी पाटील या नेहमीच आपले कौतुक करीत असतात. आपण 1995 मध्ये शेवटच्या टप्प्यामध्ये मंत्री झालात. श्री.गोपीनाथ मुंडे साहेबांकडे आपण बसलो होतो. ही गोष्ट खरी आहे ना. आपल्याकडे तर अनेक डिग्री आहेत. मी माझ्या फाईल्स आपल्याकडे देतो. अशा प्रकारे आपण आपला अधिकार अधिकाऱ्यांकडे देणार आहात काय ?

3O-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

उद्या कोणी श्री. बापट साहेबांवर आरोप केले तर ते चालेल काय ?. मी मंत्री महोदय श्री.बापटसाहेबांना गेल्या 40 वर्षापासून ओळखतो. त्यांना भरपूर संधी होती. पुणे तर पेशव्यांच्या मालकीचे आहे, पुणे त्यांचेच आहे, ते स्वत: पेशवे आहेत. बापट साहेब काहीही करु शकतात. महाराष्ट्रात काही व्यक्ती अशा आहेत की, त्या वेगळया तऱ्हेने काम करीत असतात. आयुष्यामध्ये काही तत्वे पाळून कामासाठी आपले आयुष्य झोकून देत असतात. माननीय बापट साहेबांची या महाराष्ट्रात वेगळी प्रतिमा आहे. असे असतांना हे काम तुम्ही अधिकाऱ्यांच्या ताब्यात देणार आहात काय ? या निमित्ताने माझ्ी मागणी आहे की, ॲन्टी करप्शनच्या जाळयात जे जे अधिकारी अडकले, त्यांच्याकडे नोटाही मिळालेल्या होत्या. मुद्देमालासह आढळून आले तर त्यांना ताबडतोब नोकरीमधून बडतर्फ करण्याच्या संदर्भातील कायदा या सभागृहात पास झाला पाहिजे. आपण अशा प्रकारचा कायदा करु शकतो. माझ्याकडे एवढे पैसे नाहीत एवढे पैसे अधिकाऱ्यांकडे आढळून आलेले आहेत. देवमुरीचा इंजिनिअर जोशी यांच्याकडे एवढे पैसे आढळून आले होते की, हे पैसे ठेवायचे कोठे असा प्रश्न पडला होता. त्याच्या गाडीत सुध्दा पैसे आढळून आले तरी सुध्दा त्याला तुम्ही कामावर घेतले. पाच वर्षापूर्वी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत अभियंता श्री.सुनील जोशी ॲन्टी करप्शनच्या जाळयात सापडला होता परंतु त्याला पुन्हा कामावर घेण्यात आले. त्यामुळे या कायद्यात सर्व गोष्टीचा अंतर्भाव होण्याची नितांत आवश्यकता आहे. जे अधिकारी ॲन्टी करप्शनच्या सापळयात अडकतात त्या अधिकाऱ्यांची सुध्दा चौकशी झाली पाहिजे व असे अधिकारी ताबडतोब निलंबित झाले पाहिजेत अशी माझ्ी या विधेयकाच्या निमित्ताने मागणी आहे. अशा कायद्याला कोणाचाही विरोध राहणार नाही. त्यामुळे अशा प्रकारचे कायदे करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे हे विधेयक मागे घेऊन, या कायद्यात सुधारणा करुन हे बिल नव्याने या सभागृहात येण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माझ्या भागातील 10 सरपंचावर ॲन्टी करप्शची चौकशी सुरु आहे. सरपंचाला काय अधिकार असतात ? माझ्याकडे काय पॉवर्स आहेत, मी काय मंत्री आहे ? मी या विषयाच्या संदर्भात दोन-चार अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली, उच्च न्यायालयाचे ॲड.श्री.घावणे हे माझे वकील असून त्यांच्या बरोबरही मी चर्चा केली. माझी सभागृहाला मागणी आहे की, या विधेयकाच्या संदर्भात आपण सर्वांनी एकमत तयार केले पाहिजे. या विधेयकाच्या संदर्भात डॉ.रणजित पाटील यांना विनंती करीन की, विधेयकाचे काम योग्य पध्दतीने झाले पाहिजे...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

मी खंबीर आहे. परंतु सार्वजनिक जीवनात काम करीत असताना कोणी ऊठून आरोप करावयास लागले तर ते योग्य होणार नाही. उद्या सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेबांवर कोणी आरोप करावयास लागले तर आपण ते खपवून घेऊ का ? मोते साहेब कसे आहेत हे आपल्या सर्वांना माहिती आहेत.

सभापती महोदय, माझ्याकडे जवळपास 25 टीव्ही चॅनलवाले आले होते. मी म्हणालो नाही. मला चौकशी करावी लगेल. आम्ही तुम्हाला ओळखतो, तुम्ही आम्हाला ओळखता त्यामुळे तशा प्रकारची चर्चा होणार नाही. हे विधेयक फार महत्वाचे असल्यामुळे या विधेयकावर या सभागृहात सविस्तर चर्चा झाली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो. चांगले कायदे करण्याची आवश्यकता आहे. या सभागृहात येण्यासाठी किती कष्ट पडतात, किती लोकांच्या घरी जावे लागते याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. पहिल्यांदा पार्टीकडून तिकीट मिळवावे लागते, लोकांच्या घरी जाऊन, लोकांची कामे करुन या ठिकाणी आमदार म्हणून आपण येत असतो. आता आमदार होणे एवढे सोपे राहिलेले नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, 23 तारखेपर्यंत अधिवेशन सुरु राहणार आहे. त्यामुळे आता हे विधेयक मागे घ्यावे व वाटले तर बाकीची विधेयके घ्या. या विधेयकावर वकील असलेले सन्माननीय सदस्य या विधेयकाच्या निमित्ताने चांगले विचार मांडू शकतील. त्यांनी एकत्र बसून या विधेयकावर चर्चा करावी. ही संधी आपल्याला पुन्हा मिळणार नाही. याच नागपूरमध्ये माननीय हायकोर्टाच्या आदेशा प्रमाणे आपल्याला विधेयक तयार करावे लागेल असे लॉ सेक्रेटरी सांगत असल्याची माहिती मंत्री महोदय देत होते. मंत्री महोदयांनी हा दोन तीन वेळेस काढला होता, त्यावेळेस मी या सभागृहातच होतो. मी म्हणालो की, कोर्टाच्या आदेशानुसार या ठिकाणी कायदे व्हावयास लागले तर आपली या ठिकाणी गरजच काय ? जे काही कायदे करावयाचे आहे ते कोर्टच बनवेल. त्यावेळेस मी यासंदर्भात हरकत घेतली होती. 4 दिवस ते विधेयक मी या सभागृहात पेन्डींग ठेवले होते. त्यावेळेस माझ्या जोडीला सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब सुध्दा आले होते. त्या विधेयकाच्या निमित्ताने 4-5 दिवस लॉ सेक्रेटरी माझ्या घरी आले होते. नंतर त्यांनी सांगितले की, साहेब आमच्याकडून चुकी झालेली आहे. आम्ही बिल मागे

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

घेतो व सुधारणा करुन घेतो. त्यानंतर हे बिल नंतरच्या अधिवेशनात आले. विधेयक बनवितांना हायकोर्टाचा व या सभागृहाचाही अवमान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, हे विधेयक तसेच ठेवावे, वाटले तर दुसरी दोन विधेयके घेतली तरी चालेल. वाटले तर उद्या आम्ही रात्री 11 वाजेपर्यंत बसू. या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत.

सभापती : या विधेयकाचा मी अभ्यास केलेला आहे. उद्देश व कारणे यामध्ये "कॅज्यूअल" हा शब्द वापरलेला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांची इच्छा असेल तर हे विधेयक आपण उद्या घेऊ.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात मी पॉझिटीव्ह सुधारणा सुचविल्या असून मी शासनाच्या विरोधात सुधारणा सूचविलेल्या नाहीत.

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे तसेच सन्माननीय सदस्य ॲड.राहूल नार्वेकर यांनी उद्देश व कारणे यावर काही विचार मांडले आहेत. ही गोष्ट खरी आहे की, उद्देश व कारणांमध्ये मॅजीस्ट्रेट यांच्या संदर्भात उल्लेख करण्यात आलेला आहे की, casual or mechanical manner. याचा हेतू आणि मतीतार्थ असा आहे की, It is argued in front of Magistrate in a very casual and mechanical manner. जे समाज कंटक असतात त्यांना फक्त समोरच्याला ब्लॅकमेलींग करावयाचे असते, समोरच्याचा मानसन्मान घालवायचा असतो. सामाजिक जीवनामध्ये अशा लोकांना त्रास द्यावयाचा असतो आणि स्कोअर सेटल करावयाचा असतो. सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचे मी मनापासून स्वागत करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे साहेबांनी सूचना केली आहे की, मंजूरी प्राधिकाऱ्याच्या विरुध्द कर्तव्यात कसूर केल्याबद्दल उचित कारवाई करण्यात येईल. सक्षम प्राधिकाऱ्याच्या हाती सर्व देऊन टाकावयाचे आणि त्याने जर त्याच्या कर्तव्यात कसूर केली तर त्याला सुध्दा चेक बसला पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यासंदर्भात

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

त्यांच्या ज्या भावना आहेत त्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या सुध्दा आहेत असे मी समजतो. सन्माननीय सदस्यांना मी एवढेच सांगू इच्छितो की, या विधेयकाच्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांची एक वाक्यता झाली तर आपण त्याप्रमाणे करु.

सभापती : आपण हे विधेयक उद्या सुधारणासह मांडले तर काही फरक पडणार नाही. यापूर्वी आपण सुधारणसहीत विधेयके पास केलेली आहेत. त्यामुळे आम्ही हे विधेयक सुधारणासह मांडीत आहोत असे डिक्लेअर केले तर हे् बिल मान्य करुन टाकू.

3 P-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या विधेयकामध्ये सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्याशिवाय अजून बऱ्याच सूचना आहेत. या सर्व सूचनांचा साकल्याने विचार करण्यात येईल. या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही सूचना असतील, निवेदने असतील, काही सुधारणा असतील त्याचा साकल्याने विचार करण्यात येईल. हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. यापूर्वी सभागृहाने या विधेयकावर सविस्तर चर्चा केलेली आहे. तेव्हा सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती : आपण या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करावी आणि उद्या पुन्हा नव्याने विधेयक मांडावे.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, आज आपण हे विधेयक मंजूर केले आणि उद्या ते न्यायालयात चॅलेंज झाले तर आर्ब्रीट्ररी ग्राऊंडवर हे विधेयक स्ट्रक डाऊन होईल. आज आपण असे म्हणत आहात की, उद्देश आणि कारणे हे विधेयकाचा भाग नाही. परंतु माझ्या मते ते या विधेयकाचे ड्रायव्हींग फोर्स आहे. जर विधेयकातील उद्देश आणि कारणे बरोबर नसेल तर it won't stand the test of legality. मंत्री महोदयांनी सांगितले की, कोर्टात आर्ग्युमेट कॅज्युअली होतात. पण यामध्ये आर्ग्युमेंट हा शब्दच नाही. यामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, "... it has been exercised by the Magistrate in a mechanical or casual manner."

सभापती : मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, हा तांत्रिक मुद्दा आहे. एक वकील म्हणून माझे स्वत:चे असे मत आहे की, जरी उद्देश व कारणे हे विधेयकाचे भाग नसले तरी कित्येक वेळा ते कोर्टात कोट केले जातात. तेव्हा मला असे वाटते की, सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आपण हे विधेयक पुन्हा रिइंट्रोडयुस करावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, आपण व्यक्त केलेली भावना योग्य आहे. सन्माननीय सदस्य ॲड.राहूल नार्वेकर यांनी मांडलेला मुद्दा देखील योग्य आहे. विधानमंडळाने चर्चा करून मंजूर केलेले विधेयक अडचणीत येऊ नये. तेव्हा आपण व्यक्त केलेली भावना योग्य आहे. या संदर्भात माननीय मंत्र्यांनी उद्या बैठक घ्यावी. परवा या विधेयकावर कोणतीही चर्चा न करता हे विधेयक मंजूर करावे. त्यावेळी कोणीही आक्षेप घेऊ नये अन्यथा पुन्हा विधेयकावर चर्चा होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या विरोधात जावे अशी आमची कधीही भावना नाही. कारण त्यांचा हेतू शुद्ध आहे. हे विधेयक पुन्हा मांडण्याचे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. आपण सांगितले की, उद्या सन्माननीय सदस्यांसोबत बैठक घ्यावी. आपण सभागृहात चर्चा केली तर त्यास आमची हरकत नाही, परंतु त्यामध्ये बराच वेळ जाईल. या विधेयकावर अगोदर चर्चा झालेली आहे आणि आताही चर्चा झालेली आहे. आपण चर्चेला नाही म्हणत नाही. फक्त त्याची कालमर्यादा ठेवावी. आपणास बैठकीमध्ये चर्चा करावयाची आहे, की सभागृहात चर्चा करावयाची आहे ?

सभापती : माननीय मंत्री महोदयांच्या दालनात चर्चा घ्यावी.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, आपण तीन विधेयकांवर चर्चा करणार होतो. परंतु माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले की, दोन विधेयकांवर चर्चा करावी. आपणही तसेच म्हणालात. आता हे विधेयक प्रलंबित राहिलेले आहे, तेव्हा आपण अजून दोन विधेयकांवर चर्चा करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक

L. C. BILL NO. LIV OF 2015 (A BILL TO AMEND THE MAHARASHTRA NATIONAL LAW UNIVERSITY ACT, 2014.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

श्री.रविंद्र वायकर (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 54- महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, 2004 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 54 -महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, 2004 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

सभापती : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांचा प्रस्ताव आहे, तो त्यांनी मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, सन 2015चे वि.स.वि.क्रमांक 54 वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सदरहू विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव दिलेला होता, परंतु तो प्रस्ताव मी मांडलेला नाही. या विधेयकाच्या अनुषंगाने मी दोन-चार महत्वाच्या सुधारणा करु इच्छितो. शासनाने त्या सुधारणांचा विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या विधेयकात विद्यापीठाने मंजुरी दिलेल्या पदावर महाविद्यालयात विधि प्राध्यापक असलेली व्यक्ती कुलगुरुच्या पदावरील नियुक्ती करण्यास पात्र ठरण्यासाठी तरतूद केलेली आहे. या संदर्भात माझी अशी सुधारणा आहे की, त्या व्यक्तीला महाविद्यालयात विधि विषय शिकविण्याचा पाच वर्षाचा अनुभव असावा आणि विद्यापीठात किमान दोन वर्षाचा अनुभव असावा. कोणीतरी आला आणि कुलगुरु झाला हे योग्य दिसणार नाही. मी जी सुधारणा सांगितलेली आहे ती आपणास स्वीकारावयाची असेल तर दुधात साखर आणि आपणास ती स्वीकारावयाची नसेल तर ती सुधारणा मी मागे घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, मी सभागृहाला पुनश्च विनंती करतो की, सभागृहाने हे विधेयक विचारात घ्यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-54 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 54 संमत झाले आहे.

...3Q-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शाहू महाराज जयंतीच्या तारखेबाबत झालेल्या चर्चेबाबत

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी सभागृहामध्ये शाहू महाराजांच्या जयंतीच्या तारखेबाबत चर्चा झाली. मी माझ्या दालनात ती चर्चा ऐकली. सामान्य प्रशासन विभागाने शाहू महाराजांची जयंती दिनांक 26 जुलै 2016 रोजी असल्याबाबतचे पत्रक काढल्याबाबतची ती चर्चा होती. महोदय, सामान्य प्रशासन विभागाने काढलेले पत्रक मी सोबत आणलेले आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 30 नोव्हेंबर, 2015 शासन परिपत्रक क्रमांक : जपूती-2215/279/प्र.क्र.285/29 अन्वये शाहू महाराजांची जयंती रविवार, 26 जून, 2016 रोजी असल्याचे नमूद केले आहे. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी ही बाब तपासून बघितली. कारण हा विषय फार संवेदनशील आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 30 नोव्हेंबर, 2015 रोजीच्या परिपत्रकामध्ये शाहू महाराजांच्या जयंतीची तारीख 26 जून दर्शविलेली आहे.

सभापती : ठीक आहे. आवश्यकता वाटली तर मी सुध्दा ही बाब तपासून घेईन.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझ्याकडे सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक 30 नोव्हेंबर रोजीचे परिपत्रक आहे. सामान्य प्रशासन विभागाचा जो शासन निर्णय आहे त्यामध्ये शाहू महाराजांची जयंती 26 जुलै रोजी असल्याचे नमूद केले आहे. माझ्याकडे आता दोन्ही प्रती आहेत. त्या दोन्ही प्रती मी आपल्याला देतो. कारण असे होता कामा नये की, मी चुकीचे रेकॉर्डवर आणले आहे. माझ्याकडे असलेल्या परिपत्रकामध्ये सर्व राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या जयंती व पुण्यतिथीच्या तारखा नमूद आहेत.

सभापती : ठीक आहे. आपण दोघांनीही माझ्याकडे परिपत्रके द्या. आवश्यकता वाटली तर आपण दुरुस्ती करु या.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय उपस्थित झाल्यानंतर मी नेटवर जाऊन दिनांक 30 नोव्हेंबर, 2015 रोजीचे परिपत्रक शोधले. त्यामध्ये शाहू महाराजांच्या जयंतीची तारीख 26 जून, 2016 अशीच नमूद केलेली आहे.

सभापती : ठीक आहे. आपण दोन्ही परिपत्रके माझ्याकडे द्या. मी तपासून घेतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3Q-2

SJB/ 22:20

सभापती....

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या बुधवार, दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी सकाळी 10.00 वाजता घेण्यात येईल. सकाळी 10.00 ते दुपारी 12.45 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येइल. उक्त बैठकीत नियम 260 अन्वयेच्या दुष्काळ विषयाच्या प्रस्तावावरील चर्चा माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह पूर्ण करण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभा□हाची बैठ□ रात्री 10 वाजून 23 मिनिटांनी बुधवार, दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्था□त झाली)

)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही